सं. १९८२५
म. ग्रं. मं. ठाणे
विषय
ग्रं. नं. ३५०

...त-संशोधक-मंडळ-पुरस्कृत
ग्रंथ-माला.

ग्रंथ १ ला.

# मठगांवचा शिलालेख
आणि
# ब्राह्मण सामंत राजवंश.

REFBK-0002812

वा. अ. वांबर्डेकर.

स्था १०२५

मराठी ग्रंथसंग्रहालय- ठाणे

या संस्थेस

ग्रंथकर्त्याने हे पुस्तक नजर केले असे.

मुंबई. मिति आषाढ शु

तारीख जुलै सन

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ-पुरस्कृत ग्रंथ-माला, ग्रंथ १ ला.

# मठगांवचा शिलालेख

आणि

# ब्राह्मण सामंत राजवंश

लेखक

वासुदेव अनंत बांवर्डेकर.

REFBK 0002812

REFBK-0002812

मुंबई.

शके १८४७ ] [ सन १९२५

किंमत दोन रुपये.

मुद्रक—रा. **चिंतामण सखाराम देवळे**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स्
ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, मुंबई.

प्रकाशक–**वासुदेव अनंत बांबर्डेकर.**
फणसवाडी, मुंबई नं. २.

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

ग्रं. ३३५

# प्रस्तावना.

आज कोंकणप्रांत कोणत्याहि प्रचलित बाबतींत महाराष्ट्रीय विद्वानांच्या नजरेंत फारसा असल्याचें दिसून येत नाहीं; मग त्याच्या प्राचीन इतिहासाची त्यांस जिज्ञासा नसल्यास नवल काय ? यांत विशेष खेदाची गोष्ट अशी कीं, महाराष्ट्रांतील आजचे बरेचसे विद्वान्, ते स्वतः किंवा त्यांच्या मागची पिढी, मूळचे कोंकणचे रहिवासी असून, त्यांच्यापैकीं इतिहाससंशोधनकार्यास वाहून घेतलल्यांच्या हातून दुसऱ्या प्रांताच्या इतिहासावर जितके परिश्रम झाले व होत आहेत, त्याच्या शतांशानेंहि या त्यांच्या जन्मभूमीकरितां झालेले नाहींत. यामुळें आजपर्यंत त्यांनीं जमविलेल्या अवाढव्य ऐतिहासिक सामग्रीमध्यें कोंकणप्रांताच्या वांट्यास महत्वाचे असे दहा पांचच लेख आले असतील ! अशाच एका लेखाचा या पुस्तकांत प्रामुख्यानें आम्हीं विचार केला आहे. ह्या लेखानें रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे या विख्यात शोधनपटु विद्वानाकडून वेंगुर्ल्याजवळील मठगांवांतील एका शिलालेखाचें प्रसिद्धिकार्य झालें आहे. इतिहासविषयाच्या आवडीनें गेल्या कांहीं वर्षांत दक्षिण कोंकणप्रांताच्या प्राचीन इतिहासाची थोडीबहुत माहिती आह्मीं मिळविली तिच्यावरून, रा. राजवाडे आणि त्यांच्या मागून 'सावंतवाडी संस्थानचा इतिहास' कर्ते रा. रा. विठ्ठल पुरुषोत्तम पिंगुळकर यांनीं या लेखास धरून केलेलीं विधानें चुकीचीं असल्याचें आह्मांस दिसून, तसें दाखविणारा एक सुमारें ५० पृष्ठांचा शोधनिबंध आम्हीं गेल्या वर्षी मे महिन्यांत पुणें येथील भारत–इतिहास–संशोधक–मंडळाच्या द्वादशसंमेलनप्रसंगीं वाचावयास पाठविला; आणि तो सभासदांस पसंत पडल्यास, मंडळाच्या परवानगीनें स्वतंत्र पुस्तकरूपानें छापणार आहों असेंहि चिटणिसांस कळविलें. त्यास अनुसरून चिटणीस रा. दत्तो वामन पोतदार, बी. ए., यांनीं तो मंडळास सादर करून, पसंतीपत्रासह आमच्याकडे मिति श्रा० शु० ८ शके १८४६ (ता. ८ ऑगस्ट १९२४) रोजीं परत पाठविला; आणि खासगी सूचना केली कीं, "जसे आपण शिक्क्यांचे ठसे करविले (हे मूळ निबंधाबरोबर कागदास चिकटवून पाठविले होते. ले.) तसेच मठशिलालेख, व कांहीं कागद यांचे अस्सलांवरून ब्लॉक करवून जोडावे, म्हणजे ग्रंथाचें प्रामाण्य वाढेल." निबंध स्वतंत्रपणें प्रसिद्ध करावयाचें ठरल्यास, सामान्य वाच-

कांचीहि खात्री होईल इतका सर्व तऱ्हेचा भरपूर पुरावा देण्याची आमचीहि इच्छा होतीच; त्यास प्रो. पोतदार यांचा असा दुजोरा मिळाल्यावर आम्हीं तसा निश्चयच केला. त्यामुळें निबंधाचें लहानसें स्वरूप बदलून त्यास प्रस्तुत पुस्तकाचें रूप आलें. तसेंच मूळ निबंधांत शिलालेख मराठे सावंतांचा नव्हे एवढीच गोष्ट मुख्यतः दाखवून तो ब्राह्मण सामंतांचा असावा हें फक्त सूचित केलें होतें, तें आतां या पुस्तकांत विशेष प्रामुख्यानें मांडल्यामुळें मूळ नांवांतहि तसा फरक करून पुस्तकास प्रस्तुतचें नांव देणें आह्मांस योग्य वाटलें.

पुस्तकांत मुख्य मजकुरास आधारभूत आणि क्वचित् स्पष्टीकरणार्थ अवश्य म्हणून खालच्या बाजूस बऱ्याच टीपा दिल्या आहेत; त्यांचा त्या प्रांताचा तत्कालीन आणि पूर्वीचा थोडासा इतिहास समजण्याकडेहि उपयोग होईल. विषयप्रतिपादनांत आलेल्या कांहीं महत्वाच्या मुद्यांवर ऐतिहासिक दृष्ट्या बरीच उपयुक्त अशी माहिती शेवटीं ' टिप्पणी ' या सदरांत दिली आहे. जुने कागदपत्र शक्य तितक्या काळजीपूर्वक मूळाबरहुकूम शेवटीं परिशिष्ट या सदरांत कालानुक्रमानें छापिले असून त्यांतील मजकुराच्या स्पष्टीकरणार्थ टीपाहि दिल्या आहेत. त्यांतील कांहीं कागदांचीं, तसेंच एका ताम्रलेखाचें आणि कित्येक स्थळांचींहि छायाचित्रें पुस्तकाच्या मुख्य भागांत दिलीं आहेत.

अशा तऱ्हेनें निरनिराळ्या अंगांनीं या पुस्तकाची उठावणी व्हावयास बऱ्याच सद्‌गृहस्थांचें आह्मांस साहाय्य झालें आहे ही गोष्ट आह्मीं कदापि विसरणार नाहीं. पण त्यांतून फक्त निवडक व्यक्तींचाच येथें नामनिर्देश करणें जरूर आणि शक्य आहे, तो येणेंप्रमाणें:—सावंतवाडी दरबारनें कांहीं हरकत न घेतां आपल्या संग्रहांतील कांहीं महत्वाच्या शिक्क्यांचे ठसे दिले; गगनबावड्याचे संस्थानिक श्रीमंत माधवराव मोरेश्वर ऊर्फ बाळासाहेब पंतअमात्य यांनीं इतिहासप्रेमानें आणि सौजन्यानें संस्थानच्या अनेक दप्तरांतून आम्हीं मागितलेल्या कागदांपैकीं तीन कागद शोधून काढवून आम्हांस पाठवून दिले; 'सावंतवाडी संस्थानचा इतिहास' कर्ते रा. पिंगुळकर यांनीं त्यांच्या इतिहासांतील शंकास्थळांबद्दल आम्हीं पत्रद्वारें विचारिलेल्या प्रश्नांस कांहींशा मोकळ्या मनानें वेळोवेळीं उत्तरें दिलीं; मालवणचे रहिवासी रा. रा. रामराव देसाई यांनीं आपल्या घराण्यांतील शिक्का दिला; दुसऱ्या कांहीं गृहस्थांनीं आपल्या घराण्यांतील महत्वाचे

कागद दिले; तसेंच एलफिन्स्टन कॉलेजचे पर्शियन भाषेचे प्रोफेसर शेख एम्. ए., यांनीं आह्मी नुसती विनंति करतांच अत्यंत उत्साहानें काळजीपूर्वक रामजी प्रभूचा शिक्का वाचण्याचे श्रम घेतले; मुंबईचे डॉ. वसंत गंगाराम रेळे, एल्. एम. ॲन्ड एस्., एफ्. सी. पी. एस्, यांनीं वेळांत वेळ काढून कित्येक तास एकसारखें खपून आपल्या ज्योतिर्गणितज्ञानाचा फायदा आह्मांस दिला; तसेंच अंकलेश्वर येथील दिगंबर जैनपंचांनीं सजोद येथील श्रीशीतलनाथ या दिगंबर जैनमूर्तीचें, आणि मुंबईचे प्रसिद्ध फोटोग्राफर देव्हारे यांनीं ( किंमत घेऊन ) स्वतःच्या संग्रहांत असलेलें अबू पर्वतावरील श्वेतांबर जैनमूर्तीचें, छायाचित्र दिलें; आमचे स्नेही रा. रा. बाळकृष्ण अनंत पाटील देसाई यांनीं आपल्याकडे असलेली माहिती देऊन, शिवाय पुस्तकछपाईच्या कामीं, व ते स्वतः आर्टिस्ट असल्यामुळें ब्लॉक्स वगैरे करून घेण्याच्या कामीं, आपल्या अनुभवाची जोड देऊन तीं कामें उत्साहानें पार पाडिलीं; आणि शेवटीं पुण्याच्या भारत–इतिहास-संशोधक–मंडळानें आमच्या या अल्पशा प्रयत्नाचा[१] थोर मनान पुरस्कार केला. या सर्वांचे आम्हीं अत्यंत आभारी आहों.

आतां गैरसमज न व्हावा ह्मणून येथेंच त्याबद्दल दोन शब्द सांगून टाकणें आम्हांस अवश्य वाटतें. प्रस्तुत पुस्तक हें ठिसूळ इमारत मोडून त्याच जागीं नवीन भरभक्कम इमारत उभारण्याच्या स्वरूपाचें आहे. मोडतां मोडतां कित्येक ठिकाणीं साहजिकच विशेष जोराचे धक्के बसतात, पण ते जसे इमारत बांधणाऱ्यास लागत नाहींत, त्याच न्यायानें, आमची टीका कांहीं स्थळीं कठोर झाली असेल तर ती त्या त्या व्यक्तींच्या मनास लागावी अशा हेतूनें आम्हीं ती केलेली नाहीं. रा. राजवाड्यांसारख्यांची चूक या एका बाबतींत दाखविल्यानें, त्यांच्या दुसऱ्या हजारों अचूक अनुमानांचें यश, आणि तें मिळविण्याकरितां त्यांनीं वर्षानुवर्ष घेतलेले श्रम, आम्हीं पूर्णपणें जाणत आहों; अर्थात् त्यांच्या सारख्या या विषयावरील अधिकारी पुरुषाचें मन दुखविण्याचें धाष्टर्य आमच्या हातून होणें नाहीं. तसेंच रा. पिंगुळकरांनीं आपला इतिहास श्रमपूर्वक लिहिला आहे यांत संशय नाहीं; पण कित्येक स्थळीं त्यांस आधार तोलतां न येऊन कल्पनेवर आणि स्थानिक परिस्थितीवर विसंबून त्यांनीं विधानें केलीं आहेत–तेवढ्या पुरतीच आमची टीका, बाकी व्यक्तिशः त्यांची आमची ओळखहि नाहीं ! ह्मणून आमच्या टीकेंत

---

१ सबंध पुस्तक छापून झाल्यावर मंडळाकडे पाठविलें होतें.

कांहीं कमजास्त शब्द दिसल्यास ते आह्मांस क्षमा करितील अशी आशा आहे.

विषयप्रतिपादनाच्या ओघांत आम्हीं रा. पिंगुळकरांनीं दिलेले सावंतांचे प्राचीन पूर्वज आणि सावंतांची सूर्यवंशाशीं बांधलेली सांगड हीं दोन्ही ऐतिहासिक सत्यें नव्हत हें पुराव्यानिशीं दाखविलें आहे; आणि सावंतवाडी संस्थानाधिपति हिज हायनेस श्रीमंत राजेबहादर खेमसावंत भोंसले ऊर्फ बापूसाहेब सरदेसाई हे कल्पनिक व्यक्ति स्वतःचे पूर्वज मानण्यांत भूषण नाहीं हें समजण्याइतके सुविद्य असून त्यांस ऐतिहासिक दृष्टीचीहि चांगलीच ओळख असल्याचें त्यांच्याशीं थोडावेळ संभाषण करण्याचा आह्मांस लाभ मिळाला त्यावरून आमच्या अनुभवास आलें आहे. ह्मणून आम्हीं श्रीमंतांस असें सुचविण्याची परवानगी घेतों कीं, त्यांनीं आपल्या संस्थानचा इतिहास, जुने कागदपत्र जमवून आणि इतर माहिती मिळवून आधुनिक चिकित्सेच्या कसोटीस उतरले असा लिहवावा. त्या प्रांतांत अजूनहि बरीच ऐतिहासिक सामग्री मिळण्याचा संभव आहे, संस्थानचें दप्तर आणि सावंतांच्या जुन्या चिटणीस–सबनिसांकडे मिळणारे संस्थानसंबंधी कागद हे तर श्रीमंतांच्या हातांतच असल्याप्रमाणें आहेत; यामुळें इतिहास लिहिणें फारसें कठिण जाणार नाहीं. दंतकथांत इतिहास मुळींच नसतो असें आमचें म्हणणें नाहीं; पण रा. पिंगुळकरांच्या इतिहासांत अशा कांहीं कथांवर चिकित्सा न करितां मर्यादेच्या पलीकडे विश्वास ठेविलेला दिसतो. उदाहरणार्थ, त्यांनीं दिलेल्या वंशवृक्षांतील पहिला खेम सावंत याचा इतिहासः म्हणजे, तो विजापूरकरांचा कुडाळप्रांतावरील देशमुख होता; पुढें समाधि साधण्याइतका योगाभ्यासी झाला; समाधिस्थितींत असतांना, केवळ देहाची हालचाल बंद झालेली पाहून त्याचें देहावसान झालें या समजुतीनें त्याचें दहन केलें; परशुराम भारती यांस इकडे योगबलानें ही हकीगत समजतांच ते आपल्या शिष्याची ( खेम सावंताची ) समाधि उतरण्यासाठीं बांद्यापर्यंत आल्यावर खेमसावंताच्या चितेवर बंदुकांचे काढलेले आवाज ऐकून ते परतले; खेमसावंताचें माठें ओटवण्यांत आहे; इत्यादि. यांतील एकहि विधान चिकित्सेला टिकणार नाहीं. वास्तविक सावंतांच्या सत्तेचा संस्थापक लखम सावंत दिसतो. तो पराक्रमी होता, त्यानें ब्राह्मण सरदेसायास मारून त्याचा मुलूख घेतला, शिवाजीशीं दोन हात केले, विजापूरकरांशीं राजकारण केलें, बऱ्याच लढाया मारिल्या. अशा कर्त्या पूर्वजाच्या माठ्याचें ठाव ठिकाण नसतां साधारण प्रतीच्या पूर्वजांचीं माठीं असावीं हें शक्य दिसत नाहीं. यावरून बहुधा खेमसावंताचें

म्हटलें जाणारें ओटवणें येथील माठें वस्तुतः लखम सावंताचेंच असावेंसें दिसतें. खेमसावंत म्हणून व्यक्तीच नव्हती असें आमचें म्हणणें नाहीं. तो माणगांवतर्फे-वरचा एक नाईक होता इतकेंच म्हणतां येईल. पण लखम सावंताच्या कांहीं गोष्टी आणि दुसऱ्या खेमसावंताचे पराक्रम मागच्या खेमसावंताच्या माथीं मारून सावंतांनां शक्य तितकें प्राचीन बनविण्याचा हा प्रयत्न आहे एवढेंच आमचें म्हणणें. श्रीमंत बापूसाहेब सरकार आमच्या या सूचनेचा विचार करितील अशी आशा आहे. असो.

वाचकांनीं शुद्धिपत्र पहावयास विसरूं नये. पुस्तकांतील स्वतःस वाटणारीं दोषस्थळें कोणी सद्धेतुपूर्वक दाखविल्यास त्यांचे आह्मी आभारी होऊं. पुस्तक छापा-वयास सन १९२४ त देऊन तें १९२५ त बाहेर पडल्यामुळें " चालू वर्ष " ह्मणजे १९२४ समजावयाचें. आह्मीं स्वतःचा उल्लेख ' ले. ' आणि क्वचित् ' ग्रं. ' असा केला आहे.

आतां प्रस्तुत पुस्तकाचें हें बऱ्याच जोखमीचें, खर्चाचें आणि त्रासाचें काम निर्विघ्नपणें पार पडलें, याबद्दल त्या जगन्नियंत्याचे आभार मानून ही प्रस्तावना संपवितों.

मुंबई–मिति, ज्येष्ठ शु. ६ शके १८४७
गुरुवार तारीख २८ मे सन१९२५

**ग्रंथकर्ता.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

# भारत-इतिहास-संशोधक-मंडळाकडून पुरस्कार.

आमच्या मंडळाचे सभासद रा. वासुदेव अनंत बांबर्डेकर, मिंट, मुंबई, यांनीं मंडळाच्या द्वादश संमेलनांत ' मठगांवचा शिलालेख आणि वाडकर सांवत भोंसले ' या विषयावर निबंध लिहून पाठविला होता, तो संमेलनांत वाचून दाखविण्यांत आला होता. रा. बांवर्डेकर यांची इच्छा आपल्या निबंधावर संमेलनाचा अभिप्राय कळावा अशी होती. शोधविषयक निबंधाविषयीं तांतडीनें अभिप्राय व्यक्त करणें धोक्याचें असतें. ' निबंधांतील म्हणण्याचा विचार करण्यासारखा आहे, निबंध छापून प्रसिद्ध झाल्यावर जिज्ञासू व तज्ज्ञ सावकाश विचार करतील ' असा साधारणपणें अभिप्राय प्रगट झाला आणि तो रा. बांबर्डेकर यांस इकडून कळविला. पुढें आपला निबंध स्वतःच छापण्याचा रा. बांवर्डेकर यांनीं हेतु दर्शविला आणि निबंध मंडळांत वाचला यासाठीं त्याचें श्रेय मंडळाचे पदरांत आपल्या खर्चानें पाडण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली. मंडळांत याच सुमारास ' भा. इ. सं. मंडळ-पुरस्कृत ग्रंथ-माला ' या नांवाची एक माला काढावी असा विचार चालू होता. या मालेंतील ग्रंथ मंडळाकडून प्रसिद्ध होणार नाहींत, परंतु ग्रंथांतील किंवा निबंधांतील शोधाचे व माहितीचे दृष्टीनें जे ग्रंथ किंवा निबंध विचारी जनतेपुढें येण्याजोगे आहेत अशा ग्रंथांस मंडळाचे छायेंत नांदण्यास सवड द्यावी असें मंडळास वाटेल तेच ग्रंथ या मालेंत प्रसिद्ध होतील. प्रसिद्धीकरण मंडळ करणार नाहीं, पण मंडळाचे सभासदांस मात्र हे ग्रंथ पाहिजे असल्यास सवलतीनें मिळतील. अशी योजना घाटत होती ती रा. बांबर्डेकर यांस मानवली आणि म्हणून हाच त्यांचा निबंध या पुरस्कृत-ग्रंथ-मालेपैकीं पहिला होत आहे.

रा. बांबर्डेकर यांचा निबंध वादग्रस्त आहे. कुडाळदेशकर ब्राम्हण सामंत सरदेसाई* हेच मूळ कुडाळसत्ताधीश होते आणि वाडकर मराठे सावंत ह्यांनीं मागाहून त्यांची सत्ता बळकाविली, इतकेंच नव्हे तर शिक्क्यांची

---

* या ठिकाणीं प्रो. पोतदार यांचा थोडा गैरसमज झाल्याचें दिसतें. कारण सरदेसाई हा हुद्दा सामंतांचा नसून, सामंतांच्या मागून सत्ताधीश झालेल्या त्यांच्याच ज्ञातीच्या प्रभु घराण्याचा होय; वाडकर मराठे सांवतांनीं सत्ता बळकाविली ती या प्रभूंकडून, तत्पूर्वीच्या सामंत राजांकडून नव्हे. ग्रंथकर्ता.

व नांवांची कांहीं घालमेल वाडकर सावंत यांचे बाजूकडोन झाली, असें रा. बांबर्डेकर यांचें मत होऊन तें त्यांनीं या निबंधांत साधार प्रतिपादण्याचा यत्न केला आहे. त्यांचा रोख सावंतवाडी संस्थानचे इतिहासकार रा. पिंगुळकर यांजवर आहे व क्वचित् पिंगुळकर यांचे हेतूविषयींहि त्यांनीं शंका घेतल्याचा संशय येतो. आमचे मतें रा. पिंगुळकर काय किंवा बांबर्डेकर काय कोणाचेच हेतूंविषयीं वाचकांनीं शंका घेऊं नये. सत्यनिर्णय हेंच सर्वांचे साध्य समजावें आणि धडधडीत निखालस पुरावा असल्याखेरीज हेतुशोधनाच्या आडरानांत शिरूं नये. तसेंच ज्ञातिविषयकहि कांहीं विधानें रा. बांबर्डेकर यांनीं विवेचनाचे ओघांत सूचित केलीं आहेत. कुडाळदेशकर ब्राह्मण आणि शेणवी यांची चुरस होती आणि त्यामुळें एकमेकांचें नुकसान करण्याचा क्षुद्र प्रयत्न उभय *ज्ञातींतील दुस्साही गृहस्थांनीं केला असणें निःसंशय संभवतें; परंतु तेवढ्यावरून ज्ञातिविषयक व्यापक अनुमानें बांधणें युक्त होणार नाहीं. कित्येक देशहितेच्छु विद्वानांचें असें म्हणणें ऐकण्यांत येतें कीं " जुना इतिहास उकरून काढून उगाच जुने वाद पुढें आणणें म्हणजे राष्ट्रांत कलहाला निष्कारण चेतना देणें होय." आमचें मत तसें नाहीं. आम्ही सत्य हें प्रधान, अभंग आणि अंतीं उपकारक समजतों आणि त्याचा निर्णय होण्यासाठीं जुनी स्थिति, प्रसंग, व्यक्ति, इतिहास हे सर्व नीट खरे खोटे पारखून पाहणें अगत्याचें आहे. ही पारख करतांना आपली बुद्धि कलुषित होऊं दिली नाहीं म्हणजे झालें. जशी पृथ्वी ही जवळून पाहिली तर तीवर खोल दऱ्या आणि उंच पर्वत दिसून ती फारच उंच सखल असावी असें वाटतें, परंतु दुरून अंतराळांतून तिजकडे दृष्टि फेंकली तर ती अगदीं साफ वाटोळी चेंडूप्रमाणें दिसते आणि मग तीवरील दरीपर्वताचे खांचखळगे बुजून गेल्यासारखे होतात. तोच प्रकार इतिहासांतहि घडतो. अदूरदृष्टि जे असतात त्यांस जातिवैगुण्याच्या किंवा व्यक्तिवैगुण्याच्या खोल दऱ्यांत सांपडल्यामुळें, किंवा

---

*या ठिकाणीं प्रो. पोतदार उभय ज्ञातींतील व्यक्तींस दोष देऊं पाहतात, तें बरोबर नाहीं. कुडाळदेशकर ज्ञात सत्ताधीश असलेल्या मुदतींत, शेणवी ज्ञातीस तिच्याकडून त्रास पोंचण्याचें दूरच, पण उलट आश्रय मिळाला; आणि तिची सत्ता गेल्यानंतर, म्हणजे सावंतांच्या राज्यांत, शेणवी ज्ञात अधिकारारूढ झाल्यामुळें, तिला कुडाळदेशकरांकडून उपसर्ग पोंचणेंच शक्य नसून, तिलाच उलट कुडाळदेशकरांचें नुकसान करण्याची संधि मिळाली. ग्रं.

उलटपक्षीं जातिमाहात्म्याचे किंवा व्यक्तिमाहात्म्याचे उंच पर्वत आड आल्यामुळें, चुकल्याचुकल्यासारखें होऊन ते बावरून बहकूं लागतात. परंतु जे दूरदृष्टी प्रज्ञावंत आहेत ते माहात्म्यवैगुण्याचे उंचवटे किंवा खोलवटे यांनीं न भांबावतां दुरून योग्य अंतरावरून सम्यग्दर्शनाचें सुख भोगतात आणि मग जवळूनहि नजर फिरवितांना बावचळत नाहींत. असे उभयदृष्टि सव्यसाची पुरुष राष्ट्राला सम्यग्दृष्टि देतात आणि सत्यमार्ग चोखाळण्यास समर्थ करतात.

असो. रा. बांबर्डेकर यांनीं मठगांवच्या शिलालेखासंबंधानें आणि मांगसावंताच्या संशयित अस्तित्वासंबंधानें बरेच आधार देऊन विवेचन केलेलें आहे आणि त्यांनीं जरी रा. पिंगुळकर यांस अनुमानांवर इमारत रचण्याचा दोष दिला आहे तरी त्यांनांहि अनुमान[१]प्रमाणाचा त्याग करतां आला नाहीं. अद्यापि या प्रश्नावर अधिक विश्वसनीय माहिती साधार पुढें यावयास पाहिजे. त्याखेरीज निर्णय देणें कठीण आहे. मांग सावंतांचा आणि मठाचा संबंध रा. पिंगुळकर यांनींच[२] प्रथम लावला अशांतला प्रकार नाहीं. Sawantwadi Gazetteer मध्यें ( १८८० ) हाच प्रवाद नमूद केला आहे.

रा. बांबर्डेकर यांनीं आपल्या म्हणण्याची खात्री पटण्यासाठीं मूळलेख व त्याच्या प्रतिमा दिल्या आहेत. त्यांचेजवळील कित्येक कागद आम्हीं स्वतः पाहिलेले होते आणि त्यावरून जुने कागद त्यांनीं परिश्रमानें चांगले जमा केले आहेत असें दिसलें आणि वाटलें कीं, असे कागदच आधीं मिळवून ते सटीप व शुद्ध असे जर कोणी प्रसिद्ध करील तर लंगड्या अनुमानांचा लपंडाव कोणांस खेळावा लागणार नाहीं. यासाठीं रा. बांबर्डेकर यांस आमची अशी विनंति आहे कीं त्यांनीं ऐतिहासिक साधनें आधीं जमा करावीं आणि संगतवार लावून टीपा देऊन प्रसिद्ध करावीं म्हणजे मग साकल्यानें विचार करून त्यांतून निर्बाध असें ऐतिहासिक सत्य मंथून काढतां येईल.

---

१ परंतु रा. पिंगुळकरांचीं निराधार आणि आमचीं साधार अनुमानें सारख्याच दर्जाचीं आहेत असें प्रो. पोतदार मनतात कीं काय कळत नाहीं ! ग्रं०

२ पण तसें आह्मीं ह्मटलेलेंच नाहीं; आमचें ह्मणणें एवढेंच कीं पूर्वींच्या ग्रंथांतील प्रवाद कितीसे साधार आहेत हें पाहण्याची रा. पिंगुळकरांनीं तसदी घेतलेली नाहीं. ग्रं०

रा. पिंगुळकर यांचे पुस्तकावरून त्यांनीं जुने कागदपत्र फारसे मिळवून पाहिलेले दिसत नाहींत, त्यामुळें त्यांची कदाचित् चूक झाली असेल. आणि अशी चूक वाटणारी माहिती रा. बांबर्डेकर यांनीं दुरुस्त करण्यासाठीं पुढें यावें आणि फुरसत काढून व मेहनत घेऊन विषय साधार लोकांपुढें मांडावा हें त्यांस निःसंशय फार भूषणावहच आहे.

छायाचित्र १४ मध्यें वास्तविक शब्द ' जिवानसीं ' असाच आहे. तें अक्षर ' षी ' नाहीं. अशा आणखी कांहीं किरकोळ सूचना आम्हांस करावयाच्या आहेत परंतु त्यांस हें स्थळ नव्हे.

रा. वासुदेवराव बांबर्डेकर हे अत्यंत साक्षेपी आणि दक्ष आहेत असा अनुभव आला आणि त्यांचे ठिकाणीं कळकळ चांगलीच आहे असेंहि दृष्ट्युत्पत्तीस आलें. यामुळें त्यांचा प्रयत्न एकंदरींत वाखाणण्यासारखाच झाला आहे आणि त्यांस हरएकप्रकारें उत्तेजन दिलें पाहिजे. उलट पुरावा खात्रीलायक पुढें येईल तर रा. बांबर्डेकर त्याचाहि विचार करतील.

शेवटीं रा. बांबर्डेकर यांचें या त्यांच्या परिश्रमाबद्दल व मंडळावरील प्रीतीबद्दल अभिनंदन करून त्यांचे हातून इतिहासाची अशीच सेवा उत्तरोत्तर घडो अशी आशा व्यक्त करून हा अभिप्राय पुरा करूं.

वैशाख व. ३०/४७
पुणें.

**दत्तो वामन पोतदार,**
चिटणीस, भा. इ. सं. मंडळ, पुणें शहर.

स ग्र हा ल य
भा.
ना.

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ...
ता. ...
ग्रा. ना.

# अनुक्रमणिका.

## प्रकरणें १ ते ८

### मठगांवचा शिलालेख आणि वाडकर सावंत भोंसले.


| प्रकरण | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | लें. मठगांवांतील शिलालेख | १–३ |
| २ | रें. देउळ मांग 'सावंताचें' होय, या विधानाच्या विरुद्ध कांहीं प्रमाणें. | ३–५ |
| ३ | रें. मांग सावंत–मूळ पुरुष ! | ५–१३ |
| ४ | थें. मांग सावंत–पुढील पूर्वज ! | १३–२४ |
| ५ | वें. मांग सावंत–परिवार आणि वंश | २५–३८ |
| ६ | वें. मांग सावंताचे आधार–बखर आणि सामंतविजय. | ३९–४८ |
| ७ | वें. मांग सावंताचे आधार–चिटणीसांचा कागद आणि देऊळ | ४८–५३ |
| ८ | वें. नाग सावंतानें मारिलेला शिक्का. | ५३–६६ |


## प्रकरणें ९ ते १३

### मठगांवचा शिलालेख आणि ब्राह्मण सामंत राजवंश.


| | | |
|---|---|---|
| ९ | वें. शिक्क्यांतील सामंत घराणें | ६७–७४ |
| १० | वें. ताम्रपटांतील घराणें. | ७५–९३ |
| ११ | वें. सामंत राजवंशाचा उपलब्ध इतिहास. | ९४–१२० |
| १२ | वें. ब्राह्मण मंग सामंत, याचा मराठा मांग सावंत कसा झाला ? | १२१–१४३ |
| १३ | वें. शिलालेख ब्राह्मण सामंतांचाच ! | १४४–१६५ |

# परिशिष्ट

## लेखांक १ ते १८


| लेखांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ला. शके १३५८ सालचें एक वतनपत्र | १–३ |
| २ | रा. ,, १५१९ सालचें कुळकर्ण्यास दिलेलें मुशाहिरापत्र | ४–६ |
| ३ | रा. ,, १५५२ सालीं कुडाळ येथें झालेला देश-पङ्क्यावरील महजर | ७–१० |
| ४ | था. भानजी प्रभु सरदेसाई यांचें पत्र | ११ |
| ५ | वा. भानजी प्रभु सरदेसाई यांचें आहिताग्नि प्रमुख ब्राह्मणांस पत्र | ११–१२ |
| ६ | वा. भानजी प्रभु सरदेसाई यांचें वालावलींतील ग्रामस्थ मंडळीस पत्र | १३ |
| ७ | वा. सन १६९९ चें कान्होजी आंग्रे याचें नारायण प्रभु सरदेसाई यास पत्र | १४ |
| ८ | वा. ,, बराणजी मोहिते यांचें ,, ,, | ,, |
| ९ | वा. सन १७०९ चें शिवाजी केशव याचें ,, ,, | १५ |
| १० | वा. नागसावंत सरदेसाई याचें बावडेकर पंत-अमात्यांस पत्र | १६–१७ |
| ११ | वा. सौ. मनाबाई सरदेसाईणीचें पत्र ( बहुतांशीं पंतअमात्यांस असावें ) | १८–१९ |
| १२ | वा. नाग सावंत सरदेसाई याचें बावडेकर पंत-अमात्यास पत्र | १९–२० |
| १३ | वा. ,, ,, | २१ |
| ,, | बावडेकर पंतअमात्यांचें नाग सावंत सरदेसाई यास पत्र | २२ |
| १४ | वा. नाग सावंत सरदेसाई याचें बावडेकर पंत-अमात्यास पत्र | २३–२४ |

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १५ वा. | शके १६५७ चें छत्रपति शाहू महाराज यांचें फोंडसावंत सरदेसाई यांस पत्र | २४–२५ |
| १६ वा. | शके १६६० सालीं नागसावंत सरदेसाई यानें पंतअमात्यांस दिलेली सनद. | २५–२६ |
| १७ वा. | सावंत भोंसले यांच्या कारकीर्दी दाखविणारा एक कागद. | २७–२८ |
| १८ (१) | गणेश दादाजी प्रभु देसाई याच्या अर्जाची संक्षिप्त नोंद. | २८–२९ |
| ,, (२) | सन १८४४ च्या गणेश दादाजी प्रभु देसाई याच्या कैफियतींतल्या कलमांची यादी. | २९–४४ |


## टिप्पणी.

### १ ते ११.


| | | |
|---|---|---|
| १. | चित्रांक ४ यांतील कांहीं माहिती. | २ |
| २. | ,, ५ ,, ,, | ३ |
| ३. | ,, ९ ,, ,, | ४ |
| ४. | तिलिंग–गौड. | ४—५ |
| ५. | 'वीर' माइन्देवानें पराजित केलेले हम्मीर. | ५—६ |
| ६. | प्राचीन गौडदेश आणि तेथील ब्राह्मण. | ७–११ |
| ७. | हिंदळें. | १२–१५ |
| ८. | कुणकेश्वर. | १५–२४ |
| ९. | पंचमहाशब्द. | २४–२५ |
| १०. | कुडाळ. | २५–२६ |
| ११. | A date for verification. | २७–३४ |


( संवत 'चित्रभानु' शके १३१७ आदिक बहुल ३ गुरुवार )

# छायाचित्रें वगैरेची सूचि.


| अनुक्रमांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | मठगांवचा **शिलालेख.** | १ |
| २ | मठगांवांतील दोन देवळांचें संयुक्त चित्र | २ |
| ३ | मठगांवांतल्या धाकट्या देवळांतील सहा कोरींव पाषाणां-सहित शिवलिंगाचें चित्र. (डावीकडून तिसऱ्या शिलेवर लेख आहे) | ३ |
| ४ | शके १५२२ ( सन १६०० ) मधील कुडाळ प्रांतांतील बाळबोध लिपीचा नमुना. | ४ |
| ५ | शके १५२६ ( सन १६०४ ) मधील कुडाळ प्रांतांतील मोडी लिपीचा नमुना. | ५ |
| ६ | भानजी प्रभु सरदेसाई यांचा एक शिक्का. | २० |
| ७ | भानजी प्रभु सरदेसाई यांच्या सहीचा नमुना. | ,, |
| ८ | इ. स. १५८२ सालांतील जाबत्याच्या कागदांपैकीं एक. | २२ |
| ९ | शके १५०४ ( सन १५८२ ) मधील कुडाळ प्रांतांतिल मोडी लिपीचा नमुना. | २३ |
| १० | वाडकर सावंत भोंसले यांचा एक वंशवृक्ष. | २९ |
| ११ (अ) | वाडकर सावंत भोंसले यांची कारकीर्द दाखविणाऱ्या कागदाची एक बाजू. | ३० |
| ,, (ब) | सदरील कागदाची दुसरी बाजू. | ३१ |
| १२ (अ) | शके १५५२ ( सन १६३० ) सालीं प्रभु सरदेसाई यांच्या राजवटींत कुडाळांत झालेल्या साधले घराण्याच्या निवाड्याच्या कागदाची एक बाजू. | ३२ |
| ,, (ब) | सदरील कागदाची दुसरी बाजू. | ३३ |
| १३ (अ) | वाडकर नाग सावंतानें बावडेकर पंतअमात्यांस लिहिलेल्या एका कागदाची एक बाजू. | ५४ |
| ,, (ब) | सदरील कागदाची दुसरी बाजू | ५५ |

| | | |
|---|---|---|
| १४ | वाडकर नाग सावंतानें बावडेकर पंतअमात्यांस लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्राची दुसरी बाजू. | पृष्ठ ५६ |
| १५ | रामचंद्र सावंत यांची जन्मपत्रिका. | ५७ |
| १६ | वालावली येथील **श्रीनारायण** | ६० |
| १७ | श्रीनाग सामंत यांचा शिक्का-मोर्तब. | ६२ |
| १८,१९,२० | प्रभु घराण्याचे १५ व्या शतकांतील तीन शिके. | ६३ |
| २१ | वालावली येथील श्रीनारायण देवस्थानचा एक प्राचीन शिक्का. | ६४ |
| २२ | कुडाळ शहरालगतच्या नदीवरील **संध्याघांट**. | ६१ |
| २३ (अ) | कुडाळच्या कोटांतील प्राचीन विहीर ( **घोडबाव** ). | ७४ |
| ,, (ब) | सदरील विहिरीच्या कांठाचा घेर. | ७५ |
| २४ (अ) | प्रभु घराण्याचा, मुसलमान बादशहातींतील, फारशी लिपीचा एक शिक्का. | ६७ |
| ,, (ब) | सदरील शिक्क्यासोबतचें मोर्तब. | ,, |
| २५ | मठगांवांतील स्वयंभुशिवलिंग. | ६३ |
| २६ | श्रीकुणकेश्वराचें देवालय. | ९० |
| २७ | दिगवळें येथील श्रीस्वयंभूचें देवालय. | १०६ |
| २८ | सदरील देवळासमोरची दीपमाळ. | १०७ |
| २९ | देमनृपाचा ताम्रपट. पत्रा पहिला. | ११२-११३ |
| ३० | ,, ,, दुसरा, पोट. | ११२-११३ |
| ३१ | ,, ,, ,, पाठ. | ११२-११३ |
| ३२ | ,, ,, तिसरा. | ११२-११३ |
| | मठगांवच्या शिलालेखांतील कांहीं अक्षरांचे नमुने | १४६ |
| ३३ | कुडाळ प्रांतांतील ब्राह्मण सामंतांच्या राजवटींतील कोरींव पाषाण. | १५६ |
| ३४ | कुणकेश्वर देवळानजीक असलेल्या गुहेंतील शिवोपासक राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचे मुखवटे. | १५७ |
| ३५ | सजोद ( अंकलेश्वर ) येथील मंदिरांतील " दिगंबर जैनमूर्ति. " | १६० |
| ३६ | अबूपर्वतावरील देलवाडा मंदिरांतील " श्वेतांबर जैनमूर्ति " | १६१ |

# शुद्धिपत्र.

**विनंतिः**—आमच्या नजरचुकीनें राहिलेल्या चुकांची आणि मुद्रणदोषामुळें घडलेल्यांपैकीं महत्वाच्या चुकांची दुरुस्ती खालीं दिली आहे, त्याप्रमाणें दुरुस्ती करून पुस्तक वाचावें. संदर्भावरून समजण्यासारख्या मुद्रणदोषांचा उल्लेख त्यांत केलेला नाहीं.

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
|---|---|---|---|
| ४ | ६ | फक्त सहा मैल. | सुमारें १० मैल. ( सहा मैल ह्मणण्याचें कारण, मठगांव हा होडावड्याचाच एक भाग असें सावंतवाडीच्या इतिहासांत लिहिलें असून शिवाय रत्नागिरी–सावंतवाडी ग्याझेटिअरमध्यें होडावडें वाडीपासून ६ मैल असल्याचें लिहिल्यावरून होय. ) |
| ७ | १ | राज्यवस्थेंत. | राज्यव्यवस्थेंत. |
| १२ | ७ ( टीप ) | ८–९ व्या | १० व्या |
| २६ | ६ | | ‘ स्वतंत्र ’ हा शब्द गाळावा. |
| २७ | ७ ( टीप ) | पुढील पृष्ठावर. | पृ. ३७ वर टीपेंत. |
| २८ | ४ ( टीप ) | ग्याझेटिअरकरांच्या. | ग्याझेटिअरकारांच्या. |
| ३० | ६ ( टीप ) | घडणावळ. | घडण. |
| ३७ | १ ( टीप ) | ह्मटल त्याच. | ह्मटलें त्याचा. |
| ४४ | १ | ह्मणण्याप्रमाण. | ह्मणण्याप्रमाणें. |
| ४५ | १ ( टीप ) | | ‘ स्वतंत्र ’ हा शब्द गाळावा |
| ५० | १३ | नांवाहि. | नांवहि. |
| ५१ | ७ ( टीप ) | प्रकरण ९. | प्रकरण १०. |

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
|---|---|---|---|
| ५२ | ७।८ | हा घोंडा......नकोच. | हें वाक्य पृ. ५० वर ८ व्या ओळीस जोडावें. |
| ५३ | १७ | हीच कल्पना. | ही कल्पनाच. |
| ५४ | शिक्का. | सातम (पांचवी ओळ) | सामत. |
| ५७ | १२ (टीप) | प्रकरण दहावें. | प्रकरण बारावें. |
| ,, | १६ ,, | पडिला. | पाडिला |
| ६२ | ६ | प्रभुघरण्याकडील | प्रभुघराण्याकडील. |
| ,, | १७ (टीप) | दहाव्या. | बाराव्या. |
| ६५ | मथळा | मांग सावंत–पुढील पूर्वज. | नाग सावंतानें मारलेला शिक्का. |
| ७२ | १५ | मांगालख्य. | मांगलाख्य. |
| ७७ | १९ | दालनपालन. | दानपालन. |
| ८२ | ११ | हुवेहूब. | हुबेहूब. |
| १०४ | ४ (टीप) | Jervice. | Jervis. |
| १११ | १४ | अषंडज्याति. | अषंडज्योति. |
| ,, | १७ | सव | सर्व |
| ११२ | १६ | ३८–४०. | ३८–४८. |
| ११३ | १६ | अखंडज्याति. | अखंडज्योति. |
| ,, | २२ | आरराय. | अरिराय. |
| ११४ | ७ | राज. | राजे. |
| ,, | १४ | कडाळांत. | कुडाळांत. |
| ११५ | १७ | दव. | देव. |
| ११७ | ६ (टीप) | दवशर्मा. | देवशर्मा. |
| ,, | ८ ,, | दम. | देम. |
| ११८ | ३ ,, | केला. | केली. |
| १२० | ११ | कांइदव. | कांइदेव. |
| ,, | १९ | कोणा. | कोणी. |
| | ४ (टीप) | मगेश | मंगेश |

## ( परिशिष्ट )

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
|---|---|---|---|
| १२१ | २२ | हुबहूब. | हुबेहूब. |
| ,, | २३ | आजबाजस. | आजूबाजूस. |
| १२२ | ९ | " मांगला दवाचें " | " मांगला देवाचें " |
| १२५ | १७ | आरंग– | औरंग– |
| १४७ | ५ | तद्वशी. | तद्वंशी. |
| १६० | १ ( टीप ) | सर्याजी. | सूर्याजी. |
| २१ | शिक्का. | विलस ˆ लेखनावधि. | विलसति लेखनावधि. |
| २४ | ,, (४) | महेश्वर. | महस्वर. |
| ३७ | ८ | मिळेल. | मिळेलं. |
| ३८ | १ | सां दाय. | सांप्रदाय. |
| ४१ | २१ ( टीप ) | भषणावह. | भूषणावह. |
| ४३ | ७ ,, | कदली. | कर्दली. |
| ,, | १३ ,, | चडामणि. | चूडामणि. |
| ४४ | २ | सददरहु. | सदरहु. |


### टिप्पणी.

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
|---|---|---|---|
| ५ | २१ | रामदेवराव यादवाच्या सन ११९४ च्या एका ताम्रपटांतील. | सोईदेव नांवाच्या यादवांच्या मांडलिकाच्या पाटण ( खानदेश ) येथील शके ११२८ च्या शिलालेखांतलि. |
| ७ | ६ | प्रकरणाच्या एका टीपेंत. | प्रकरणांत. |
| ८ | १८ | from. | form. |
| १६ | २१ | वाटत. | वाटेंत. |
| १७ | २३।२४ | ' मगेशमहात्म्य ' | ' मंगेशमहात्म्य ' |

## शुद्धिपत्र ( पुरवणी. )

| पृष्ठ. | ओळ. | चूक. | दुरुस्ती. |
|---|---|---|---|
| ४ | ६ | इतक्याच अंतरावर | सहा सात मैलांवर |
| | | **टिप्पणी.** | |
| २९. | १६ | Calander | Calendar |
| | | **प्रस्तावना.** | |
| २ | २४ | तीन | चार |
| ३ | १२ | मनान | मनानें |
| ४ | ११ | उतरले | उतरेल |

श्री ग्रंथ
चित्र अंक १



मठगांवचा शिलालेख.

Joshi Art Bombay. 1.

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. ३३२
ता. ५-५-५२

# मठगांवचा शिलालेख आणि वाटकर सावंत भोंसले.

मराठी ग्रंथ संग्रहालय
१९२
५-५-५२

## प्रकरण १ लें.

## मठगांवातील शिलालेख.

कोंकणांत वेंगुर्लें गांवाजवळ, सावंतवाडी—बेळगांवाकडे जाणाऱ्या रस्त्यावर, सावंतवाडी संस्थानच्या हद्दींत असलेल्या मठनामक गांवांत शिवलिंगाचीं दोन देवळें एकमेकांच्या अगदीं जवळ बांधिलेलीं आहेत. त्यांपैकीं एक मोठें, फार जुनाट असें असून त्यास स्वयंभूचें देऊळ ह्मणतात; त्याची व्यवस्था त्या प्रांतांतील कोणत्याहि गांवच्या मुख्य देवळाप्रमाणें चालत आहे. दुसरें लहान, तशाच बांधणीचें पण बरेंच अर्वाचीन दिसणारें असून त्याची व्यवस्था वरील देवळाच्या मानानें कांहींच दिसत नाहीं; या देवास 'मांगलादेव' असें आज ह्मणतात. या दुसऱ्या देवळांत भिंतीशीं टेकून ठेवलेले सहा पाषाण असून प्रत्येकावर चित्रें कोरलेलीं आहेत; शिवाय एकावर लेखहि आहे.

हा शिलालेख आह्मीं आज पहिल्यानेंच पुढें आणितों असें नसून तो प्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. राजवाडे यांनीं सन १९०३ सालींच आपल्या 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ वा' या ग्रंथांत पृ. ३३ वर प्रसिद्ध केला आहे; तो तसाच खालीं देतों:—

---

१ छायाचित्र अंक २ पहा. २ छायाचित्र अंक ३ पहा.

३ पुढील चर्चा रा. राजवाडे यांनीं दिलेल्या वाचनासच अनुसरून केलेली आहे; पण अलीकडे आह्मीं त्याचें एक छायाचित्र घेतलें, त्यावरून बरींच अक्षरें रा. राजवाडे यांनीं वाचलीं त्याहून वेगळीं दिसतात, व त्यामुळें अर्थांतहि कांहींसा फरक पडतो. याबद्दल आमचें सर्व ह्मणणें आह्मीं पुढील एका प्रकरणांत मांडिलें आहे; पण तें सर्वमान्य होई तों, रा. राजवाडे यांच्यासारख्या विद्वानांचाच आधार घेऊन चालणें आह्मांस योग्य वाटतें.

2892


"स्वस्ति श्री सालीवान सकु कु १३१९ वरीसे चीत्रभानु संवत्सर आदीक बाहुळ ३ गुरुवारी चांदगडाडुजीपती नऱ्यसी देवाचा दळवै यानें याचा पीता भाम सावंतु तदोद्दीसी उपभोगासी देण वीडा धुणा तेला द्रेया उपभोगासी दत्त रौप्य टांके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी देउळाच्य कामाया वेचू द्राम १५०० दळवैपणोचे जाले दीनु आर्थे एखंधर याची ला दीनु नीची वेचू द्राम १००० आखेरतोपी सासु उफरासी भाम सावता वेळाचा दळवै यदोद्दीसी भूमी भऱ्यया २ मडायी मेव ओंयू व्ययी मेरं नेयो मेर सडे खडींचे यी मेर आंभऱ्ययी."

या शिलालेखांतील दुसऱ्या व तिसऱ्या ओळींत, '**चांदगडाडुजीपती नऱ्यसी देवाचा दळवै**' यानें आपला पिता भाम सावंत यास सद्गति मिळावी ह्मणून देऊळ बांधिलें ही गोष्ट नमूद करून, बाकीच्या ओळींत तें कधीं, त्याबद्दल खर्च किती आला, त्याच्या चतुःसीमा कोणत्या, वगैरे माहिती दिली आहे.


सदरील ग्रंथांतून तो लेख सन १९११ सालीं रा. पिंगुळकर यांनीं आपल्या सावंतवाडी संस्थानचा इतिहास या पुस्तकांत छापिला. रा. राजवाडे यांनीं (१) त्यांतील भाम सावंत या पुरुषास वाडकर सावंतांचा पूर्वज मानून, त्यावरून 'सातारकर भोंसल्यांची ह्मणून जी वंशावळ प्रसिद्ध झाली आहे ती बनावट आहे' असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला तीच भाम सावंताची कल्पना रा. पिंगुळकरांनीं घेऊन शिवाय आणखी असें विधान केलें कीं, (२) त्याचा पूर्वज—वाडकर सावंतांचा मूळपुरुष—मांग सावंत ह्मणून झाला, (३) त्याचीच ही (शिलालेख असलेली) छत्री (?) होय, (४) जिच्यावरून त्या भागास 'मांगल्याचा मठ' असें नांव पडल्याचें सांगतात. पुनः, रा. राज-

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास परिशिष्ट लेखांक ५.

२ " " पृ. २३



चित्र अंक २ मठगांवांतील दोन देवळांचे संयुक्त चित्र.



**चित्र अंक २** मठगांवांतल्या धाकट्या देवळांतील सहा कोरींव पाषाणांसहित शिवलिंगाचें चित्र. डावीकडून तिसऱ्या शिळेवर लेख आहे.

वाडे यांनीं भाम सावंताचा मुलगा नऱ्यसी देव असें त्या शिलालेखावर वाचलें; तर [१]रा. पिंगुळकर ( ५ ) त्याचें नांव 'नऱ्यसींदेव दळवी' असें सांगतात. पण या दोघांहि गृहस्थांचीं वर अंकांनीं दाखविलेलीं हीं मतें बरोबर नसावींत असें तो शिलालेख प्रत्यक्ष पाहून आह्मांस वाटल्यावरून तो आज आह्मीं वाचकांपुढें पुनः मांडीत आहों. वरील गृहस्थांपैकीं रा. पिंगुळकर हे सावंतवाडीचे इतिहासकार असल्यामुळें, त्यांनीं केलेल्या विधानांकडे प्रथम वळून त्यांच्या मांग सावंताच्या विधानापासून सुरवात केल्यास, त्यांतच पुढें त्यांचीं बाकीचीं विधानें येणार असल्यामुळें, एकंदर विवेचनास फार सोयीचें होईल.

---

## प्रकरण २ रें.

# देऊळ मांग 'सावंताचें' होय, या विधानाच्या विरुद्ध कांहीं प्रमाणें.

शिलालेख असलेल्या ह्या इमारतीस रा. पिंगुळकर छत्री ( समाधि किंवा थडगें ) ह्मणतात, पण तें एक शिवालय[२] आहे हें आह्मीं आरंभींच सांगितलें आहे. तिला छत्री ह्मणावयास, ओटवणें गांवीं तसेंच खुद्द वाडीशहरांतहि सावंतांच्या पूर्वजांचीं 'माठीं' ( थडगीं ) आहेत, त्यांतील रचनेसारखें येथें कांहींच दिसत नाहीं; एक शिवलिंग नुसत्या जमिनीवर, तेंहि बांधकाम नसल्यामुळें सहज हालेल अशा स्थितींत ठेविलें आहे. आतां हें देऊळ सावंतांचा मूळ पुरुष ह्मटलला मांगसावंत याचें होय असें ह्मणावयास, प्रथमदर्शनींच कांहीं विरुद्ध प्रमाणें दिसतात तीं अशीं:—

१ या देवळाची एकंदर व्यवस्था पाहिल्यास ती सावंतांच्या मूळ पुरुषास शोभेशी नाहीं. उदाहरणार्थ त्याला सभामंडप नाहीं; एकाबाजूस

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. २३. २ रा. राजवाडे सुद्धां त्याला देवाचें देऊळ ह्मणतात.

मोठ्या देवळाच्या निकट सान्निध्यामुळें प्रदक्षिणा घालावयास पुरेशी जागा नाहीं; सरंजाम वगैरेहि कांहीं नाहीं. सावंत हे वाडीमध्यें आज निदान दोन शतकें अव्याहत नांदत असतां, हें देऊळ त्यांच्या पूर्वजाचें आणि त्यांतहि मूळपुरुषाचें असतें, तर त्याची अशी अनास्था त्यांनीं कधींच होऊं दिली नसती हें उघड आहे. तशांत तें वाडीशहरापासून फार दूर आहे असेंहि नव्हे. फक्त सहा मैल, पुनः संस्थानच्या हद्दींत. आणि इतक्याच अंतरावर दुसऱ्या दिशेस असलेल्या ओटवणें गांवीं खेम सावंताचें माठें आहे, त्याचा पहावें तों अगदीं सावंतांनां साजेसा थाटमाट चालत आला आहे.

२ त्यालाच सावंत वेळोवेळीं भजत असतात. उलट, या देवळाचें दर्शनहि वाडकर सावंत कधीं घेत नसल्याचें चौकशी अंतीं कळतें आनंदाच्या किंवा दुःखाच्या प्रसंगीं त्यांची धांव ओटवण्यास खेम सावंताजवळ, किंवा त्याच गांवीं असलेला त्यांचा कुलदेव रवळनाथ याजपाशीं असते; होडावड्याच्या या मांगलादेवाकडे नव्हे ! इतकेंच नव्हे, तर या खेम सावंताच्या गुरूचा मठ तळवणें येथें आहे, त्या मठाकडे सुद्धां सावंतांची भजणूक अद्याप आहे ( सा. सं. इ. पृ. ३८ ); पण ती या मांगलादेवाकडे नाहीं !

३ या देवळांत असलेल्या शिलालेखांत ' **सावत** ' असें नांव आहे, एवढ्यावरूनच तें वाडकर सावंतांच्या पूर्वजाचें असलें पाहिजे असें ह्मणतां येत नाहीं कारण आमच्या संग्रहीं असे बरेच जुने कागद[1] आहेत कीं ज्यांत **ब्राह्मण सामंतांनीं 'सावत'** अशा सह्या केल्या आहेत. शिलालेख कोरणाराचाहि तसाच प्रकार होणें अशक्य नाहीं.


४ बरें, हा मूळपुरुष ' मांग सावंत ' होय असें ह्मणावयास तसें खुद्द रा. पिंगुळकरांनीं छापलेला जो सावंतांचा वंशवृक्ष[2] त्यांत आढळत नाहीं !

---

१ अशा आणखी दोन कागदांचीं छायाचित्रें ( अंक ४।५ पहा ) आह्मीं दिलीं आहेत, आणि दुसरा एक कागद परिशिष्टांत ( लेखांक २ ) छापिला आहे.


२ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ५० च्या जवळ दिलेली " भोंसले राजघराण्याची वंशावळ."

चित्र अंक ४



शक १५२२ (सन १६००) मधील कुडाळ प्रांतातील बाळबोध लिपीचा नमुना

चित्र अंक ५



शक १५२६ (सन १६०४) मधील कुडाळ प्रांतांतील मोडी लिपीचा नमुना.

इतकेंच नव्हे, तर पूर्वजाचें नांव ठेवण्याची वहिवाट सावंतकुलांत चालू असूनहि 'मांग सावंत' असें नांव त्यांच्या सबंध वंशांत आतांपर्यंत नाहीं. उलट, वरील वंशवृक्षांत मूळपुरुष ह्मणून दिलेल्या खेम सावंताचें नांव पहावें तों आतांपर्यंत त्यांच्या कुलांत पांच वेळ आलें आहे.

ह्या सर्व गोष्टी समोर असतांहि रा. पिंगुळकर मांग सावंतास वाडकर सावंतांचा मूळपुरुष म्हणत आहेत; अर्थात् त्याचें अस्तित्व सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडते; ती त्यांनीं पार पाडून मांग सावंत खरोखरीच झाला असें दाखविल्यानंतरच वास्तविक त्याच्या देवळाचा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून आतां या मांग सावंताबद्दल आपल्या इतिहासांत—शाळाखात्यासाठीं तयार केलेल्या संक्षिप्त इतिहासांत सुद्धां—ते काय माहिती देतात तें पाहूं.

---

## प्रकरण ३ रें.

# माग सावंत—मूळपुरुष !

" सावंत भोंसले यांचा मूळपुरुष यीच काळीं किंवा त्याच्यापूर्वीं कांहीं वर्षें या प्रांतीं आला असें आढळून येतें. त्याचें नांव मांग सावंत असें होतें. तो उदेपूर येथील प्रसिद्ध शिसोदिया घराण्यापैकीं असून त्याचें उपनांव भोंसले असें होतें. मांग सावंत यानें या प्रांतीं आल्यावर कांहीं प्रांत मिळविला, आणि होडावडें येथें आपलें राहण्याचें ठिकाण केलें. "

पंधराव्या शतकाच्या अगदीं शेवटच्या पांच वर्षांत मांग सावंत सत्ताधारी झाला असें मानिलें, तरी त्यापूर्वीं निदान पांच वर्षें—१४९० च्या सुमारास—तो उदेपुराहून आला असला पाहिजे; आणि आल्याबरोबर तो तडक प्रांत आणि सत्ता मिळवूं लागला, यावरून त्याचें वय त्या वेळीं कमींत कमी २० वर्षांचें असणें भाग आहे; ह्मणजे त्याचा जन्म इ. स. १४७०

---

१ इ. स. १५०० च्या सुमारास (सा. सं. इ. पृ. २२). २ इ. स. च्या १५ व्या शतकांत त्यानें या प्रांतीं कांहीं 'सत्ता' मिळविली असें संक्षिप्त इतिहास सांगतो.

च्या सुमारास झाला असें ठरतें; मग तो शिसोदिया घराण्यांतहि असेल कदाचित्! कारण सूर्य जसा दूर आकाशांत राहून पथ्वीवर चोहोंकडे प्रकाश पुरवितो, त्याप्रमाणें हें सूर्यवंशीय शिसोदिया घराणें राजपुतान्यांत राहून हिंदुस्थानच्या चारी दिशांना तेजस्वी आणि पराक्रमी पुरुषांचा पुरवठा करीत राहणें अगदींच असंभवनीय नाहीं! सावंत आणि भोसले हीं नांवें त्याला इकडे आल्यावर मिळालीं, किंवा तीं अगोदरचींच होतीं हें रा. पिंगुळकर यांनीं स्पष्ट केलेलें नाहीं; पण त्याबद्दल पुढें पाहूं. आतां दक्षिणेंत आल्यावर त्यानें सत्ता कोणती मिळविली ?

" युसुफानें ( ज्याच्या कारकीर्दींत मांग सावंत इकडे आला आणि

१. अबदुल मुझफर युसुफ अदिलशाहा असें याचें पूर्ण नांव होतें. मूलतः हा तुर्कस्थानचा असून आगामुराद अथवा सुलतान अमुरथ याचा कनिष्ठ पुत्र होता. ( गिबनकृत रोमन साम्राज्यपतनाचा इतिहास ) बापाच्या पश्चात् वडील बंधु सुलतान झाल्यावर त्यानें तिकडील रिवाजाप्रमाणें, प्रधान मंडळाच्या आग्रहावरून, युसुफाचा वध करण्याबद्दल हुकूम दिला; त्यावरून त्याच्या आईनें ख्वाजा इमादुद्दीन नांवाच्या इराणांतील 'सावा' या नांवाच्या गांवांतल्या एका व्यापाऱ्याबरोबर युसुफाला गुप्तपणें इराणांत पाठवून दिलें. कांहीं वर्षांनीं हे दोघेहि इराण सोडून हिंदुस्थानांतील दाभोळ बंदरांत येऊन उतरले ( इ. स. १४५९।६० ) आणि कांहीं दिवस तेथें घालवून नंतर बेदर येथें सुलतान महमदशहा बहामनी याच्या आश्रयास येऊन राहिले. 'सावा' नांवाच्या गांवांतून युसुफ इकडे आला त्यावरून मुसलमान इतिहास लेखकांनीं त्याला 'सवाई' किंवा 'सावाई' असें अभिधान दिलें आहे; आणि बार्थेमा, बार्बोसा, गास्पर कोरीआ इत्यादि पोर्तुगीज लेखकांनीं सवाईम्, झाबाइम्, साबाईओ अशा निरनिराळ्या नांवांनीं त्याचा उल्लेख केला आहे. सदरील कोरीआनें युसुफ आणि बहामनी महमदशहा या दोघांनाहि 'साबाईओ' च म्हटलें आहे!

महमदशहा बाहामनीच्या कारकीर्दींत, रा. पिंगुळकर लिहितात त्या प्रभु घराण्याकडे कुडाळ प्रांताची देखरेख सोंपविण्यांत आली. पुढें इ. स. १४८९।९० सालीं अदिलशाहीची स्थापना झाली, त्यावेळीं कुडाळ आणि गोवें हे प्रांत युसुफ

त्यानें सत्ता मिळविली असें रा. पिंगुळकर ह्मणतात ) राज्यवस्थेंत पुष्कळ सुधारणा केली......परगण्यावरील कामगारास देशमुख म्हणत. तळ-कोंकण सुभ्याच्या पोटीं कुडाळ व भीमगड असे दोन परगणे होते. कुडाळ परगण्याची देशमुखी प्रभु कुडाळदेशस्थ ब्राम्हण यांजकडे होती, व

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

अदिलशहाच्या राज्यांत समाविष्ट झाले. त्यावेळीं युसुफानें, बहामनींच्या वेळच्या या प्रभु घराण्याला ' सरदेसाई ' ही पदवी देऊन आपले मांडलिक ह्मणून कबूल केलें. ( हीच पदवी परंपरेनें वाडकर सावंत लावीत आहेत ). युसुफ अदिलशहानें त्या वेळचा सरदेसाई गोम प्रभु याला एक रत्नजडित सोन्याचा शिरपेंच दिला, तो शेवटच्या नारायणप्रभूनें आपल्याकडचे शिक्के वगैरे यांसह वालावली येथील श्रीनारायणास अर्पण केला, तो अद्यापि तिथें आहे. त्यावरील कांहीं हिरे वगैरे जवाहीर पुष्कळ वर्षांपूर्वी नाहींसें झाल्याचें समजतें.

१. देशमुख आणि देसाई हे दोन्ही समान दर्जाचे अधिकारी होत. देशक या संस्कृत शब्दावरून देसाई शब्द रूढ झाला. 'महाल' आणि ' परगना ' हे अनुक्रमें अरबी आणि फारशी शब्द होत.

कुडाळ प्रांतांतील देसाई-देशमुखांची संस्था, बनवासीच्या कदंबांपासूनची दिसते. प्रभु घराण्याच्या जुन्या कागदांत, "कदमाच्या वेळीं कुडाळास देसाई होता" आणि या देसायाच्या हाताखालीं प्रांताच्या व्यवस्थेसाठीं आठ जण असत. त्यांत ३ देसाई, १ सांमत, १ नायक, २ मतकरी, आणि १ नाडकर्णी यांचा समावेश होई; "त्यांस अष्टप्रधान म्हणत" असा उल्लेख आढळतो. "इ स. च्या बाराव्या शतकांत कुडाळचे देसाई यांणीं सर्व कोंकणांत पुष्कळ दूर पर्यंत स्वाऱ्या केल्या होत्या असें समजतें" वि. ज्ञा. वि. पु. १८. "In the twelfth Century the Desai of Sawant Wadi, the most northern of the Poligar chiefs, overran the whole of the Konkan". *Bom. Gazetteer—Savantwadi History*. सावंतवाडी हा शब्द इ. स. च्या १८ व्या शतकाच्या सुरवातीस रूढ झाला; ( तत्पूर्वीं त्या प्रदेशाला कुडाळ प्रांत ह्मणत. )

वर सांगितल्याप्रमाणें प्रभु देशमुखांचें घराणें अदिलशहाचें 'सरदेसाई' या नात्यानें मांडलिक झालें. " मूळचे कुडाळे होते ते शिरदेसाई होते. शिरदेसाई हे मूळचे

भीमगड परगण्याची देशमुखी सावंत भोंसले यांजकडे होती. ” ( सा. सं. इ. पृ. ९ )

भीमगड परगण्याचा हा देशमुख मांग सावंतच असला पाहिजे, त्याचा कोणी पूर्वज असणें शक्य नाहीं; कारण दक्षिणेंत प्रथम आला तो तोच

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

मांडलिक राजे समजावे.” ( वि. ज्ञा. वि. पु. २३ अं. ११ ). गादीवर असलेल्या पुरुषासच सरदेसाई असें ह्मणत. त्याच्या शिवाय घराण्यांतील इतर पुरुष आपलें उपनांव देसाई असेंच लावीत; ( सरदेसाई असें क्वचित लिहिल्याचें आढळतें. परिशिष्ट लेखांक ५ पहा; त्यांत दादाजी प्रभूला सरदेसाई ह्मटलें आहे ). ते आपल्या पुरातन वतनास देशकाचें किंवा देशमुखीचें वतन ह्मणत. त्यांच्या पुरातन वृत्तीच्या आणि इनामतीच्या २९ गांवांची याद मिळते. कान्होजी राजे प्रभावळीकर यास त्यानें सावंताविरुद्ध आपणास मदत करावी ह्मणून जोगण प्रभु आणि नारायणप्रभु यांनीं आपल्या वतनाचा जो तिसरा भाग दिला तें वतन सदरील पुरातन देशमुखीचें वतन होय, विजापूरच्या अदिलशहांनीं दिलेल्या सरदेसकतींतलें नव्हे-हें त्यांस विकतां येणें शक्य नव्हतें.

अदिलशाहींतल्या एका कागदांत प्रभु सरदेसायांस “तुम पुरातन देशक लोकां” ( तुम्हीं पुरातन देशक लोक ) असें म्हटलें आहे.

प्रभु सरदेसायांप्रमाणें परुळें गांवांतील ‘ सामंत ’ उपनांवाचें एक घराणें कुडाळ प्रांतांत पुरातनचें देशमुख होतें, याबद्दल दुसरे शिवछत्रपति यांच्या एका पत्रांत पुढील उल्लेख आले आहेत. ( १ ) “ शिवाजी शंकर यास आज्ञा कीं वीठ सामत याची देशमुखी प्रांत कुडाळ देशचे राजे याजकडून पूर्वापार चालत आहे त्यास धामधुमीमुळें अडचण तरी निशाण होन १०० सुरळीत चालो देणें ” (२) “केळवली ता सौदळ हे दान गाव मातोश्रीबाई साहेबाकडे देऊन वीठ सामत यांजकडे आरमाराचे बेगमी साठी दिल्हे आहत तरी त्या गावास उपद्रव न करणे. ”

देशमुखांसंबंधीं अन्या काळची माहिती सरकारी अहवालांतून व इतरत्र मिळते ती अशीः—देशमुख=Chief of a district. “ The extract from Elphinstone's History of India......would show them ( देशमुख आणि देशपांडे ) to be officers of ancient standing

असें रा. पिंगुळकर म्हणतात. आतां या उत्तरेंतून नुकताच आलेल्या एकाकी तरुण मुशाफराला विजापुरासारख्या त्या काळच्या प्रबळ बादशहातीनें एकदम देशमुखीच्या अधिकारावर नेमणें, तेंहि पुनः स्थानिक कुडाळदेशस्थ ब्राम्हणे त्या सुभ्यांत देशमुख असतांना शक्य होतें काय ?

१ वास्तविक भीमगड परगण्यावर सुद्धां त्यांची सत्ता होती हें मागील टीपेवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. पण तें बाजूस ठेवूनहि रा. पिंगुळकरांचें ह्मणणें कसें टिकत नाहीं हें आह्मीं येथें दाखवित आहों.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

and of some note...probably the lord of a hundred villages; but the same causes which have changed the position of village officers have had a corresponding effect on them. From ancient records which have come under my notice it would appear that these officers in the earlier times of the Mahomedans were entrusted with considerable powers and formed the chief |branch of the executive". ( Report on the village communities of the Deccan by Mr. R. N. Goodine ( 1852 )

"There are many conjectures as to the origin of Deshmookhs and Deshpandyas. They were probably a universal institution of the Hindu states as ancient as village establishments or divisions into castes; and the देशाधिकारी and देशलेखक may possibly have been the chief managers in the district for the time being as the ग्रामाधिकारी and ग्रामलेखक were in the village........There is as yet no proof of the देशाधिकारी having been permanent and hereditory officers with lands and immunities such as देशमुख had under the Mahomedan princes of the Deccan. The institution of देशमुख, however, on that footing, if not prior to

कारण एखादा दूरचा सुभा सबंधच स्थानिक माणसांकडे सोंपवावयाचें सोडून, त्यांतील कांहीं भाग परदेशांतून नवीनच आलेल्या एका तरुणाच्या हवालीं कोणी करील हें मुळींच संभवनीय दिसत नाहीं. मांग सावंताचें हें भाग्य शिवाजी महाराजांच्याहि पूर्वजांना मिळाल्याचें

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

the rise of the Bahamunee dynasty, is at least coeval with it in महाराष्ट्र ( Grant Duff ).

शिवाजी महाराजांनीं कुडाळ प्रांतावर स्वारी करण्यापूर्वी कुडाळदेशस्थ प्रभु घराण्याच्या मताहतींत असलेल्या मुलखाची सरकारी दप्तरांत माहिती मिळते ती अशीः-खुद्द कुडाळ परगण्यांत बारा तर्फा, २ कर्याती, १ विलायत, १ बंदर आणि ५ महाल मिळून ४१३ गांवांचा समावेश होत असे.

| तर्फा | गांव. | कर्याती. | |
|---|---|---|---|
| १ मसुरें | १२ | १ पाटगांव | १२ |
| २ वराड | १० | २ नारूर | १४ |
| ३ पाट | १० | १ **विलायत** ( बांदें ) | ४८ |
| ४ हवेली ( कुडाळ ) | १५ | १ **बंदर वेंगुर्लें** | |
| ५ माणगांव | १४ | **महाल** | |
| ६ तळवडें | १२ | १ डिचोली | २४ |
| ७ आजगांव | १२ | २ फोंडा | २० |
| ८ सांतर्डें | १२ | ३ पेडणें | २४ |
| ९ मनोहर ऊर्फ सांगेली | २४ | ४ सांखळी | ७० |
| १० बोर्डवें | १६ | ५ मणेरी | २५ |
| ११ कळसुली | २२ | | |
| १२ मालंड | १७ | | एकूण ४१३ |

( Selections from the Records of the Bom. Govt. Vol. X ( new series ) 1855. P. 153-54. )

शिवाय सरकारी दप्तरांत नसलेली अशी, आह्मांस उपलब्ध झालेल्या माहितीवरून, प्रभु घराण्याकडे असलेल्या जास्ती मुलखाची माहिती पुढें देतोंः—

५५ / ८३ /१२

इतिहास सांगत नाहीं! पण हा मांग सावंत एकट्या भीमगड परगण्याचाच देशमुख होऊन थांबत नाहीं, तर "आपली पूर्वापार सत्ता दोन्ही परगण्यांवर आहे असें तो ह्मणत असे!" मांग सावंताचे उदेपुरांतील शिसोदिया घराण्यांतील पूर्वज या कुडाळप्रांतावर कधीं सत्ता सांगत होते

---

१ सावंतवाडी संस्थानचा संक्षिप्त इतिहास पृ. ९

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

सध्याच्या देवगड तालुक्यांत मोडत असलेल्या कित्येक गांवांस साळशी महाल असें नांव आहे. हा महाल सुद्धां या प्रभुघराण्याकड होता. "तर्प सालशी ८४ गाउ वाडीया २ एकून असामी गाऊ ८६ आणी एक माहाल गोली-[ गोली हा गांव होता कीं महाल तें समजत नाहीं. गांवाच्या संख्येंत जमा धरलेला आहे, त्यावरून तो गांव असावा. ] यांचा गांव गना तपसील" दिलेला आहे. त्याचप्रमाणें "तर्पे चांदगड तर्पे याचे गाऊ ८४ आणी ११ वाडीया" या सर्वांनां मिळून "कदिम कुडाळी वीलातीचे गाऊ" असं ह्मटलें आहे. यांशिवाय दक्षिणेकडील कारवार, अंकोला आणि मिरजन हे महाल सुद्धां प्रभुघराण्याकडे होते असें ह्मणतां येतें. तद्दर्शक थोडी माहिती जुन्या कागदांतूनहि मिळते. "होडावडेची चावडी घेतुली पादशाही काही दिवस बेदराखाली हा मुलुक आसता मग आदलशाही वीजापुरी पादशाही करीत आसता त्याचे मुदती मधे कोकण कुडाळपासोन आंकोले मीरज पावेतो मुलुक होता." ( ब्राह्मण सामंतांच्या राजवटींत होडावडें येथील 'चावडी' फार महत्वाची मानली जात होती. कारण ती बंदरकिनाऱ्यापासून जवळ असे. ) वरील माहितीवरून दक्षिणेकडील मिरजन पर्यंतचा प्रदेश कुडाळच्या सरदेसायांकडेच होता असें ह्मणतां येतें. यासंबंधीं जर्व्हिस साहेबांचें मतः—

"Seevajee did not make any alterations in the revenue system of the Southern provinces from the Salsee Muhal to Karwar, which was then under the exclusive management of the Sir Desaee of Koodal or Chief of the Desaees in charge of five Muhals, Koodal, Phonda. Punch Muhal, Karwar, Mirjan and Ankola" ( Geographical and Statistical Memoir of the Konkan, by Major T. B. Jervis ( 1840 ) Page 101 )

श्री ग्रंथ संग्रहालय ३३२ ५५८२

काय ? असो. येथवर आपण मांग सावंताचा, मूळपुरुष या नात्यानें, उदेपुराहून माग काढीत आलों; पण यापुढें रा. पिंगुळकरांनीं दिलेल्या हकीकतीनें त्याचें मूळपुरुषाचें स्थान कसें डळमळतें पहा !

“ याच्या वंशांत पुढें भाम सावंत हा पराक्रमी पुरुष उत्पन्न झाला. त्यावेळीं या प्रांतीं विजयानगरच्या हिंदु राजांचा अंमल होता. भाम सावंत यानें त्यांच्याविरुद्ध बंड केलें. तेव्हां त्याजवर बेळगांवाहून सैन्य येऊन त्याची व भाम सावंत याची होडावडें येथें मोठी लढाई झाली. तींत भाम सावंत याचा पराभव होऊन तो मारला गेला. याच भागांत याचा पूर्वज मांग सावंत याची छत्री बांधलेली आहे; आणि त्याच कारणानें होडावड्याच्या या भागास ‘ मांगल्याचा मठ ’ असें नांव पडून

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

रा. पिंगुळकरांनीं आपल्या इतिहासलेखनाच्या कामीं सदरील जर्व्हिसच्या पुस्तकाचा उपयोग केला असून जर्व्हिसनें सांगितलेले कुडाळ येथील पाळेगार “हेच कुडाळदेशस्थ प्रभु असावे……व ते विजयानगरचें राज्य स्थापन होण्यापूर्वी देवगिरी येथील यादव-राजांचे मांडलिक असावे ” असें अनुमान काढलेलें आहे. पण त्याचवेळीं जर्व्हिस-च्या वरील माहितीकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें नसतें तर मुसलमानांच्या राजवटींतील प्रभु घराण्याची माहिती त्यांना बरीच निराळी देणें प्राप्त झालें असतें. ( जर्व्हि-सच्या वेळीं नागदेवाचा ताम्रपट–याची माहिती ८–९ व्या प्रकरणांत दिली आहे– उपलब्ध होता तर त्यानें १२ व्या शतकांतील कुडाळच्या सत्ताधाऱ्यांना नुसतें पाळेगार म्हणून न सांगतां त्यांच्या पुढील स्वतंत्र राजवटीचीहि माहिती त्यानें खात्रीनें दिली असती. )

देशमुखाच्या संस्थेचा प्राचीन इतिहास पाहतां सन १५०० च्या सुमारास अभ्यां-गताप्रमाणें कोंकणांत आलेल्या मांग सावंताला एकदम देशमुखी प्राप्त होणें किती बिकट होतें याची खात्री होईल; आणि प्रभु घराण्याकडे ती पूर्वापार कशी चालत आली होती याचाहि उलगडा होईल. “भीमगड परगण्याची देशमुखी सावंत भोंसले यांजकडे होती” या मोघम विधानानें मांग सावंताला ती प्राप्त होऊं शकत नाहीं हें रा. पिंगुळकरांच्या ध्यानीं यावयास पाहिजे होतें.

तो स्वतंत्र गांव झाला असें सांगतात. भाम सावंताचा मुलगा नत्यसींदेव दळवी यानें देऊळ बांधण्यासाठीं कांहीं पैसा देऊन पुढें पूजानैवेद्यासाठीं कांहीं जमीनहि दिली होती असें त्या वेळच्या मठगांवांतील शिलालेखावरून दिसून येतें[1]."

हा शिलालेख म्हणजे वर दिलेला प्रसिद्ध शिलालेखच होय. त्यांतील माहितीवरून भाम सावंत हा शके १३१९ म्हणजे सन १३९७ सालाच्या पूर्वी मृत्यु पावल्याचें दिसून येतें. आणि मांग सावंताचा जन्मकाल १४७० च्या सुमारास येतो हे वर दाखविलेंच आहे. तसेंच भाम सावंत हा विजयनगरकरांच्या काळीं, आणि मांग सावंत विजापूरकराच्या काळीं झाला असें वर सांगितलें आहे; पण त्या प्रांतावर विजयनगरकरांचा अंमल असेल तर तो प्रथम, आणि विजापूरकरांचा मागाहून हें इतिहासज्ञास ठाऊक आहेच ! यावरून भाम सावंत आणि मांग सावंत यांतून कोण कोणाचा वंशज हें स्पष्ट ठरून, मांग सावंताच्या गळ्यांतील मूळपुरुषाची माळ भाम सावंताच्या गळ्यांत घालावी लागते, आणि मांग सावंत एकदम चौथा किंवा पांचवा पुरुष होऊन पडतो ! म्हणजे आतां उदेपुराहून यावयाचें तर भाम सावंतानें, तेंहि सन १३५० च्या सुमारास !

---

## प्रकरण ४ थें.

# मांग सावंत–पुढील पूर्वज !

मागें सांगितल्याप्रमाणें खुद्द रा. पिंगुळकरांच्याच सांगण्यावरून मांग सावंत हा मूळपुरुष नव्हे असें ठरल्यावर आतां त्या नांवाचा सावंतांचा कोणीतरी पूर्वज होऊन गेला कीं काय तें पाहूं. मागें दिलेल्या हकीकतीच्या पुढें मांग सावंताचा उल्लेख आला आहे तो असा:—

---

१ सा. सं. इ. पृ. २२। ३

“ वर सांगितल्याप्रमाणें अदिलशहा व पोर्तुगीज यांच्या ज्या लढाया झाल्या, त्यांत मांग सावंताचे वंशज सावंत भोंसले यांनीं विजापूर सरकारास चांगली मदत केली. ह्मणून अदिलशहानें खुष होऊन त्यांस सावंत बहादर असा किताब दिला[1]. ”

वरील मजकूर जर खरा असता, तर त्यावरून असें ह्मणतां आलें असतें कीं, सन १५५५ च्या सुमारास सावंतांची सत्ता चांगलीच प्रस्थापित होऊन बलवान् अशी झाली होती; अर्थात् त्यापूर्वी पिढी दोन पिढ्या त्यांच्या कुळांत कोणी तरी पराक्रमी पुरुष झाला असला पाहिजे; मग हा पुरुष कदाचित् मांग याच नांवाचा असेल ! पण हा दूरचा आनुमानिक आधारहि मांग सावंतास मिळत नाहीं; कारण वरील गोष्टच मुळीं निराधार आहे. रा. पिंगुळकरांनीं आपल्या पुस्तकांत आधार दिलेला नाहीं; पण बहुधा ग्रँट डफ् हा त्यांचा आधार असावा ! ग्रँट डफ् ह्मणतो:–

“Savants were hereditary Deshmukhs of Waree near Goa and acquired the title of Bahadur from the Kings of Bijapur during some of the wars against the Portuguese” ( History of the Marathas, Vol. 1 p. 88 )

( सावंत हे गोव्याजवळ असलेल्या वाडीचे वंशपरंपरा देशमुख होते, आणि पोर्तुगीजांशीं झालेल्या कांहीं लढायांमध्यें विजापूरच्या राजांकडून त्यांनीं बहादुर हा किताब मिळविला. )

ग्रँट डफ्चीं विधानें नेहमींच सत्य असतात असें नाहीं, हें आतां बरेच वेळां सिद्ध झालें आहे. पण या ठिकाणीं तो निश्चित कालहि देत नाहीं. असें असतां रा. पिंगुळकर हा किताब नक्की १५५५ सालीं ‘मांग सावंताच्या वंशजांस ’ चिकटवितात ! पण तो चिकटवितांना त्यांनीं एका तरी लढाईचें नांव द्यावयाचें होतें कीं जिच्यांत एखाद्या सावंताची बहादुरकी दिसून

[1] इ. स. १५५५ च्या सुमारास. सा. सं. इ. पृ. २९ पहा.

आली ! बहुतेक सर्व लढायांत तर विजापूरकरांचाच पराजय झालेला दिसतो; * मग एकट्या सावंतांनींच पराक्रम केला असल्यास नकळे ! तसें असल्यास त्यांपैकीं एकाचेंहि नांव रा. पिंगुळकरांस कां देतां येत नाहीं ? त्यांची ओळख मांग सावंतावरूनच कां पटवावी लागते ?

बरें, १५५५ सालीं जर हा किताब विजापूरकरांनीं सावंतांस दिला ह्मणावें, तर पुढें १६६४ सालीं त्यांनीं सावंतांस तीनं फर्मानें दिलीं आहेत, त्यांत ते त्यांना नुसतें " सावंत सरदेसाई " असें कां ह्मणतात ? " सावंत बहादूर " असें कां ह्मणत नाहींत ? मांगसावंतानंतर थोडीं वर्षे-पर्यंत सावंत भोंसले हे नामशेष झाले असें रा. पिंगुळकर पुढें (पृ. ३३ वर)

* सा. सं. इ. पृ. २८–२९

१ सा. सं. इ. परिशिष्ट लेख ८, ९, १०

२ मूळ फर्मानांत ' देसाई' असेंच असावें; कारण या सुमारास तसेंच त्याच्यहि पुढें २० वर्षें सावंतांना ते स्वतः अगर दुसरे कोणी 'सरदेसाई ' असें म्हणत नसत, हें सावंतवाडीचा इतिहास लेखांक २९ ( लखम सावंतानें स्वतः लिहिलेलें पत्र–ज्यांत तो स्वतःस नुसतें देसाईच ह्मणवितो ), लेखांक १७ ( कान्होजी राजे प्रभावळीकर यांनीं कुडाळच्या नारायण प्रभूस लिहिलेलें पत्र, ज्यांत ते दोघेहि दुसरा खेमसावंत (१६७५-१७०९) यास 'देसकतींचा अधिकार ' हि नाहीं असें ह्मणतात ) यांवरून दिसतें. लेखांक ७ यांत शिवाजी आणि लखम सावंत व खेम सावंत यांचा इ. स. १६५८ सालीं झालेला तहनामा दिला आहे. त्यांत सावंतांना ' सरदेसाई ' असें शिवाजीनें लिहिल्याचें ह्मटलें आहे तेंहि बरोबर नसावें. कारण हाच तहनामा बऱ्याच वर्षांपूर्वी काव्येतिहाससंग्रहांत ( पु. ९ ) आणि मोडककृत कोल्हापूर संस्थानच्या इतिहासांत प्रसिद्ध झाला आहे. त्यांत सावंतांना नुसतें देसाईच ह्मटलें आहे. वर दिलेलीं फर्मानें मूळांत फारशी व उर्दू भाषेंत आहेत असें रा. पिंगुळकर लिहितात व त्यांचीं हीं मराठी भाषांतरें अगदीं अलीकडे झालीं, असेंहि ते आह्मांस कळवितात. यावरून भाषांतर करविणाऱ्यानें आपल्या समजुतीप्रमाणें ही भर घातली असावी. हीं फर्मानें ( मूळ व भाषांतर ) सावंतवाडींतील चिटणीसांच्या घराण्यांत आहेत असें रा. पिं कर सांगतात.

ह्मणतात; परंतु त्याप्रमाणें विजापूरकर कांहीं नामशेष झाले नव्हते खास! त्यांचीं दप्तरें शाबूद असलींच पाहिजेत! त्यांत त्यांना हा सावंतांना दिलेला बहादुर किताब कसा सांपडला नाहीं? बरें विजापूरकरांना आपल्या दप्तरांत सांपडला नाहीं, आणि सावंतांचें दप्तरच (प्रकरण ६ वें पहा) नाहीं, मग हे ग्रँट डफ अथवा पिंगुळकर तो किताब सावंतांस मिळाला असें कशावरून ह्मणतात?

वास्तविक पाहतां, 'बहादर' किताब सावंतांनीं सन १६५८ सालीं शिवाजी महाराजांकडून तहाअन्वयें, मिळविण्याचा यत्न केला. तत्पूर्वीं त्या किताबाशीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. वरील तह त्यांनीं मोडिला, अर्थात्च त्याजबरोबर किताबहि गेला! नंतर पुढें इ. स. १७८५ सालीं त्यांना जिवबादादा बक्षी यांच्या मध्यस्थीनें 'राजेबहादर' हा किताब दिल्लीच्या बादशहाकडून मिळाला तो ते आतांपर्यंत लावीत आहेत! १५५५ सालीं त्यांच्या पूर्वजांस, अथवा रा. पिंगुळकर ह्मणतात त्याप्रमाणें "मांग सावंताच्या वंशजांस," तो किताब मिळाला हें साफ चुकीचें विधान होय. अर्थात् त्याच्यावर अनुमान बांधून त्यावर मांग सावंताची स्थापना करण्याची खटपट करणें तितकेंच व्यर्थ होय!

यापुढें मांग सावंताचा उल्लेख येणें प्रमाणें:—"या कुडळदेशस्थ प्रभूंकडे दळवी या आडनांवाचे सेनापती होते. हे दळवी मूळचे जोधपूर येथें राहणारे असून कुडाळदेशस्थ प्रभूंची सत्ता या प्रांतांत सुरू झाली तेव्हां प्रभूंनीं त्यांस आपले सेनापति केलें. **भानजी** देशमुखीचें काम करीत असतां **देव दळवी** हा त्याचा **सेनापति** होता. मागें सांगितलेले सावंत भोंसले हे होडावडें येथें राहत असत. प्रभु देसायांत आपसांत तंटे उत्पन्न झाले ही संधि आपला लाग साधण्यास बरी आहे असें

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ८३.

देव दळवी यास वाटलें. सावंत कुळांत या वेळीं मांग सावंत हा पराक्रमी पुरुष निपजला होता[1] ”

मागें इ. स. १५५५ त मांग सावंताचे वंशज होऊन गेल्यानंतर आतां येणारा हा मांग सावंत ह्मणजे कोणी तरी दुसरा—त्या वंशजांचा वंशज—असावा असें कोणासहि साहजिक वाटेल. ह्मणून त्याबद्दल रा. पिंगुळकर यांस पत्रद्वारें विचारलें. त्यांच्या उत्तरावरून हे दोन्ही मांग सावंत एकच पुरुष होत असें त्यांचें ह्मणणें दिसलें. तसें मानिल्यास वरील बहादरीच्या वेळीं मांग सावंत हयात होता असें झालें; मग “बहादर” किताब मांग सावंतास मिळाला असें न ह्मणतां त्याच्या वंशजांस मिळाला असें ह्मणण्यांत मतलब काय ? तसेंच, रा. पिंगुळकरांच्या ह्मणण्याप्रमाणें, जर मांग सावंत हा सावंत कुळाचा मूळपुरुष तर तो ‘ या वेळीं सावंत “ कुळांत ” निपजला होता ’ या ह्मणण्याचा अर्थ काय ? असो. या अगदीं उघड दिसणाऱ्या असंबद्धतेंत[2] विशेष न शिरतां, रा. पिंगुळकरांचेंच ह्मणणें मान्य करून, या मांग सावंताचें पुढील चरित्र पाहूं.

“ त्यास ( मांग सावंतास ) हातीं धरून मराठ्यांची सत्ता स्थापन करावी अशा हेतूनें देव दळवी यानें बंड केलें; तेव्हां देसायांनीं विजापूरच्या बादशहाकडे मदत मागितली. बादशहानें मदत देण्याचें कबूल करून सावंतांवर कांहीं सैन्य पाठविलें. त्याची व सावंत आणि दळवी यांची लढाई होऊन तींत मांग सावंत व देव दळवी हे दोघेहि ठार झाले ( इ. स. १५८० ). विजापूरकरांनीं भोंसल्यांचा मुलुख घेऊन तो प्रभु देसायांस दिला. ” ( सा. सं. इ. पृ. ३३ )

---

१ सा. सं. इ. पृ. ३२,३३.

२ मांग सावंत दोन मानिल्यास, त्यांच्यामधील पुरुषांची कुठूनहि कांहीं सोय लावतां येत नाहीं, ही अडचण टाळण्यासाठीं वरील असंबद्धता आणि त्याच्या पुढेंहि दिसणारा घोंटाळा रा. पिंगुळकरांनीं पतकरिला असावा !

आतां प्रश्न असा कीं, कोणी कोणास हातीं धरलें ? देसायांच्या कुडाळ परगण्यावर पूर्वापार सत्ता सांगणाऱ्या या भीमगडच्या 'देशमुखानें' आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या सेनापतीस, कीं उलट कुडाळच्या 'देशमुखीचें काम' करणाऱ्या प्रभूंच्या सेनापतीनेंच विजापूरच्या बादशाहातीसहि साहाय्य करणाऱ्या या सावंत बहादुरास ? यांतून कोणतें अधिक संभवनीय आहे ? आतां मांग सावंताचें वय या वेळीं (१५८०–१४७०=११०) कोणी तरी 'हातीं धरूनच' लढाईवर नेण्यासारखें होतें हें आह्मांस कबूल आहे ! तसेंच बादशहाहि आपणास मदत करणाऱ्या या सावंत बहादुराची बाजू घ्यावयाची सोडून त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या ( कुडाळदेशस्थ प्रभूंच्या ) बाजूस जातो हें तितकेंच आश्चर्य नव्हे काय ? असो.

या बंडाचा हेतु काय, तर मराठ्यांची सत्ता स्थापन करणें, आणि ती ब्राह्मणांची सत्ता नाहींशी करून ! असले हे विसाव्या शतकांतील उदात्त ( ? ) हेतु सुदैवानें त्या आडदांड सोळाव्या शतकांत नव्हते ! त्या काळीं ज्याला त्याला स्वतःसाठींच मुलुख मिळविण्याची हांव; स्वतःच्या जातीपुरती सुद्धां भावना कोणाच्या डोक्यांत येत नसे. १६ व्या शतकांत तर राहोच, पण पुढें १७ व्या शतकांतील वाडीच्या लखम सावंताला तरी 'मराठ्यांची सत्ता स्थापन करण्याची' कल्पना होती काय ? त्या काळीं शिवाजी महाराज विजापुरकरांविरुद्ध लढून हिंदुपदपादशाही स्थापन करण्याची अहर्निश खटपट करीत होते. इतकी थोर, दिव्य कल्पना कदाचित् लखम सावंतास आकलन होणें कठिण होतें असें समजूं, पण शिवाजी महाराज 'मराठे' होते हें तरी त्याला ठाऊक होतें कीं नाहीं ? मग शिवाजीला मदत करावी, निदान स्वस्थ बसून त्याच्या मार्गांत विघ्नें* तरी आणूं नयेत; तसें न करतां हा मनुष्य

*काव्येतिहाससंग्रह पु. २६ यांत शिवाजीवर आणिलेल्या प्रसंगाची माहिती दिली आहे.

"आपल्या[1] अंगचा पराक्रम दाखवून विजापूरच्या बादशहाची कृपा संपादून करण्यास ही संधि उत्तम आहे असें समजून......" विजापूरच्या बादशहास अशी विनंति करतो कीं, "मला कांहीं मदत मिळेल तर शिवाजीपासून कोंकणप्रांत मी सोडवून घेईन." ही याची मराठ्यांच्या सत्तेची कल्पना ! इतकेंच नव्हे, तर शिवाजीनें पोर्तुगीज लोकांची खोड जिरवितांच निराधार झालेला हा लखम सावंत शिवाजीला शरण येऊन तहे करितो, आणि लगेच तो मोडून थेट विजापुरकरांनां जाऊन मिळतो ! ही जर थोडाबहुत स्वतंत्रपणा मिरविणाऱ्या १७ व्या शतकांतील लखम सावंताची स्थिति, तर सोळाव्या शतकांत प्रभु देसायांच्या सेवेंत वंशपरंपरा असलेल्या या देव दळव्याच्या डोक्यांत 'मराठ्यांची सत्ता स्थापन करण्याची' कल्पना[3] येणें संभवनीय[4] होतें काय ? अर्थात् स्वामिद्रोह मागें पाडण्यासाठीं जातीचें नांव पुढें करून आपल्या देव दळव्याचें देवपण वाढविण्याचा हा रा. पिंगुळकरांचा प्रयत्न फुकट आहे ! पण कोणत्याहि हेतूनें कां होईना त्यानें खरोखरच बंड केलें कीं काय पाहूं.

१ इ.स.१५८० सालीं देसायांच्या सेनापतीनें बंड केलें असतें, तर त्यावे-

---

१ सा. सं. इ. पृ. ३९; २ सा सं. इ. पृ. ३९-४०-४१

३ पहा Gazetteer of the Bom. Presideny, Vol. xxiv-Kolhapur, Page 84.

४ ही कल्पना वाडीप्रांतांतील मराठ्यांमध्येंच नव्हती असें नसून, देशावरील मराठ्यांतहि ती नव्हती. आपसांतील भांडणें असतील तीं विसरून परकी शत्रूला तोंड दिलें पाहिजे या तत्वाचा अंतर्भाव 'मराठ्यांच्या सत्तेच्या स्थापनेंत' होतो; पण चंद्रराव मोरे, बाजी घोरपडे इत्यादि देशावरील मराठ्यांनीं विजापूरकरांच्या बाजूनें शिवाजी महाराजांस शक्य तितक्या संकटांत आणिलें हें इतिहासप्रसिद्ध आहे.

ळचा गादीवरील सरदेसाई भानजी[1] प्रभु याचा सूड घेण्यासाठीं इ. स. १५७३ पासून टपून बसलेले रामजी प्रभूचा मुलगा दादाजी प्रभु, व चुलतभाऊ गोमप्रभु, या दोघांना, भानजीचा खुद्द सेनापतीच त्याच्या विरुद्ध उठल्यामुळें, भानजीचा नाश करावयास ती सर्वोत्कृष्ट संधि होती. पण त्यांना पुढें १५८४

चित्रांक ६. भानजी प्रभु सरदेसाई यांचा एक शिक्का.



१ भानजी प्रभु हा इ. स. १५७३ सालीं आपला चुलतभाऊ जो रामप्रभु त्यास रेडीच्या किल्ल्यांत ठार मारवून, आपण त्याच्या जागीं सरदेसाई झाला. ही गोष्ट अर्थात्च रामजीचा भाऊ गोम प्रभु व मुलगा दादाजी प्रभु यांस आवडली नाहीं, व ते भानजीचा सूड घेण्याची संधि पाहत बसले. भानजीची राज्यव्यवस्था आणि बंदोबस्त चांगलाच असल्यामुळें ११ वर्षेपर्यंत त्यांना तशी संधि मिळाली नाहीं. पुढें इ. स. १५८४ सालीं त्यांनीं भानजीच्या विरुद्ध कट केला, आणि त्यांत दोन महालांवरचे देसाई "परउलेकर हर सावत आणि मांजरेकर खळ सावत" यांस सामील करून घेतलें. भानजी प्रभु मसुऱ्यास कांहीं राजकारणासाठीं गेला होता ही संधि आपला डाव साधण्यास योग्य आहे असें पाहून वरील कटाची मंडळी मसुरें येथें गेली; आणि भानजी तेथील किल्ल्याच्या बाहेरील मंडपांत कांहीं मंडळीसहित राजकीय कामांत गुंतला असतांना, त्यास या कटाच्या मंडळीनें किल्ल्यावरील गणेश नाईक नांवाच्या अधिकाऱ्याकडून बंदुकीच्या गोळीनें ठार मारविलें. भानजीच्या वधाची मिति नमूद आहे ती अशीः-"तारुण्यसवच्छरी सन खमस समानीन तिसामया मधे मसुरेस मारिला नायकाच्या गणेसाच्या हाते बंदुखेने सायंकाळीं मांडवामधे मारिला." ज्या ठिकाणीं भानजीचा खून झाला तेथें दर वर्षीं कांहीं ठराविक देवस्की आजमितीसहि केली जाते.

चित्रांक ७. भानजी प्रभु सरदेसाई यांच्या सहीचा नमुना.



पर्यंत आपला हेतु साधावयास मिळाला नाहीं, ही गोष्ट उघड सांगते कीं, भानजीचा अंमल अतिशय व्यवस्थित आणि करडा असून त्याच्या ११ वर्षांच्या कारकीर्दींत कोणाहि बंडखोरास वर डोकें काढावयास मिळालें नाहीं.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

भानजी प्रभूचा सेनापति नाग दळवी म्हणून होता. हा मूळ होडावडें गांवीं राहणारा. त्यास प्रभूंकडून ४०० होनांची तैनात होती. त्याच्या बापाचें नांव भान दळवी. भानजीच्या पश्चात् त्याला मारविणारा त्याचा चुलत बंधु गोमप्रभु हा ( इ. स १५८४ त ) गादीवर बसला गोमप्रभूचें कृत्य नाग दळव्यास न आवडून त्यानें १५८५ सालीं प्रभूंच्या विरुद्ध पुंडावा करण्यास सुरवात केली. ( रा. पिंगुळकरांनीं या बंडाची दिलेली हकीकत कांहीं बाबतींत चुकीची आहे. ह्मणून ती आमच्याजवळ असलेल्या पुराव्यावरून सविस्तर येथें देतों. ) नाग दळव्यानें सुरवातीस कोलगांवच्या डोंगराच्या आधारास राहून तीन वर्षेंपर्यंत पुंडावा चालविला. गोमप्रभूनें त्याला पकडून कैदेंत ठेविलें. नंतर तेथून त्यास विजापुरास नेऊन बादशाही कैदेंत ठेविलें. कैदेंत तो ३ वर्षें होता. तेथून तो व दुसरा एक दरवेश नायक नांवाचा मुसलमान कैदी होता तो, पळून कुडाळ प्रांतीं आले. या दोघांस पळून जाण्यास संधि अशी मिळाली. " दरवेश पातशाहा ( दुसऱ्या इब्राहिम अदिलशहाचें हें नांव असावें ) गादीवर बसला तेव्हां सर्व बंदिवान सोडिले, पण यास ( नाग दळव्यास ) सोडलें नाहीं. पण त्या रात्रीं हा पळाला.......दरवेश नायक मुसलमान विजापुराहून बंदींतून पळाला होता तो यास साहाय होता. " विजापुराहून पळून आल्यावर नाग दळवी आणि दरवेश नायक हे दोघे पुनः कोलगांवच्या आश्रयानें राहून ७ वर्षेंपर्यंत, व तेथून पुढें चौकूळ-बारदेशपर्यंतच्या प्रदेशांत ७ वर्षें मधून मधून पुंडाई करित राहिले. याप्रमाणें सेनापतीपद सोडून २० वर्षें काढिल्यावर तो इ. स. १६०५ सालीं लढाईंत मारला गेला. ती हकीकत अशी:—गोम प्रभूनें आपल्या दोन्ही पुतण्यांस, बरोबर कांहीं फौज देऊन, नाग दळव्याचें पारिपत्य करण्यासाठीं पाठविलें; परंतु लढाईंत ते दोघेहि पडले. त्यानंतर " कुडाळ येथील हवालदार मिर मुरादखान याणें स्वारी करून नाग दळवी सांतरडेचे भांडणी मारिला. आधीं भान दळवी लेंक पडला ( हेंच

२ आमच्या संग्रहीं इ. स. १५८२ चा एक 'जाबतो'[1] आहे. त्यांत 'जाबीते वोंवल व तेनाती देसाई व नाडकर्णी प॥ कुडाळ सु॥ सलास समानीन व तीसा मया' असें आरंभीं ह्मणून खालीं यादी दिली आहे. त्यांत एका ठिकाणीं '४०० तेनाती नाग[2] दळवी' असें नमूद केलें आहे. यावरून १५८२ सालीं नागदळवी सेनापती होता असें सिद्ध झालें. इ. स. १५८० सालीं जर दळव्यानें बंड केलें,—तेंही लहान-सहान नव्हे, तर ज्यांत विजापूरकर येऊन मोठी लढाई झाली, व त्यांत तो दळवी आणि मांग सावंत दोघेहि मारले गेले—तर पुढें दोनच वर्षांनीं ह्मणजे १५८२ सालीं त्याच कुळांतील हा नाग दळवी सेनापती राहून तैनात कशी भोगतो ? नाग दळव्यास 'थारविण्यासाठीं[3]' तैनात देऊं केली ह्मणावें तर आपल्या वडिलांनीं केलेल्या बंडानंतर इतक्या लवकर त्यानें स्वतः उचल खाल्ली, तसेंच इतक्या थोड्या काळांत देसाई दळव्यांचा उघड रणांत पुनः मोड करावयास असमर्थ बनले असें समजावयाचें काय ? याच नाग दळव्यानें पुढें गोम प्रभूच्या कार-

---


( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

नांव नाग दळव्याच्या बापाचेंहि होतें. ) देवळामधे नाग दळवी त्यासी समाचार गेला तां आपण दळवी आला दरवेश नायक मुसलमान जो विजापुराहून बंदीमधून पळऊन आणिला तो यैसे आले झगडा जाहाला दळवी पडीला दरवस नायक पडिला ते साल सन खमस व अलफ क्रोधी सवत्सर." ( इ. स. १६०५ ). याप्रमाणें ही नाग दळव्याची हकीकत आहे. रा. पिंगुळकरांनीं त्यांत कित्येक चुका केल्या आहेत; पण या नागदळव्याच्या बंडावरूनच त्यांनीं देवदळव्याच्या बंडाची कल्पना उभा-रिलेली आहे असें दिसतें.

१ छायाचित्र अंक ८ पहा. या लेखाचा कागद बराच जीर्ण झाला असून तो मळकट गोणपाटाच्या रंगासारखा असल्यामुळें, वरील अक्षरें शाबूद असूनहि, तीं छायाचित्रांत स्पष्ट उठूं शकलीं नाहींत.


२ जावत्यांतील श्रीकार सोडून १० वी ओळ पहा. ३ सा. सं. इ. पृ. ३३

चित्र अंक ८



इ. स. १५८२ सालातील जाबत्याच्या कागदांपैकी एक.

चित्र अंक ९



शक १५०४ (सन १५८२) मधील कुडाळ प्रांतांतील मोडी लिपीचा नमुना.

कीर्दींत खरोखरच बंड केलें, तेव्हां देसायांनीं त्याची काय दशा केली, हें रा. पिंगुळकरांनींच आपल्या पुस्तकांत दिलें[1] आहे; आणि त्याहून साधार माहिती आह्मीं टीपेंत दिली आहे. त्यावरून नाग दळवी हा 'थारविलेला' सेनापती नसून खरोखरचा सेनापती होता असें सिद्ध होऊन १५८० सालचें देव दळव्याचें बंड खोटें पडतें.

आतां या 'बंडखोर' ह्मटलेल्या दळव्याचें नांव तरी 'देव दळवी' असें होतें कीं काय तें पाहूं. मागें दिलेल्या जाबत्यावरून इ. स. १५८२ सालीं नाग दळवी हा सेनापती होता हें ठरलें. त्यावरून १५८० सालींहि बहुधा तोच सेनापती असावा. पण क्षणभर असें समजूं कीं, नाग दळव्याची नेमणूक १५८० नंतर झाली. तर मग १५८० सालचा दळवी हा नाग दळव्याचा पिता असला पाहिजे, कारण या दळव्यांचें कुळ वंशपरंपरा देसायांच्या सेनापतीच्या अधिकारावर होतें असें रा. पिंगुळकर ह्मणतात. नाग दळव्याच्या बापाचें नांव काय हें ते सांगत नाहींत. पण नाग दळव्याच्या एका शिक्क्यावरून[3] त्याच्या बापाचें नांव 'भान' दळवी असल्याचें स्पष्ट दिसतें. यावरून १५८० सालचा दळवी, नाग दळवी नसेल तर तो भान दळवी असला पाहिजे; ह्मणजे देव दळव्याला कुठेंच ठिकाण नाहीं! रा. पिंगुळकर या देव दळव्या-

---

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास. पृ. ३३

२ आमच्या संग्रहीं या सुमाराचे त्या प्रांताच्या इतिहासाशीं संबद्ध असे कांहीं कागद आहेत. त्यांत मांगसावंत-देवदळवी यांच्या बंडाचा मुळींच उल्लेख नाहीं. उलट, असे अनेक उल्लेख आहेत कीं, त्यावेळीं त्या प्रांतांतील प्रजा सुखी असून मुलुख आबादानींत होता; तसेंच अदिलशहाच्या साम्राज्यसत्तेखालील प्रभु सरदेसायांच्या राजवटींत ग्रामस्थ मंडळी दानधर्मादि कृत्यें करीत सुखानें कालक्रमण करीत होती.

३ जाधव ऊर्फ साठम घराण्याचा वृत्तांत.

बद्दल इतर कांहींच माहिती देत नाहींत; उलट, नाग दळव्याची ते बरीच माहिती देतात; पण तो देव दळव्याचा कोण हें मात्र गुप्त! बरोबरच आहे! कारण जुन्या कागदपत्रांत नाग दळवी अनेक वेळां आढळतो, पण देव दळव्याचें नांवहि नाहीं! तें नांव प्रस्तुत निबंधाचा विषय जो शिलालेख त्यांतील 'नऱ्यसी देवाचा दळवै' या अक्षरांतील 'चा' स्पष्ट न लागल्यामुळें एका लेखकानें उत्पन्न केलें; तेंच बहुधा रा. पिंगुळकरांनीं उपयोगांत आणिलेंसें दिसतें!

याप्रमाणें हा 'देव' या पृथ्वीवर कधींच आला नाहीं असें ठरल्यावर त्यानें प्रभु देसायांविरुद्ध बंड केलें, त्याकरितां मांग सावंतास हातीं धरिलें, मोठी लढाई झाली, त्यांत ते दोघेहि मारले गेले, वगैरे केवळ कल्पनांचा खेळ होय! मग त्यांत बिचाऱ्या मांग सावंताचा जीव जाऊन त्याचा सर्व मुलूख जरी प्रभु देसायांच्या हातीं गेला तरी त्याहि पुनः कल्पनाच! पण त्या जरा पद्धतशीर दिसतात हें लक्षांत घेण्यासारखें आहे. कारण सावंतांच्या खऱ्या मूळ पुरुषानें-खेम सावंतानें-आपल्या आयुष्यास अगदीं श्रीगणेशापासून सुरवात केली, त्यावेळीं सर्व कुडाळप्रांत प्रभु देसायांच्याच ताब्यांत होता ह्या खऱ्या इतिहासाशीं त्या जुळविलेल्या आहेत; बहुधा याच संधिकार्यासाठीं या 'देवाचा' आणि त्याच्या 'बंडा'चा अवतार मांग सावंताप्रीत्यर्थ रा. पिंगुळकरांच्या पुस्तकांत झाला असावा! असो.

येथवर मांग सावंताच्या स्वतःच्या चरित्रांतील असंबद्धता आणि असत्यता दाखवून, ह्या नांवाचा कोणी पुरुष झाला असें ह्मणावयास त्यांत कांहींच आधार कसा सांपडत नाहीं हें दाखविलें. आतां शेवटीं त्याचा परिवार, संतति वगैरे बाबतींकडे लक्ष देऊन, त्या बाजूनें तरी त्याचा सुगावा लागतो कीं काय हें पाहूं.

---

## प्रकरण ५ वें.

# मांग सावंत-परिवार आणि वंश.

" मांग सावंत यास सात बायका होत्या. त्यांपैकीं सहा बायका त्याच्याबरोबर सती गेल्या व एक बायको त्यावेळीं गरोदर होती ती ओटवणें गांवीं तिचे कोणी आप्त होते तेथें जाऊन राहिली. मांग सावंत यास यावेळीं कांहीं संतान नव्हतें यामुळें थोडीं वर्षेपर्यंत सावंत भोंसले हे नामशेष झाले[1] ".

मांग सावंतास यावेळीं ( १५८० ) संतान नव्हतें याचा अर्थ काय ? मागें १५५५ सालीं सावंत बहादुर किताब घ्यावयास त्याचे वंशज तयार झाले होते, मग ते सगळेच १५८० च्या आंत मृत झाले कीं काय? बरें त्यांच्या मुलांचें–कदाचित् नातवांचेंहि–काय झालें ? मोठीं माणसें सर्वच लढाईंत पडलीं असें एकवेळ समजूं, पण मुलांपैकीं एकहि शिल्लक राहूं नये हें आश्चर्य होय ! म्हणजे, या ११० वर्षांच्या मांग सावंतास आपल्या डोळ्यांदेखत कमींत कमी दोन पिढ्यांचा समूळ नाश पहावा लागला ह्मणावयाचें ! तर मग त्याचें एवढें वय झालें असतां त्याची एक बायको गरोदर राहते व तीहि अगदीं तो रणांत पडण्याच्या सुमारास, हा दैवी चमत्कार या दुर्दैवी माणसाच्या नशिबीं कुठून आला ? अथवा देवपदास पोंचणाऱ्या माणसाचें चरित्रच अशा चमत्कारांनीं भरलेलें असावयाचें असें मानिल्यास, मग सर्वच कांहीं ठीक आहे !

मांग सावंताच्या सहा बायका त्याच्याबरोबर सती गेल्या; तर मग मांग सावंताची ज्यानें छत्री बांधली, (असें रा. पिंगुळकर ह्मणतात) त्यानें पतीच्या शवाबरोबर अग्निप्रवेश केलेल्या या सतींचेंहि स्मारक जवळच कुठें तरी केलें असलें पाहिजे; तें दिसत मात्र नाहीं हें कसें ? अथवा

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ३३.

पतीच्या शवाबरोबर सहगमन न करितां निरनिराळ्या ठिकाणीं अग्नि प्रदीप्त करून त्यांत या साध्वींनीं प्रवेश केला असल्यास, त्यांचीं थडगींहि जवळपास कुठें तरी असलीं पाहिजेत; त्यांची कांहींच कथा रा. पिंगुळकर सांगत नाहींत ! स्वयंभूच्या देवळाच्या एका बाजूस ८।१० दगडी वृंदावनें थडग्यांसारखीं दिसतात, तीं या सतींचीं नव्हेत; त्यांचा इतिहास वेगळाच आहे, तो आह्मीं पुढें एका स्वतंत्र प्रकरणांत दिला आहे. शिवाय त्याबद्दल एक अगदीं उघड असा पुरावा आहे कीं, मांग सांवताची पूजा करणाऱ्या गुरवाला व ब्राह्मणाला त्याच्या बायकांच्या थडग्यांवरहि फूल अक्षता टाकणें भाग होतें, पण तसा कांहींच प्रकार या थडग्यांच्या बाबतींत दिसून येत नाहीं. बरें, या सहा बायकांपैकीं एकीशींहि, दुरूनच कां होईना, नातें जोडणारे कोणी आप्तसंबंधी नांवें देण्यासारखे नाहींत काय ? असो. आतां त्या सातव्या बायकोचें पुढें काय झालें तें पाहूं. ती ओटवणें गांवीं—सांवतांच्या वंशवृक्षांत दिलेला मुळपुरुष खेम सावंत याच्या गांवीं—आपल्या आप्तांकडे गेली. आतां चारहि बाजूंनीं निराधार झालेल्या या बाईनें आप्तांकडे आश्रयार्थ जाणें शक्य आहे; तेथें तिला नेमका मुलगाच होणें हेंहि शक्य आहे; आणि या मुलानें पुढें सावंतांचा एवढा विस्तार करणें हीहि गोष्ट शक्य कोटींतील आहे—अशक्य असें निदान कल्पनेला तरी कांहींच नाहीं ! पण या तिच्या आप्तांची थोडी माहिती, निदान नांवें तरी, रा. पिंगुळकरांनीं द्यावयाचीं होतीं ! तीं मिळावयास फारशी अडचण पडली असती असें नाहीं ! सध्यां सत्ताधीश असलेल्या सावंताच्या

१ नागदळव्याच्या बायका उसगांव येथें सती गेल्या असें निश्चितपणें रा. पिंगुळकर पृ. ३३ वर सांगतात; मग मांग सावंताच्या बायका होडावडें येथें सती गेल्या कीं दुसऱ्या कोणत्यातरी ठिकाणीं सती गेल्या हें स्पष्टपणें सांगावयाचें त्यांनीं कां टाळावें ?

या आद्यजननीशीं दुरूनहि संबंध पोंचवावयास जो तो अहमहमिकेनें पुढें आला असता ! पण ओटवणें गांवांत तपास करतां तसा कोणीच आढळत नाहीं ! संस्थानाधिपति सावंत हे तिचे एका बाजूनें वंशज, ते तर खेम सावंतापलीकडे कोणासच ओळखीत नाहींत हें मागें दाखविलेंच आहे. यावरून खेम सावंत ओटवणेकराशीं मांग सावंत होडावडेकराचा संबंध जोडून देणारा हा दुवा रा. पिंगुळकरांच्या कल्पनेबाहेर नाजुक ठरतो. असो. आतां तिच्या पोटीं आलेल्या अपत्याबद्दल विचार करूं.

"मांग सावंत याची जी एक गरोदर बायको ओटवणें गांवीं जाऊन राहिली होती तिला पुढें जो मुलगा झाला त्याचें नांव **फोंड सावंत**; या फोंड सावंतापासून खेम सावंत ओटवणेकर हे जन्मले[१]" (याच्यापुढें खेम सावंताबद्दल मजकूर)[२].

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ३५.

२ खेमसावंताचा बाप फोंड सावंत असें ह्मणावयास बहुधा सरकारी गॅझेटीअरचा आधार रा. पिंगुळकरांनीं घेतला असला पाहिजे. पण तसें त्यांनीं आपल्या पुस्तकांत सांगितलेलें मात्र नाहीं; त्यावरून ग्याझेटीअर मधील ही माहिती आपल्या पुस्तकांत ग्रथित करतांना याबद्दल त्यांची त्यांनांच खात्री नव्हती असें दिसतें; आणि नंतर आह्मीं त्यांनां खासगी पत्रद्वारें विचारिल्यावरून जें त्यांनीं उत्तर दिलें (तें याच प्रकरणांत पुढील पृष्ठावर दिलें आहे) त्यावरून हें आमचें अनुमान दृढ होतें. गॅझेटीअर-मध्यें (Ratnagiri पृ. ४४०) असें ह्मटलें आहे कीं "On the decline of Bijapur power in the early years of the seventeenth century (1627) *Phond Savant's son Khem Savant*, who held part of the Vadi Country in grant, *Jaghir*, made himself independent. (विजापूर-सत्तेच्या अवनतीच्या काळीं सतराव्या शतकाच्या सुरवातीस (१६२७ त) फोंडसावंताचा मुलगा खेमसावंत, जो वाडी प्रांताच्या कांहीं भागाचा जहागीरदार होता तो स्वतंत्र झाला.)

फोंडसावंत-खेमसावंत अशी एक पितापुत्रांची जोडी रा. पिंगुळकर यांनीं दिलेला वंशवृक्ष, तसेंच आह्मीं छापिलेल्या [ छायाचित्रें अंक १०।११ ] दोन वंशावळी

मांग सावंताच्या वृद्धपणीं झालेल्या या एकुलत्या एक मुलाबद्दल,—कीं ज्याच्यामुळेंच आज सावंतांचें नांव शिल्लक राहिलें असें रा. पिंगुळकरांच्या गोष्टींवरून दिसतें—त्याचें नांव फोंड सावंत आणि त्याच्यापासून खेम सावंत ओटवणेकर हे जन्मले, या पलीकडे कांहींच माहिती रा. पिंगुळकरांस देतां येत नाहीं हें आश्चर्य नव्हे काय? पण दिलेली तेवढी तरी माहिती विश्वसनीय आहे काय तें पाहूं. प्रथम नांव. त्याबद्दल आम्हीं विचारिलेल्या प्रश्नाचें रा. पिंगुळकर असें उत्तर देतात कीं, "मांग सावंत याचा मुलगा फोंड सावंत असें पृ. ३५ वर म्हटलें आहे ती माहिती आधारभूत अशी नाहीं." मग तसें त्यांनीं पुस्तकांत कां सांगितलें नाहीं? दुसरी गोष्ट, खेम सावंताचें पितृपद मुळीं ज्याच्या नांवाबद्दलच संशय आहे, अशा माणसास खेम सावंताचा पिता म्हणण्यापेक्षां खुद्द रा. पिंगुळकरांनींच पृ. ३५ वर टीपेंत दिलेलें सबनीसांच्या दप्तरांतील विधान निःसंशय अधिक विश्वसनीय होय. तें खालीं दिल्याप्रमाणें आहे:—


"मूळ पुरुष सोम सावंत. त्यास तीन मुलगे—गोम सावंत, रुप सावंत व पाय सावंत. गोम सावंताचे वंशज सालईवाडकर सावंत; रुप

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

या तिहींतहि सांपडते; त्यांतील खेमसावंत हा पराक्रमी पुरुष होऊन गेला, त्यानेंच स्वतःस "देसाई" म्हणवून घेण्याचा प्रघात पाडला, वगैरे त्याजबद्दलची माहिती हचिन्सनच्या बखरींत सांपडते; पण हें सर्व सन १६२७ त नसून १६७५-१७०९ याच्या दरम्यान होय. ग्याझेटिअरकरांच्या लक्षांत हें कालमान न येऊन त्यांनीं विशेष प्रसिद्ध असलेल्या ह्या पुढच्या खेमसावंताचा आरोप त्याच्या पूर्वींच्या खेमसावंतावर केला असला पाहिजे; आणि तसें करतांच मग तो खेमसावंत "फोंडसावंताचा मुलगा" होणें हे साहजीकच झालें! अशा तऱ्हेची अदलाबदल पुढच्या खेमसावंतापूर्वींच्या दुसऱ्या कांहीं पुरुषांसंबंधानेंहि झाली आहे, हें आम्हीं पुढें ६ व्या प्रकरणांत टीपेंत दाखविलें आहे

चित्र अंक १०



वाडकर सावंत भोसले यांचा एक वंशवृक्ष.

सावंताचे वंशज आकेरी, इनसुली, वेंगुर्लें व कुडाळ येथील सावंत व पाय सावंताचे पुत्र खेम सावंत ओटवणेकर." ( सा. सं. इ. पृ. ३५ )

याच माहितीला दुजोरा देणारा असा इ. स. १८१२ पर्यंतचा सावंतांचा एक वंशवृक्ष[1] शेवटचे बाजीराव पेशवे यांजकडे असलेल्या एका पाटकर प्रभु उपनांवाच्या सरदाराच्या वंशजांपाशीं आढळला. त्यांत "**मुल पुरुष पाये सावत राहाणार वोटवणे**" असें म्हटलें आहे. तसेंच सावंतांच्या निरनिराळया पुरुषांची कारकीर्द दाखविणारा एक जुना कागद[2] आम्हांस उपलब्ध झाला आहे त्यांतहि खेम सावंताचा बाप "पाये सा। वोटवणेकर" असेंच म्हटलें आहे.

याच्या जोडीस आम्हीं रा. पिंगुळकरांच्याच पुस्तकांतून आणखी असा पुरावा देतों कीं, त्यावरून खेम सावंत हा मुळीं मांग सावंताच्या मुलाचा मुलगाच ठरणें संभवनीय नाहीं !

१ रा. पिंगुळकरांनीं पृष्ठ ३५ वर "लहानपणीं त्यांची-खेम सावंताची-स्थिति फार गरिबीची होती" असें सांगून, या गरिबीची कल्पना येण्यासारखी एक आख्यायिका दिली आहे. "ओटवणें येथें त्या वेळीं वरदे उपनांवाचे शेणवी गृहस्थ कुळकर्णी होते. खेम सावंत हे त्यांच्या घरीं गुरें[3] राखण्यासाठीं राहिले होते......." जो मांग सावंत सतत पाऊण

१ छायाचित्र अंक १०

२ ,, ,, ,, ११ अ. ब.

३ या आख्यायिकेचा पुढील भाग येणें प्रमाणें:-" एके दिवशीं दुपारच्या वेळीं ते गुरांस गोठणीवर बसवून आपण एका झाडाखालीं विश्रांति घेण्यासाठीं पडले तेथेंच त्यांस झोंप लागली. इतक्यांत जवळच्या बिळांतून एक मोठा सर्प बाहेर येऊन त्यानें त्यांच्यावर आपली फणा पसरून धरिली. खेमसावंताच्या धन्यानें त्याच्या येण्याची वाट पाहून मग तो त्यास शोधण्यासाठीं रानांत गेला; तेथें हा चमत्कार त्याच्या दृष्टीस पडला. तें पाहून खेमसावंत हे पुढें मोठे भाग्यशाली होतील अशी त्याची खात्री झाली. त्यास पाहतांक्षणींच सर्प आपल्या बिळांत निघून गेला......

शतकाच्या वर त्या भागांत मोठ्या ऐश्वर्यानें नांदला, ज्यानें मुलूख मिळविला, सत्ता संपादन केली, देशमुखीचें काम केलें, पोर्तुगीजांच्या विरुद्ध विजापुरकरांना मदत करून लढाया मारिल्या, सावंतबहादर किताब मिळाविला, असें रा. पिंगुळकर सांगतात—त्याच मांग सावंताचा प्रत्यक्ष मुलगा इतका नादान आणि नालायक निपजला असें समजावयाचें काय, कीं ज्याच्या मुलास त्याच भागांतील एका कुळकर्ण्याच्या घरीं गुरें राखणें भाग पडावें ? त्याला स्वतःचे भाऊबंद नसले तरी मांग सावंतास हातीं


---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

ज्या ठिकाणीं सर्पानें खेमसावंतावर फणा धरिली त्या ठिकाणीं **हल्लीं एक पाषाणी सर्प पूजेस लाविलेला** असून त्याची तेथील पंचायतन देवांत गणना होते. यावरून वरील आख्यायिकेस बळकटी येते." ( सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ३५–३६ )

पूजेस लाविलेला हा पाषाणी सर्प खेमसावंताच्या पश्चात् लौकरच पूजेस लाविला नसून हल्लीं लाविलेला आहे, ही रा. पिंगुळकरांची माहिती, त्याची घडणावळ पाहित्यानेंहि पटण्यासारखी आहे. अलीकडेच पूजेस लाविलेल्या या सर्पानें जशी रा. पिंगुळकरांच्या आख्यायिकेस बळकटी येते, तशीच किंबहुना अधिकच दुसऱ्याहि एका जुन्या आख्यायिकेस बळकटी येते. ती आख्यायिका अशीः—


मठगांवांतील स्वयंभूच्या देवळा इतक्याच तत्प्रांतस्थ एका प्राचीन शिवालयांत प्राचीन स्थानिक राजानें शिवपिंडीवर छाया पाडणारा एक सोन्याचा सर्प करून ठेविला होता. कांहीं राजकीय अगर दुसऱ्या कारणांमुळें तो सर्प सावंतांनीं हस्तगत करण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्यांना बऱ्याच प्रयासानंतर यश आणून देण्याच्या कामीं [ रा. पिंगुळकरांनीं आपल्या आख्यायिकेंत खेमसावंताचे धनी ह्मणून सांगितलेल्या ] वर्दे उपनांवाच्या ओटवण्याच्या मूळच्या कुळकर्ण्यांनींच मदत केली. तो सर्प सावंतांनीं कांहीं वर्षांनीं वितळविला. नंतर तो त्यांस बाधूं लागला, अशा समजुतीनें, वरील पाषाणी सर्प त्यांनीं नंतर ओटवणें गांवीं पूजेस लाविला. वरील वर्दे यांच्या एका शाखेंत नागपंचमीच्या दिवशीं नागाची पूजा करीत नाहींत, याचें कारण आपल्या पूर्वजांनीं एक नाग मारला होता असें ते सांगतात.



चित्र अंक ११ (अ)

वाडकर सावंत भोसले यांची कारकीर्द दाखविणाऱ्या कागदाची एक बाजू.

चित्र अंक ११(ब)



छाया चित्र ११ अ या कागदाची दुसरी बाजू.

धरणारा जो त्याचा जातभाई देवदळवी त्याचेहि वंशज नष्ट झाले होते काय, कीं ज्यांनां या दुःस्थितींत पडलेल्या सावंतबहादुरास मदत करतां आली नाहीं ? नाग दळवी तर थेट १६०५ पर्यंत होता. त्याच्यानें या शिसोदिया घराण्यांतील सावंतास गुरें राखतांना पाहवलें कसें ? अर्थात् वरील आख्यायिकेंत कांहीं अर्थ आहे असें मानावयाचें—आणि रा. पिंगुळकर तसें मानतात—तर असेंच ह्मणणें भाग आहे कीं, खेम सावंत हा मांग सावंताच्या मुलाचा मुलगा नव्हे.

( २ ) खेम सावंताची पुढील हकीकत:—

"कुडाळदेशस्थ प्रभु हे या प्रांताचे देशमुख असतांना...खेम सावंत यांजकडे माणगांव तर्फेची नाइकी होती...त्यांनीं पुंडाव्यास आरंभ केला. पुढें कांहीं दिवसांनीं **ह्मामदराजा** नांवाचा एक विजापूरचा सरदार पारपोली घांट उतरून येत असतां खेम सावंत यांनीं त्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला..............खेम सावंत यांनीं दयाळूपणानें त्यास जीवदान देऊन सोडून दिलें. त्यानें विजापुरास गेल्यावर खेम सावंत यांच्या शौर्याची व दयाळु स्वभावाची फार तारीफ केली. त्यावरून बादशहा खुष होऊन त्यानें खेम सावंत यांस देशमुखीची सनद दिली. ही गोष्ट इ. स. १६२७ च्या[1] सुमारास घडली."

---

१ या विधानांस आधार काय तें रा. पिंगुळकर सांगते तर ठीक झालें असतें; बहुधा सरकारी गॅझेटीअरवरूनच ही माहिती त्यांनीं घेतली असावी. (पृ. २७ वरील टीप पहा ) एरव्हीं तद्विरुद्ध प्रमाणें बरींच आहेत तीं अशीं:—

( १ ) या पुस्तकांतील परिशिष्ट लेखांक ३ ( छायाचित्रांक १२ अ, ब ) हा निवाडा सन १६३० मध्यें प्रभुसरदेसायांनीं कुडाळांत केलेला आहे; अर्थात् विजापूरकरांतर्फे या काळीं तेच कुडाळप्रांतावर अधिकार चालवीत होते. पण ते तसे सरदेसाई असूनहि, पुढें ज्याप्रमाणें शिवाजीमहाराजांविरूद्ध सावंतांस ह्मातीं धरणें विजापूरकरांस भाग पडलें तसा प्रकार खेम सावंताच्या काळीं

खेम सांवंताची इतकी माहिती देणारे रा. पिंगुळकर त्याचा जन्म कोणत्या सालीं झाला हें मात्र सांगूं शकत नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अगदीं अलीकडे झालेल्या या खऱ्याखुऱ्या पुरुषाचा—वंशवृक्षांतील मूळपुरुषाचा—जन्मकाल सुद्धां ज्यांना ठाऊक नाहीं त्यांनीं

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

झाला असेल ह्मणावें, तर त्याकाळीं बादशहातीच्या या भागांत शांतता होती, आणि शिवछत्रपतीचा जन्म सुद्धां झाला नव्हता! शिवाय पुढें सावंतांस हातीं धरलें त्याच्या अगोदर सांवतांनीं कोणत्यातरी प्रकारें थोडें बहुत शौर्य दाखविलें होतें; पण या काळीं ( सन १६२७ पूर्वी ) खेम सांवत नुकताच पुंडाई करूं लागला होता! अशा स्थितींत, पूर्वापार चालत आलेला प्रभु सरदेसायांचा अधिकार काढून घेऊन तो लुटालूट करणाऱ्या या खेमसावंतास आपल्या सरदारास त्यानें जिवें मारलें नाहीं याजबद्दल बक्षीस ह्मणून द्यावयास, परगण्याची देशमुखी बहाल करणें हा एक पोरखेळ होय असें विजापूरचा सुप्रसिद्ध महमद अदीलशहा मानीत असल्याचें दिसत नाहीं! शिवाय त्या काळीं प्रबळ असलेल्या या बादशहानें असल्या या उपकारांची फेड त्या उपकारकर्त्यास नेस्तनामूदच करून केली असती, अपमान सहन करून उलट देशमुखीचा नजराणा देऊन नव्हे, हें सबंद मुसलमान रियासतीचा इतिहास पाहिल्यास कोणासहि पटण्यासारखें आहे. पण दरबारांत व खुद्द बादशहाकडे इतकें वजन असणारा सरदार अशा दूरच्या प्रांतीं इतक्या थोड्या लोकांनिशीं येतो कीं, घांटांत त्याला सहज लुटारूंच्या या टोळीनें लुटावें, ही गोष्ट बरीच असंभवनीय दिसते! या संबंधांत आह्मांस एक आख्यायिका माहित आहे, ती येणें प्रमाणें:—

विजापूरच्या बादशहाच्या घराण्यांतील "मासाहेबा ऊर्फ बडे साहेबीण" या नांवाची एक बेगम मक्केस गेली होती ती परत येऊन वेंगुर्लें मार्गानें घांटांतून विजापुरास जात होती. या सुमारास जंगलाच्या आश्रयानें राहून खेमसावंतानें लुटालुटीस आरंभ केला होता. बेगमेचा मेणा रस्त्यान जात असतां एका भोयावर त्यानें आडून गोळी घातली. भोई जखमी होऊन पडतांच, खेमसावंतानें पुढें येऊन बेगमेस असें भासविलें कीं "प्रभु सरदेसायांच्या राज्यांतली ही एक बंडखोर

चित्र अंक १२ (अ)



शक १५५२ (सन १६३०) सालीं प्रभु सरदेसाई यांच्या राजवटींत कुडाळांत झालेल्या साधले घराण्याच्या निवाड्याच्या कागदाची एक बाजू.

चित्र अंक १२ (ब)



छाया चित्र १२ अ. या कागदाची दुसरी बाजू.

त्याचा बाप, आजा वगैरे पूर्वजांच्या गोष्टी रचीत बसावें हें धाष्टर्य झटलें पाहिजे! पण पिंगुळकरांनीं प्रत्यक्ष दिला नाहीं तरी, त्यांनीं दिलेल्या माहितीवरून, खेम सावंताचा जन्मकाल आपणास अनुमानानें काढतां येईल. खेम सावंत प्रथम गुराखी, नंतर तर्फेवरचा नाईक,

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

टोळी आहे, तिचा मोड करण्यासाठीं मीं या तर्फेवरील नाईक तिच्या पाठीवर होतों. बंडखोरांनीं गोष्टी सोडलेली ऐकून मीं धांवून आलों. माझ्या बरोबरचे लोक आपणास घांटमाथ्यापर्यंत सुरक्षित पोंचवितील." असें म्हणून मेण्यास त्यानें खांद लाविला. बेगमेस पुढें पोंचविल्यावर आपली ही सेवा बादशहाच्या कानावर घालण्याबद्दल त्यानें तिला विनंति केली. आपणास जीवदान देणाऱ्या या नाईकास काय पाहिजे असें विचारतांच माणगांव तर्फेच्या नाइकीची सनद बादशहाकडून मिळावी म्हणून त्यानें सांगितलें. कोणी म्हणतात कीं, बारा तर्फांतील एक एक प्रमुख असे बारा गांव त्यानें मागितले, व हा सल्ला त्यास ओटवण्याच्या कुळकर्ण्यानें दिला. कांहींहि असो, पण बेगमेनें पुढें बादशहाकडून खेम सावंताच्या नावें नाइकी-ची सनद पाठवून दिली. या सनदेच्या जोरावर तो सरदेसायांस जुमानीनासा झाला, व बाराहि तर्फांवर आपला हक्क पोंचतो असें म्हणून प्रांतांत जास्तीच लुटालूट करूं लागला. सदरील बेगमेचें नांव जुन्या लेखांत दोन ठिकाणीं आढळतें. म्हामदराजाचें नांव-राजा, राव हीं नांवें मुसलमानानीं लाविलेलीं आढळत नाहींत-मुळींच आढ-ळत नाहीं. रा. पिंगुळकरांचा हा " म्हामदराजा " ह्मणजे ही " मासाहेबा बेगम "च नसेलना? " मासाहेबा " या शब्दाचें " म्हामदराजा " त रूपांतर होणें फारसें कठीण नाहीं. तें कसेंहि असलें तरी आह्मीं दिलेली आख्यायिका अधिक सुसंगत असून तिच्यावरून खेम सावंतास फार तर नाईकीची सनद मिळाल्याचें दिसतें.

( २ ) इ० स० १६२७ तच नव्हे, तर खेम सावंतास मुळीं देशमुखीची सनदच मिळाल्याचें दिसत नाहीं. कारण शिवाजीविरुद्ध सावंतांनीं आपणांस केलेल्या मदतीनें विजापूरकर खुष होऊन त्यांनीं सावंतांस बक्षिसादाखल दहा गांव इनाम दिल्याचीं १६६४ सालचीं फर्मानें आहेत. ( सावंतवाडी सं. इतिहास परिशिष्ट लेख नं. ८।९ ) तीं " अंमलदार हल्लींचे व पुढें होतील त्यांस व देसाई परगणे कुडाळ" यांस

त्यानंतर पुंडावा करणारा आणि शेवटीं १६२७ सालीं देशमुख झाला. गुराखीपणांतून शिपाईगिरीचा पेशा, आणि त्यांतून पुढें हळुहळु नाईकी, अर्थात् ही कर्तबगारी बऱ्याच कालावधीची होय; म्हणून त्याचें वय नाईक झाला त्यावेळीं २५।३० च्या आंत असणें शक्य नाहीं. यापुढें

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

उद्देशून आहेत. अर्थात् कुडाळ परगण्यावर तोंपर्यंत सावंतांशिवाय दुसरे कोणीतरी–ह्मणजे प्रभु हेच–देसाई असून सावंतांस तो अधिकार अद्याप मिळाला नव्हता; मग खेम सावंतास तो मिळाला नाहीं हें सांगावयास नकोच !

( ३ ) यावर सन १६३५ त खेमसावंतानें आपल्या नांवापुढें " सरदेसाई परगणे कुडाळ " असें लावून " अंतशेणवी बिन नारशेणवी " ( चिटणीस ) यास दिलेला कौलनामा ( सा. सं. इतिहास परिशिष्ट लेख नं. २८ ) रा. पिंगुळकर पुढें करितील ! तर त्यावर पुढें १९ वर्षांनीं त्याचा मुलगा ( मुलगा कीं नातू ? ) लखम सावंत हा एका कौलनाम्यांत ( सा. सं. इ. परिशिष्ट लेख नं. २९ ) स्वतःस नुसते " देसाई " च ह्मणवितो असें दाखवितां येईल ! या 'देसाई' 'सरदेसाई' शब्दांवर फारसा विश्वास ठेवितां येत नाहीं, कारण ते मागाहूनहि कोणीतरी जोडून देणें किंवा त्यांची अदलाबदल करणें संभवनीय आहे ! खेमसावंताच्या या कौलनाम्यांत तसा शब्दसंस्कार बराच झालेला दिसतो ! कारण खेमसावंताच्या काळच्या कुडाळ प्रांतांतील दरबारी अस्सल कागदांची भाषा खेम सावंताच्या या कौलनाम्याइतकी फारशी–शब्द–प्रचुर नाहीं, ( या पुस्तकांतील सन १६३० चा परिशिष्ट लेखांक ३ पहा ). त्यांतील हा बादशाही थाट मागाहून बळेंच ओढून आणिलेला दिसतो ! असो. पण या कौलनाम्यांतील मजकुराकडे नजर फिरवितांच खेमसावंत सरदेसाई, देसाई, कीं दुसराच कोणी होता हें स्पष्ट होतें. अंतशेणवी यास खेमसावंत ह्मणतोः—"......तूं कदीम ( जुना ) मिरासी ( वतनदार ) चिटणवीस पइले तुजे आजा अंतशेणवी चिटणविशी चालवित असतां तुजे बाप नारशेणवीं यासी हरकारगी मिरास देसाई ( प्रभु देसाई ) याणीं मोकरर करून दिवाण चाकरीसी ठेविले होते...तेणें प्रमाणें हुजती ( हुजुरती=बादशाही ) फर्मान...आणवून" दिलें होतें ( परिशिष्ट लेखांक १८ कलम १४ पहा). पुढें या चिटणविशीचा मुशा-

गुंडावा करण्याची बुद्धि, आणि नंतर देशमुखी. तीहि बादशहा कोणा उपटसुंभाला देणें शक्य नाहीं, त्या मनुष्याची बरीच स्थिरस्थावर झालेली असली पाहिजे. तशी ती व्हावयास कमींत कमी दहा वर्षें लागलीं असें मानावयास हरकत नाहीं. म्हणजे खेमसावंत हा

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

हिरा बंद कां झाला तें सांगून खेम सावंत ह्मणतो " तुमी बिन मुशाहिरा चाकरी करितां ती व आमावरी यकसान होऊन आमच्या सेवे यकनीयागी असता दखोन आमी तुमावरील संतोषेन तुमचे मूल गंगाधर शेणवी यासी हरकारगी **देस तालुका तिचे मिरास** मोकरर करून देऊन यासी मुशाहिरा सालिना तिला होनु ३६ मोकरर करून खेरीज हक्क मोकासा इसा दिल हरीपटी करून देऊन दिवाण खिजमतीसि ठेविले असे". या चिटणीसांस प्रभु सरदेसायांकडे असतांना मिळत असलेल्या वेतनाची माहिती सा. सं. इ. परि. ले. नं. ३१ मध्यें दिली आहे. त्यावरून त्यांस ८० होन, दोन गांव इनाम, व बंदर वेंगुर्लें येथील जकातीपैकीं कांहीं भाग इतका मुशाहिरा मिळत होता असें समजतें. पण पुढें प्रभु सरदेसायांविरुद्ध खेम सावंतास ते सामील झाल्यावर ( सा. सं. इ. पृ. ३८ आणि या पुस्तकांतील परिशिष्ट लेख १८/२ कलम १४ पहा ) हा मुशाहिरा रद्द करण्यांत आला, त्यामुळें त्यांस खेम सावंताची चाकरी बिनमुशाहिरा करणें अपरिहार्य झालें. रा. पिंगुळकर सांगतात त्याप्रमाणें खेमसावंतास सन १६२७ त कुडाळ परगण्याची देशमुखी मिळाली होती तर सन १६३५ तील ही चिटणीसाची चाकरी बिनमुशाहिरा कां ? तसेंच अंत शेणव्याच्या मुलास हरकारगीची मिरास मोकरर करून मुशाहिरा देतांना " देस तालुका " च नमूद कां, देस ' परगणा ' असें कां नाहीं ? याचें उत्तर सरळ आहे कीं, खेम सावंताजवळ कुडाळ परगण्याची देशमुखी नसून फार तर फक्त एका-माणगांव-तालुक्याची ह्मणजे तर्फेची नाइकी असावी !

( ४ ) रा. पिंगुळकरांनीं आपल्या इतिहासाच्या शेवटीं वाडकर सावंतांचे पोवाडे छापले आहेत; त्यांतील जयराम सावंतावरील पोवाड्यांत त्यानें आंग्रे यांजबरोबर झालेल्या लढाईत देवाला मारळ ठेविला त्याचें वर्णन करितांना "**वंश नाईकाचा** नारळ ठेविला " असें शाहीर ह्मणतो. त्यावरून सावंतांस नाइकाचा वंश

३५।४० च्या पुढें देशमुख झाला असें ठरतें. यावरून त्याचा जन्म (१६२७–३५।४० ) इ. स. १५८७ आणि १५९२ यांच्या दरम्यान, किंबहुना तत्पूर्वीच झाला असें ह्मणणें प्राप्त आहे. या वेळीं मांग सावंताचा

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

असें ह्मणण्याचा प्रघात होता हें उघड दिसतें. सावंतांच्या या " नव्या " वंशांतील पहिला पुरुष खेमसावंत ( " जुन्या " वंशांतील रा. पिंगुळकरांनीं उभा केलेला पहिला पुरुष मांग सावंत याची विस्मृति पडली असें घटकाभर समजूं ) जर देशमुख झाला असता तर त्याच्या पूर्ववयांतील नाईकपणा बाजूस ठेवून शाहीरानें "वंश देशमुखाचा " असें कवन मोठ्या आनंदानें केलें असतें ! ( झारापी गांवांतील पंडूच्या पाथरी ( शिला ) जवळ नाईकाचा वंश ह्मणून नारळ ठेविला, त्याच्या पुढील कडवें " वंश दळव्याचा बोंब मारिली त्या जाग्याला " असें आहे. नाईकाच्या (सावंतांच्या) वंशाच्या नांवानें त्या जागीं नारळ ठेवल्यावर लगेच दळव्याच्या वंशाच्या नांवानें बोंब मारणें, या विषींत प्रभु सरदेसायांच्या घराण्यांतील एका सतीच्या इतिहासाशीं संबंध आहे. )

( ५ ) पण खेमसावंतास मिळलेली ही बादशाही सनद रा. पिंगुळकरांनीं उजेडांत आणिली असती ह्मणजे वरील सर्वच संशय क्षणांत नाहींसे झाले असते ! सन १६३५ त खेमसावंतानें ' सरदेसाई परगणे कुडाळ ' या नात्यानें दिलेला कौलनामा जर उपलब्ध होतो, तर तत्पूर्वी फक्त आठच वर्षें त्याला स्वतःला सरदेसाई बनविणारी बादशाही सनद उपलब्ध कां नसावी ? " पण १६२७ च्या सुमारास " या अनिश्चित विधानावरून रा. पिंगुळकरांस ही सनद संस्थानच्या दप्तरांत मिळाली नसावी हें उघड होतें; सन १८१८ त कॅप्टन हचिनसन साहेबांसहि ती मिळाली नाहीं; यावरून अशी सनद खेमसावंतास खरोखर 'मिळाली' असें ह्मणण्यापेक्षां खरोखर 'मिळाली नाहीं' हेंच ह्मणणें जास्त सयुक्तिक दिसतें. संस्थानच्या दप्तरांत "सावंतांचा अंमल सुरू होण्यापूर्वीचे थोडेसे कागदपत्र मिळतात " (सा. सं. इ. पृ. १५।१२ ) तर तो सुरू करणारी ही बादशाही सनद कां मिळूं नये ? ज्या चिटणीसांच्या घरीं खेमसावंताचा कौलनामा मिळाला, त्या चिटणिसांच्या घराण्याकडे "जुन्या सरकारी दप्तराचा बहुतेक भाग अद्याप त्यांच्याच ताब्यांत आहे" ( सा. सं. इ. पृ. १४९ ) ह्मणून

मुलगा फार तर ६ आणि ११ च्या दरम्यान वयाचा असेल! या वयांत तो खेम सावंताचा जनक होणें शक्य आहे काय ?

खेम सावंतास मांग सावंताशीं जोडूं पाहणारा एकटाच असा हा बंध याप्रमाणें बाजूस पडतांच, खेम सावंताचें घराणेंहि मांग सावंतापासून

---

१. " खेम सावंत फोंड सावंतापासून जन्मले, असें जें म्हटलं त्याचा अर्थ किंवा लिहितानांचा हेतु खेम सावंत हा फोंड सावंताचा मुलगा असा नसून त्याच्या त्या वंशांत तो झाला असा आहे " असें रा. पिंगुळकर आह्मांस कळवितात. वर दाखविलेंच आहे कीं मांग सावंताचा मृत्यु आणि खेम सावंताचा जन्म यांमध्यें अवघा ७ पासून ११ वर्षांचा अवधि उरतो, त्यामध्यें एक पुरुष सुद्धां समाविष्ट होत नाहीं, मग हा फोंड सावंत व ( वंशज मानिलेले भाम सावंत आणि नऱ्यसी देव दळवी हे मांग सावंताचे पूर्वज होऊन बाजूस सरल्यानें तितकी गर्दी कमी झाली तरी शिल्लक राहिलेले) आणखी कांहीं पुरुष, यांना रा. पिंगुळकर कुठें स्थान देणार आहेत तें त्यांचें त्यांनांच ठाऊक !

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

ही बादशाही सनद असली पाहिजे ! पण ती असती तर रा. पिंगुळकरांनीं पुढें आणिलीच असती ! (सरकारी दप्तर, आणि तेंहि थोडें थोडकें नसून "त्याचा बहुतेक भाग" या चिटणिसांकडे अजून कां राहिला ? वास्तवीक तो संस्थानच्या मालकीचा आहे. )

( ६ ) कॅप्टन हचिन्सन साहेबांनीं कागदपत्र पाहून सबनिस, चिटणिसादि दरबारी मंडळीकडून माहिती मिळवून जी सन १८१८ सालीं पहिलीच बखर लिहिली त्यांत ते खेम सावंताचें नांव, देशमुख ह्मणून तर नव्हेच, पण नुसतीं सावंतांच्या सत्तेस सुरवात करणारा या नात्यानेंहि देत नाहींत. त्यांच्या मतें **माणगांव तर्फेवरचा नाईक लखम सावंत** यानेंच पुढें सावंतांच्या सत्तेचा पाया, ती वंशपरंपरा चालू राहील अशा रीतीनें घातला.

" Previous to the conquest of Shivaji Raja the celebrated founder of the Maratha Empire, the country now denominated the Savantwaree State consisted of the Koodal Province, subdivided into twelve districts, each

दूर होतें हें सांगावयास नकोच! मांग सावंताचें अस्तित्व त्याच्या स्वतःबद्दलच्या हकीकतीनें सिद्ध होत नाहीं, ह्मणून त्याचे वंशज ह्मटलेल्या व्यक्तींच्या इतिहासावरून त्याचा सुगावा लावण्याचा हा प्रयत्न केला, तों ते त्याचे वंशजच नव्हेत असें ठरतें! मग हा मांग सावंत वाडकर सावंतांचा पूर्वज होय असें ह्मणावयास रा. पिंगुळकरांपाशीं आधार तरी कोणते आहेत तें पाहण्यासाठीं त्यांना तसें विचारिलें.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

under a petty chief, collectively styled the *Bara Naiks* and the *five purgunas* of Dicholee, Phonda, Pedna, Sanklee and Maneree, under as many several Desaees, all subject to the superior authority of the Desaee of Koodal by birth a Brahmin, himself tributary to the Nawabs of Bijapoor on Krishna.

"As circumstances aided,the several chiefs and Desaees until overpowered or awed used to resist the payment of their respective quotas. Of these *Lukum sawant*, the *Mangaum Naik*,was the most distinguished by enterprising and turbulent dispostition; during the course of a successful resistance, in a *predatory incursion* he made captive the Desaee of Koodal and subsequently assumed his authority, through the inability of the Bijapoor Durbar to oppose his usurpation. Vigorous means shortly reduced to his submission the other Desaees and petty chieftains and fixed his power on a basis so firm as to have been transmitted to his descendants."

( *Selections from the Records of the Bom. Govt. Vol.X* ( *New Series* ) *P. 153* ).

## प्रकरण ६ वें.

# मांग सावंताचे आधार—बखर आणि सामंतविजय.

आम्हांस वाटलें होतें कीं, आमच्या पत्रास उत्तर ह्मणून रा. पिंगुळकर मांग सावंताचें दप्तरच पुढें ठेवतील ! कारण मांग सावंत हा आपल्या वंशजांसह सतत पाऊण शतक राज्याच्या उलाढाली करीत होता, तेव्हां त्याचे कांहीं तरी कागदपत्र जमणें अवश्यच आहे. त्याच्या मृत्यूनंतर बादशहानें त्याचा मुलूख काढून घतला असेल, पण त्याच्या घरांतील चीजवस्त लांबविण्याची बादशहास कांहींच जरूर नव्हती ! त्या वस्तूंबरोबर मांग सावंताचे कागदपत्र त्याच्या ७ व्या बायकोच्या आप्तांकडे येऊन, त्यांनीं ते, मांग सावंताचा मुलगा नाहींतर नातु पुढें लवकरच कर्ता झाला, त्याच्या स्वाधीन करणें साहजिक दिसतें. त्या नातवाचें घराणें तर अगदीं अविच्छिन्नपणें आतांपर्यंत चालू आहे; मग या घराण्याकडे मांग सावंताचें दप्तर कां असूं नयें[1] ?

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

कॅपटन साहेबांची बखर जवळ असतांना व त्यांनीं संस्थानच्या ऐतिहासिक माहितीचा रिपोर्ट केल्याची माहिती देऊनहि ( सा. सं. इ. पृ. १०५ ) रा. पिंगुळकरांनीं साहेबमजकुरांच्या वरील माहितीकडे डोळेझांक कां केली तें समजत नाहीं. कॅपटन साहेबांच्या विधानावरून खेम सावंत नाईक तरी होता कीं काय या बद्दलहि संशय उत्पन्न होतो; आणि इकडे रा. पिंगुळकर तर त्याला पार कुडाळ प्रांताचा देशमुख बनवून टाकितात ! सावंत घराण्याला सुरवात पंधराव्या शतकापासून करा, नाहीं तर सतराव्या शतकापासून करा, केव्हांही केली तरी त्यांचा पहिला पुरुष थोडी बहुत हालचाल करावयाचाच अवकाश कीं तो " कुडाळ प्रांताचा देशमुख " बनलाच—जणूं काय जन्मतःच तो देशमुखीची सनद घेऊन आलेला असतो !

१ कदाचित् खुद्द सावंतांकडे मांगसावंताचें दप्तर नसल्यास निदान ओटवण्याच्या वर्दे कुळकर्णी घराण्याकडे तें असण्याचा संभव फार. कारण खेमसावंत हा त्याच्या

पण आश्चर्य हें कीं, हा प्रत्यक्ष पुरावा न देतां, रा. पिंगुळकर आह्मांस भलतेच तीन आधार दाखवितात !

१ " सावंतवाडी मेमॉयर ह्मणून एक इंग्लिश पुस्तक इ. स. १८४०चे सुमारास तयार केलें आहे. "

२ " सामंतविजय ग्रंथ. "

३ " चिटणीस यांचेकडे सांपडलेला जुना लेख. "

हे तीनहि आधार मांग सावंतानंतर शतक दीड शतक मागाहून झालेल्या लेखकांचे आहेत. त्यांनीं कांहीं तरी प्रत्यक्ष पुरावा नमूद केला असेल तर गोष्ट निराळी, पण नुसतीच मांग सावंताची हकीगत दिली असेल, तर ती मांग सावंताच्या अस्तित्वाचा पुरावा कशी होऊं शकणार ? पण आतां हे आधार काय सांगतात तें अनुक्रमानें पाहूं.

इ. स. १८४० च्या सुमारास तयार केलेलें हें मेमॉयर ह्मणजे इ. स. १८५५ सालीं मि. वइलिअम् कोर्टने व मेजर ऑल्ड यांच्या नांवानें प्रसिद्ध झालेलें मेमॉयरच असावें. कारण १८४० सालीं कोणतेंच मेमॉयर प्रसिद्ध झालेलें नाहीं. पण वरील साहेबद्वयांपैकीं कोर्टने हे मात्र २।६।४० पासून २४।३।४५ पर्यंत सावंतवाडीचे पोलिटिकल सुपरिंटेन्डन्ट होते असें रा. पिंगुळकर आपल्या इतिहासांत लिहितात. कोर्टने हे नंतर रत्नागिरीचे कलेक्टर झाले; व इ. स. १८५३ सालीं मेजर ऑल्ड हे पोलिटिकल सुपरिंटेन्डन्ट होऊन पुढें त्यांनीं हें मेमॉयर प्रसिद्ध केलें. या मेमॉयर मध्यें साहेब मजकूर ह्मणतातः—

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

आश्रयास होता असें रा. पिंगुळकर ह्मणतात; तेंच घराणें पुढें सावंतांचें सबनिस झालें. त्यांच्यापाशीं एक दप्तर असून त्यांत खेमसावंताच्या पूर्वींची जी माहिती मिळते ती रा. पिंगुळकरांनीं पृ. ३५ वरील टीपेंत दिलेली आहे. ज्याअर्थीं मांगसावंताचें दप्तर पुढें येत नाहीं, त्याअर्थीं तें नाहीं असेंच मानून चालणें भाग आहे. आणि ही गोष्ट मांगसावंताच्या अस्तित्वासहि थोडीशी बाधक आहे.

"It is not known with any accuracy who was the founder of the present reigning family of Bhonslay but it is believed that the Waree State formed a province of the territories under the Bijapur kings, and that it was held by feudal tenure from that dynasty, by the ancestors of the present family, long before it became a princedom.

" Some 300 years since an ancestor of the present family, by name Mang Savant, is supposed to have rebelled against the Mohomedan power, established himself in the village of Horowde, in this principality and carried on constant war with the troops of Delhi and Bijapur. There is no proof extant to show that he established his independence, but he would seem to have succeeded in repulsing the troops sent to subjugate him. On his deatb he was deified and his Math or shrine is still to be seen at the village of Horowde, which he made his capital.

" There are no records to show who succeeded this Mang Savant; but it is believed that his successors wanting the prowess and courage which he displayed, were soon subjugated to the Mohomedan yoke, and became again feudatories of the empire. "

[ " About the year A. D. 1627 Khem Savant ascended the throne. " ]

या उताऱ्यांत **प्रत्यक्ष पुरावा ह्मणावयास एकच काय तें देऊळ;** बाकी सर्व माहिती प्रचलित **समजुती** ह्मणून नमूद केल्या आहेत. बखरकारांनीं स्वतःचा अभिप्राय ह्मणून ज्या ज्या ठिकाणीं दिला आहे तेथें तो 'पुरावा नाहीं' असेंच सांगण्याकरितां ! हें सर्व आह्मीं वरील विधानें खालीं निरनिराळीं लिहिलेलीं आहेत त्यावरून स्पष्ट होईल:—

१ सध्यां गादीवर असलेल्या **भोंसले घराण्याचा संस्थापक कोण हें बरोबरसें माहित नाहीं;** परंतु

२ **अशी समजूत आहे कीं,** वाडी संस्थान हें पूर्वी विजापुरच्या राज्याचा एक प्रांत होता; आणि तें स्वतंत्र राज्य होण्यापूर्वी त्याचा कारभार सध्यांच्या घराण्याचे पूर्वज मोकाशाच्या पद्धतीनें चालवित असत.

३ **असें ह्मणतात कीं,** सुमारें ३०० वर्षांपूर्वी चालू घराण्याच्या कोणी मांग सावंत नामक पूर्वजानें मुसलमानी सत्तेविरुद्ध बंड केलें, आणि या संस्थानांतील होडावडें गांवीं आपलें ठाणें करून दिल्ली आणि विजापूर येथील बादशहांच्या सैन्याशीं एकसारखी लढाई चालू ठेविली.

४ **त्यानें स्वातंत्र्य मिळविलें असें ह्मणावयास पुरावा नाहीं;** पण

५ **असें वाटतें कीं,** त्याला ताळ्यावर आणावयास पाठविलेल्या सैन्यास त्यानें मागें हटविलें.

६ मृत्यूनंतर त्याला देव समजून त्याचा मठ बांधिला, तो अद्यापि त्याचें राजधानीचें ठिकाण जें होडावडें त्या ठिकाणीं पहावयास मिळतो.

७ **मांग सावंताच्या मागून गादीवर कोण बसले, हें समजावयास कांहींच लेखी पुरावा नाहीं.** पण—

८ **अशी समजूत आहे कीं,** त्याच्या वंशजांमध्यें त्याच्या इतका पराक्रमी आणि धाडसी कोणी न निपजल्यामुळें, ते पुनः मुसलमानी सत्तेखालीं गेले, आणि साम्राज्याचे मांडलिक झाले.

[ ९ इ. स. १६२७ च्या सुमारास खेम सावंत गादीवर आला. ]

खेम सावंतापूर्वींचा सावंतांचा इतिहास ह्मणजे एक निराधार समजुतीचा कसा ब्रह्मघोंटाळा आहे हें यावरून दिसेल. पण आपणास या ठिकाणीं फक्त मांग सावंतापुरतेंच पहावयाचें आहे. तो मूळ पुरुष नव्हे हें

१ ल्या कलमावरून स्पष्ट होतें. त्याच्याबद्दलची इतर माहिती कलमें ३–८ यांत आली आहे; तिला पुरावा या नात्यानें काय किंमत देतां येईल हें दिसतेंच आहे ! मेमॉयर मधील १९ व्या शतकांतील या निव्वळ **समजुती**, अविच्छिन्न परंपरेनें आल्या नसतील तर, त्या १५ व्या आणि १६ व्या शतकांतील मांग सावंताचें अस्तित्व मुळींच सिद्ध करूं शकत नाहींत हें उघड आहे; आणि ( कलम ६ वगळून ) त्या इतिहासाशीं इतक्या असंबद्ध आहेत कीं, त्या उत्पन्नच होणें अशक्य, मग परंपरेनें यावयाचें दूरच ! कारणः—

१ मांग सावंताच्या पराक्रमाच्या ह्मटलेल्या या काळांत त्या प्रांतावर दिल्लीच्या बादशहांचा मुळीं अंमलच नव्हता, कीं ज्याच्या विरुद्ध या मांग सावंतास बंड करतां येईल ! मोंगलांचें सैन्य त्या काळपर्यंत कोंकणांत कधीं आल्याचा इतिहासांत दाखला नाहीं; आणि खुद्द त्या काळांत तर अकबर बादशहा उत्तरेंत रजपूत राजेच जिंकण्यांत गढून गेला होता हें सर्वविश्रुत आहे !

२ या काळीं त्या भागावर विजापूरकरांची साम्राज्यसत्ता होती हें ह्मणणें इतिहासास सोडून नाहीं; पण या मांग सावंताच्या मृत्यूपूर्वी फक्त १५ च वर्षें ह्मणजे इ. स. १५६५ सालीं तालिकोटच्या ( राक्षस तागडीच्या ) लढाईंत विजयनगरच्या लक्षावधि सैन्याचा धुव्वा उडवून त्या प्रचंड वैभवशाली साम्राज्याचा नायनाट करण्यांत जो अग्रगण्य मानिलेला विजापूरचा अल्ली अदिलशहा त्याच्या सैन्याला मांग सावंतासारख्या एका सामान्य बंडखोरानें अनेक वेळां मागें हटविलें, हें स्वप्नांतहि कोणी खरें मानणार नाहीं ! यावर कदाचित अशी शंका येईल कीं, विजापूरकरांनीं आपल्या या दूरच्या प्रांतावर लहान लहान सैन्यें पाठविलीं असल्यास त्यांना मांगसावंतानें हटविणें शक्य कां नाहीं ? याला उत्तर

असें कीं, त्या काळीं त्या प्रांतावर—रा. पिंगुळकरांच्या ह्मणण्याप्रमाण एका परगण्यावर—विजापुरकरांचे मांडलिक या नात्यानें प्रभु देसायांची सत्ता होती. हें घराणें, निदान विजापुरचें सैन्य आल्यावर तरी, मांग सावंताचा मोड करावयास पूर्ण समर्थ होतें, हें रा. पिंगुळकरांना सुद्धां कबूल करावें लागेल; कारण तसा त्याचा मोड प्रभु देसायांच्या हातून त्यांनीं १५८० सालीं करविलेला आहे.

बरें, मांग सावंताचें नांव तरी परंपरागत आहे ह्मणावें, तर इ. स. १८१८ सालीं Captain Hutchinson यांनीं सर्व माहिती गोळा करून जी सावंतवाडीची पहिलीच बखर लिहिली, त्यांत तें नाहीं हें मागें दाखविलेंच आहे. तसेंच इ. स. १८३३ सालीं Captain John Clunes यांनीं प्रसिद्ध केलेल्या Historical Sketch of the Native Princes of India या पुस्तकांतहि[१] (पृ. २०७) मांग सावंताचें नांव नसून, खेम सावंतासच मूळपुरुष ह्मटलें आहे.

६ व्या कलमांत नमूद केलेली, देऊळ मांग सावंताचें होय अशी समजूत, हाच मुळीं आमचा वादाचा प्रश्न आहे; आणि ती समजूत विसाव्या शतकांतीलच नसून एकोणीसाव्या शतकाच्या मध्यावरहि होती, असें सांगितल्यानें तो सुटण्यास कांहीं मदत होते असें नव्हे, त्याला दुसरा कांहीं तरी आधार मिळणें अवश्य आहे. तो या बखरकारांनीं दिलेला नाहीं. शिलालेख आणि चित्रें मांग सावंताच्या पराक्रमाचीं निदर्शक, अतएव देऊळ त्याचें म्हणावयास आधारभूत होत, असें त्यांना वाटलें असल्यास, तें साफ चुकीचें होय. कारण शिलालेखांत मांग सावंताचें नांव नाहीं; आणि पाषाणावरील चित्रें मांग सावंताच्या मुसलमानांबरोबर झालेल्या लढायांचीं द्योतक होत नाहींत, कारण त्यांत मुस-

---

१ "Khem Savant to whom the family trace their origin."

लमान सैनिकाचें एकहि चित्र नाहीं; सर्व चित्रें हिंदूंचीं[1] ( यांत जैन, लिंगायत इत्यादींचाहि याच शब्दांत सोईसाठीं आम्हीं समावेश केला आहे ) आहेत. शिवाय भामसावंतासंबंधींचा शिलालेख या मांगसावंताच्या छत्रींत काय म्हणून, हा प्रश्न आहेच ! शिलालेख आणि चित्रें यांच्यावरून अनुमानच करावयाचें तर, तें देऊळ फार तर भामसावंताचें म्हणतां येईल; त्यांतहि पुनः हा भामसावंत मराठा कीं ब्राह्मण[2] ही अडचण शिल्लक राहतेच !

या सर्व विवेचनावरून असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, मांगसावंताच्या एका नांवाशिवाय दुसऱ्या कोणत्याच माहितीला ही बखर आधार होऊं शकत नाहीं. तें नांव सुद्धां पुढील इंग्रज इतिहास ग्रंथकारांनीं दिलेलें नाहीं. उदाहरणार्थ सन १८७५ सालीं Colonel Malleson हे आपल्या Native States of India या पुस्तकांत[3] सावंतांचा मूळपुरुष खेम सावंत होय असें म्हणतात; Indian Antiquary च्या या वर्षाच्या जून महिन्याच्या अंकांत Notes on Piracy on Eastern Waters हा लेख लिहिणारे Charles Hill खेम सावंतासच या घराण्याचा संस्थापक[4] म्हणतात.

१८४० च्या बखरीच्या मागें मांग सावंताचा उल्लेख ‘ सामंतविजय ’ नामक ग्रंथांत येतो, असें रा. पिंगुळकर सांगतात. हा ग्रंथ आह्मांस

---

१ शेवटीं दिलेलें स्वतंत्र प्रकरण पहा.

२ प्रकरण २ पहा.

3 “......Khem Savant to whom the rulers of the Wari tribe trace their origin......”

4 “ Between 1675 and 1707 Khem Savant, namesake and descendant of the founder of the Savantwadi dynasty,......”

प्रयत्न करूनहि पहावयास मिळाला नाहीं. पण रा. पिंगुळकरांनीं आपल्या पुस्तकांत त्याबद्दल माहिती दिली आहे ती अशीः-

" इ. स. १७८०च्या सुमारास आंध्र देशांतील ( हल्लींचें तेलंगण ) गौतमी तीरावर राहणारा गोपाळ कुंदावोझ्झल या नांवाचा एक कवि त्यांच्या ( तिसरे खेम सावंत १७५५-१८०३ ) दरबारीं आला. त्यानें राजाज्ञेवरून सामंतविजय नामक एक संस्कृत ग्रंथ लिहिला. त्याचे ६ सर्ग असून श्लोकसंख्या ३४७ आहे. त्यांत प्रथमतः मांगलीक नांवाचा सावंत यांचा मूळपुरुष उत्तर दिशेहून या देशांत आला असें वर्णन केलें असून त्यापुढें पहिल्या खेमसावंतांपासून पुढील परंपरा दिली आहे आणि प्रत्येक पुरुषाच्या पराक्रमाचें बरेंच वर्णनहि केलेलें आहे. परंतु त्याच्यापासून ऐतिहासिक माहिती ह्मणण्यासारखी मिळत नाहीं. या संस्कृत ग्रंथाचें इ. स. १७८१ त विठ्ठल नरसिंह सांखळकर यानें प्राकृत ओंवीबद्ध भाषांतर केलें असून त्याची ग्रंथसंख्या ९०७ आहे.[1] "

या ग्रंथांत ' मांगलीक ' असें ह्मटलें आहे; पण ' मांग ' हें त्याचें संक्षिप्त रूप मानून चालूं. तो उत्तरदिशेहून आला ( यावरूनच रा. पिंगुळकर यांनीं त्यास उदेपूरच्या शिसोदिया घराण्यांत घातलें असावें! ) हें विधान अगदींच अनिश्चित आहे; महाराष्ट्रांतील पुष्कळशीं मराठे घराणीं उत्तरदिशेकडे आपलें मूलस्थान दाखवितात त्यांतलाच हा एक प्रकार आहे, असें दिसतें! ह्मणजे ' मांगलीक ' अथवा ' मांग ' या नांवापलीकडे या ग्रंथांत सावंतांच्या या ' मूळपुरुषा ' बद्दल कांहींच— तो कोणत्या कालीं झाला एवढी सुद्धां—माहिती नाहीं! मधल्या वंशजांचाहि पत्ता नाहीं—ग्रंथकार एकदम पुढें होऊन खेम

१ सावंतवाडी संस्थानचा इतिहास. पृ. ९४

सावंतापासून सुरवात करितो! जणूं काय या सामंतप्रशस्तिग्रंथारंभीं फक्त नमन करण्यासाठींच मांगसावंतास आणिलें आहे! एवढ्यावरून जर तो सावंत घराण्याचा मूळपुरुष ठरत असेल; तर उद्यां श्रीगणपतीहि एक ऐतिहासिक पुरुष ठरून तो सर्वच हिंदु घराण्यांचा संस्थापक बनून जाईल! असो. सावंतांनीं—किंवा त्यांच्या मुत्सद्यांनीं—काव्यरचनेसाठीं हें नांव पुरविलें असलें तरी त्याच्यावर खुद्द त्यांचाच इतका विश्वास कीं, त्यानंतर तयार झालेल्या सावंतांच्या एकाहि वंशवृक्षांत तें दिसत नाहीं! एक वंशवृक्ष तर रा. पिंगुळकरांनींच छापिला आहे; त्याच्याशीं बहुतांशीं जुळणारा असा एक दुसरा, आणि त्याशिवाय सावंतांची सन १६३३ ते १८०३ पर्यंत कारकीर्द दाखविणारी वंशावळहि आम्ही मागें दिली आहे. या तिहींतहि इतर बाबतींत फरक असला, तरी मांगसावंताचें मूळपुरुष म्हणून नांव न देण्यांत त्या सर्वांची एकवाक्यता आहे. तसेंच सामंतविजयाची शोभा वाढविण्यासाठीं अग्रस्थानीं पूजिलेल्या या मांगसावंतास

---

१. प्रकरण ५ छा. चि. अंक १०।११ पहा. छायाचित्र अंक १० ह्या वंशवृक्षांत उजव्या बाजूच्या टोंकाजवळ " खेम सावंत बीन फोंड सावंत ऊर्फ बापूसाहेब ( १८१२ पासून ) आमल वर्षे ५ " असें म्हटलें आहे. त्यावरून हा वंशवृक्ष सन १८१७ च्या नंतर लौकरच तयार झाला असला पाहिजे असें ठरतें. दुसरा, कारकीर्दीचा कागद अंक ११, हा " खेम सा॥ रामचंद्र सा॥ " पर्यंत माहिती देतो; यांवरून तो सन १८०३ च्या नंतर लौकरच तयार झाला असें दिसतें. या खेम सावंताच्या मृत्यूनंतर सन १८०३ पासून तों सन १८२२ पर्यंत गादीबद्दल एकसारखे तंटे माजून राहिले होते, व कारभार रीजन्सीच्या हस्तें चालला होता. या काळांत सन १८१८ सालीं कप्टन हचिनसन यांनीं येऊन मुंबई सरकारास सावंतवाडीबद्दल " रिपोर्ट " केला. त्यांतहि या गडबडीचा उल्लेख आहे. वरील दोन्ही कागद ह्या गडबडीमध्यें तयार झाल्याचें त्यांच्या कालावरून उघड दिसतें. यावरून गादीचा वारस ठरविण्याच्या उद्देशानेंच हे तयार करविले गेले असें

सन १८१८ त पहिले बखरकार हच्चिन्सन साहेब, आणि १८३२ मध्यें Captain Clunes या ग्रंथकारांनींहि मानिलें नाहीं, हें आम्हीं मार्गे सांगितलेंच आहे. यावरून हा सामंतविजयाचा आधार ऐतिहासिक-दृष्ट्या किती मोलाचा आहे हें स्पष्ट होतें !

---

प्रकरण ७ वें.

## मांग सावंताचे आधार—चिटणीसांचा कागद आणि देऊळ.

मांग सावंतास रा. पिंगुळकरांनीं दिलेला शेवटचा आधार चिटणीसांचा जुना कागद होय. हा कागद आम्हीं पाहिलेला नाहीं. पण रा. पिंगुळकर सांगतात कीं, तो इ. स. १७०९ च्या नंतरचा—फोंड सावंताच्या कारकीर्दींत तयार झालेला—असावा, कारण त्यांत सावंतांची वंशावळ मूळपासून लिहीत आणून लेखक दुसऱ्या खेम सावंताच्या कारकीर्दीच्या शेवटीं ( १७०९) थांबला आहे. त्यांतील जरूर तो मजकूरहि आह्मांस त्यांनींच कळविलेला आहे. तो येणें प्रमाणें:—

" मांग सावंत हा मांगलादेव मठामध्यें आहे. त्याचा वंश होडावडे मध्यें नांदला त्यावर बेळगांवाहून स्वारी येऊन पडोन मारीलें त्याचे नांव

---

( मागील पृष्ठावरील टीप पुढें चालू. )

अनुमान काढावयास फारशी हरकत नाहीं. त्यांत नुसतीं नांवेंच न देतां प्रत्येकाची कारकीर्दहि दिली आहे, त्यावरून कांहीं तरी विशेष माहिती मिळविण्याचा प्रयत्न करून शोधक बुद्धीनें ऐतिहासिक उपयोगासाठीं ते लिहिले आहेत हें उघड दिसतें. ( आह्मीं छापिलेले कागद हे दरबारनें तयार करविलेल्या कागदांच्या त्यावेळीं घेतलेल्या नकला असणें संभवनीय आहे. ) रा. पिंगुळकरांनीं आपल्या पुस्तकांत छापिलेला वंशवृक्षहि आपण रेकार्डांतून घेतल्याचें ते सांगतात. हें सर्व लक्षांत घेतां या तीन वंशवृक्षांत वास्तविक कांहीं फरक असूं नये असें कोणासहि वाटेल. पण तसा तो आहे हें आम्हीं पुढें दाखविलें आहे.:—

भाम सावंत त्याचा पुत्र देव दळवी त्याचा शक वरुषें .१४०० धोंडेवर

(मागील पृष्ठावरील टीप पुढें चालू)

**१. कारकीर्दीचा कागद (चित्रांक ११)**

पाये सा. वोटवणेकर (१)
- खेम सा. पाये सा. वोटवणेकर १६३३+१२=१६४५ (३)
  - सोम सावत खेम सावत. (१६४५+१=१६४६)
    - फोंड सा. १६४६+७=१६५३.
      - खेम सा. फोंड सा. १६७७+३२=१७०९
    - लखम सा. (२) १६५३+२४=१६७७

**२. वंशवृक्ष (चित्रांक १०)**

मुलपुरुष पाये सा. राहाणार वोंटवणे (१)
- खेम सा. बिन पाये सा. योगाभ्यासी १६३३+१२=१६४५ (३)
  - फोड सा. आमल वर्षे. ७
    - खेम सा. बिन फोड सा. आमल वर्ष ३२ — ०
    - नार सा. बिन फोड सा. आमल नाहीं.
      - फोड सा. बिन नार सा. आमल वर्ष २९
  - लखम सा. (२) आ. व. २४ — ०
  - नार सा. — •
  - सोम सा. आ. व. १ — •

**३. पिंगुळकरांनीं दिलेला वंशवृक्ष.**

फोंड सावंत (१)
- खेम सावंत १६ ७-४० (३)
  - सोम, १६४०-४१.
  - फोंड, १६४१-५१
  - लखम (२), १६५१-७५.
    - खेम सावंत. १६७५–१७०९
    - नार सावंत.
      - फोंड सावंत. १७०९–३८
  - नार. ०

लिहून मठाचे देवळीं आहे. ”

जुन्या भाषेचें वळण बाजूस ठेविल्यास, हा उतारा असा होईलः—

“ मांग सावंत हा मांगलादेव होय, जो मठामध्यें ( मठ नांवाच्या गांवामध्यें ) आहे; त्याचा ( एक ) वंशज होडावड्यामध्यें नांदला; त्याज-वर बेळगांवाहून सैन्याची स्वारी होऊन त्यांत तो मारला गेला; त्याचें नांव **भाम सावंत**; त्याचा **पुत्र देव दळवी** याचा शक वर्षें १४००[1] असें धोंड्यावर लिहून ठेवलें आहे, तो धोंडा मठाच्या ( मठगांवच्या ) देवळांत आहे. ”

वरील उताऱ्यांत लेखकानें ( स्वतःच्या समजुतीप्रमाणें ) सावंतांच्या तीन पूर्वजांची माहिती दिलेली आहे. मांग सावंत, भाम सावंत व देव दळवी. पण पुढच्या दोन पुरुषांची शिलालेखांत ( एकाची थोडीशी इत-रत्रहि ) माहिती मिळाली ती जशी त्यास देतां आली तशी मांग सावंता-बद्दल कुठेंच ( शिलालेखांत तर नांवाहि ) न सांपडल्यामुळें देतां न येऊन, “ मांग सावंत ह्मणजे मांगलादेव ” अशी समजूत नमूद करून त्यास स्वस्थ बसावें लागलें;—हा मांग सावंताच्या खरोखरच्या अस्ति·

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

यावरून स्पष्ट दिसतें कीं हा फरक दुसऱ्या खेम सावंता ( १६७५–१७०९ ) पूर्वींच्याच पुरुषांबद्दल असून ( प्रकरण ५ टीप पहा ) तो मुख्यतः खालीं दिलेल्या बाबतींत आहे:-( १ ) पहिल्या खेमसावंताचा पिता कोण ? ( २ ) लखमसावंत हा १ ल्या खेमसावंताचा मुलगा कीं नातु ? ( ३ ) १ ल्या खेम सावंताची “ कारकीर्द ” केव्हांपासून ? आणि ह्याच्या पुढें हचिन्सनचें विधान घेत-ल्यास आणखी एक प्रश्नः–१ ला खेम सावंत हा देशमुख राहोच, नाईक तरी होता काय ? ( प्रकरण ५ पहा ).

१ शिलालेखांत ‘सकू १३१७ किंवा १३१९ वरीसे किंवा वरीखे’ असेंआहे. १४०० हें, शकांत ७८ मिळवून (१३१९+७८=१३९७) केलें आहेसें दिसतें. यावरून या जुन्या कागदावर इंग्रजी अंमलांत कांहीं तरी संस्कार झाला असावा असा संशय येतो.

त्याचा आधार नसून तो त्याजबद्दलच्या " **कल्पनेचा** " मात्र **खरोखरचा आधार** होय ! कारण चिटणीसांसारख्या दरबारी घराण्याकडील कागदांत सावंतांचें वंशवृत्त लिहावयास बसलेल्या या लेखकासहि जर " मांगला " देवाव्यतिरिक्त " मांग " सावंताचा कुठेंच पत्ता लागत नाहीं, तर त्यावरून " मांग " सावंताबद्दल एकच अनुमान निघतें तें असें:— मठगांवांत " मांगला " देवें अगोदरचाच होता; त्याच्या देवळांत आढळलेल्या शिलालेखांत ( भाम ) " सावत " असें नांव दिसल्यामुळें, आणखी तें देऊळ संस्थानच्या हद्दींत वाडी शहरापासून जवळच फक्त दहा मैल असल्यामुळें, तो वाडकर सावंतांचा पूर्वज होय अशी त्या लेखकानें आपली समजूत करून घेतली, व नंतर " मांगला " या नांवावरून ( जसें ' सामंतविजयांत ' त्याचें ' मांगलीक ' असें दीर्घ रूप झालें तसें ) ' मांग ' हें संक्षिप्त रूप व तें धारण करावयास सावंतांचा मूळ पुरुष, हीं दोन्ही एकदमच तयार केलीं[२] ! ( अथवा दुसऱ्या कोणी तरी

---

१. राजपदाधिष्ठित पुरुषांच्या ( क्वचित् इतर पुरुषांच्याहि ) नांवें शिवलिंग स्थापन करण्याचा प्रघात पूर्वापार चालत आल्याचें दिसून येतें उदाहरणार्थ:— ( १ ) उत्तरकोंकणांत संगमेश्वर येथें "**कर्णेश्वर**" नांवाचें शंकराचें स्थान आहे, तें चालुक्य राजा ' **कर्ण** ' यानें स्थापन केल्याचें संगमेश्वरमहात्म्यांत लिहिलें आहे. ( J. B. B. R. A. Soc. Vol. XI, 1875 ) ( २ ) देवगड तालुक्यांतील ' **हिंदळें** ' गांवचा मुख्य देव ' **भैरव** ' असून ' **भैरवदेव** ' नांवाच्या राजपदाधिष्ठित पुरुषाच्या नांवानें तें स्थान ओळखिलें जातें ( प्रकरण ९ पहा ). ( ३ ) गोव्यांतील '**मंगेश**' देवस्थान हें एक शिवलिंग असून तें ' मंग ' नामक पुरुषाच्या नांवानें ओळखिलें जातें. ( Modern Review Vol. XXXII ).

२ या चिटणिसांच्या कागदानें मांग सावंताशिवाय आणखी एक पुरुष रा. पिंगुळकरांस पुरविला आहे; तो मांग सावंतास हातीं धरणारा देव दळवी हा होय. वास्तविक पाहतां या नांवाचा पुरुष कोणी झालाच नाहीं हें आम्हीं मागें दाखवून त्या नांवाच्या उत्पत्तीसाठीं एका लेखाचा आधार दिला होता. तो लेख म्हणजे

अशाच रीतीनें तयार केलेलीं या लेखकानें आपल्या कागदांत फक्त नमूद केलीं ! )

चिटणीसांच्या कागदांत अशा रीतीनें केवळ कल्पनेवर बसविलेल्या "मांग सावंतास" खराखुरा पुरुष ह्मणून लोकांसमोर वेळोवेळीं आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना, त्याला पुनः कल्पनांवरच सजवून उभा करणें भाग पडलें यांत मुळीच आश्चर्य नाहीं !

हा धोंडा ह्मणजे प्रस्तुत वादविषय शिलालेख ज्याच्यावर आहे तो पाषाण होय हें सांगावयास नकोच. सन १७०९ च्या सुमारास, चिटणिसांच्या कागदानें नुसतें नांव तयार केलें; पुढें ६०।७० वर्षांत वंशवृत्त लिहिण्याचा प्रसंगच आला नाहीं, तो १७८० त येतांच सावंतवंशाचा महिमा गाण्यासाठीं रचलेल्या "सामंतविजयानें" सर्व शूर पुरुष उत्तरेकडून येतात या सर्वसाधारण समजुतीस अनुसरून मांग सावंत उत्तर दिशेकडून आल्याचें कवित्व केलें. पुनः ६०।७० वर्षें मांग सावंताचें नांव नाहीं; त्या मुदतींत सन १८१८ सालीं हचिन्सन साहेबांची बखर झाली, पण त्यांत त्यांनीं या काल्पनिक मांग सावंताचें नांव देण्याचें नाकारलें; व १८३३ सालीं क्ल्यून्स साहेबांनींहि त्यांचेंच

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

हा चिटणिसांचा कागद. शिलालेखांत (रा. राजवाडे यांच्या वाचनाप्रमाणें) "नन्यसींदेवाचा दळवै" असें आहे, तें कांहीं अक्षरें बरोबर न वाचतां आल्यामुळें या कागदानें "देव दळवी" असें करून टाकिलें ! आणि तें नांव पिंगुळकरांच्या उपयोगीं पडलें ! खरें पाहतां या चिटणिसांच्या कागदाचा आणखीहि बराच उपयोग रा. पिंगुळकरांस झाला आहे; मांग सावंताच्या वंशजांची ( प्र. ३ ) माहिती त्याच्यावरूनच त्यांनीं घेतलेली आहे हें उघड दिसतें; असें असून त्या कागदाचा आधार मात्र आपल्या पुस्तकांत ते देत नाहींत हें आश्चर्य होय ! मग त्याच्या जुनेपणाबद्दल अथवा खरेपणाबद्दल त्यांस शंका आली असल्यास नकळे !

अनुकरण केलें. पण पुढें १८४०-५५ सालांत कोर्टने-ऑल्ड यांचें हृदय द्रवून त्यांनीं, सध्यां सावंत राज्यकर्ते आहेत यावर अनुमान बांधून त्यांच्या या मूळ पुरुषास 'मोंगल-विजापूरकरांशीं लढाई देऊन स्वतंत्र राज्य स्थापण्याचा यत्न केला' इत्यादि 'समजुतींचा' वेष दिला. पण या नुसत्या बाह्य वेषानें १८७५ सालच्या इतिहासकारास मांग सावंताचें अस्तित्व पटलें नाहीं. पण पुढें १९११ सालीं रा. पिंगुळकरांचा इतिहास येऊन अगदीं मोकळें मैदानच तयार झालें! ह्या वेळीं मात्र मांग सावंतास सजवावयाची रा. पिंगुळकरांनीं अगदीं शिकस्त केली! आणि त्याला अगदीं पायाशुद्ध करण्यासाठीं प्रथम त्याच्या जन्मस्थानाचा विशेष शोध लावून "उत्तर दिशा" ह्मणजे उदेपुरांतील शिसोदिया घराणेंच होय अशी दंवडी पिटली; नंतर आतांपर्यंतच्या कारागिरांनीं कुठें कुठें वाव ठेविला आहे तें बारकाईनें तपासून, त्या त्या जागीं कल्पनांचीं चिरगुटें भरून, दुरून पाहणारास तो अगदीं खऱ्याखुऱ्या माणसासारखा दिसावा अशी योजना केली; आणि मग तो लांबलचक बागुलबोवा सावंतांचा मूळ पुरुष ह्मणून लोकांसमोर उभा केला! पण हा नसता खेळ मूळांत ज्या कल्पनेवर बसविलेला आहे ती चिटणिसांच्या कागदांतील 'मांगलादेव' हा सावंतांचा पूर्वज होय हीच कल्पना, मुळीं खरी कीं खोटी ह्याचा आतां विचार करू.

---

## प्रकरण ८ वें.

# नाग सावंतानें मारिलेला शिक्का.

**मांगलादेव** हा वाडकर सावंतांचा पूर्वज होय, ही कल्पना खरी किंवा खोटी हें पाहतांना, त्या कल्पनेचा द्योतक असा फोंडसावंताच्या कारकीर्दींत झालेला दुसरा एक प्रयत्न आपणास मार्गदर्शक होतो;

तो फोंडसावंतांचा मुलगा नागसावंत यानें आपल्या नांवाचा ह्मणून मारिलेला शिक्का होय. हा शिक्का असा आहे:—

शिक्का.




मोर्तब.





आणि तो त्यानें सन १७३२ च्या सुमारास बावडेकर पंत अमात्यांस पाठविलेल्या पत्रांवर मारिलेला आहे. अशुद्धता काढून टाकिल्यास शिक्यांतील शब्द असे होतात:—

---


१. ( हा शिक्का आणि मोर्तब मारलेलीं ) अशीं चार पत्रें रा. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८वा' या ग्रंथांत ( लेखांक १३७, १३९, १४०, १४२, ) छापिलीं आहेत. त्यांवरील शिक्का, त्यांनीं भाषेच्या दृष्टीनें सुधारून छापिलेला असावा अशी शंका आल्यामुळें, साधल्यास अस्सल पत्रें पाहून खात्री करून घ्यावी या हेतूनें श्रीमंत बावडेकर पंत अमात्य यांनां अर्ज केला. श्रीमंतांकडून आम्हांस त्यांपैकी तीन पत्रें मिळालीं ( राजवाडे लेखांक १३७,१४०, १४२) त्यांच्या अस्सल बरहुकुम नकला आणि चौथ्या पत्राची राजवाड्यांच्या लेखांक १३९ वरून नकल आम्हीं परिशिष्टांत लेखांक अनुक्रमें १०, १३, १४, १२ अशा छापिल्या आहेत. शिवाय लेखांक १३ च्या दोन बाजूंचीं दोन, आणि लेखांक १४ च्या मागील बाजूचें एक अशीं छायाचित्रें ( अनुक्रमें १३ अ, ब, आणि १४ ) आम्हीं दिलीं आहेत. त्यांवरून अस्सल पत्रांवर मारलेल्या शिक्क्यांचें व पत्रांतील कित्येक शद्बांचें रा. राजवाडे यांनीं शुद्धीकरण केल्याचें दिसून येईल. जुन्या काम-

चित्र अंक १३ ( अ )



वाडकर नाग सावंतानें बावडेकर पंत अमात्यांस लिहिलेल्या एका पत्राची एक बाजू ( परिशिष्ट लेखांक १३ पहा. )

छायाचित्र ११ (अ) की दूसरी बाजू ( परिशिष्ट लेखांक १३ पहा )



चित्र अंक १३ (ब)

" सामंतकुलयशोभानुर्मांगलाख्यमहेश्वरः श्रीनागसामंतमुद्रेयं जनभूत्यै विराजते "

[ अर्थः—सामंतकुलाची कीर्ति अत्यंत विशुद्ध व तेजस्वी करून ती दिगंतीं पोंचविणारा **मांगला** किंवा **मांगल** नांवाचा **महाराजा** ( दुसऱ्या अर्थीं शंकर ) ( त्या वंशांत झालेला ) श्रीनागसामंत याची ही मुद्रा प्रजेच्या कल्याणासाठीं विराजमान होत आहे. ]

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू. )

दांत यत्किंचितही फरक न करितां ते असतील तसे छापून काढण्याच्या कामीं रा. राजवाडे यांचा मोठा कटाक्ष आहे, असें आम्हीं आजवर ऐकत होतों ! असो. मजकुरांतील कांहीं शब्दांचीं रूपें शुद्ध करून छापिल्यास त्यानें अर्थास फारसा धक्का बसण्याचा संभव नसतो. तसें शिक्क्याचें नाहीं. सदरील ग्रंथांत छापिलेल्या १९५ पत्रांच्या अस्सल बरहुकूम नकला रा. राजवाड्यांना स्वतः करणें शक्य नाहीं हें आम्हांस कबूल आहे. परंतु नकलनवीस फार तर मजकुरांतील शब्दांचें शुद्धीकरण करील; शिक्क्याचें शुद्धीकरण करण्याचें धाडस तो भाषानिपुण असला तरी करीलसें दिसत नाहीं; म्हणून तें बहुधा स्वतः राजवाड्यांच्या हातून झालें असावें असें म्हणावें लागतें शिवाय अस्सल पत्रांत हा शिक्का पत्रांच्या एका बाजूस मारलेला आहे, पण रा. राजवाडे यांनीं तो पत्रांच्या शिरोभागीं ( कदाचित् छापण्याच्या सोईसाठींही असेल ) छापिला आहे. रा. राजवाडे यांनीं छापिलेला शिक्का असा आहे:—

सामंत कुलेशोभानु-
　मांगलाख्य महेश्वरः ।
श्रीनाग सामंत मुद्रेयं
　जनभूत्यै विराजते ॥

( आम्हीं छापिलेल्या अस्सलाशीं ताडून पाहतां फरक कुठें आहे तें सहज दिसून येईल ). यांतहि पुनः एक अगदीं ढोबळ फरक करून तो दुसऱ्या एका कागदावर ( लेखांक १३७ ) छापिला आहे, त्यांत नाग सामंताच्या नांवामागें श्रीकार नाहीं, आणि त्याच पत्राच्या शेवटीं मारिलेल्या मोर्तबांत, अस्सल पत्रांतील ' लेखनावधि '

हा शिक्का मारणाऱ्याचाच ह्मणजे वाडकर नाग सावंताचाच असल्यास, तो वरील कल्पनेस पोषक होईल, नाहींतर बाधक होईल हें उघड आहे. पण त्यांतील मजकुराचा बारकाईनें विचार करतां तो त्याचा नव्हेच असें दिसतें; कारण—


---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

च्या जागीं 'लेखनसीमा' असें छापिलें आहे. यांशिवाय अस्सल पत्रांतील शब्द शुद्ध करून व कित्येक चुकीचे लिहून छापिलें आहेत, त्यांतील नमुन्यासाठीं कांहीं पुढें देतों.


| अस्सल पत्रांप्र. | राजवाडे खंडाप्र. | अस्सल पत्रांप्र. | राजवाडे खंडाप्र. |
|---|---|---|---|
| (लेखांक १० पहा) | (लेखांक १३७पहा) | ( लेखांक १० ) | ( लेखांक १३७ ) |
| गुणालंक्रर्ण | गुणालंकरण | वृर्धी | वृद्धि |
| महालानहाये | महालानिहाय | चींतात | चित्तांत |
| स्वकिये | स्वकीय | प्रज्यन | प्रजन्य |
| संतोश | संतोष | साहजेंच | सहजच |
| कितेक | कित्येक | उभये | उभय |
| चींताचे ठाई | चित्ताचे ठायीं | दसरे कारणें ( विजयादशमी ) | दुसरे कारणें |
| हर्शोत्कर्श | हर्षोत्कर्ष | येदर्थीचा | यदर्थीचा |
| | | वीनति | विनंति |
| (लेखांक१३) | (लेखांक१४० पहा) | (लेखांक १३) | (लेखांक १४०पहा) |
| छायाचित्र १३ पहा | | छायाचित्र १३ | |
| गुणाल करणे | गुणालंकरण | मुक्ता | मुखता |
| लक्षुमीआलंकृत | लक्ष्मीअलंकृत | जाला | झाला |
| राजमान्यें | राजमान्य | काये | काय |
| अटवण | आठवण | यैसे यैकिले | ऐसें ऐकिलें |
| संतोशाभिवृधि | संतोषाभिवृद्धि | निश्चयेरूप आसेल | निश्चयरूप असेल |
| | | हारगडी | हरघडी |

चित्र अंक १४



वाडकर नाग सावंतानें बावडेकर पंत अमात्यांस लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्राची दुसरी बाजू.

चित्र अंक १५



रामचंद्र सावंत यांची जन्मपत्रिका.

१ सावंत या शब्दाचें ‘ सामंत ’ हें संस्कृत रूप वाडकर सावंतांस दुसऱ्या कोणी अथवा त्यांनीं स्वत: आजादिवसपर्यंत कागदोपत्रीं सुद्धां लाविलेलें दिसत नाहीं. नाग सावंतानें याच वहिवाटीस अनुसरून पंत अमात्यांस पाठविलेल्या पत्रांत आपलें नांव ‘ सावंत ’ असें लिहिलें आहे; मग तो त्याच पत्रांवर मारलेल्या आपल्या शिक्क्यांतच सामंत असें निराळें रूप कसें उपयोगांत आणील ? शिक्क्यांत सर्वविश्रुत असें ‘सावंत’ हेंच रूप असावयास पाहिजे ! बरें, लिहिण्यांत एक आणि शिक्क्यांत दुसरेंच अशीं रूपें वापरण्याची सावंतांची रीत पूर्वीपासूनच चालत आली होती असेंहि ह्मणतां येत नाहीं ! कारण नागसावंताच्या पूर्वीं ( आणि नंतरहि ) तशा तऱ्हेचा ( नव्हे, सावंताच्या राजसत्तेचा निदर्शक असा कोणताहि) शिक्का सावंतांनीं कधीं मारलेला दिसत नाहीं.

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

| ( लेखांक १४)( लेखांक १४२पहा) छायाचित्र १४ पहा | | (लेखांक १४) (लेखांक १४२ पहा) छायाचित्र १४ पहा | |
|---|---|---|---|
| कुषल | कुशल | आपनापेक्षा | आपणापेक्षां |
| विसेष | विशेष | तेंवा | तेव्हां |
| वेदमुहुर्तो | वेदमूर्ति | जीवानषिं | जिवानसी |
| मुग्ता | मुखता | स्येरीक | षरीक |

१. या नाग सावंताचा सावत्र बंधु नार सावंत याच्या रामचंद्र नामक मुलाच्या जन्मपत्रिकेंत ‘ सामंत ’ हें रूप लिहिलेलें आढळतें ( छायाचित्र अंक १५, ओळी ४ आणि ६ पहा ); पण तसें राजकारणांतील शिक्क्यांत करतां येत नाहीं हें आम्हीं वर दाखविलेंच आहे; शिवाय जन्मपत्रिकेंत तसें रूप यावयासहि बहुधा त्यावेळची विशेष राजकीय परिस्थिति किंवा फोंड सावंताची स्वतःची मनःस्थिति कारणीभूत झाली असावी असें मानण्यास जागा आहे ( प्रकरण दहावें पहा ).

२. “ त्यांनीं ( लखमसावंतांनीं ) आपल्या नांवाचा शिकाहि पाडिला होता ” असें रा. पिंगुळकरांनीं मागेंपुढें तद्दर्शक कांहींच संबंध नसलेलें, विधान केलें आहे ( सा. सं. इ. पृ. ४४ पहा ) त्याबद्दल आम्हीं त्यांस विचारिलें असतां ते म्हणतात:-“ लखमसावंत यांनीं आपले नांवाचा शिक्का पडिला होता असें **वाटतें,**

त्यांचा शिक्का दिसतो तो " श्रीशंभु" "श्रीशंभु दप्तर हुजूर " ( आणि नागसावंतानंतर 'श्रीनाथ'-ह्मणजे बहुधा ओटवणें येथील कुलदेव श्रीरवळनाथ याचा संक्षेप ) आणि फारशी लिपीचें " मोर्तब सूद. "

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त ).

पण तो पुढें परंपरेनें चालला होता कीं काय **नकळे.** " रा. पिंगुळकरांस संस्थानचें रेकॉर्ड व सरदारदरकदारांकडील कागद मिळूनहि त्यांस " **वाटतें** " आणि " **नकळे** " तर त्यांनीं संस्थानच्या इतिहासांत निश्चित विधान कां दडपून द्यावें ? आणि तेंहि पुनः खुद्द लखमसावंताचा सन १६५४ तील कागद परिशिष्टांत ( ले. २९ ) छापिला आहे, त्यावर **शिक्काहि नाहीं,** आणि **मोर्तबहि नाहीं,** ही गोष्ट वाचकांसमोर स्पष्ट मांडून ! पण या दडपून दिलेल्या विधानाचा, पुढील इतिहास लेखनावर. काय परिणाम झाला तो पहा ! रा. पिंगुळकरांनीं नुसत्या शिक्क्यावर लखमसावंताची बोळवण केली, तर रा. न. चिं. केळकर ( मराठे व इंग्रज पृ. १३४ ) आणखी पुढें जाऊन त्यास "**नाणें** " पाडून देतात ! तर मग पीरखान नांवाच्या विजापूरच्या सुभ्याचीं " **पीरखानी** " नाणीं ईस्ट इंडिया कंपनीचा ताबा होई पर्यंत व कांहीं काळ नंतरहि सावंतांच्या मुलुखांत कां चालू राहिलीं ? ( सा. सं इ. पृ. १४१ ). असो. एक निराधार विधान दुसऱ्या निराधार विधानास कसें प्रसवतें याचा हा मासला आहे !

१. वाडकर सावंतांचे कित्येक कागद आमच्या संग्रहीं आहेत; बरेचसे जिवबादादाबक्षी यांच्या चरित्रांत प्रसिद्ध झाले आहेत; कांहीं रा. पिंगुळकरांनीं सावंतवाडी संस्थानच्या इतिहासांत छापिले आहेत; त्यांवरून हें विधान केलें आहे.

२. हें मोर्तब, प्रभु घराण्यांतील कांहीं जुन्या कागदांच्या शेवटीं आढळणाऱ्या एका फारशी लिपीच्या मोर्तबाच्या आकाराचें, तसेंच अक्षरांतहि त्याच वळणाचें आहे. यावरून प्रभु घराण्याकडील शिक्का मोर्तब सावंत वापरीत असत या दंतकथेस दुजोरा मिळतो. आणि सावंतांची ही वहिवाट लक्षांत घेतां नाग सावंतानें मारलेलें मोर्तब (शिक्का सुद्धां) संस्कृत भाषेंत कां अशी शंका उत्पन्न होऊन ती वर दिलेल्या इतर शंकांमध्यें भर पाडते.

२ वाडकर सावंतांचे प्रत्यक्ष अधिकारावर असलेले पुरुषहि आपल्या नांवास श्रीकार जोडीत नसत व नाहींत; कारण तेवढ्या योग्यतेचें त्यांचें तें स्थानच नव्हे. नागसावंतास तर तोहि अधिकार कधीं मिळाला नाहीं. मग त्याच्या नांवास श्रीकार कां जोडला जावा ? हेरें— चंदिगड याकडच्या भागावर कांहीं काळ त्यानें अधिकार चालविला असें रा. पिंगुळकर सांगतात. पण तेवढ्यानें तो ' श्री ' नाग कसा होईल ?

३ या शिक्क्यांतील अक्षरांचें वळण नागसावंताच्या काळचें ह्मणजे १८ व्या शतकांतील दिसत नाहीं. आह्मीं त्या प्रांतांतील सन १५८० पासून १७३२ पर्यंतचे कांहीं मोडी कागद या पुस्तकांत छापिले आहेत व कांहींचीं छायाचित्रेंहि दिलीं आहेत, त्यांरून दीडशें वर्षांत त्या प्रांतांत मोडी लिपीचें वळण कसें अधिकाधिक डौलदार बनत गेलें हें दिसून येईल. अगदीं तितका आणि तसाच नसला तरी बराच फरक १६ व्या आणि १८ व्या शतकांतील बाळबोध लिपीच्याहि वळणांत दिसला पाहिजे, हें उघड आहे. आह्मीं त्या प्रांतांतील सन १६०० मधील बालबोध लिपीच्या एका कागदाचें छाया चित्र मागें दिलें आहे; त्यांतील वळणाच्या मानानें या शिक्क्याच्या बालबोध लिपीचें सन १७३२ मधील वळण बरेंच सफाईदार पाहिजे; तसें तें दिसत नसून, उलट त्या १६०० च्या कागदांतल्या वळणाच्याहि पूर्वींचें दिसतें. दुसरें असें कीं वरील शिक्क्यांत श्रीकारावर असलेली तिरपी रेघ १८ व्या शतकांतच नव्हे तर १७ व्या शतकाच्या सुरवातीच्या तत्प्रांतस्थ कागदांतहि दिसून येत नाहीं.

याप्रमाणें नागसावंतानें मारिलेला हा शिक्का त्याचा स्वतःचा नव्हे असें दिसतांच, हें काय गौडबंगाल आहे याचा विचार करीत असतां सावंतवाडी येथील वेस्ट्रॉप म्युझिअमच्या तपशिलवार वर्णनाचें

पुस्तक[1] आमच्या वाचनांत आलें. या पुस्तकाच्या पृ. ४० वर ३१९ च्या बाबींत पुढील माहिती आह्मांस आढळली:—

**Seals and Signets:**—This set of five silver seals was found on the God Narayan at the village of *Walawal* in the *Kudal* Petha. They are said to have originally belonged to the two brothers *Chandrabhan* and *Suryabhan* former Desais of Kudal District while it was under Mahomedan rule. These Desais when expelled by an ancestor of the Sar Desai from the Savantwadi State, entrusted their seals to the care of the God *Narayan* and went to reside at Malwan.

[ **शिक्के आणि मोर्तब:**—चांदीच्या पांच शिक्क्यांचा हा गट, कुडाळ पेट्यातील **वालांवल**[2] गांवीं नारायण देवाच्या अंगावर सांपडला. मुळांत

---

१. सावंतवाडींतील या अजबखान्याची स्थापना सन १८८२ सालीं कर्नल जी. आर. वेस्ट्रॉप यांनीं केली. हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं त्या वेळचे असि-स्टंट पोलिटिकल सुपरिंटेंडेंट कॅप्टन एफ. डब्ल्यू. स्नेल यांना सावंतवाडी संस्थानचे इतिहासलेखक रा. पिंगुळकर यांनीं बरीच माहिती देऊन मदत केल्याचें पुस्त-काच्या प्रस्तावनेंत नमूद आहे.

२. **वालावली** अथवा वालावल या गांवाचा जुन्यांत जुना उल्लेख बदामी येथील चालुक्य सम्राट विजयादित्य याच्या, शा. श. ६२२ च्या ( Indian Antiquary Vol II ) ताम्रपत्रांत पुढील प्रमाणें आढळतो:—


नदीतटस्थः **बल्लावल्लि**ग्रामसह्यपूरग्रामयोर्मध्यस्थःनेरूरनाम्ना ग्रामः

वरील तीन गांवांपैकीं सह्यपूर हा गांव नकाशांत सांपडत नाहीं असें डॉ. फ्लीट साहेबांनीं लिहिलें आहे. वालावल्ली लगतच्या नदीपलीकडे **धामापुर** हा गांव तेथील तलावामुळें तत्प्रांतीं सर्वविश्रुत आहे, तोच या ताम्रपत्रांतील सह्यपूर ग्राम होय.

चित्र अंक १६



वालावली येथील श्रीनारायण.



चित्र अंक २२ कुडाळ शहरालगतच्या नदीवरील संध्याबांट.

हे शिक्के, पूर्वीं कुडाळ प्रांत मुसलमानी अंमलाखालीं असतांना त्यावर **चंद्रभान** आणि **सूर्यभान** नांवाचे बंधु देसाई होते, त्यांचे होत असें ह्मणतात. हे देसाई, सरदेसायांच्या एका पूर्वजानें त्यांस संस्थान सोडून जावयास भाग पाडलें असतां, आपले शिक्कामोर्तब नारायण देवाच्या स्वाधीन करून मालवणास रहावयास गेले. ]

यांत उल्लेखिलेले कुडाळ प्रांतावरील देसाई ते **चंद्रभान** आणि **सूर्यभान** हे नव्हत, एवढी दुरुस्ती केल्यास वरील माहिती ऐतिहासिक दृष्ट्या बव्हंशीं बरोबर आहे. सन १६९६ सालीं लखमसावंताचा पुतण्या खेमसावंत यानें जोगण नारायण प्रभू यास ठार मारून कुडाळ प्रांत पूर्णपणें हस्तगत करून घेतला. तेव्हां जोगण प्रभूचा पुतण्या नारायण प्रभू यानें आपल्या घराण्यांत परंपरेनें आलेले सर्व शिक्का-मोर्तब आपला कुलदेव वालावली येथील श्रीनारायण ( छायाचित्र अंक १६ ) याच्या पायांवर ठेवून आपण स्वतः करवीरकर छत्रपति व आंग्रे सरखेल यांच्या आश्रयास जाऊन राहिला. ( परिशिष्ट लेखांक ७ व

१. 'देसाई' हा प्रभु घराण्याचा प्राचीन किताब होता. परंतु अदिलशाहीच्या अंमलांत त्यांस सरदेसाई असें ह्मणत. ( परिशिष्ट लेखांक ३–७, व ९, तसेच ३ऱ्या प्रकरणावरील टीप पहा ). चंद्रभान व सूर्यभान हे पुरुष प्रभु घराण्याचे प्राचीन पूर्वज असून ते लोकोत्तर पराक्रमी पुरुष होऊन गेले ह्मणून त्यांचीं नांवें तत्प्रांतस्थ आबालवृद्धांच्या तोंडीं आजहि ऐकूं येतात. " **सूर्यभान** " हें नांव सन १८५२ पर्यंत या घराण्यांत दिसतें. ( परिशिष्ट लेखांक १९ कलम १० वरील टीप पहा ). या पुरुषांचा काल निश्चितपणें ठरवितां येत नाहीं; परंतु जैन इतिहासविषयक वाङ्मयांत, मिरज किंवा मिरजनच्या बाजूस ब्राह्मणांनीं केलेल्या यज्ञामुळें तत्प्रांतस्थ जैन मंडळांत उपस्थित झालेल्या कलहाच्या बाबींत या पुरुषांचा उल्लेख प्रधान आणि सेनापति ह्मणून केलेला आढळतो; त्यावरून त्यांचा काल इ. स. च्या १४ व्या शतकांतील असावा असें दिसतें.


१९ पहा ). सर्व मिळून २०।२२ शिक्क्यांची ही माळ श्रीनारायणाच्या, अंगावर घातली जाई असें समजतें; त्यांतून अद्यापि एक शिक्का, त्यावरील अक्षरें घांसून टाकलेला असा, देवाच्या जामदारखान्यांत आहे; बाकीचे वाडीस नेले. त्यांपैकींच वेस्ट्रॉप म्युझिअम् मध्यें असलेले हे पांच होत. असो.

हीं प्रभुघरण्याकडील शिक्का-मोर्तबें कशीं आहेत तें पहाण्यासाठीं

---

१. अक्षरें घांसून नाहींशीं करून टाकिल्यामुळें, प्रभु घराण्याकडील हा शिक्का कोणत्या स्वरूपाचा होता हें प्रत्यक्ष समजण्याचा मार्गच खुंटला. सावंतवाडी येथें कांहीं वर्षें चीफ जज्ज असून त्या प्रांताच्या इतिहासावर परिश्रम केलेले लेखक मि. जे. ए. सालडाना बी. ए. एलएल. बी. हे मुंबई Anthropological Society च्या सभेंत जून ३० सन १९०९ रोजीं Savantwadi castes and village Communities या विषयावर वाचिलेल्या निबंधांत प्रभु देसायांच्या "कुडाळ प्रांताच्या शिक्क्याची" ( the seal of the Kudal Province ) माहिती देऊन पुढें ह्मणतात कीं, " **मूळ** शिक्का आतां वालावलीच्या देवळांत पुराण वस्तु ह्मणून ठेविलेला आहेसें दिसतें. " ( The original seal is now, it appears, kept as a relic in the Walavali temple ) आज वालावलीच्या देवळांत, आह्मी ज्याबद्दल लिहित आहों तोच तेवढा एक शिक्का आहे, यावरून सालडाना साहेबांनीं उल्लेखिलेला तो हाच शिक्का असावासें वाटतें. दुसरें असें कीं, त्याचे जोडांदार निघून गेले असतां, तोच तेवढा मागें शिल्लक रहावा, किंवा निघून गेलेला परत यावा, पण येऊन न आल्याप्रमाणेंच त्याची गत व्हावी—ह्मणजे तो घांसून टाकण्यांत यावा, इत्यादि स्थित्यंतरांची उपपत्ति सालडानासाहेबांच्या या " **मूळ** " शिक्क्यानेंच बरीचशी लागते ( याबद्दल विस्तृत विवेचन पुढें दहाव्या प्रकरणांत केलें आहे ). शिक्क्याच्या मालकांस नामशेष केल्यावर काळाच्याहि पुढें जाऊन त्यांचें नांव सुद्धां नष्ट करण्याचें कृष्ण कृत्य एका नाफडे उपनांवाच्या ब्राह्मणाच्या हातून ( कदाचित् इच्छेविरुद्ध ) घडलें हें खरें असेल तर दुर्दैवाची सीमाच ह्मणावयाची !

चित्र अंक १७.



श्रीनागसामंत.

यांचा

शिक्का-मोर्तब.

Joshi Art Bombay. 1

चित्र अंक २५.



मठगांवांतील स्वयंभुशिवलिंग.

( चित्रांक २ यांतील सभामंडप असलेल्या देवळांतील प्राचीन शिवलिंगाची प्रतिमा ).

Joshi Art Bombay. 1.

त्यांचे ठसे आह्मीं दरबारांतून आणविले; त्यांत एक शिक्का आणि मोर्तबें अशीं आढळलीं.

शिक्का.




मोर्तब.




या शिक्क्यांतील मजकूर, आणि तोहि अगदीं ओळीवार, वाडकर नाग सावंतानें मारिलेल्या शिक्क्यांतल्याप्रमाणें आहे असें दिसतांच, ते दोनहि शिक्के ( मोर्तबें सुद्धां ) आह्मीं ताडून पाहिले; तों त्यांत कांहीं फरक दिसून आला तो येणेंप्रमाणें:—

---

१. मोर्तब, या शिक्याबरोबरचेंच म्हणावयाचें कारण तें त्याच्यासारखेंच संस्कृत भाषेंत आहे. बाकीचीं दोन आणि एक शिक्का हीं मराठी आणि फारशी या मिश्र भाषांचीं आहेत. त्यांचे ठसे पुढें दिले आहेत.




चित्रांक १८.




चित्रांक १९.




चित्रांक २०

या तीन शिक्क्यांवर फारशी भाषेचा संस्कार झाल्यामुळें ते प्रभु घराण्याच्या अमदानींतील असले पाहिजेत हें उघड आहे. यांपैकीं दोन शिक्क्यांचा संबंध वेंगुर्लें येथील कोटाशीं पोहोंचतो. प्रभु घराण्याच्या जुन्या कागदांत " जकात बंदर वेंगुर्लें " असा उल्लेख आढळतो. त्यावरून वेंगुर्लें येथें सध्यां जो प्राचीन कोटाचा अवशेष आहे, तो बंदरालगत असल्यामुळें शहरांत येणाऱ्या मालाची जकात

| प्रभुघराण्याकडील शिक्का | वाडकर नागसावंतानें मारिलेला शिक्का. |
| --- | --- |







२ री ओळ. भानन्माग्लारव्यो — भानून्मागलाख्य
३ री ,, महेश्वर श्री ( श्रीकारावर तिरपी रेघ² आहे ) — महश्वर श्री [ तिरपीरेघ नाहीं ]

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त ).
त्या कोटांत घेण्याची व्यवस्था होती, आणि त्या कामीं या दोन्ही शिक्क्यांचा उपयोग प्रभु घराण्याच्या अमदानींत केला जात असे असें म्हणतां येतें.

वेंगुर्ल्यांतील कोट डच लोकांनीं बांधिल्याची जी कित्येकांची समजूत आहे ती निराधार होय. त्यांनीं जुन्या कोटाची दागदुजी करून त्यांतील कांहीं भागाला वखारींचें रूप दिलें असें म्हणतात गोवें आणि खारेपाटण यांच्या खालोखाल वेंगुर्लें बंदर हें व्यापाराचें मोठें ठाणें होतें. त्याला साजेसा उत्तम रस्ता शहरांतून दूरवर गेलेला होता. व्यापाराच्या सोईमुळें सन १६३८ च्या सुमारास डच लोक तिथें येऊन राहिले होते. हें शहर शिवाजीनें सन १६६४ त व मोंगलांनीं सन १६७५ त जाळून व लुटून फस्त केल्यामुळें, त्यानंतर त्याला पूर्वीचें स्वरूप कधींच प्राप्त झालें नाहीं.

चित्रांक २१.



२. श्रीकारावर असलेली ही तिरपी रेघ फक्त १६ व्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या कागदांत [ छायाचित्रें अंक ४ ( बालबोध ), ९ ( मोडी ) ] आढळते, त्यापुढील कागदांत दिसून येत नाहीं [ छायाचित्र अंक १२ अ ]. श्रीदेवनारायणाच्या शिक्क्यांतहि ही रेघ आहे.

| | |
|---|---|
| १४ थी ओळ. मुद्रेयं | मुद्रेय |
| पहिल्या ओळींतील पहिल्या 'सा' अक्षरावर एक, तसेंच शेवटच्या ओळीच्या दोन्ही बाजूंस व खालीं मिळून तीन, अशा एकंदर **चार तारका आहेत.** | **तारका मुळींच नाहींत.** |
| परिघासभोंवतालचीं वर्तुळें ३२ मोर्तब. | वर्तुळें ३० मोर्तब |







| | |
|---|---|
| शिरोभागीं—दोन तारका | चंद्र आणि सूर्य |
| १ ली ओळ. वीलस | विलस |
| २ री ,, तीलेखन | तिलेख |
| ३ री ,, वधी, दोहों बाजूस दोन तारका. | नावधि, तारका नाहींत. |

येणें प्रमाणें फरक या दोहोंमध्यें असल्यामुळें तीं भिन्न आहेत, एकच नव्हेत, हें स्पष्ट होतें. परंतु हे फरक अगदींच किरकोळ बाबतींत असून इतर सर्व बाबतींत—उदाहरणार्थ, मजकूर, ( शिक्क्यावरील ) मजकुराच्या प्रत्येक ओळींतिल अक्षरें, अक्षरांचें वळण, श्रीकारावरील तिरपी रेघ, वगैरे—हीं दोन्ही अगदीं इतकीं एकसारखीं आहेत कीं, त्यांवरून एकच अनुमान निघतें, तें हें कीं, एक दुसऱ्याची नक्कल होय; आतां तीं दोहोंतून कोणती हें ठरवूं.

यासाठीं प्रथम खुद्द शिक्क्यांतच थोडाबहुत पुरावा मिळण्यासारखा, आहे. नक्कल घेतांना बहुधा मूळाचा ठसा उमटवून त्या ठशाबरहुकूम ती कोरतात. ठशांत मूळांतील टिंबें, क्वचित् रेघाहि, स्पष्ट न उमटणें शक्य असल्यामुळें, त्या नकलेमध्यें न येणें संभवनीय असतें. हा प्रकार अक्षरांमध्यें होणें शक्य नाहीं; कारण तीं मूळांतूनच स्पष्टपणें ओळखतां येतात. ह्मणून अक्षरें वगैरे इतर बाबतींत सारखेपणा असून ज्यांत टिंबें इत्यादि नाहींत तीच दुसऱ्याची ह्मणजे टिंबें असलेल्याची नक्कल होय असें ह्मणतां येईल. याप्रमाणें पाहिल्यास, नागसावंतानें मारिलेला शिक्का प्रभु घराण्याकडील शिक्क्याची नक्कल ठरतो. दुसरा पुरावा ऐतिहासिक होय. तो हा कीं, प्रभु सरदेसायांचें घराणें लयास गेलें ( सन १६९६ ) तेव्हां या नाग सावंताचा कदाचित् जन्मसुद्धां झाला नसेल, मग त्याच्या शिक्क्याची नक्कल करावयास ते कुठून येणार ? उलट, प्रभु घराण्याचें स्थान बळकाविल्यावर त्यांचे शिक्केहि सावंतांनीं बळकाविले यास इतिहासाचा आधार असल्यामुळें, त्यांच्याच शिक्क्याची नक्कल नागसावंतानें केली हें निर्विवाद होय. हें सिद्ध होतांच, नाग सावंतानें मारिलेला शिक्का चिटणीसांच्या कागदांतील कल्पनेस पोषक न होतां उलट, मांगलादेव हा खरोखर कोणाचा पूर्वज आहे याची नक्की दिशा दाखवून देऊन तो त्या कल्पनेस मारकच होतो. ती दिशा ही कीं, '**मांगलादेव**' हा वाडकर सावंतांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्या तरी वंशांतील होय. आतां तो वंश कोणता, एवढें कळलें ह्मणजे मग मांगलादेवाचा प्रश्न अगदीं निश्चितपणें सुटला असें होईल.


नं.
ता.

# मठगांवचा शिलालेख
## आणि
# ब्राह्मण सामंत राजवंश.

## प्रकरण ९ वें.

### शिक्क्यांतील सामंत घराणें.

श्रीनागसामंताचा शिक्का प्रभुघराण्याकडे आला यावरून त्याच्या सामंत कुलाची राजघट प्रभूंच्या सुरवातीपर्यंत होती हें उघड आहे. प्रभूंच्या राजवटीस १५ व्या शतकाच्या तृतीय पादांत सुरवात झाली, असें आम्हांस प्रभु घराण्याचा एक शिक्का अलीकडे उपलब्ध झाला आहे त्यावरून दिसतें. हा शिक्का ( आणि मोर्तब ) पुढें दिल्याप्रमाणें आहे. चित्रांक २४ (अ, ब)

| शिक्का | शब्द | अर्थ |
|---|---|---|
|  | रामजी इब्न् गोमजी<br>अल् अब्द्–<br>–इ–गिलानी | रामजी सुत गोमजी<br>प्रतिनिधि (मूळ अर्थ सेवक)<br>गिलानीचा. |

मोर्तब



हा शिक्का व त्यासोबतचें मोर्तब हीं आम्हांस मालवणचे रा. रा. रामराव आबाजी प्रभु देसाई यांजकडून मिळालीं. रा. रामराव, तसेंच, प्रभु घराण्यास मोंगलांनीं दिलेला ताम्रपट ज्यांनीं स्वतःपाशीं असलेला आम्हांस दिल्याचें परिशिष्टांत ( लेखांक १८।२ ) नमूद केलें आहे ते रा. कृष्णराव सीताराम ऊर्फ आबासाहेब देसाई, हे एकाच म्हणजे प्रभु घराण्याचे वंशज होत. मालवणांत या देसायांचें

आणखीहि एक कुटुंब आहे. रा. रामराव यांच्या कुटुंबांत वरील शिक्क्याची पूजा " गोमजीच्या दिवाळीस " करतात. " गोमजी " हा प्रभु घराण्याचा मूळ पुरुष असून तो एकदां कांहीं महत्कार्य करून स्वदेशीं परत आला म्हणून आनंद व्यक्त करण्यासाठीं त्याच्या नांवानें दिवाळी करण्यांत आली. ती वहिवाट अद्यापि कुडाळप्रांतांत चालू असून त्या दिवाळीस **" थोरली दिवाळी "** असें म्हणतात. तिच्यापूर्वी एक महिना येणाऱ्या दुसऱ्या प्रसिद्ध दिवाळीचें इतकें महत्व त्या प्रांतांत मानलें जात नसे. आज मुंबई शहराच्या व्यापार–विषयक सहवासामुळें हें सर्व पालटलें आहे हें सांगावयास नकोच.

देसाई घराण्यांतील हा शिक्का बऱ्याच तज्ज्ञ विद्वानांकडून आम्हीं वाचवून आणिला. त्यांत फारशी व अरबी अशा मिश्र लिपींचें वळण असून दोन ओळी " रामजी इब्न् गोमजी-अल अब्द् " अशा असल्याबद्दल सर्वांची एकवाक्यता झाली. त्यापुढील शब्द ( एक किंवा दोन ) कोणासच पूर्ण लागत नाहींत. एलफिन्स्टन कॉलेजचे पर्शियन भाषेचे विद्वान् प्रोफेसर शेख यांनीं त्यांपैकीं शेवटचा शब्द " गिलानी " असा लाविला आहे. प्रोफेसर शेख यांचें म्हणणें असें कीं, हा शिक्का फारशी–अरबी लिपी विशेष न जाणणाऱ्या कारागिरानें कोरलेला असावा, म्हणूनच लपेट्या व टिंबें यांच्या थोड्याशा फरकानें सुद्धां अर्थ बदलणाऱ्या या लिपींत कोरक्याच्या हातून चुका झाल्यामुळें ( उदाहरणार्थ, वरील ' गिलानी ' हाच शब्द. तो " गिल्लानी " असा कोरलेला आहे ) बाकीचे शब्द नीट वाचतां येत नाहींत. पण " रामजी......" इत्यादि वर दिलेल्या दोन ओळी अगदीं स्पष्ट आहेत, त्यांच्याबद्दल मुळींच शंका नाहीं.

प्रभु घराण्यांत रामजी व विशेषतः गोमजी हीं नांवें पुनः पुनः दिसतात. रा. पिंगुळकर यांनीं सावंतवाडीच्या इतिहासांत पृ. ३१ वर प्रभु

घराण्याचा वंशवृक्ष[१] १८ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत दिला आहे, त्या १ पिढ्यांत गोमजी हें नांव तीनदां आलें आहे; रामजी हें नांव दोनदां दिसतें ( चौथ्या पिढींत आणि दुसऱ्या पिढींत ). पहिल्याचा पिता बायेप्रभु असून दुसऱ्याच्या पित्यास त्याचें ' नांव समजत नाहीं ' असें सांगून नुसतें "मूळ पुरुष" म्हटलें आहे. पण त्याचें नांव या शिक्क्यावरून पाहतां, बहुधा ' गोमजीच ' असावें. असें म्हणण्यास दुसरें एक कारण असें कीं, या रामजीच्या भावाचा एक मुलगा गोमजी आहे, तेव्हां आजाचें नांव नातवास ठेवण्याची सर्वसाधारण चाल लक्षांत घेतां या गोमजीचा आजा, म्हणजे रामजीचा बापहि, गोमजीच असण्याचा बराच संभव दिसतो. शिवाय हा शिक्का गोमजीचा नसून त्याची पूजा मात्र **गोमजीच्या दिवाळीस होते** तेंहि बहुधा त्यांतील " गोमजी " हें नांव मूळपुरुषाचें होय याच समजुतीनें असावें ! यावरून रामजी हा मूळपुरुषाचा मुलगा होय असें ह्मणावयास हरकत नाहीं.

शिक्क्यावरून हा ' रामजी ' कोणा ' गिलानी ' नामक पुरुषाच्या वतीनें अधिकार चालविणारा, अर्थात् त्याचा प्रतिनिधि, होता असें दिसतें. कुडाळप्रांत इ. स. १४६९ सालीं बहामनी शहाच्या ताब्यांत गेला, तेव्हां त्याच्यावर **बाहादूरखान गिलानी** म्हणून बहामनींचा सुभेदार होता,[२]

---

१. परागंदा झालेल्या प्रभूंच्या एका घराण्याकडे मिळणाऱ्या माहितीवरून हा वंशवृक्ष कांहीं बाबतींत चुकीचा दिसून येतो, पण प्रस्तुत शिक्क्यावरून आम्हीं काढिलेल्या निष्कर्षाला त्यावरून बाध येत नाहीं. पुढें जो मूळपुरुष गोमजी ह्मणून सांगितला त्याच्याहि पूर्वी एक गोमजी ह्या माहितींत दिसून येतो.

२. सन १४६९ सालीं **ख्वाजा महमद गवान्** या पराक्रमी सरदाराच्या आधिपत्याखालीं सैन्य व आरमार देऊन गोवें बंदरासह कोंकणच्या भागावर दोन्ही बाजूंनीं स्वारी करून महमदशहा बहामनीनें तो प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडिला. एकदां अजिंक्य मानलेली ही कोंकणपट्टी काबीज करण्यांत गवानचा मदत-

व पुढें बहामनी राज्याचे तुकडे होऊन तो प्रांत सन १४८९ सालीं विजापूरकर युसुफ अदिलशहाच्या वांट्यास गेला, तेव्हां ( आणि कांहीं वर्षें पूर्वींहि ) त्याजवर **मलिक-एन्-उल्-मुल्क गिलानी** हा सुभेदार होता. या दोन गिलानींतून शिक्क्यांतील कोणता तें पाहूं. पहिली मोष्ट ही कीं, हा शिक्का विजापूरच्या अदिलशाहींत प्रभु घराण्याचे जे शिक्के दिसतात त्यांच्या सारखा नाहीं. दुसरें असें कीं, विजापूरकरांचा ' गिलानी ' हा स्वतंत्र नसून सुभेदार असल्यामुळें त्याचें नांव शिक्क्यांत येण्याचा संभव नाहीं. बहामनींचा गिलानी मात्र सन १४८२ मध्यें महमदशहा बहामनी वारल्यानंतर त्याच्या महमूदशहा नामक अल्पवयी मुलाच्या सुरवातीच्या कारकीर्दींत राज्यांत व खुद्द बेदर येथील राजधानींत जिकडे तिकडे अंदाधुंदी माजली तिचा फायदा घेऊन कांहीं काळ स्वतंत्र झाल्याचें इतिहासांत नमूद आहे. यावरून शिक्क्यांतील गिलानी तो हाच असें ठरून त्याच बरोबर रामजी प्रभु हा सन १४८२ त त्या प्रांतावर अधिकारी असल्याचेंहि ठरतें. तत्पूर्वीं त्याचा बाप **गोमजी** हाहि **अधिकारी** असावा, असें " **गोमजीची दिवाळी** " कुडाळ प्रांतांत ( सध्यांच्या व जुन्या, म्हणजे देशावरील कोल्हापूर संस्थान व बेळगांव जिल्ह्यांत मोडणाऱ्या कांहीं भागांत ) सर्व जातींत साजरी करण्याची वहिवाट आहे त्यावरून दिसतें. यावरून प्रभूंची सत्ता १५ व्या शतकाच्या तृतीय पादांत

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

नीस सेनापति **कीश्वरखान** यानें विलक्षण शौर्य दाखविल्यावरून त्यास, त्यानें या स्वारींत काबीज केलेले कोल्हापूर, कुडाळ, आणि फोंडा हे किल्ले, महमदशहानें दिले आणि त्या प्रांतावरचा पहिला अधिकारीहि त्यासच नेमिलें. कीश्वरखानाच्या पश्चात् सन १४७८ च्या सुमारास **निजामुद्दीन गिलानी** हा सुभेदार झाला. नंतर त्याच्याच हाताखालीं असलेला वरील **बहादूरखान गिलानी** हा सुभेदार झाला. ( फेरिस्ता )

बहामनींच्या राजवटींतच सुरू झाली होती असें ह्मणावयास हरकत नाहीं. अर्थात सामंत घराणें बहामनींच्या अंमलापूर्वी म्हणजे १५व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कुडाळ प्रांतावर राज्य करीत होतें असें झालें.

या सामंत राजांचें सामर्थ्य बहामनी शहांच्या मानानें अखेर कमी ठरलें, तरी सन १४३६ पासून कोंकणपट्टी जिंकू पहाणाऱ्या बहामनींस त्यांनीं जवळ जवळ तीस वर्षेपर्यंत दाद दिली नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या वेळीं कुडाळ प्रांताच्या उत्तरभागांतील कोंकणपट्टींत रायरी, सोनखेड ( सोनगड ) या ठिकाणीं हिंदू संस्थानिकांचीं राज्यें होतीं.* त्यांनां जिंकण्यासाठीं अल्लाउद्दीनशहानें प्रथम दिलावरखान नामक सरदाराची नेमणूक केली. दिलावरखानानें त्यांनां जिंकून त्यांच्यापैकीं सोनगडच्या राजाची कन्या शहाकरितां नजर आणिली. त्या-

---

* सन १४५० च्या सुमारास दक्षिणेंत ( कोंकणासहित ) जीं लहान मोठीं हिंदू राज्यें होतीं त्यांत, रा. राजवाडे यांच्या माहितीप्रमाणें ( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें. खंड ८ वा. पृ. ४४।४५ ), "खानदेशाच्या बाऱ्यांत निकम, ठाण्यास बिंबदेव राणे याचे वंशज, कोळवणांत कोळी, रामनगरास राणे, सोनगड व रायरी प्रांतांत तेथील राजे, शिरकाणांत शिरके, खेळण्यास शंकरदेव, वाडीस सावंत, बेळगांवास कर्णराज, मोरगिरीस मोऱ्ये, असे अनेक लहान लहान संस्थानिक स्वतंत्रपणें राज्य करीत होते." यांतील "वाडीस सावंत" हें विधान चूक आहे. कारण वर दिलेल्या काळीं 'वाडी' आणि 'सावंत' दोन्हीहि नसून त्यांच्या जागीं अनुक्रमें 'कुडाळ' आणि 'ब्राम्हण सामंत' होते ( प्रकरणें ९, १०, ११ पहा ). वाडी आणि सावंत हीं दोन्ही बरोबरच, ( ६०।७० वर्षांच्या दरम्यान ) म्हणजे दुसऱ्यावरून पहिलें, पुढें १७ व्या शतकामध्यें उपस्थित झालीं. रा. राजवाडे हे या दोहोंसहि प्राचीन समजतात, आणि यास पुरावा म्हणून त्यांनीं मठगांवच्या सन १३९५ च्या शिलालेखांत असलेला भाम सावंत हा मराठा वाडकर सावंतांचा पूर्वज होय अशी समजूत करून घेतली आहे; ती कशी चुकीची आहे हें आम्हीं पुढें दाखविलें आहे.

नंतर सन १४५३ च्या सुमारास वरील राजांनीं आपला प्रांत पुनः हस्तगत करून घेतला. त्यावर दक्षिण कोंकणांतील लहान मोठ्या सर्व हिंदू राजांनां जिंकण्यासाठीं शहानें मलिक–उत्–तुंजार ह्या सरदाराची नेमणूक केली. तुंजारानें शिर्के नांवाच्या मराठे संस्थानिकावर स्वारी करून त्यास जिंकलें आणि ' मुसलमान हो, नाहीं तर तुला ठार मारतों ' असा आग्रह धरला. हा प्रसंग कठिण आहे असें पाहून शिर्के यानें शरण आल्यासारखें दाखविलें व " आपण दोघेही मिळून प्रथम माझा वंशपरंपरा शत्रू असलेला जो कोंकणचा राजा ( the Raja of Konkan ) त्याच्यावर स्वारी करूं या व त्यास जिंकून वाटवूं या " असें त्या सरदाराचें मन वळविलें, व त्यास सैन्यासहित निबिड अशा अरण्यांतून नेऊन आगाऊ ठरविल्याप्रमाणें शिर्के आणि ' कोंकणचा राजा ' या दोघांनीं त्याच्यासकट त्याच्या सर्व सैन्याची कत्तल केली.[२] असो. या हकीकतींतील ' वंशपरंपरा शत्रू असलेला ' बलिष्ठ असा त्या कालचा ' कोंकणचा राजा ' हें वर्णन शिर्क्यांतील सामंत घराण्याचें दिसतें. कारण तें सामंत कुल ' यशोभानुः ' मांगालव्य महेश्वराच्या पराक्रमानें बलिष्ठ झालें होतें. आतां तें कोणत्या ज्ञातीचें हें पाहूं.

**श्रीनागसामंत** यांचा शिक्का वेस्ट्रॉप म्युझिअम्च्या यादीवरून पाहतां, प्रभु घराण्याच्या प्रत्यक्ष कुलदैवताच्या अंगावर सांपडलेला; आख्यायिकेवरून, प्रभु घराण्याच्या जामदारखान्यांत परंपरेनें रक्षण करून ठेविलेला; आणि वेस्ट्रॉप म्युझिअम्च्याच यादींत नमूद केलेल्या

---

१. Calcutta Review, vol. IV, July–December, 1845.

२. या कोंकणच्या स्वारीमुळें अनेक भानगडी उपस्थित होऊन बहामनी दरबारांत तंट्याचें बीज पेरलें गेलें आणि त्यामुळें पुढें त्या बादशहातीचा अंत झाला. वर लिहिलेली कत्तल विशाळगडाच्या आसपासच्या अरण्यांत झाली.

प्रचलित समजुतीप्रमाणें **चंद्रभान-सूर्यभान** यांचा, म्हणजे प्रभु घराण्याच्या प्रसिद्ध " पूर्वजांचा " म्हणून मानिलेला, असा आहे. यावरून त्या शिक्क्यांतील " सामंत " हे देखील प्रभु घराण्याच्या ज्ञातींत आढळणाऱ्या " सामंतां " पैकींच एकाद्या घराण्याचे पितृवंशीय पूर्वज असावेत असें अनुमान होतें. कारण शिक्क्यावरून स्पष्टपणें सूचित होणारी क्षत्रियवृत्ति ह्या सामंतांच्या पूर्वजांच्या ठिकाणीं, ते ब्राह्मण असूनहि, होती, यास ( सामंत या नांवाशिवायहि ) आज भरपूर पुरावा आहे. त्यांपैकीं बरींच घराणीं देसाई, देशमुख, सरनाईक, नाईक इत्यादि हुद्यांवर होतीं व हीं नांवें ते आज उपनांवें म्हणून लावितात; तत्संबंधीं कांहीं उत्पन्नें आज त्यांजपाशीं चालू आहेत; वैभवदर्शक वाडे, पागा इत्यादींचे अवशेष आजहि क्वचित् दिसतात; कागद पत्र सुद्धां बरेचसे सांपडतात-कालाच्या दाढेंतून याहून अधिक कांहीं शिल्लक राहील ही अपेक्षाच व्यर्थ होय ! तसेंच, शिक्क्यांतील सामंतांची वर सिद्ध केलेली प्राचीनता ह्या सामंतांतहि आहे. कारण ही प्रभु-सामंतांची ब्राह्मण ज्ञात कुडाळप्रांतांत कैक शतकें असल्याबद्दलची एक तर त्यांनां स्वतःसच परंपरेची स्पष्ट जाणीव आहे; दुसरें, तेथील बहुतेक खेड्यांतील पूर्वापार जमीनदार त्याच जातीचे ब्राम्हण आहेत; पुनः त्यांतील प्रभु घराण्याच्या नुसत्या राजवटीसच १५ व्या शतकापासून सुरवात झाली, हें आम्हीं वर सिद्ध केलेंच आहे. शिक्क्यांतील ' नाग ' हें नांव सुद्धां या ज्ञातींतील सामंत घराण्यांत ( किंबहुना या सबंध ज्ञातींतच ) गेल्या पिढीपर्यंत, ह्मणजे नवीन वळण रूढ होईपर्यंत, एकसारखें चालू होतें. दुसरें असें कीं, वाडकर सावंतांस गेल्या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें वगळल्यानंतर, शिक्क्यानें सूचित केलेल्या वर्णनाचे ' सामंत ', या ज्ञातीशिवाय दुसऱ्या कोणत्याहि ब्राह्मण अगर इतर ज्ञातींत, कुडाळ प्रांतांतच नव्हे तर बहुधा दक्षिणेंत कुठेंहि, आढळत

नाहींत; मुळीं ' सामंत ' हें उपनांवच ( मूळचें, मागाहून घेतलेलें नव्हे ) अन्यत्र सांपडणें कठिण आहे. या ज्ञातींत मात्र तें जवळ जवळ निम्मे प्रमाणांत आहे; आणि दुसरें असेंच नांव ह्मणजे वरील प्रभु घराण्याचें ! यावरून श्रीनाग सामंताच्या शिक्क्यांतील हें घराणें प्रभु घराण्याच्या ज्ञातीच्या–ह्मणजे कुडाळदेशकर या स्थानिक नांवानें प्रसिद्ध असलेल्या आद्यगौड ब्राह्मण ज्ञातीच्या–घराण्यांपैकीं एक होय असेंच ह्मणणें भाग पडतें.

येथपर्यंत शिक्क्यांतील या सामंत घराण्याची जी माहिती आपणांस मिळाली ती थोडक्यांत पुढें दिल्याप्रमाणें मांडतां येईल:–" हें **सामंत घराणें आद्यगौड ब्राह्मण ज्ञातीचें** असून, **सन १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत**, तत्पूर्वीं बराच काल **मांगला नामक एक महापराक्रमी पुरुष** त्यांत निपजल्यामुळें **प्रबल झालेली आपली सत्ता कुडाळ प्रांतावर** चालवीत होतें. त्यांत **श्रीनाग** नांवाचा एक राजा ( बहुधा वरील कालाच्या अखेरीस ) होऊन गेला. " या घराण्याची विस्तृत माहिती सन १४३६ च्या एका ताम्रपटांत आढळते, तिचा विचार पुढें केला आहे.


चित्र अंक २३ (ब).



चित्रांक २३ (अ) च्या कांठाचा घेर (सुमारें १०० फूट).

Joshi Art Bombay. 1.

चित्र अंक २३ (अ)



कुडाळच्या कोटांतील प्राचीन विहीर (घोडबांव)
(सुमारें ४० फूट खोल).

Joshi Art Bombay 1.

# प्रकरण १० वें.

## ताम्रपटांतील घराणें.

गेल्या प्रकरणाच्या शेवटीं सांगितलेला ताम्रपट शोधून काढून मुंबई सरकारास ( ११ जुलई १८५० रोजीं ) सादर करण्याचें श्रेय त्या वेळचे वाडीसंस्थानचे पोलिटिकल सुपरिंटेंडेंट मेजर ( नंतर सर ) लीग्रँट जेकब यांस आहे. सादर–पत्रांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं " ह्या ताम्रपत्रांचा संच गोवें मुलुखांतील एका घराण्यापाशीं असून तो त्यांच्या इस्टेटीचें अधिकारपत्र असल्यामुळें स्वतःपासून दूर करणें त्यांस पसंत नाहीं. "[1] त्यावरून, तो प्रत्यक्ष पहावा या हेतूनें शोध करतां, म्हापसें गांवांत एका कांसार घराण्यापाशीं आढळला. त्याचा आम्हीं कागदावर घेतलेला ठसा तितका स्पष्ट न आला तरी, त्यावरून सरकारी सिलेक्शन ( नं. १० ) मध्यें प्रसिद्ध झालेल्यांतील कांहीं अक्षरें स्पष्ट लागलीं; पण अद्यापि ( विशेष महत्वाचे नसलेले ) एकदोन शब्द सुटत नाहींत. ताम्रपट आरंभीं संस्कृतांत, पण पुढें प्रत्यक्ष दान केल्याच्या वर्णनांत मराठी आहे.[2] हें मराठी अर्थातच आजच्या दृष्टीनें अशुद्ध आहे, पण संस्कृतांतहि थोड्या बारीकसारीक चुका दिसतात. त्या तशाच ठेवून, फक्त सोयीसाठीं शब्द तोडून, आम्हीं तो पुढें ओळीवार देत आहों.

१ " The original set of plates is in possession of a family residing in the Goa territory who do not like to part with it, as it is the title-deed to their estate ". ( Letter No. 96 dated 11th July 1850, addressed to the Chief Secretary to Government, Political Department, Bombay—*Government Selections, Vol. X, New Series.* )

सावंतवाडी संस्थानचे कारभारी या नात्यानें ज्यांची स्मृति त्या प्रांतास सदैव राहील असे कै० वा० रा. व. वामनराव पीतांबर चिटणीस यांनीं हा ताम्रपट धारशेट कांसार यांच्याकडून आणून सन १८५० च्या सुमारास जेकब साहेबांस दिला.

२ अशा तऱ्हेनें संस्कृत आणि मराठी किंवा कानडी अशा दोनदोन भाषांत ताम्रपट लिहिण्याची कोंकणांतल्याप्रमाणें दक्षिणेंतील इतर भागांतहि वहिवाट होती.

## नागदेवाचा ताम्रपट.

( ओळी ) ( पत्रा १ ला )

( १ ) ॐ नम शिवाय: । जयत्यादिवराहोसौ कल्पांभोद्
( २ ) धिपल्वले । यस्य दंष्ट्रांकुराग्रास्था भाति मुक्तेव मेदिनी ॥
( ३ ) श्रीमतोस्य वंश: प्रस्तूयते ॥ जान्हवीतीरसंभूतो वेदवे
( ४ ) दांगपारग: । श्रुताध्ययनसंपन्नसत्यवाणीजितेंद्रिय: ।
( ५ ) काश्यपो देवशर्मेति ब्राह्मणो ब्रम्हवित्तम: यजु
( ६ ) षां पारगो दांत: षट्कर्मनिरतो भवत् । तुरुष्कोपप्लु
( ७ ) वात्तत्र कोंकणं समगादयं इंदुलाख्ये ग्रामवरे मुहू राज्ञां
( ८ ) सभाजित: । राज्यश्रियं तदा लब्ध्वा कुणुकेश्वरवासिन: । चं
( ९ ) द्रमौलेर्भगवतप्रसादात्पुत्रवानभौत् । तत्पुत्रपौत्रा विख्याता शौ
( १० ) र्यवीर्यादिभिर्गुणै: । तदन्वये × वत्छ्रीमान्जोगदेव: प्रतापवान्

( पत्रा २ रा. पोट )

( ११ ) तस्माद्भूत्प्रिया दिप्यं देवोजा उगिसंज्ञक: । तस्माद्भून्मायिं
( १२ ) देवो रणलक्ष्मीवधूवर: ॥ सौराष्ट्रान्[१]यदुकुलसंभवां
( १३ ) श्च लाटानुन्मथ्य प्रबलतरांस्तिलिंगगौडांन् । हंमीरां
( १४ ) द्रविडपतींश्च पाडिनाथां त्तामुर्व्वी समवतु वीरमा
( १५ ) यिंदेव: । कल्पस्थायि विजयतां विजिताशेषपा
( १६ ) र्थिव: । यत्कीर्तिसुधया शश्वद्भुवनं धवलायते ।
( १७ ) यश्चातिबलपराक्रम: कावंबभूपतीनां राज्यं द्वादश
( १८ ) वर्ष आक्रांतवतो महाराष्ट्रांन्छमुन्मुल्य विजयादि
( १९ ) त्यसूनुं श्रीमत्रिभुवनमल* राज्यं अभिषिच्य तदनुरा
( २० ) गात्सकलं राष्ट्रं पालयति स्म: ॥ संग्रामांगण एक

---

× 'ये' आणि 'व' यांच्यामध्यें 'भ' हें अक्षर कोरावयाचें चुकून राहिलेंसें दिसतें.

१ पुढें न् असला कीं, मागें उगीच एक अनुस्वार लिहिण्याची खोड या कोरक्यास आहे.

* 'ल' वरील अनुस्वार चुकून 'राज्य' यांतील 'ज्य' वर कोरलेला दिसतो. अशाच तऱ्हेची चूक ३ ऱ्या पत्र्यांत ३७ व्या ओळींतील 'दानाश्रेयोत्पालनं' यांतील 'त्' च्या बाबतींत झाली आहे.

( पत्रा २ रा. पाठ. )

( २१ ) एक गुणवान्छेत्तुं रिपूनां शिरः । तीर्थे शांभव ए
( २२ ) क एव गुणवान्दातुं द्विजेभ्यो धन । धार्मस्यार्जुन ए
( २३ ) क एव गुणवानाज्ञां विधातुं पितुः । श्रीमन्मंगम
( २४ ) हीपतेः समभवत्छ्रीभैरवो भूपतिः । येन स्वबलमा
( २५ ) लंब्य हता रिपुपराक्रमाः । समुद्रालंकृता धा
( २६ ) रा कृपाणधारया धृता । यस्य कृपाणतरणे
( २७ ) समुल्लासः समुल्लसन् । स्वयोद्धानां भयध्वांतमम्
( २८ ) मुषन्मुहुर्मुहुः ॥ तस्यांत्यः नागदेवो कांइदेवः* सुतो ब
( २९ ) ली । शिवदीक्षापरो धीमान्शिवध्यानपरायणः ॥ स च
( ३० ) पाल्लिका नांम ग्रामे समस्तकांसारमहाजनेत्यः तिष्ठन् ॥ स्वस्ति श्री

( पत्रा ३ रा. )

( ३१ ) श्रीभैरवदे++ । वरडें गीऱ्हामा । सर्वनमस्य करुनु दी
( ३२ ) धले । श्रीनलसंवस्छरे चैत्रमासे १३५८ सकु श्रीकाली
( ३३ ) कादेवीवरपुत्र रूपसेठीपुत्र लषुमसेठी दतं ग्राहम
( ३४ ) तांब्रसांसणं प्रदातु पुंर्व दीसे सीमा चीपोलीयेचीः उंत्र
( ३५ ) दीसे सीमा चादेलाचीः दषीण दीसे ॐजरीयेची
( ३६ ) सीमाः पसीम दीसे वारषंडीची सीमाः येवं चतुधा
(३७) ट सीमाः दालनपालनयोर्म्मधो दानाश्रेयोत्पालनं । दानं स्वर्गमाप्नो
(३८) ति ।पालनादच्युतं पदं।स्वदत्तं पर्दत्त वा ।यो हरेति वसुंधरा।सष्टि वर्ष
( ३९ ) सहस्राणि । विष्टांयां जायते क्रिमि । स्वर्णमेकं गवामेकं भूमिरे
ष्येकमंगुलं
( ४० ) हरं नरकमाप्नोति । यावदाभूमिसंप्लवं । सामान्योयं धर्मसेतुं
नृपाणां काले काले
( ४१ ) काले पालनीयो भवाद्भि सर्वानेतान् भाविना पार्थिवेंद्रां भूय्यो
भूय्यो भूय्यो याचते रामचंद्र

---

* येथें विसर्ग चुकीनें कोरला गेला आहे.

++ येथील दोन अक्षरें बरोबर वाचतां येत नाहींत.

१ 'पालनं' यांतील 'पा' या अक्षरास जोडलेला त् वास्तविक 'दाना' च्या पुढें पाहिजे. 'दानात्' =दानाहून.

## भाषांतर.

ॐ नमः शिवाय। त्या आदिवराहाचा विजय असो, ज्यानें डबक्याप्रमाणें लेखिलेल्या प्रलयकालच्या समुद्रांत आपल्या कोमल आणि अणकुचीदार सुळ्यांच्या टोंकांवर धरिलेली पृथ्वी तेथें मौक्तिकाप्रमाणें भासते॥ वैभवशाली (अशा) त्या (राजा) चा वंश वर्णिला जात आहे। **जान्हवीतीरीं** जन्मलेला, वेदवेदांगांमध्यें पारंगत, श्रुताध्ययनसंपन्न, सत्यवाणी, जितेंद्रिय, **काश्यप** गोत्राचा **देवशर्मा** नामक ब्राह्मण (हा) ब्रह्मज्ञांमध्यें श्रेष्ठ, **यजुर्वेदांत पारंगत,** आणि षट्कर्मांत गढलेला असा होता। तेथें (जान्हवी तीरावर) तुरुष्क लोकांची स्वारी झाल्यामुळें तो (इतरांस बरोबर घेऊन) **कोंकणांत** गेला. **इंदुल** नामक (एका) प्रशस्त गांवांत (तेथील) **राजानें त्याचा पुनः पुनः सन्मान केला**। नंतर **राज्यलक्ष्मी प्राप्त** होऊन (त्यास) **कुणुकेश्वरस्थ भगवान् शंकराच्या** प्रसादानें पुत्र झाले। त्याचे मुलगे, नातु वगैरे शौर्यवीर्यादि गुणांनीं प्रसिद्धीस आले। त्याच्या वंशांत वैभवशाली आणि पराक्रमी '**जोगदेव**' झाला। त्याजपासून (जोगदेवापासून) वैभवानें दिपविणारा, देवांसारखें सामर्थ्य असणारा '**उर्गा**' नांवाचा झाला। त्याजपासून **मायिदेव** झाला, ज्यास रणांत (विजय) श्री (सदैव) माळ घालीत असे॥ सौराष्ट्र (काठेवाडांतील राजे) यदुवंशीय लाट (गुजराथेकडील यादव), त्याहूनहि प्रबळ तिलिंग गौड* (तेलंगणांतील गौडदेशी), हम्मीर, द्रविडदेशचे राजे (होयसळ बल्लाळ), आणि पाडिनाथ राजे (मदुरा अथवा उच्चंगीदुर्ग येथील पांड्य संस्थानिक), यांचा धुव्वा उडवून त्या राज्याचें **वीर मायिन्देवानें** संरक्षण केलें। कल्पांतापर्यंत (कीर्तिरूपानें) राहणाऱ्या, जिंकावयाचा असा एकहि राजा शिल्लक न ठेवणाऱ्या त्याचा विजय असो। ज्याच्या कीर्तिरूप

---

* तिलिंगगौड आणि हम्मीर यांजबद्दल विशेष माहिती पुढें टिप्पणींत दिली आहे.

सुधेनें [ हें ] जग कायमचें धवल होऊन राहिलें आहे। आणि जो अमर्याद सामर्थ्यवान् आणि पराक्रमी [ होत्साता ], **कदंब** **वंशीय राजांचें** राज्य बारावर्षे पर्यंत आक्रमण करून बसलेल्या '*महाराष्ट्र' राजांचें समूळ उच्चाटन करून विजयादित्याचा मुलगा **श्रीमत्त्रिभुवनमल्ल यास राज्याभिषेक करून** त्याजवरील प्रेमानें **सबंध राष्ट्राचें पालन करिता झाला** ॥ समरांगणावर शत्रूंचीं शिरें तोडण्यांत अद्वितीय कुशल। शंकराच्या तीर्थस्थानावर ब्राह्मणांनां द्रव्य देण्यांत अद्वितीय उदार। [१]धर्म राजाची ( आज्ञा जशी ) अर्जुन, ( तशी ) पित्याची आज्ञा पाळण्यांत अद्वितीय गुणवान् ( असा ) **श्रीमन्मंगमहीपतीपासून श्रीभैरवभूपति** झाला। ज्यानें स्वतःच्या सामर्थ्यावर अवलंबून राहून, शत्रूंचे पराक्रम निष्फळ केले। ( आणि ) समुद्रानें सुशोभित झालेला कांठ ( समुद्रकांठ ह्मणजे याठिकाणीं **दक्षिण कोंकणपट्टी** ) तरवारीच्या धारेनें ताब्यांत ठेविली। ज्याची तरवार परजत असतां फांकणारा प्रकाश त्याच्या योध्यांच्या मनांतील भीतिरूपी अंधःकार चोरीत ( नाहींसा करीत ) असे। त्याच्या ( भैरव भूपतीच्या ) लागोपाठ कांइदेवाचा बलवान् मुलगा **नागदेव। शंकराचा भक्त**, बुद्धिवान्, **शंकराच्या ध्यानांत सदा निमग्न** असणारा, ( असा होता ) ॥ व त्यानें पल्लिका ( कांसारपाल? ) नामक गांवांत समस्त कांसार महाजनांसमोर उभें राहून ॥ ( स्वति श्रीभैरवदे++ यांतील शेवटचीं दोन अक्षरें नीट लागत नसल्यामुळें, संदर्भ कळत नाहीं ) वरड गांव सर्वनमस्य[२]

* यांची माहिती पुढें याच प्रकरणांत टीपेंत दिली आहे.

१. धर्मराजा अर्जुनाचा बंधु असल्यामुळें उपमा सर्वांगीण नाहीं.

२. याचा अर्थ ' इनाम ' असा आहे. ' नमस ' हें नांव कुडाळ प्रांतांत बऱ्याच जमिनींनां असलेलें आडळतें. नमस्कार याच्याशीं त्याचा मुळींच संबंध नाहीं. या कालिकादेवीच्या देवळांत ( या देवीला काळंबादेवी असें तिकडे ह्मणतात ) ताम्रपट देणाऱ्या नागदेवाचा एक शिलालेख होता तो व हा ताम्रपट वाडीस घेऊन

करून दिलें । **श्रीनल संवत्सरे चैत्रमासे शके १३५८,** श्री कालिका देवीच्या वरानें झालेला पुत्र ( जो ) रूपसेटी, ( त्याचा ) पुत्र लक्ष्मणसेटी, यास ( दत्तंग्राहं ? ) ताम्रपट दिला; पूर्वदिशेस चीपोलीयेची सीमा, उत्तरदिशेस चादेलाची सीमा, दक्षिणदिशेस ओंजरीयेची सीमा, पश्चिम दिशेस वारखंडीची सीमा, याप्रमाणें चारी बाजूंच्या सीमा ( आहेत ); दान आणि ( त्याचें ) पालन या दोहोंमध्यें दानापेक्षां पालन अधिक कल्याणकारक आहे । दानानें ( त्यास ) स्वर्ग मिळतो । पालनाच्या योगें अढळ ( सायुज्य ? ) पद ( प्राप्त होतें )। स्वतः अगर दुसऱ्यानें दिलेली जमीन जो हिरावून घेतो । ( तो ) साठ हजार वर्षें । विष्टेमध्यें किड्याच्या जन्मास जातो । ( दान दिलेल्यांतून ) एखादें सोन्याचें नाणें, एखादी गाय व एक अंगुळभर देखील जमीन हरण करणाऱ्यास नरक प्राप्त होतो । पृथ्वी बुडेपर्यंत ( कल्पांतापर्यंत )। " हा धर्मरूपी सेतु ( सर्व ) राजांचा एकच आहे, ( तो ) सदासर्वकाळ आपल्या हातून रक्षण केला जावा " ( असें ) पुढें होणाऱ्या या सर्व राजांना रामचंद्र पुनः पुनः विनवीत आहे.

या ताम्रपटांत वर्णिलेलें ब्राह्मण राजघराणें नक्की कोणाचें असावें याबद्दल खुद्द जेकब साहेबांस उलगडा न होऊन त्यांनीं त्याबद्दल नुसतें

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

जाण्याचा प्रयत्न दोनशें वर्षांच्या सुमारास झाल्याचें समजतें. हा शिलालेख पुढें फुटून ( फोडून ? ) त्याचे तुकडे झाल्यामुळें नापत्ता झाला असें ऐकण्यांत येतें. आजमितीस हा ताम्रपटच काय तो या कांसार घराण्याकडे असून देवस्थान आणि त्यास दिलेला इनाम गांव त्यांच्याकडे चालत नाहीं असेंहि समजतें.

१ शेवटचा श्लोक बहुधा निरनिराळ्या राजांनीं दिलेल्या बऱ्याच ताम्रपटांच्या शेवटीं घातलेला आढळतो. याच ताम्रपटास तो विशेषेंकरून लागू आहे असें मुळीच नाहीं. 'रामचंद्र' हें दाशरथी रामाचें किंवा दुसऱ्या कोणाचें नांव आहे हें कळत नाहीं.

एवढेंच म्हणून ठेविलें आहे कीं "तो ( ताम्रपट ) कांहींसा ऐतिहासिक दृष्ट्या विचारांत घेण्यासारखा आहे. या भागांत **चालुक्य** आणि **यादव** यांच्या मागोमाग एका बलाढ्य ब्राह्मण घराण्याची राजवट प्रस्थापित झालेली आढळणें, ही एक इतिहासांत नवीनच बाब दिसते." अशाच तऱ्हेचा शेरा त्यावर रॉयल एशिआटिक सोसायटीच्या मुंबई शाखेनें २४ एप्रील सन १८५१ च्या सभेंत मारून ती बाब निकालांत काढली. रत्नागिरी ग्याझेटिअरकार "१५ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास ( सावंत ) वाडी ही एका बलाढ्य **स्थानिक ब्राह्मण** घराण्याच्या राज्यांत मोडत असे," येथपर्यंत येऊन थबकले. परंतु सावंतवाडीस बरींच वर्षे चीफ जज्ज असलेले प्रसिद्ध इतिहास-

---

१. "It is of some historical interest. The establishment in this quarter of a powerful Brahmanical dynasty in succession to the चालुक्यs and यदुs seems to be a new bit of history".

२. "This ancient inscription from the कोंकण......certainly contains rather a curious piece of the ancient history of the Konkan and deserves to be possessed on that account". ( Govt. Selections, Vol. X, new series ).

३. "About the middle of the 15th century it (Vadi) formed part of the territory of a powerful local Brahman dynasty".

'**स्थानिक**' या शब्दानें कुडाळ प्रांताचे १५ व्या शतकापासून सरदेसाई असलेल्या ब्राह्मण ज्ञातीच्या, म्हणजे प्रभूंच्या ब्राह्मण ज्ञातीच्या, असा अर्थ गॅझेटीअरकारांना अभिप्रेत असल्याचें उघड दिसतें.

संशोधक मि. जे. ए. सालडाना हे याच्याहि पुढें जाऊन ह्मणतातः " बहुधा याच ( ताम्रपटांतील ) घराण्याचे वंशज, पंधराव्या शतकाचे अखेरीस विजापूरकरांचे मांडलिक असलेले कुडाळचे देसाई हे असावेत." पण आतां या नुसत्या अंदाजावर थांबण्याचें कारण नसून, असें अगदीं निश्चित विधान करणें शक्य झालें आहे कीं, हें प्रभु घराण्याचें पूर्वज घराणें ह्मणजे गेल्या प्रकरणांत वर्णिलेलें श्रीनाग सामंताच्या शिक्क्यांतील "सामंत" घराणेंच होय-ज्यांचे वंशज आज प्रभूंच्या वंशजां-बरोबरच कुडाळप्रांतांत नांदत आहेत. ही गोष्ट ताम्रपट वाचतांच लक्षांत येण्यासारखी आहे, पण कोणतीच शंका राहूं नये याकरितां शिक्क्यांतील घराणें व या ताम्रपटांतील घराणें यांचें त्या त्या बाबींत कसें अगदीं हुबेहूब साम्य आहे हें खुलासेवार दाखविणें जरूर दिसतें.

---

१. तो संबंध उतारा पुढीलप्रमाणें आहे. " There is also an interesting copper-plate of the year 1436 which proves the existence of a Gaud...Brahmin dynasty of chiefs in Southern Konkan about the beginning of the 15th century. The founder of this dynasty is said in the copper plate to have expelled the Marathas, who had usurped the power of the Kadambas. It is probably to this dynasty the Desais of Kudal belonged, who were tributaries of Bijapur about the close of the 15th century.

"The Kudal Brahmin Desai was taken Captive by Lakham Savant ( ancestor of the present Sar Desai of Vadi ) and afterwards put to death ( about the year 1640 A. D. ) and thus ended the Brahmin dynasty."

( *Jour. Anthro. Soc. Bom. Vol. VIII* )

## १ आद्यगौडब्राह्मण*–जान्हवीतीरसंभूत ब्राह्मण.

आद्यगौडांचा मूळ देश म्हणजे प्राचीन श्रावस्तीपुरीजवळील ‘ गौंडा ’ नगरीवरून नांव प्राप्त झालेला देश होय. आदिगौडदीपिकेमधील पुढील श्लोकांत त्याच्या मर्यादा दिल्या आहेतः—

**गौडदेशं* समारभ्य भुवने शान्तगः शिवे ।**
**गौडदेशः समाख्यातः सर्वविद्याविशारदः ॥**

म्हणजे बंगाल ( वंग ) पासून अमरनाथपर्यंतचा प्रदेशः पूर्वेस गंगा आणि गंडकी यांचा संगम, दक्षिण आणि पश्चिम दिशांस शरयू, आणि उत्तरेस हिमालय. यांतच जान्हवीतीर या विशेष नांवाच्या प्रदेशाचा समावेश होतो.

## २. काश्यपगोत्र.

शिकघांतील सामंतांचीं काश्यपगोत्री घराणीं आजहि कुडाळप्रांतांत व त्या ज्ञातीच्या इतर ठिकाणच्या वसाहतींत आढळतात. आमच्या मुद्द्याच्या स्थापनेसाठीं, सर्वच “ सामंत ” घराणीं काश्यपगोत्राचीं असणें आवश्यक नाहीं; हें या सामंतांच्याच ज्ञातीच्या ‘ प्रभु ’ घराण्याच्या उदाहरणावरून स्पष्ट होईल. प्रभु घराण्यांत अनेक गोत्रें आहेत; पण त्यांपैकीं फक्त जामदग्न्यवत्स गोत्राचेंच घराणें सरदेशमुखपदाधिष्ठित होतें.

## ३. यजुर्वेद–ऋग्वेद.

आजचे काश्यपगोत्री सामंत ऋग्वेदी आश्वलायन असले तरी ते मूळांत यजुर्वेदीच होते, असें म्हणण्यास पुरावाः ( १ ) सामंतांची गौडदेशीय ज्ञात, किंबहुना उत्तरेंतील या गौडब्राम्हणांतील बहुतेक भेद यजुर्वेदीच होते, व आजहि बरेचसे आहेत.

( २ ) आश्वलायन सूत्रांतील काश्यपगोत्राचे प्रवर “ काश्यपावत्सारासितेतिं ” असून, हिरण्यकेशी सूत्रांतील काश्यपगोत्राचे प्रवर “ काश्य-

* विशेष माहिती टिप्पणींत दिली आहे.

पावत्सारनैध्रुवेति " आहेत. या ज्ञातींत काश्यपगोत्र प्रभु आणि सामंत या दोघांतहि आहे, आणि ते दोघेहि " काश्यपावत्सारनैध्रुवेति " असा हिरण्यकेशी प्रवरोच्चार करितात. यावरून या ज्ञातीचे ब्राम्हण मूळांत ऋग्वेदी आश्वलायनसूत्राचे नसून यजुर्वेदी हिरण्यकेशी होते हें निश्चयात्मक ठरतें. पुढें दक्षिणेंत आल्यावर त्यांच्या क्षात्रवृत्तीमुळें त्यांच्या घरचें अध्यापन–यजनादि स्थानिक कऱ्हाडे ब्राम्हणांकडे सोंपविण्यांत आलें ( तें अल्पांशानें आजमितीसहि आहे ), यामुळें कऱ्हाडे ब्राम्हणांचा जो ऋग्वेद तो या गौडांचाहि झाला. अशा तऱ्हेनें कऱ्हाडे ब्राम्हणांच्या सान्निध्यानें वेद बदलल्याचें उदाहरण चित्पावन ब्राह्मणांचें होय. चित्पावन हे मूळचे हिरण्यकेशी यजुर्वेदी ब्राह्मण; पण आज त्यांच्यांत आश्वलायन ऋग्वेदी यांचीच संख्या जास्त दिसते. याचें कारण केवळ ब्राह्मणवृत्ति अल्पसंतुष्ट न राहण्याचा या ज्ञातीचा गुण होय–जो आज स्वोन्नतिकार्यांत आणि राष्ट्रोन्नतिकार्यांत, तसेंच १८ व्या शतकांत क्षत्रियवृत्ति स्वीकारण्यांत, स्पष्ट दिसून येतो.

---

१. चरणव्यूहाच्या टीकेंत महार्णव नामक ग्रंथांतील पुढील माहिती उतरून घेतली आहे: नर्मदेच्या दक्षिणेस आपस्तंभी, आश्वलायनी, राणायनी व पैप्पलादि ह्या शाखांचे ब्राह्मण आहेत; तुंगभद्रा, कृष्णा व गोदा ह्या नद्या ज्या प्रदेशांतून वाहतात त्या ह्मणजे सह्याद्रिशिखरापासून तैलंगणापर्यंतच्या प्रदेशांत ऋग्वेदी आश्वलायन शाखेचे ( हे सध्यां ' देशस्थ ' म्हणून संबोधिलेले ब्राह्मण होत ); आणि सह्याद्रिपर्वताच्या आरंभापासून तों नैऋत्यदिशेस समुद्रापर्यंत, तसेंच परशुरामाचे सन्निध असलेल्या प्रदेशांत [ " सह्याद्रिपर्वतारम्भा नैऋत्यां दिशि सागरात । हिरण्यकेशि शाखा स्यात्परशुरामस्य संनिधौ ॥ " हे दोन्ही प्रदेश म्हणजे कोंकणपट्टी–ज्यांत रत्नागिरी जिल्हा, आणि सावंतवाडी संस्थानचा समावेश करणारा कुडाळ प्रांत हे येतात. ] हिरण्यकेशी शाखेचे ब्राह्मण आहेत. परशुरामाच्या संनिध असलेले ब्राह्मण ह्मणजे कोंकणस्थ चित्पावन ब्राम्हण होत.

या गुणामुळें द्रव्यार्जनासाठीं कर्ते पुरुष घरदार सोडून दूरवर जात असत; अर्थातच त्यांच्या मुलांचें अध्ययन, घरच्या घरींच बसून उदरनिर्वाह करणाऱ्या कऱ्हाडे ब्राह्मणांपाशीं गेलें; व हा क्रम बऱ्याच पिढ्या चालत राहिल्यामुळें, हिरण्यकेशीपेक्षांहि, आश्वलायन शाखेचे ऋग्वेदी त्यांच्यांत अधिक झाले. ज्या गांवांत कऱ्हाडा ब्राह्मण मूळाचा असा कोणीहि नाहीं, असें वेळंब ह्मणून एक गांव चिपळूण तालुक्यांत आहे; तेथील चित्पावन सर्व हिरण्यकेशीच राहिले. असो. सामंतांच्या या गौड ब्राह्मण ज्ञातीचा वेद बदलल्याचा प्रश्न सुमारें २० वर्षांपूर्वीं शारदापीठाचे शंकराचार्य श्रीमन्माधवतीर्थ यांनीं अनाळ्यास तेथील वे. शा. सं. भिकूशास्त्री सामंत परुळेकर यांस केल्यावरून त्याचा खल झाला, त्यांत वर दिलेलें कारण श्रींस पटलें. वेद आणि शाखा बदलल्याची विस्तृत माहिती महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या " वेदविद्या " नामक २ ऱ्या भागांत दिली आहे, ती जिज्ञासूंनीं वाचावी.

## ४ मांगलाख्य महेश्वरः आणि मंगमहीपतिः

( १ ) **नामैक्य.** मांगला आणि मंग हीं दोन्ही नांवें एकच असून, पहिल्याचें दुसरें संक्षिप्त रूप होय. यास अगदीं जवळचा आणि त्यांतहि ( या पुस्तकास ) विरुद्धपक्षीय असा आधार म्हणजे मागें ( पृ. ४८ ) सांगितलेला चिटणीसांचा कागद होय. त्यांत **मांगला** देव तोच **मांग** सावंत अशी स्पष्ट कबुली आहे; आणि हें संक्षिप्त रूप मान्य करूनच रा. पिंगुळकरांनीं **मांगल्याचा** मठ हा **मांग** सावंताचा मठ होय असें आपल्या पुस्तकांत विधान केलें आहे; शिवाय तसें संक्षिप्त रूप आजहि प्रचालित आहे. ( मांग आणि मंग यांतील फरक तर लक्षांतहि घेण्यासारखा नाहीं ! ) पण नांवांचीं अशीं रूपांतरें पहावयास इतकी सूक्ष्म नजर नकोच आहे ! खुद्द या ताम्रपटांतच या ' **मंग** ' महीपतीचें दुसरें नांव वीर **मायिंदेव** असें दिलें आहे. दुसऱ्या एका ताम्रपटांत त्याचें **मलि-**

**नाथदेव** असें नांव आहे. दुसऱ्या कित्येक मोठमोठ्या राजपदाधिष्ठित, अथवा इतर पुरुषांच्या नांवाचा तर याहूनहि पलीकडचा प्रकार दिसतो. उदाहरणार्थः जैतुगी—जैत्रपाल—जैत्रसिंह; सिंघण—सिंहण—सिंहदेव—सिंहल-देव; कृष्ण—कन्हार—कन्धर—कंधार; कर्क—कक्क—कक्कल—कर्कर; हरिहर—हक्क—हरियप्पा; हेमाद्रि—हेमाडपंत—हेमाडिदेव; ध्रुव—धोर—धारावर्ष, वीरदेव—वीरनाथ इत्यादि. असो.

( २ ) **अधिकारैक्य.** " महेश्वर " आणि " महीपति " हे दोन्ही शब्द समानार्थक होत. तसेंच ' कुलयशोभानुः ' हें शिक्क्यांतील विशेषण, ताम्रपटांत उत्साहपूर्वक तपशीलवार वर्णिलेल्या मंग ऊर्फ मायिंदेवाच्या पराक्रमांस अगदीं तंतोतंत लागू पडतें.

( ३ ) **स्वतःच्या घराण्याचें संस्थापकत्व.** शिक्क्यांतील 'मांगल' हा आपल्या कुलाचा केवल ' यशोभानुः ' आहे, मूळपुरुष नव्हे; असें असूनहि त्याचें नांव शिरोभागीं आहे; यावरून बहुधा तो स्वकुलाच्या स्वतंत्र सत्तेचा संस्थापक असावासें वाटतें. ताम्रपटांतील ' मंग ' देखील तसाच आहे.

ताम्रपटांत ' महीपति ' किंवा भूपति या पदास ' मंग ' महीपतीपासूनच सुरवात झालेली आहे. तत्पूर्वीं कैक पिढ्या हें घराणें चाललेलें असून त्यांतील पहिल्याच पुरुषास—म्हणजे देवशर्म्यासच ' राज्यश्री '[1] मिळालेली होती; पण ती सामान्य दर्जाची[2]. देवशर्म्याचे जोगदेव, उगीदेवादि वंशज पराक्रमी निपजले, तरी त्यांनीं राजा या नात्यानें आपला दर्जा विशेष वाढविला नाहीं. पुढें मंग ऊर्फ मायिंदेव हा महापराक्रमी निघून त्यास ' वीर ' हें पद प्राप्त झालें. हें पद सामान्य

१ प्रकरण ११ वें पहा.

२ मागें तिसऱ्या प्रकरणांत ( पृ. ७ ) दिलेल्या देसाई—देशमुखांच्या टीपेवरून ह्या दर्जाचें अनुमान होण्यासारखें आहे.

योद्धयाचें वाचक नसून विशेष अधिकाराचें आणि पराक्रमाचें द्योतक आहे; उदाहरणार्थ वीर विज्जरस ( सिंघणाचा एक मांडलिक—महामंडलेश्वर ), वीर बल्लाळ ( होयसळवंशी, चालुक्यांचा महामंडलेश्वर, हा पुढें स्वतंत्र झाला ). 'वीर' मायिंदेवाच्या पराक्रमांचें ताम्रपटांतील वर्णन निव्वळ अतिशयोक्तिपूर्ण म्हणतां येत नाहीं; कारण त्यांत प्रत्यक्षच असा दाखला दिलेला आहे कीं, मायिंदेवानें विजयादित्याचा मुलगा त्रिभुवनमल्ल यास त्याचें राज्य मिळवून देऊन पुनः स्नेहाखातर स्वतः त्याचें पालन केलें. याप्रमाणें स्वतःचें राज्य आणि त्रिभुवनमल्ल कदंबाचें राज्य मिळून सबंध राष्ट्राचा पालक बनल्यावर, पुढें मायिंदेवानें केवळ 'वीर' न राहतां ( मंग ) 'महीपति' व्हावें व एका स्वतंत्र राजघराण्याचा **संस्थापक** बनावें हें साहजिक होय.

( ४ ) **प्राचीनता.** वर दिलेल्या त्रिभुवनमल्लावरून या 'मंग' महीपतीचा काल काढतां येतो. ( दुसऱ्या ) विजयादित्याची कारकीर्द ११४८-११७१।७२ अशी मिळते[१]; त्याच्या मागून ( तिसरा ) जयकेशी ११८७-८८ आणि १२१०-११; त्याच्यापुढें त्रिभुवनमल्लः पण त्याचें फक्त नांव देऊन कारकीर्द किंवा इतर कांहींच ऐतिहासिक माहिती दिलेली नाहीं; याचा उलगडा ताम्रपटाच्या १७, १८, १९, २० ओळींवरून होतो. कारण कदंबांचें राज्य तत्पूर्वी "महाराष्ट्र"

---

१ Bombay Gazetteer, Vol. I, Part II, p. 563. तिसरा जयकेशी आणि त्याच्या मागून दिलेला त्रिभुवनमल्ल हे विजयादित्याचे कोण तें ग्याझेटियरमध्यें सांगितलेलें नाहीं. नागदेवाच्या ताम्रपटावरून त्रिभुवनमल्ल हा विजयादित्याचा मुलगा होता याबद्दल मात्र संशय राहत नाहीं. त्याच्या पूर्वीचा तिसरा जयकेशी हाहि विजयादित्याचा वडील मुलगा असावा.

२ हे "महाराष्ट्र" राजे बहुधा कलादगी तालुक्यांतील **गुत्तल** येथें राज्य करणारे **गुत्त** ( गुप्त ) वंशीय राजे असले पाहिजेत. या वंशांतील अहवादित्य उर्फ ( दुसरा ) वीर—विक्रमादित्य ( सन ११८२—१२१३ ) हा जरी स्वतःस महामंड-

राजांच्या स्वाधीन १२ वर्षे होतें; व नंतर त्यांचें उन्मूलन करणारा मंग, उर्फ मायिंदेव हा त्रिभुवनमल्लास फक्त नांवाला राज्यावर बसवून स्वतःच ' राष्ट्राचें पालन ' करीत असे ! म्हणजे त्रिभुवनाची ' कारकीर्द ' अशी खरोखर नाहींच ! पण तो सन १२२० च्या सुमारास गादीवर बसविला गेलासें दिसतें. अर्थात माथिंदेवाचाहि हाच काल होय. आणि तोच दुसऱ्याहि एका पुराव्यावरून येतो. यादव सम्राट सिंघणदेव ( सन १२१०-१२४७) यानें हम्मीर, होयसळ, मालव, तेलंग, गुर्जर, लाट आदि राजांवर स्वाऱ्या केल्या; त्याच स्वाऱ्या ताम्रपटांतील वीर मायिंदेवाच्याहि दिसतात; ' **मायीदेव** ' पंडित या ब्राम्हण्यदर्शक नांवाचा सिंघणाचा एक **महाप्रधान सर्वाधिकारी,** आणि **महापरमविश्वासी** अशा उपाधींचा मांडलिक होता; आणि मांडलिकांस साम्राज्यरक्षणार्थ स्वाऱ्यांवर जावें लागे; यावरून हा मांडलिक मायीदेव म्हणजे ताम्रपटांतलि मायींदेवच ठरून त्याचा काल सिंघणदेवाच्या स्वाऱ्यांचा, म्हणजे सुमारें १२१५ येतो. वरील स्वाऱ्यांपैकीं हम्मीरांवरील स्वारीच्या उल्लेखांत ( टिप्पणी पहा ) " यस्य भृत्यबटुना हम्मीरवीरो जितः " असें म्हटलें आहे. ' भृत्यबटु ' याचें डॉ. भांडारकरांनीं ( Early History of

---

लेश्वर म्हणवीत असे, तरी तो सिंघण यादव आणि होयसळ-बल्लाळ यांच्या साम्राज्यपदार्थ चाललेल्या चढाओढीचा फायदा घेऊन स्वतंत्रपणेंच अधिकार गाजवीत असे. सन १२१३ च्या सुमारास कदंबांचा बनवासी १२००० हा प्रांत त्यानें हस्तगत केला होता-ज्यास ' निजैश्वर्य ' ( ज्याच्यावर कोणत्याहि वरिष्ठ सत्तेचा अंमल चालत नाहीं ) असें त्या वेळच्या आपल्या एका शासनांत त्यानें म्हटलें आहे. ताम्रपटांत उल्लेखिलेला बारा वर्षांचा काल याच सुमारास येतो ( Bombay Gazetteer Vol. I, Part II). ताम्रपटांतील या उल्लेखावरून १५ व्या शतकांत कोंकणचा समावेश " महाराष्ट्रांत " होत नव्हता असें दिसतें.

१ Bombay Gazetteer, Vol. I, Part II-P. 523-525.

the Deccan पृ. ८२ ) 'बालसेनापति' [1] असें भाषांतर केलें आहे. यावरून वरील स्वाऱ्यांच्या काळीं मायिंदेव अगदीं तरुण असल्यामुळें, पुढें महीपतिपदाची प्राप्ति करून घेऊन स्वतंत्र राज्यसंस्थापना करण्यास त्यास सहजच अवकाश सांपडला.

## ५ श्री नाग–नाग देव.

( १ ) **अधिकारैक्य.** श्री आणि देव हीं दोन्ही बहुमानार्थी पदें असून, ' देव ' हें सर्वसाधारण प्रसंगीं व ' श्री ' हें विशेष गौरवसूचित करण्याच्या प्रसंगीं–उदाहणार्थ राजमुद्रेंत–वापरावयाचें; हें खुद्द या ताम्रपटावरूनहि स्पष्ट दिसतें. त्यांत बहुतेकांच्या नांवापुढें सर्व साधारण ' देव ' असें आहे, पण भूपति, महीपति हे शब्द पुढें लाविल्यावर मागें ' श्री ' चा उपयोग केला आहे; उदाहरणार्थ, श्रीभैरवो भूपति, श्रीमन्मंगपहीपति; पण यासच नुसतें वीर म्हणतांना मात्र मायिंदेव म्हटलें आहे. ताम्रपटांतील नागदेव हा स्वतःच्या कुलास महीपति किंवा भूपति हें पद प्राप्त झाल्यानंतर जन्मलेला आहे, आणि श्रीभैरव भूपतीच्या लागोपाठ ( तस्यांत्यः ), म्हणजे भूपतिपद कायम असतांनाच, गादीवर आलेला आहे; यावरून त्याचें स्वतःचेंहि गौरवयुक्त नांव श्रीनाग ( भूपति ) असेंच होईल.

( २ ) **कालैक्य.** नागदेवानें ताम्रपट शके १३५८ म्हणजे सन १४३६ मध्यें दिलेला आहे, आणि शिक्क्यांतील नाग सामंताचा तोच काल येतो हें गेल्या प्रकरणांत दाखविलें आहे.

( ३ ) **उपास्यैक्य.** शिक्क्यांतील महेश्वर हा शब्द श्रीनागसामंताच्या पराक्रमी पूर्वजाच्या नांवें स्थापिलेल्या शिवलिंगाचा वाचक होय,

---

1 " Hammir was vanquished by but a boy–general of Singhana. "

असें जरी मानिलें तरी, त्या बाबतींताहि "शिवदीक्षापरो धीमान्शिव-ध्यानपरायण:" हें नागदेवाचें वर्णन बरोबर लागू पडतें.


## ६. कुडाळ प्रांतावरील राज्य.

ताम्रपटांतील कुळाचा मूळपुरुष 'देवशर्मा' हा जान्हवीतीर सोडून कोंकणांत हिंदळें येथें आला, व तेथेंच त्यास राज्यश्री प्राप्त झाली. ( व पुढें कुणकेश्वराच्या प्रसादानें त्यास पुत्र झाले ). कुणकेश्वराजवळील हिंदळें[1] हा गांव सध्यां रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत मोडत असून कुडाळ प्रांताचें मुख्य शहर जें कुडाळ त्याच्यापासून सुमारें ३५ मैलांवर आहे. पुढें मंग ऊर्फ मायिंदेव हा स्वतःच्या राज्याबरोबर त्रिभुवनमल्ल कदंबाच्या राज्याचेंहि पालन करूं लागला. कदंबांचें राज्य त्या काळीं बनवासी बारा हजार, धारवाड आणि बेळगांव जिल्ह्यांतील बराच मोठा भाग ( पलसी बारा हजार आणि वेणुग्राम ७० ) आणि ( जंजिरे ) गोवें इतक्या भागावर राहिलें होतें. त्रिभुवनानंतर कदंबांची ही शाखा जवळ जवळ खुंटल्यामुळें, एवढ्या मोठ्या 'राष्ट्राचें' पालन अगोदरपासूनच करीत आलेला मंगमहीपति हाच पुढें त्याचा खराखुरा अधिपति झाला असावा; निदान त्या राष्ट्राचा आपल्या पूर्वजांच्या राज्यास जोडून असलेला, म्हणजे समुद्रादिशेकडील, बराचसा भाग आपल्या स्वतंत्र बलाढ्य महीपतिपदास शोभेल असा, त्याच्या स्वाधीन खात्रीनें असला पाहिजे. हीच गोष्ट मंगमहीपतीचा वंशज श्रीभैरवभूपति याच्या वर्णनावरूनहि स्पष्ट होते. भैरवानें "समुद्रालंकृता धारा कृपाणधारया धृता" असें ताम्रपटांत म्हटलें आहे. या वर्णनांत, ताम्रपटलेखकास पदलालित्य साधूं देणारी समुद्रानें सुशोभित अशी 'धारा' म्हणजे अगदीं स्पष्टपणें कोंकणपट्टीच ठरते. त्यापुढील वंशज नागदेव हा तर

1 हिंदळें आणि कुणकेश्वर या दोन्ही स्थळांची विशेष माहिती पुढें टिप्पणींत दिली आहे.

चित्र अंक २६

सुधा... नं.



श्रीकुणकेश्वराचें देवालय.

J. A. F. W.

खुद्द गोव्यांतच ताम्रपट देतो; पण गोव्यापुरतेंच त्याचें राज्य होतें असें नव्हे. वर हिंदळें, दिगवळें वगैरे भागांतील भैरवाचें देऊळ, भैरवाची घांटी, भैरवाचा किल्ला या स्मारकांवरून ( हिंदळें टिप्पणी पहा ) तें पूर्वजांचें राज्यहि नागदेवाच्या ताब्यांत होतें असें स्पष्ट दिसतें. असो. गोवें कुडाळापासून दक्षिणेस सुमारें ३५ मैल आहे; यावरून उत्तरेस निदान देवगडपासून तों दक्षिणेस गोव्यांपर्यंत मधला ( निदान घांटा-पर्यंतचा ) सर्व टापू या ताम्रपटांतील घराण्याच्या राज्यांत ( ताम्रपटाच्या काळीं ) मोडत होता. हाच कुडाळ प्रांताचा अत्यंत महत्वाचा भाग होय. कुडाळ शहर या भागाच्या मध्यावर असून, सध्यां तें सावंतवाडी संस्थानांत मोडतें.

## ७. सत्तेचें प्रबलत्व.

शिक्क्यांतील घराण्याप्रमाणें ताम्रपटांतील घराण्याचीहि सत्ता प्रबल होती; १३ व्या शतकाच्या सुरवातीस मंग महीपतीनें स्थापना केल्यानंतर पुढें ती कमी झाली असें नव्हे. कारण १४ व्या शतकाच्या अखेरीस असलेल्या श्रीभैरवभूपतीनें दुसऱ्या कोणाची मदत न घेतां ( स्वबलमालंब्य ) शत्रूंचे हल्ले परतवून आपल्या राज्याचें रक्षण केलें. त्या वेळचे या ब्राह्मण राजघराण्याचे शत्रु कोण होते हें जरी नक्की सांगतां येत नसलें तरी ते बहुधा कोंकणावर नजर असलेले बहामनी सुलतान असावेत. कोणीहि असले तरी भैरवाची सत्ता प्रबल होती यांत शंका नाहीं. त्याच्या नंतरचा नागदेवहि स्वतःस सामर्थ्याचें दर्शक ‘ बली ’ हें विशेषण लावतो.

## ८. स्थानिकत्व.

मंगमहीपतीचा काल सन १२२० च्या सुमारास येतो हें वर दाखविलेंच आहे. **मंग** आणि **नागदेव** यांच्या कालांत या प्रमाणें जवळ जवळ दोन सवादोनशें वर्षांचें अंतर पडतें. या कालांत

फक्त एकच पुरुष ताम्रपटांत दिलेला आहे. तो श्री**भैरव**भूपति होय. अर्थात तो विशेष परक्रमी म्हणूनच दिलेला आहे. भैरवाच्या मागोमाग **काइन्देवा**चा मुलगा नागदेव गादीवर आला. यावरून भैरव हा मंगमहीपतीचा मुलगा होण्याइतका प्राचीन नाहीं हें उघड आहे. म्हणजे श्रीमन्मंगमहीपती ‘ पासून ’ भैरव झाला याचा अर्थ त्याच्या ‘ सरळ वंशांत ’ झाला असाच घेणें भाग आहे. या अर्थानें **उगीदेव** हा मायिंदेवाचा ऊर्फ मंगमहीपतीचा पिता असण्याऐवजीं पूर्वज असणें संभवनीय आहे. तसाच **जोगदेव** हाहि उगीचा पूर्वज असला पाहिजे. हा जोगदेव देवशर्म्याच्या ‘ वंशांत ’ झाला असें स्पष्ट म्हटलें आहे, व देवशर्म्याचे पुत्रपौत्र पराक्रमी झाले असें एक मोघम विधान केलें आहे. यावरून **देवशर्मा** आणि **जोगदेव** यांच्यांत किती पिढ्या गेल्या हें निश्चित सांगतां येणार नाहीं. पण ठोकळ मानानें दीडशें वर्षें धरल्यास, ताम्रपटांतील हें घराणें नागदेवाच्या पूर्वीं म्हणजे १४३८ च्या पूर्वीं निदान चारशें वर्षें कुडाळ प्रांतांत **स्थायिक** झाले होतें. ( याबद्दल पुढील प्रकरणांत आणखी विवेचन केलें आहे ).

## ९. सामंत उपनांव.

ताम्रपटांत या राजघराण्याचें उपनांव दिलेलें नाहीं. तरी त्याचें उपनांव ‘ सामंत ’ च असावें असें अनुमान करावयास पुढील गोष्टींची मदत होण्यासारखी आहे:–

( १ ) **सामंतपट्टण.** ‘ सरसिजभवनंदन ’ नांवाच्या एका विद्वान् जैन कवीनें जुन्या कानडी भाषेंत लिहिलेल्या एका इतिहासविषयक ग्रंथांत प्राचीन कुडाळ प्रांताच्या घाटाखालील भागास–सामंतपट्टण असें नांव दिलेलें आढळतें; तें बहुधा, वर दाखविलेल्या कालापासून राज्य करीत असलेल्या या ताम्रपटांतील घराण्याच्या नांवावरूनच असण्याचा बराच संभव आहे.

( २ ) वरील ताम्रपट गोव्यांत ज्या कांसार जातीच्या गृहस्थापाशीं आढळला त्याचें पूर्ण नांव रा. वैकुंठ बाबणी सावंत असें आहे. ताम्रपटांत 'सेटी' एवढ्याच नांवानें त्या घराण्याचा उल्लेख आहे. यावरून 'सावंत' हें नांव बहुधा नागदेवानें ताम्रपटानें सबंध गांव इनाम दिला म्हणून त्यांनीं कृतज्ञता दाखविण्याच्या बुद्धीनें धारण केलें असावें. अशा तऱ्हेनें आडनांवें स्वीकारण्याची वहिवाट जुनीच आहे. 'घोरपडे' हें मराठ्यांचें नांव ब्राम्हण सरदारांनीं घेतल्याची हकीकत इतिहास-प्रसिद्ध आहे, आणि 'आंग्रे' या नांवाची तीच कथा आहे.

याप्रमाणें नागदेवाच्या ताम्रपटांतील हें घराणें कुडाळदेशकर गौड ब्राम्हण ज्ञातीचें सामंत घराणें होय असें दाखविल्यावर, त्या ताम्रपटा-वरून आणि इतर पुराव्यावरून सुचलेली या घराण्याची विस्तृत माहिती पुढील प्रकरणांत दिली आहे.

---

१ "Samant is surname of some of the leading families of Kudaldeshker Gaud...(but not Kudal Desai). It seems that the Maratha 'Savant' is derived from 'Samant' as 'Parab' the surname of one of the Maratha Kuls is a corruption of 'Prabhu' a common surname among Kudaldeshker Gaud."

( Jour. Anthro. Society, Bombay, Vol. VIII )

# प्रकरण ११ वें.

## सामंत राजवंशाचा उपलब्ध इतिहास.

या आदिगौडदेशीय सामंत कुलाचा कुडाळ देशांतील मूळपुरुष देवशर्मा हा आपली जन्मभूमि, म्हणजे जान्हवीतीराच्या लगतचा प्रदेश, तुरुष्कांच्या[1] त्रासानें सोडून दुसऱ्या कांहीं समदुःखी ब्राम्हण[2] क्षत्रियांसम-[3]

१ तुरुष्क म्हणजे मुसलमान असें सामान्यतः मानण्यांत येतें. परंतु नागदेवाच्या ताम्रपटांतील उत्तर हिंदुस्थानांत स्वाऱ्या करणारे हे तुरुष्क ( मुसलमानी धर्माच्या मूलस्थानांतील ) अरब नसून तुर्की होते. कारण त्या स्वाऱ्या गिजनी येथील तुर्की सुलतान सबक्तगीन आणि त्याचा पराक्रमी पुत्र महमूद यांच्या होत.

२ देवशर्म्याबरोबर त्याच्या ज्ञातीचीं आणखी १३ गोत्रांचीं घराणीं ( सर्व मिळून १४ ) कोंकणांत आलीं. पुढें या १४ घराण्यांनीं कुडाळ प्रांतांतील निरनिराळ्या १४ गांवीं वसाहती केल्या. हे गांव त्या ज्ञातीचे ' मूळभुंकेचे ' ( मूळभूमिकेचे ) या विशिष्ट नांवानें प्रसिद्ध आहेत. याच १४ गांवच्या ' मतमानकऱ्यांना ' ज्ञातींत महत्व आहे; कोणत्याहि ज्ञातिविषयक महत्वाचा प्रश्न गुरुपीठाकडून त्यांच्याच सल्ल्यानें निकालांत काढण्याची वहिवाट जुनीच असून ती अल्पांशानें आजमितीसहि चालू आहे.

३. या ब्राह्मणांबरोबरच उत्तरेंतून तुर्कांच्या स्वाऱ्यांमुळें आलेले कांहीं क्षत्रिय कोंकणांत दिसतात. उदाहरणार्थ ( १ ) हिंदळें येथील राणे, यांच्याबद्दल पुढें टिप्पणींत विस्तृत माहिती दिली आहे; ( २ ) शृंगारपुर येथील जुने मराठे संस्थानिक; ( ३ ) विशाळगड येथील शिर्के: या सर्वांचा कुलदेव कुणकेश्वरच होय. या शृंगारपुरच्या राजांच्या सत्तेंत दाभोळपासून विजयदुर्गापर्यंतचा मुलुख एका काळीं

घेत दक्षिणेंत आला. तेथील राजानें त्याचा अत्यंत आदरपूर्वक पुनः पुनः सन्मान केला व ( त्याची पुत्रपौत्रादिक स्थिरस्थावर व्हावयाच्या अगोदर, यावरून ) लवकरच, त्यास लहानसा राज्याधिकार देऊन तेथेंच ठेऊन घेतलें. यावरून तो केवळ वेदाभ्यासी प्रतिग्रहाकांक्षी ब्राम्हण नसून, मूळ जान्हवीतीराच्या प्रदेशावर सत्ता चालविणारा पुरुष होता असें अनुमान होतें. अशा राजसत्ताधाऱ्याच्या राजधानीवरच परकीय शत्रूच्या स्वारीची धाड प्रथम पडत असते.

देवशर्म्यावरील हा तुर्कांचा उपप्लव, माइन्देवाच्या ( सन १२२० ) कालापूर्वी कित्येक पिढ्या घडून आल्याचें ताम्रपटावरून दिसून येतें. या कालांत उत्तरेंत घरदार सोडून देशोधडीस लावणारा उपप्लव म्हणजे एकट्या

---

होता; आणि शिर्के हा विशाळगडच्या आसपासच्या भागावर ( शिर्काणांत ? ) अधिकार चालविणारा शृंगारपुरकराचा हस्तक होता. सध्यां शृंगारपुर या नांवाचें एक खेडें संगमेश्वर तालुक्यांत आहे. बहामनी सेनापति मालिक-उत् तुंजार याच्या सकट त्याच्या सैन्याचा विशाळगडच्या निबिड अरण्यांत खुर्दा उडविणारा तो ह्याच शिर्के होय. शृंगारपुरकर आणि विशाळगडकर शिर्के यांच्या ताब्यांतील मुलुखाची दक्षिणेकडील सीमा कुडाळच्या राज्याला भिडलेली होती, असें क्यापटन डॉवेल यांनीं जुन्या रत्नागिरी तालुक्याच्या पहाणी-रिपोर्टांत नमूद केलें आहे:-"This Raja's Country was from दाभोळ, to विजयदुर्ग, i. e. अंजनवेल, रत्नागिरी and विजयदुर्ग down to Kudal-deshikara (?) now part of Savantwadi" शृंगारपुरकराला जुन्या काळीं जो अधिकार मिळाला तो कऱ्हाड आणि कोंकण येथील शिलाहार आणि गोव्यांचे कदंब यांच्या भालेराईच्या ( Ind. Ant. Vol. IX ) समाप्तीनंतर कदंबांकडून मिळाला असावा.

महमूद गिजनीकराचा होय. महमुदानें* सन १००१ ते १०२४ च्या दरम्यान कमींत कमी १६ स्वाऱ्या करून लहानमोठ्या हिंदू राजांस 'त्राहि भगवान्'

---

* महमुदाच्या या स्वाऱ्यांचा हेतु पैगंबरानें स्थापन केलेल्या धर्मावर विश्वास न ठेवणाऱ्या हिंदूंना तो धर्म स्वीकारावयास लावणें आणि तसें करतां न आल्यास त्यांची कत्तल करून त्यांच्या देवळांचा व मूर्तींचा विध्वंस करणें, ( स्त्रिया आणि अर्भकें यांनाहि ) गुलाम करून स्वदेशीं पाठविणें आणि या देशांतील अलोट संपत्ति लुटून स्वदेशीं नेणें, हीं महत्कृत्यें करणें, हा होता. महमुदाच्या स्वाऱ्यांबरोबर असलेल्या उथी ( Uthi ) नामक एका अरब लेखकानें ' तारीख-इ-यामिनी ' या ग्रंथांत महमुदाच्या स्वाऱ्यांची माहिती देतांना म्हटलें आहे कीं, सबक्तगिनास स्वाऱ्यांत यश प्राप्त झालेलें पाहून महत्वाकांक्षी महमुदाला हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यास हुरूप चढला; पण आपल्या हेतूला धर्माची आणि कायद्याची जोड देण्याकरितां स्वारी करण्यापूर्वीं मूर्तिपूजक हिंदूंच्या विरुद्ध धर्मयुद्ध करण्याचा आपला हेतु आहे असें त्यानें बगदादच्या खलीफास कळवून त्याची आज्ञा मिळविली होती.

"Having given this account of Sabuktagin's invasion of Hindustan the Arab Chronicle proceeds to describe the continuation of the holy wars against the idol-worshipping Hindus carried on by Sabuktagin's famous son, Mahumud of Ghazni, under the sanction of the Caliph of Baghdad" ( Sir Henry Elliot कृत History of Mahomedan India; आणि History of India, Vol. V by A. V. Williams Jackson, Ph. D., L. L. D. )

महमुदाच्या स्वाऱ्यांतील एक विशेष असा असे कीं, तो पहिल्याच तडाक्याबरोबर एकाद्या राजावर आणि त्याच्या राजधानीवर चाल करून जाई आणि त्या दोघांची धूळधाण करून मनमुराद लूट मिळवी, आणि असहाय स्थितींत पडलेल्या प्रजेला बाटवून मुसलमान करी. अशा युक्तीनें आपले दोन्ही हेतु हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांत साध्य करतां येतील अशी त्यानें खूणगांठ बांधिली होती.

१ Stanley Lane-Poole's Medieval India.

करून सोडिल्याचें इतिहासप्रसिद्ध आहे. गंगाकिनाऱ्याच्या लगतच्या भागांत, त्याचप्रमाणें बंगाल, ओढ्या या देशांत गुप्त राजांची सत्ता नष्ट झाल्यावर कित्येक ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य जातींचीं लहान लहान संस्थानें ठिकठिकाणीं उत्पन्न होऊन आपापसांत त्यांचे कलह चालू होते. ही त्यांची चुरस कांहीं काळ कनोजच्या साम्राज्यसत्तेमुळें थंड पडली, पण तीहि सत्ता नष्ट होतांच वरील कलहानें पुन: डोकें वर काढून, इतर सामान्य प्रजेला त्रासवून सोडिलें. यामुळें[1] प्रजेनें **धर्मपाल** राजास गौड देशाचा स्वामी केलें[2]. हा राजा विलक्षण धोरणी असल्यामुळें आपसांत झगडणाऱ्या वरील लहानसहान राजांना त्यानें आपल्या साम्राज्यांत सामील करून घेतलें; अर्थातच यापुढें ते पाल सम्राटाचे मांडलिक अथवा ‘ सामंत ’ बनले. या मांडलिकांतून ब्राम्हणांचीं संस्थानें विशेष उदयास आलीं. पाल राजांच्या अमदानींत त्यांचे प्रधानँहि

१ खालीमपूर ताम्रलेख. Epigraphia Indica, Vol. IV, P. 248.

२ पाल वंशांत हा राजा महाप्रतापी झाल्याचें भागलपूर ताम्रपटावरून ( Ind. Ant. Vol. XV, P. 105 and Vol, XX, p. 187 ) दिसून येतें. धर्मपालाच्या पूर्वीं तीन राजे सामान्य अधिकाराचे झाले होते. ( हे पालराजे मूलतः भुँइहार ब्राम्हण होते असें कित्येक पाश्चात्यांचें म्हणणें आहे, परंतु अजूनपर्यंत त्याला सबळ असें प्रमाण मिळालेलें नाहीं. )

३ “ The Pálas were shrewd enough to find that a purely Budhist regime was impossible in their days when Buddhism was declining and Brahminism was rising into power in every quarter, and so they tried to prop their empire by enlisting the power of the Brahmans on their side. ( Memoirs of Asiatic Society of Bengal, Vol. III, No. 1, pp. 8-9. )

त्यांपैकीं मुत्सद्दि, राजकार्यधुरंधर आणि विद्वान् म्हणून प्रसिद्धीस आलेल्यांचीं

ब्राह्मणच होते. किंबहुना पालांचें राज्य म्हणजे ब्राम्हणांचें राज्य, असेंच म्हणण्याची पाळी आली होती. स्वतः पालराजे जरी बौद्धमतानुयायी होते तरी, त्या मताचा ऱ्हास आणि ब्राम्हणी धर्माचा जिकडे तिकडे जोरानें फैलाव होत असतां, राज्यरक्षणासाठीं ब्राम्हणांचीच मदत त्यांना घेणें अपरिहार्य झालें. बौद्धमत आणि ब्राम्हणांचें शैवमत यांच्या झगड्यांत[1] दुसरें मत विजयी होऊन खुद्द बौद्धमतानुयायी पाल राजांनीं ( महीपालानें खुद्द काशी नगरींत ) अनेक शिवमंदिरेंहि बांधलीं[2]. पालांचें साम्राज्य[3] पूर्वेस बंगाल-आसाम, दक्षिणेस विंध्य पर्वत आणि पश्चिमेस थेट काबूल ( काम्बोज ) पर्यंत पसरलें असून तेथपर्यंत बौद्ध धर्म पोंचलेला होता, पण आतां त्या ठिकाणीं ब्राम्हणांच्या शैव मताची ध्वजा फडकूं लागली. खुद्द काबूलमध्यें एक शैवमतानुयायी ब्राम्हण सामंत घराणें नवव्या शतकाच्या अखेरीस उदयास आलें. यालाच **शाहीराजे** असें म्हणतात. त्या राजांच्या नाण्यांवर '**सामंतदेव**' असें नांव आढळतें. या ब्राम्हणी राज्याचा शेवट गिझनीकर महमुदानें केल्यावर तो भाग मुसलमानी सत्तेंत सामील झाला. या ब्राम्हण सामंत

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

नांवें. ( १ ) धर्मपालाचा प्रधान गर्ग; (२) या गर्गाचा पुत्र दर्भपाणी, हा देवपालाच्या वेळीं पराक्रमी मानला जाई; ( ३ ) विग्रह पालाचा ( विग्रपाल ) प्रधान, दर्भपाणीचा नातु, म्हणजे सोमेश्वराचा मुलगा, केदारपाणी; यानें तर लढाईत आपल्या पराक्रमानें उत्कल, हूण, द्रविड आणि गुर्जर राजांचा गर्व हरण केल्याची माहिती मिळते. ( Epig. Indica, Vol. II. )

१ हा झगडा सारखा दीडशें वर्षें चालून बौद्ध मताचा पाडाव केल्यावर ब्राम्हणी धर्म विजयी झाला.

२ भारतके प्राचीन राजवंश। ( विश्वेश्वरनाथ रेऊ कृत )

३ Ind. Ant. Vol. XV, P. ३०५

राजांची बरीच माहिती अलबेरुनी, राजतरंगिणी ह्या ग्रंथांत दिली आहे. याच प्रकारचें सामंत घराणें जान्हवीतीरावरील देवशर्म्यांचें होय. इतरांबरोबर याचाहि उदय होत चालला होता, इतक्यांत सुप्रसिद्ध महमूद गिजनीकराची स्वारी त्या प्रांतावर झाली.

महमूद म्हणजे प्रत्यक्ष यमदूत, त्याच्यापुढें कोणाचेंच कांहीं चालणार नाहीं, अशी विलक्षण कल्पना त्या काळच्या बहुतेक राजांनीं करून घेतली. म्हणून सर्व लहानथोर राजांचा एक संघ[1] बनवून या परकीय शत्रूस एकजुटीनें तोंड देण्याऐवजीं जो तो आपापले प्राण वांचविण्याच्या खटपटीस लागला. ( एकेकट्या अशा कित्येकांनीं त्यास तोंड दिलें ते कायमचे धुळीस मिळाले ). कोणी महमुदाची स्वारी येण्याचा संभव आहे, एवढ्यावरच राज्य सोडून अरण्यांत दडून राहिले; कोणी महमुदाचा मोर्चा आपल्या बाजूस निश्चितपणें फिरला आहे, असें ऐकून लगबगां पळत सुटले, ज्या कोणास इतकाहि अवकाश मिळाला नाहीं, ते शेवटीं महमुदाच्या तरवारीस बळी पडले ! इ. स. १०१७च्या सुमारास महमुदानें गंगाकिनाऱ्यानें सरकत कनौज, काल्पी, कलिंजर या भागावर स्वाऱ्या केल्या. इतर स्वाऱ्यांपेक्षां या १०१७ सालची हिंदुस्थानावरची स्वारी इतिहासांत फार महत्वाची मानिली जाते. या वेळीं तो जैयत तयारी करूनच गंगाकिनाऱ्याच्या स्वारीस आला होता. कनौजचा राजा महमुदाच्या येण्याची नुसती वार्ता ऐकतांच मुलांमाणसांसहित अरण्यांत पळाला. दुर्भेद्य

---

१ या वेळीं गांधार देशांत ब्राह्मण राजे, दिल्लींत तुंवरवंशी राजे, कनौजला प्रतिहारी राजे, गौड ( बंगाल ) चे पालराजे, माळव्यांतील गुप्त राजे, नर्मदेकडील महोबाचे चंदेलराजे, यांशिवाय किरकोळ लहान संस्थानिक होते. इतके एकजुटीनें मनांत आणते तर महमुदाला केव्हांच काबूलपार करून टाकूं शकते !

मानिलेला कनौजचा किल्ला महमुदानें एका दिवसांत काबीज केला,[१] हिंदूंचीं दहा हजार देवळें जमिनदोस्त करून मनमुराद लूट मिळविली आणि हिंदूंची यथेच्छ कत्तल केली ! या वावटळींत देवशर्म्यांचें घराणें सांपडलें हें सांगावयास नकोच. तें अमुक गांवाहून आलें अशी निश्चित माहिती नागदेवाच्या ताम्रपटांत नाहीं, पण तें '**मुंज**' नामक गंगा किनाऱ्यावरील एका ठिकाणाहून आलें असावें असें पुढील माहितीवरून अनुमान करण्यास जागा आहे.

"नंतर तो ( महमूद ) 'ब्राम्हणांचा किल्ला' म्हणून प्रसिद्ध असलेल्या मुंज[२] नामक गांवीं गेला. तेथील रहिवासी उंटांप्रमाणें स्वतंत्र

---

१ सर हेनरी ईलिअट कृत History of Mohamedan India. देवळांच्या संख्येची अतिशयोक्ति वाटत असल्यास, त्या काळीं उत्तरहिंदुस्थानदेश देवळांनीं कसा फुलून गेला होता याबद्दल रा. ब. चिंतामणराव वैद्यांनीं मध्ययुगीन भारतांत दिलेली माहिती पहावी. याच स्वारींत मथुरेंतील श्रीकृष्णाचीं कित्येक मंदिरें जमीनदोस्त करून महमुदानें अनेक मूर्ति वितळवून स्वदेशीं नेल्या.

२ "He then went to Munj, known as the fort of Brahmans, the inhabitants of which were independent as headstrong camels. They prepared to offer opposition like evil demons and obstinate Satans, and when they found they could not withstand the Mussulmans and that their blood would be shed, they took to flight, throwing themselves down from the apertures and the broad and lofty battlements, but most of them were killed in this attempt." ( History of India edited by A. V. Williams Jackson, Ph. D., L. L D., Vol. V. Page 70).

मराठी ... 2C92
द्रा. क्र.



वृत्तीचे होते. त्यांनीं दुष्ट राक्षसांप्रमाणें, आणि हट्टी सैतानांप्रमाणें तोंड देण्याची तयारी केली, आणि जेव्हां त्यांनां कळून आलें कीं आपला मुसलमानांपुढें टिकाव न लागतां आपली कत्तल होईल, तेव्हां तटावरून आणि खिंडारांतून खालीं उड्या मारून त्यांनीं पळ काढला, पण या प्रयत्नांत बहुतेक जण मारले गेले." ( यांतील उंट, सैतान, राक्षस यांच्या उपमा लेखक मुसलमान असल्यामुळें साहजिक होत. )

सदरील मुंज येथील किल्ल्याच्या उंचवट्याच्या मोठ्या भागाचे अवशेष आज मितीसहि दृष्टीस पडतात. त्या जागीं नक्षीचें बांधकाम केलेली अशी एक चौकोनी विहिर अद्यापि पहावयास मिळते.

याप्रमाणें देवशर्म्याच्या उत्तरेंतील मूलस्थानाचा अंदाज लावून, तें त्यानें कोणत्या तुरुष्कोपप्लवानें सोडिलें असावें याचेंहि अनुमान बांधिलें. आतां त्याचा कोंकणांतील इतिहास पाहूं.

देवशर्मा कोंकणांत आला त्या सुमारास चट्ट किंवा ( पहिला ) शास्तादेव कदंब हा कल्याणीच्या ( दुसऱ्या ) जयसिंह चालुक्याचा महामंडलेश्वर अर्थात् मांडलिक म्हणून त्या भागावर राज्य करीत होता; त्यानेंच देवशर्म्याचा हिंदळें गांवीं सत्कार करून त्यास पुढें राज्यश्री दिली असावी. कदंबांनीं अशा रीतीनें दिलेला हा आश्रय पुढें त्यांच्यावर मायिदेवानें निःस्वार्थबुद्धीनें केलेल्या महदुपकारांवरूनहि अनुमित होतो. कारण गेलेलें राज्य मिळवून देऊन पुनः तें रक्षणेंहि करणें, हे सामान्य स्नेहाचें कार्य नसून त्याच्या मुळाशीं अखंड कृतज्ञताबुद्धीसारखेंच बलवत्तर कारण असावें लागतें. असो—

---

१ माइन्देवाच्या हाताखालीं हेम्मेयनायक नांवाचा सुंकाधिकारी ( सुंक=एक जातीचा कर ) होता; त्याच्याकडे बनवासी प्रांताची देखरेख माइन्देवानें सोंपविली होती. ( Bom. Gaz., Vol I, P. II Page 523 ).

शास्तादेवाच्या मागून (पहिला) जयकेशी 'कोंकणचा राजा' झाला, पण चालुक्यांचा मांडलिक असल्यामुळें तो तशी पदवी मात्र धारण करीत नसे. कदंबवंशांत तो एक महापराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें कोंकणच्या उत्तरेकडील भागांत राज्य करणाऱ्या शिलाहारांस व चोल राजांस जिंकून सम्राट् चालुक्यांची त्या भागावरील सत्ता दृढ केली. शिलाहारांनीं देवब्राम्हणांचा फार छळ केला होता. त्यावरून जयकेशीचें आणि त्यांचें युद्ध होऊन त्यांस कोंकणच्या या भागांतून त्यानें हुसकून लाविलें. या वेळच्या शिलाहारांच्या कत्तलीचीं स्मृतिचिन्हें राजापूर तालुक्यांत अद्यापि दिसतात. शिलाहारांचा कोंकणचा बराचसा भाग आपल्या राज्यास जोडिल्यानंतर जयकेशीनें गोवें[२] हें, (मूळची जयन्तिपूर किंवा वनवासी ही एक राजधानी असूनहि) आणखी एक राजधानीचें ठिकाण केलें; तें मध्यावर असल्यामुळें सोयीचें म्हणून बहुधा असावें. असो. हा जयकेशी शिवोपासक[३] होता; त्याचा सम्राट् जयसिंह ऊर्फ जगदेकमल्ल चालुक्य यानेंहि जैनमताचा त्याग करून शैवमताचा पुरस्कार केलेला होता; त्यामुळें कोंकणांत शैवमताचा प्रसार जारीनें सुरू होऊन त्याचबरोबर, गंगाकिनारीं असतांनांच शैवमतानुयायी असलेल्या देवशर्म्याच्या अधिकारवृद्धीसहि बराच अवसर मिळाला असला पाहिजे. असो. शिवोपासक देवशर्मा कुणकेश्वराचा भक्त होऊन, पुढें त्याच्या प्रसा-

---

१ गुडीकटी येथील लेख ( Journal Bom. Br. R. A. Soc., Vol. IX, p. 272.)

२ Journal Bom. Br. R. A. Soc., Vol. IX. p. 283.

३ कदंबांच्या दोन शाखांचा इतिहासांत तपास लागतो. ते मूळचे ब्राह्मण असून शिवोपासक होते, कालेंकरून ते क्षत्रिय झाले, आणि शैवमताचा त्याग करून जैनमतानुयायी बनले. पण ११ व्या शतकांत ते पुनः शैवमतानुयायी झाले.

दानें त्यास पुत्र झाले. यावरून तो कोंकणांत तरुणपणीं, तीस पस्तीसच्या सुमारास, आला असावासें दिसतें. त्याच्या येण्याचा काल अजमासें सन १०२० असा आह्मीं वर दाखविला आहे. त्यावरून त्याकालच्या दीर्घ हयातीस अनुसरून देवशर्मा १०६० पर्यंत, म्हणजे अजमासें वयाच्या ७० व्या वर्षापर्यंत हयात असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

देवशर्म्याचा वंशविस्तार होऊन त्याचे पुत्र पौत्र एकाहून एक पराक्रमी निपजले. १२ व्या शतकांत कुडाळ येथील ज्या पाळेगारांनीं सर्व कोंकणांत दूरवर स्वाऱ्या केल्या असें जर्विस या इतिहासलेखकानें लिहून ठेविलें आहे, ते 'पाळेगार' (?) या नांवानें संबोधिलेले सत्ताधारी हेच असावे असें

---

१ "The whole Konkan was anciently subject to the Deoghar ( देवगिरि ) princes; in the 12th century the districts south of the Savitree river were overrun by Poligars or chiefs, acknowledging some sort of submission to the Anagoondee princes of Kurnata."

हे पाळेगार चाकण, जुन्नर, रायरी, पन्हाळा, कुडाळ आणि सौंदें येथील होत असें जर्विसचें मत आहे.

"According to Jervis ( Konkan 81 ) in the twelfth century the Desai of Sawantwadi, (वास्तविक कुडाळ. ग्रंथकर्ता.) the most northern of the Poligar chiefs, overran the whole of the Konkan."

(*Bombay Gaz. Ratnagiri and Sawantwadi*, P. 439).

२ जर्विसनें पाळेगार या शब्दाची अशी माहिती नमूद केली आहे:—

"The word Poligar appears to have been anciently used for a free booter; and phond poligar, one who lived on black-mail. As the weakness of the empire increased, and the terror inspired by the

त्यांपैकीं ताम्रपटांत वर्णिलेल्या **जोगदेव** आणि **उगीदेव** या पुरुषांच्या वैभवावरून आणि पराक्रमावरून म्हणतां येतें. अशा तऱ्हेनें शौर्यवीर्यादि गुणांचा विकास या घराण्यांत होत असतां एक अत्यंत पराक्रमी असा पुरुष त्यांत निपजला, तो **माइन्देव** हा होय. लहान वयांतच ' वीर ' माइन्देव सिंघणाच्या साम्राज्याचा मांडलिक मानला जाऊं लागला. त्या वेळच्या वहिवाटीप्रमाणें मांडलिक हे आपापल्या भागापुरते स्वतंत्र असत, पण साम्राज्य रक्षणासाठीं त्यांस स्वाऱ्यांवर जावें लागे. वीर माइन्देवाचीं ताम्रपटांत दिलेलीं वर्णनें अशाच स्वाऱ्यांचीं[१] होत. पुढें माइन्देव हा कदंबांचें राज्य

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

insurgent feudatories and marauding chiefs extended over the South of India, it came to be applied to all who had set up for themselves, whether from choice or absolute necessity." (Jervice Konkan 81).

मोलस्वर्थच्या कोशांत पाळेगारचा अर्थ असा दिला आहेः—

"A revolted Ryot Setting himself up as a chieftain lying in woods and fastness, and employing himself in levying contributions and marauding."

१ माइन्देवाच्या या स्वाऱ्या, कै. गोविंदराव काशिनाथ चांदोरकर यांनीं ब्राह्मणांच्या क्षत्रियवृत्तीबद्दल काहीं महत्त्वाचे विचार ( भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, तृतीय-संमेलन-वृत्त, पृ. २४ वर ) प्रगट केले आहेत, त्यांत प्रामुख्यानें उदाहरणादाखल घेतल्या आहेत. ते ह्मणतातः—"अठरावे शतकाचे आरंभीं राज्यसूत्रें व तलवार हातांत खेळविणें ही जी ब्राह्मणांस सहज लीला झाली होती त्या लीलेचें बीं ५।६ शतकें लांबवर रुजलें गेलेलें होतें. पूर्वपरंपरा नसतां ब्राह्मण क्षात्रवृत्ति कसे बनले असें वाटण्याचें कारण नाहीं. चालुक्यांच्या मोडूं पहाणाऱ्या राजशकटास आपल्या बाहुबलाचा आश्रय देऊन किंचित् काल कां होईना त्यास स्थिरत्व आणणारा बम्म अथवा **ब्रह्म** हा ब्राह्मण. सिंघणाचा विजयध्वज हातीं घेऊन सर्व महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरही हुतुतु घालणारा **खोलेश्वर** व त्याचा शौर्यांत तत्तुल्य पुत्र **राम** हेहि ब्राह्मणच. श्रीजनलाच्या कुलांत उत्पन्न झालेला

त्यांस मिळवून देऊन तें त्रिभुवनाच्या निर्बलतेमुळें स्वतःच चालवूं लागल्यावर, त्याची सत्ता व दर्जा हीं बरींच वाढत चाललीं आणि पुढें कदंबांचा वंश अगदीं क्षीण झाल्यामुळें त्यांचें राज्य साहजिकपणें मायींदेवाच्याच हातांत राहून तो यापुढें स्वतंत्र महीपति झाला. अशा तऱ्हेनें आपल्या कुलास स्वतंत्र राजपद मिळवून देऊन यशोभानुः झालेला हा मंग ( मागें दाखविलेल्या कालावरून ) सुमारें १२५० त दिवंगत झाला असावा. त्याच्या मागून तें घराणें तसेंच स्वतंत्र आणि बलाढ्य राहिलें, असें १४ व्या शतकाच्या अखेरीस त्या घराण्यांत झालेल्या श्रीभैरव भूपतीच्या पराक्रमावरून दिसतें. ह्या भैरवाच्या नांवानें हिंदळें येथें देऊळ आणि घांटी, तसेंच दिगवळ्याच्या बाजूस सह्याद्रीवर **भैरवगड** अशीं बांधलीं आहेत. असें दिसतें कीं, भैरवाच्या वेळीं या घराण्याच्या दोन शाखा होऊन

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

**अच्युत** व यादव रामचंद्रानें कोंकणावर अम्मल चालविण्यास नेमलेला **श्रीकृष्णदेव** हेहि ब्राह्मणच. **फार काय परंतु आपल्या पराक्रमानें कदम्बांसारख्या मराठ्यांस व इतर दाक्षिणात्य वीरांस खडे चारून सौराष्ट्र, लाट, द्रविड, तेलंग, गंड, यदु व हम्मीर यांस त्रस्त करून गोव्यांकडे (?) इंदुलींत राहणाऱ्या देवशर्म्याचें कुल ब्राह्मणाचेंच.** गोवें काबीज करणारा हरिहराचा दिवाण **माधव** हा ब्राह्मण आणि त्यानंतर अंमल चालविणारा **नरहरी** हाहि पण ब्राह्मणच. तसेंच श्रीबप्पदेवाचा कदाचित्, परंतु काण्वचालुक्याचा निश्चयानें महामात्य **केशवमहाजनी** हा ब्राह्मण. अपरादित्याचा महामात्य **भोण** हाहि ब्राह्मण (?). श्रीरामचंद्र यादवाचे वेळीं एक **देवपंडित** नांवाचा ब्राह्मणच महामात्य होता. **हेमाद्रि**संबंधी तर त्याचा निर्देश न करितां त्याचें स्मरण होतें. ”

वरील देवशर्म्याच्या वर्णनांत चांदोरकरांच्या दोन तीन चुका नकळत राहिलेल्या दिसतात. इंदुली म्हणजे हिंदळें, गोव्यांकडे नसून देवगड तालुक्यांत आहे ; देवशर्मा हा कुळाचा मूळपुरुष खरा, पण त्याच्या मायिंदेवाच्या होत; तसेंच, कदंबांस मायिंदेवानें खडे चारलेले नसून, त्यांच्याशीं त्याचा स्नेह ( अनुराग ) होता.


त्यांतील एका शाखेनें गोव्यांत राजधानी केली. ( पुढें दिलेली ग्याझेटिअरच्या माहितीवरील टीप पहा. ) भैरवाच्या लागोपाठ गोवें राजधानींत नागदेवाच्या हातीं राज्यसूत्रें आलीं; नागदेवाचा बाप काइदेव गादीवर बसल्याचें दिसत नाहीं. नागदेव बराच पराक्रमी ( बली ) होता. याचा उपलब्ध झालेला ताम्रपट आणि शिक्का आम्हीं मागें दिलेलेच आहेत. याचा काल ताम्रपटावरून पंधराव्या शतकाचा मध्य हा येतो. नागदेवानंतरच्या राजांची माहिती अद्याप उपलब्ध नाहीं. पण लवकरच बहामनी मुसलमानांची सत्ता त्या प्रांतावर सुरू झाल्यामुळें, या सामंत घराण्याची स्वतंत्र सत्ता नष्ट झाली हें उघड आहे.

याप्रमाणें, हें सामंतकुल दक्षिणेंत ११ व्या शतकाच्या सुरवातीस आलें; पुढें दोन शतकें त्यानें साधारण प्रतीच्या राजवैभवाचा उपभोग घेतला; त्यानंतर म्हणजे १३ व्या शतकाच्या सुरवातीस मंग सामंतानें खऱ्या स्वतंत्र बलाढ्य राजसत्तेची स्थापना केली; ती पुढें १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत—म्हणजे बहामनी शहांची सत्ता होईपर्यंत—त्यांच्या कुलांत चालली. या चार सवाचारशें वर्षांच्या काळांत या सामंत घराण्याचा विस्तार किती झाला, हें ताम्रपटांत सांगणें आवश्यक, तसेंच शक्यहि, नाहीं. नागदेवानें फक्त ठळक पुरुषांचीं नांवें सांगितलीं आहेत. ( १ ) कुलाचा दक्षिणेंत येणारा मूळपुरुष ( देवशर्मा ), ( २ ) स्वतंत्र राजसत्तेचा संस्थापक ( मंग सामंत ), ( ३,४ ) तत्पूर्वींच्या सामान्य सत्तेंतील दोन पराक्रमी पुरुष ( जोगदेव आणि उगीदेव ), ( ५ ) आपण ज्याच्या मागून गादीवर बसला तो पुरुष ( भैरवदेव ), ( ६ ) स्वतःचा पिता ( कोंइनदेव )[1]—तोहि पुत्रधर्म म्हणून, पराक्रम

---


१ ताम्रपटांतील ‘ कांइदेव ’ हें नांव आमच्याकडील कित्येक जुन्या कागदांत कांयदेउ, काइदेऊ, काईनदेव असें लिहिलेलें आढळतें. कान, काने कान्हो, कोनेर हीं यांचींच संक्षिप्त रूपें असलीं पाहिजेत.

चित्र अंक २७



श्रीस्वयंभूचें देवालय (दिगवळें)

चित्र अंक २८



देवळासमोरील दीपमाळ

J. A. P. W.

वर्णन करण्याच्या इच्छेनें नव्हे ! तसेंच, देवगडपासून गोव्यांपर्यंत, आणि समुद्रकांठापासून घांटांपलीकडे बेळगांवपर्यंत, विस्तारलेल्या या राज्याच्या निरनिराळ्या भागांवर, सामान्य वहिवाटीप्रमाणें राजकुलांतील कोणकोणते पुरुष कोणकोणत्या काळीं नेमिले होते, हें सांगण्याचेंहि नागदेवास कांहीं प्रयोजन नव्हतें. हें सर्व पुढें मागें काल आपल्या तोंडांतून बाहेर काढील तेव्हां कळेलच. सध्यां त्यांपैकीं एका पुरुषाचें नांव उपलब्ध झालें आहे, तें देम भूपाल याचें होय. हा राजा **कुडुवलपत्तनांत** ( कुडाळशहरीं ) आपल्या कुलाचें 'अनवरत' ( सतत ) चालत आलेलें राज्य सन १२६३ सालीं करीत होता, असें त्या सालीं त्यानें कुडाळ शहरापासून ३०।३५ मैल पूर्वेस घाटाच्या पायथ्याशीं असलेलें 'दिघवलें' ( दिगवळें ) गांव त्या गांवच्या 'श्रीष्वयंभ'

१ या देवळाची बांधणी कुडाळ प्रांतांतील इतर प्राचीन देवळांच्या पद्धतीची आहे. आंतील गाभारा, देवळाच्या बाहेरच्या भागापेक्षां जुन्या बांधणीचा आहे. त्यावरून सध्याचें हें देऊळ ( छायाचित्र २७ ) मागाहून कोणीतरी दुरुस्त केलेलें दिसतें. देवळासमोर एकच गोल दीपमाळ आहे. ( छायाचित्र २८ पहा ) तिचा चबुतरा १०×१० फूट व व्यास ५ फूट असून वर निमुळती होत गेलेली आणि बरीच उंच आहे. तिच्या चबुतऱ्यावर देवळाकडे तोंड केलेला नंदी आहे तो छायाचित्रांत दिसतो. ही दीपमाळ इतर देवळांपासून जितक्या अंतरावर दीपमाळा असतात त्यापेक्षां कांहींशी लांब आहे, त्यावरून देऊळ आणि ती यांच्या मधल्या जागेंत बराच प्रशस्त असा सभामंडप होता असें वाटतें. आजमितीस मात्र तो नाहीं. देऊळ आणि दीपमाळ यांच्या सभोंवार पक्का दगडी तट आहे. या तटाच्या आंत एक चौफळ दगडी खांब असून, त्याच्या चारहि भागांवर इतर जुन्या ( चित्रांक ३ व ३३ ) पाषाणांप्रमाणें लढाईचीं व राजाराणींचीं चित्रें कोरलेलीं असून वरच्या भागावर प्रत्येक बाजूस एक असे एकंदर चार कलश आहेत. देवळाच्या आसपास चार पांच नंदी व वर कलश असलेल्या दोनतीन कोरींव मूर्तींच्या शिला आहेत.

( श्रीस्वयंभू ) महादेवास दान दिल्याच्या ताम्रपटांत म्हटलें आहे. हा ताम्रपट पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

तटाच्या आवाराबाहेर प्रेक्षणीय अशी एक प्राचीन विहीर असून तिची बांधणी व तळ इतका संगीन आहे कीं, वरून खडा खालीं तळांत टाकल्यास त्याचा खण-खणीत आवाज वर स्पष्ट ऐकूं येतो. देऊळ ( गाभारा ), दीपमाळ, विहीर आणि कोरींव पाषाण हीं सर्व देम राजानें दिलेल्या ताम्रपटाच्या समकालीन दिसतात.

दिगवळ्याच्या या स्वयंभू देवाला घालण्यासाठीं एका कुळकर्ण्यानें पितळेचा एक पंचमुखी शेषाचा टोप अर्पण केला तो आज कित्येक वर्षें गाभाऱ्याच्या बाहेर ठेव-लेला आहे; त्यावर तीन ओळींचा पुढील लेख आहे:—

॥ श्री देव शंभु ॥ दिगवळ ॥ वजन पका नाग सुधा ८८२३

॥ **शके १६१८** धाता नाम संवत्छरे मार्गसिर्ष बहुळ प्रतिपदा ॥

॥ **अंताजी नागेश** वतनदार मौजे दिगवळें प्रा शाळसि ॥

इतक्या वजनाचा हा शेषछाई टोप, वर लेख लिहून देवाला वाहिलेला असतां तो बहिष्कृत केल्यासारखा बाहेर धूळ खात कां पडलेला आहे समजत नाहीं! त्याला आज २२८ वर्षें झालीं; ह्मणजे बरोबर ज्या सालीं सामंतांच्या मागून आलेल्या त्यांच्याच वंशांतील प्रभु घराण्याची सत्ता सध्यांच्या मराठे सावंतांनीं बळकाविली त्या सालीं हा टोप बनविलेला आहे. अंताजी नागेशाचे गोत्रज अगर वंशज दिग-वळ्याच्या आसपास असून त्यांचें उपनाव गुळगुळे असें असल्याचें समजतें. प्रभु घराण्याकडे चिटणीस असलेल्या शेणवी घराण्याचेंहि नांव गुळगुळे असेंच होतें! वरील राज्यक्रांतीचा या टोपाशीं कांहीं संबंध नसेल ना? कदाचित् ही नवस-फेडही असेल!

## ताम्रपट *

ओळी [ पत्रा पहिला ]

( १ ) विगलित ○ मद्दल निव
( २ ) हं भ्रमर कुलानिक सेवित क
( ३ ) पोलं अभिमत फलदातारं
( ४ ) कामेसं गणपति वंदें ॥ चतुर्मु
( ५ ) ष मुषांभोज वनहंस वधुर्मन
( ६ ) मानसे रमता नित्यं सर्व सुक्ला
( ७ ) सरस्वती ॥ नमस्तुंग सिरश्चुंबि
( ८ ) चंद्र चामर चारवे त्रैलोक्य न
( ९ ) गरारंभः मुलस्तंभाय संभवे
( १० ) प्रजानां सीतल श्चंद्र साधु
( ११ ) नां प्रतिपालक देव द्विज गु

---

* ह्या ताम्रपटाच्या अस्तित्वाचा उल्लेख आम्हांस प्रथम मालवणचे (कै.) रा. रा. अनंत सीताराम देसाई, बी. ए. एल्‌एल्‌ बी.-यांनीं लिहिलेल्या कुडाळप्रांताच्या इतिहासाच्या हस्तलेखांत सन १९१३ सालीं आढळला. तपास करितां, दिगवळ्या नजीक हरकूळगांवचे (कै. ) रा. रा. गोपाळ धोंडदेव नाईक यांजकडून समजलें कीं सुमारें ३० वर्षांपूर्वी ते, आपल्या घराण्यांत १०० वर्षांपूर्वी लिहून ठेविलेलें एक टिपण इतिहासविषयाच्या आवडीमुळें वाचीत असतां, त्यांत या ताम्रपटाचा उल्लेख आणि तत्संबंधीं कांहीं माहिती आढळल्यावरून त्यांनीं दिगवळ्याच्या देवळांत जाऊन तो प्रत्यक्ष पाहिला होता. पुढें १९१४ सालीं एका स्नेह्याकरवीं त्याची एक शिसेलोळीनें घेतलेली नकल आम्हीं मागविली. पण ती फारशी स्पष्ट नसल्यामुळें कांहीं शब्दच तेवढे आम्हांस लावतां आले. ही नकल पुढें १९१६ सालीं पुण्याच्या भा. इ. सं. मंडळाकडे आम्हीं पाठविली; पण ती मंडळाच्या नव्या इमारतींत जुने कागद नेत असतां गहाळ झाली. म्हणून १९२२ सालीं या ताम्रपटाच्या सध्यांच्या माल-

( १२ ) रुभक्तः देमनृपोस्तिरंजि
( १३ ) वि ॥ स्वस्ति समधिगत पं

[ पत्रा दुसरा, पोट ]

( १४ ) चमहास ○ बुंद[1] ह्मराजा
( १५ ) धिराज गडीयकसिंह नृभय
( १६ ) मल सत्यरत्नाकर सरणा
( १७ ) गतवज्रपंजर परनारी
( १८ ) सहोधर सौचगांगेय भु
( १९ ) जबलभीव षांडेराय श्री

---

( मागील पृष्ठावरील टीप सामाप्त. )

कासच तो स्वतः घेऊन यावयास आम्हीं सांगितलें. त्यांस फार वेळ राहतां न आल्यामुळें, आम्हांस फोटो घेतां आला नाहीं, फक्त एक शिसेलोळीची नकल व लांबीरुंदीचें माप हीं घेऊन कांहीं अक्षरें बारकाईनें पाहतां आलीं. नंतर चालू सालीं आम्हीं त्या गृहस्थाकडे आमचा मनुष्य व एक फोटोग्राफर पाठवून अक्षरांत सफेत रंग भरून फोटो घेतला. त्यावरून आतां सगळा ताम्रपट लावतां येतो. ताम्रपटाची लांबी ७ इंच आणि रुंदी ५ इंच आहे. त्याचे तीन पत्रे असून ते तांब्याच्या मजबूत कडींत अडकविले आहेत. कडीचीं टोकें मिळवून त्यावर अतिशय गुळगुळीत अशी कांशासारख्या धातूची नंदीची मूर्ती बसविल्यामुळें पत्रे कडींतून बाहेर काढतां येत नाहींत. हा ताम्रपट १०।१५ वर्षांपूर्वीपर्यंत स्वयंभूच्या देवळांतच होता; पण गांवकऱ्यांच्या भांडणामुळें तो आतां वरील (गावडे या नांवाच्या मराठे ) गृहस्थाकडे आहे. हे गृहस्थ त्या गांवचे गांवकर असून त्यांचें घराणें त्या गांवांत बरेंच प्राचीन असल्याची त्यांची समजूत आहे. त्यांची व तिकडील लोकांची परंपरागत समजूत, हा ताम्रपट कुडाळच्या ' चंद्रभान सूर्यभान ' नामक गौडब्राह्मण ज्ञातीच्या राजानें दिला अशी आहे. या समजुतींत राजाच्या नांवांत चूक असली तरी घराणें देम सामताचेंच होय.

१. १४ व्या ओळींतील ' सबुद ' आणि ३६ वींतील ' तावतु ' यांतील ' उ ' कार कोरक्याच्या चुकीमुळें तसे दिसत असून त्या वास्तविक व्यंजनदर्शक रेघा आहेत. छायाचित्रांत ( अंक ३०।३१ ) ' उ ' दिसतो म्हणून आम्हींहि तसाच छापिला आहे एवढेंच.

( २० ) मल्लिनाथदेवपादपंकज
( २१ ) भ्रमरः । श्रीहेमभूपाल विजय
( २२ ) राज्योदै कुडुवलपत्तने सु
( २३ ) षसंकथाविनोदेन अन
( २४ ) वरत राज्यं कुर्वाणः स
( २५ ) षवर्ष ११८५ रुदिरोद्गा

[ पत्रा दुसरा, पाठ ]

( २६ ) री संवस ○ रे स्रावण
( २७ ) सुध १ सनौ चंद्र षंपाते
( २८ ) थ्या प्रतिबद्ध दिघवले ग्रा
( २९ ) म तृण जल काष्ट पाषाण
( ३० ) सहितोपि चतुःसीमा प
( ३१ ) र्यंत श्रीष्वयंभदेवस्य गंध
( ३२ ) पुस्प धूप अंषंडज्याति नै
( ३३ ) वेद्य सोडसोपचार नि
( ३४ ) मित्त सर्व बाधा परिहर
( ३५ ) सर्व नमस्यकृत आचंद्रा
( ३६ ) क* साक्संबर* तावतु साग्रा

[ पत्रा तिसरा ]

( ३७ ) मद्दानं दी ○ यतां ॥ दा
( ३८ ) नाद्दा पालनाद्दापि । द्दा
( ३९ ) नं स्रेयोनु पालनं । दा

---

* ३६ व्या ओळींतील ' क ' व ' क्स ' हीं अक्षरें अगदीं अस्पष्ट आहेत. तथापि शिसेलोळीनें काढलेली नकल व फोटो यांत उठलेल्या अक्षरांच्या आधारें जशीं लावतां आलीं तशीं दिलीं आहेत.

( १२ ) रुभक्त: देमनृपोस्तिरंजि
( १३ ) वि ॥ स्वस्ति समधिगत पं

[ पत्रा दुसरा, पोट ]

( १४ ) चमहास ○ बुंद ह्माराजा
( १५ ) धिराज गडीयकसिंह नृर्भय
( १६ ) मल सत्यरत्नाकर सरणा
( १७ ) गतवज्रपंजर परनारी
( १८ ) सहोधर सौच्यगांगेय भु
( १९ ) जबलभीव षांडेराय श्री

---

( मागील पृष्ठावरील टीप सामाप्त. )

कासच तो स्वत: घेऊन यावयास आम्हीं सांगितलें. त्यांस फार वेळ राहतां न आल्यामुळें, आम्हांस फोटो घेतां आला नाहीं, फक्त एक शिसेलोळीची नक्कल व लांबीरुंदीचें माप हीं घेऊन कांहीं अक्षरें बारकाईनें पाहतां आलीं. नंतर चालू सालीं आम्हीं त्या गृहस्थाकडे आमचा मनुष्य व एक फोटोग्राफर पाठवून अक्षरांत सफेत रंग भरून फोटो घेतला. त्यावरून आतां सगळा ताम्रपट लावतां येतो. ताम्रपटाची लांबी ७ इंच आणि रुंदी ५ इंच आहे. त्याचे तीन पत्रे असून ते तांब्याच्या मजबूत कडींत अडकविले आहेत. कडीचीं टोकें मिळवून त्यावर अतिशय गुळगुळीत अशी कांशासारख्या धातूची नंदीची मूर्ती बसविल्यामुळें पत्रे कडींतून बाहेर काढतां येत नाहींत. हा ताम्रपट १०।१५ वर्षांपूर्वींपर्यंत स्वयंभूच्या देवळांतच होता; पण गांवकऱ्यांच्या भांडणामुळें तो आतां वरील (गावडे या नांवाच्या मराठे ) गृहस्थाकडे आहे. हे गृहस्थ त्या गांवचे गांवकर असून त्यांचें घराणें त्या गांवांत बरेंच प्राचीन असल्याची त्यांची समजूत आहे. त्यांची व तिकडील लोकांची परंपरागत समजुत, हा ताम्रपट कुडाळच्या 'चंद्रभान सूर्यभान' नामक गौडब्राह्मण ज्ञातीच्या राजानें दिला अशी आहे. या समजुतींत राजाच्या नांवांत चूक असली तरी घराणें देम सामताचेंच होय.

१. १४ व्या ओळींतील 'सबुद' आणि ३६ वींतील 'तावतु' यांतील 'उ' कार कोरक्याच्या चुकीमुळें तसे दिसत असून त्या वास्तविक व्यंजनदर्शक रेघा आहेत. छायाचित्रांत ( अंक ३०।३१ ) 'उ' दिसतो म्हणून आम्हींहि तसाच छापिला आहे एवढेंच.

( २० ) मलिनाथदेवपादपंकज
( २१ ) भ्रमरः । श्रीदेमभूपाल विजय
( २२ ) राज्योदै कुडुवलपत्तने सु
( २३ ) षसंकथाविनोदेन अन
( २४ ) वरत राज्यं कुर्वाणः स
( २५ ) षवर्ष ११८५ रुदिरोद्गा

[ पत्रा दुसरा, पाठ ]

( २६ ) री संवस ○ रे स्रावण
( २७ ) सुध १ सनौ चंद्र षंपाते
( २८ ) या प्रतिबद्ध दिघवले ग्रा
( २९ ) म तृण जल काष्ट पाषाण
( ३० ) सहितोपि चतुःसीमा प
( ३१ ) र्यंत श्रीष्वयंभदेवस्य गंध
( ३२ ) पुस्प धूप अंषंडज्याति नै
( ३३ ) वेद्य सोडसोपचार नि
( ३४ ) मित्त सर्व बाधा परिहर
( ३५ ) सर्व नमस्यकृत आचंद्रा
( ३६ ) र्क* साक्संबर* तावतु साग्रा

[ पत्रा तिसरा ]

( ३७ ) मदानं दी ○ यतां ॥ दा
( ३८ ) नाद्वा पालनाद्वापि । द्वा
( ३९ ) नं स्रेयोनु पालनं । दा

* ३६ व्या ओळींतील ' र्क ' व ' क्स ' हीं अक्षरें अगदीं अस्पष्ट आहेत. तथापि शिसेलोळीनें काढलेली नकल व फोटो यांत उठलेल्या अक्षरांच्या आधारें जशीं लावतां आलीं तशीं दिलीं आहेत.

( ४० ) न ष्वर्गमवाप्नोति पाल

( ४१ ) नादच्युतं पदं ॥ बहुभिर्वसु

( ४२ ) धा दत्ता राजभिः सगरा

( ४३ ) दिभिः यस्य यस्य यदा भूमि

( ४४ ) तस्य तस्य तदा फलं ॥ स्वदत्तं

( ४५ ) परदत्तं वा यो हरेतु वसुं + रा

( ४६ ) षष्टिवर्ष सहस्राणि विष्टार्यां

( ४७ ) जायते कृमिः ॥ मंगल झा

( ४८ ) स्री स्री स्री

**ताम्रपटांतील विषयानुक्रम पुढें दिल्याप्रमाणें:**—ओळी १–४ गणपति, ४–७ सरस्वती, ७–९ शंभु, यांना वंदन; १०–१३ देम राजाचें विशेषणयुक्त नांव; १३–१९ ‘समधिगत’ पासून ‘षंडेराय’ पर्यंत श्रीमलिनाथदेव या पुरुषाची बिरुदावळी; २०–२१ देम राजा हा वरील श्रीमलिनाथदेवाचा पादपंकजभ्रमर; २१–२४ देम राजा कुडाळांत अनवरत राज्य करणारा; २५–२७ दानाची तिथि, शक इत्यादि; २८–३१–३७ दिगवळें गांव–स्वयंभू देवास–दान; ३८–४० दानफलप्राप्ति आणि दानहारकाची दशा यांबद्दल नेहमींचे श्लोक.


या ताम्रपटांत नेहमींप्रमाणें अशुद्धें बरींच दिसतात, पण तीं सहज समजण्यासारखीं आहेत. ताम्रपटाचा शब्दशः अर्थ देणेंहि आवश्यक नाहीं, बहुतेक भागाचा अर्थ सहज लागतो. कांहीं कठीण शब्दांचा अर्थ आम्हांस वाटतो तसा पुढें देतों.

**पंचमहाशब्द**=टिप्पणी पहा.

---


\+ येथें ‘ ध ’ हें अक्षर पाहिजे.

चित्र अंक २९



देमनूपाचा ताम्रपट (पत्रा १ ला)

चित्र अंक ३०



देमनृपाचा ताम्रपट. (पत्रा दुसरा, पोट.)

J. A.P. W.

चित्र अंक ३१



हेमनृपाचा ताम्रपट. (पत्रा दुसरा, पाठ.)

चित्र अंक ३२



हेमनृपाचा ताम्रपट. (पत्रा तिसरा.)

J. A. P. W.

**गडीयकसिंह**=याचा अर्थ निश्चितपणें सांगतां येत नाहीं; बहुधा गड अथवा किल्ले काबीज करणारा, किंवा सिंहासारखा पराक्रमी, असा असावा.

**नृभॆयमल**=यांतील ' नृ, ' बहुधा ' नि ' बद्दल ' नु ' हा चुकीचा उच्चार कोरतांना आणखी झालेली चूक असून, खरा शब्द ' **निर्भयमल** ' ( ल्ल ) असा असावा. याच अर्थाचें ' **निःशंकमल्ल** ' असें बिरुद कलचुरीवंशीय विज्जळाच्या प्रशस्तींत आहे. ( *Mysore Inscriptions, by Lewis Rice. P. 66,*)

**शौचगांगेय**=भीष्मासारखा शुद्ध. ' गंगोदकाप्रमाणें शुद्ध ' असा अर्थ आम्हांस बरोबर वाटत नाहीं, कारण पुढच्या ' भुजबलभीम ' या बिरुदांतील ' भीम ' हें पुरुषवाचक असल्यामुळें, या बिरुदांतील ' गांगेय ' हेंहि पुरुषवाचक ह्मणजे भीष्म याच अर्थाचें असावें.

**भुजबलभीव**=' भीव ' हा ' भीम ' याचा फार प्रचलित असलेला अपभ्रंश होय. अर्थ, भीमासारखें भुजसामर्थ्य ज्याचें.

**षांडेराय**=' ष ' हें ' ख ' बद्दल आहे. चतुर्मुष, सुषसंकथा, अषंड-ज्योति यांबद्दल चतुर्मुख, सुखसंकथा, अखंडज्योति ही याचीच उदाहरणें होत. अर्थ, राजांचीं खांडें (तुकडे) करणारा ( Destroyer of kings ). विजयनगरचा पहिला बुकराय ( १३५४–७७ ) याच्या मल्लिनाथ ओडेयार नांवाऱ्या प्रांताधिकाऱ्याच्या शिलाशासनांत ( चितलदुर्ग येथील सन १३५५।५६ मधील दोन शिलालेख, *Mysore Inscriptions, by Lewis Rice, 1879* ) बुकरायाच्या " श्रीमनु महामंडलश्वरम् मंडलिक **खंडीयराय** आरराय विभाड भाषेगे तप्पुव रायर गंड पूर्वपश्चिमसमुद्राधिपति " या बिरुदावळींत असलेल्या ' खंडीयराय ' याचा राईस साहेबांनीं केलेला अर्थच आह्मीं वर दिलेला आहे.

**पादपंकजभ्रमरः**=हें मुलगा या अर्थी आहे.

**विजयराज्योदैः**=हा शब्द कामदेव चालुक्याच्या सन १२६१ मधील तेरवण येथील ताम्रपटांत आलेला आहे. *Sel. Bombay Govt. Records, No. X, New series* मध्यें त्याचा अर्थ ' Since the time of the accession to the throne' म्हणजे ' सिंहासनाधिष्ठित झाल्यापासून ' असा केला आहे.

ताम्रपटांत या देमराजानें, तत्कालीन इतर स्वतंत्र अथवा मांडलिक राज आपपल्या वंशाची जशी माहिती देतात तशी स्वतःच्या वंशाची माहिती दिलेली नसून फक्त आपल्या बापाचें नांव दिलें आहे. ( बापाच्या नांवास जोडलेली बिरुदावळी त्याला स्वतःलाहि लागते हें उघड आहे ) पण ११ व्या शतकापासून १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत कुडाळप्रांतावर, आरंभीं मांडलिक पण पुढें १३ व्या शतकाच्या मध्यावर स्वतंत्र झालेलें, देवशर्म्याचें ब्राम्हण सामंत कुल एकसारखें राज्य करीत असतां, सन १२६३ सालीं ' कुडुवलपत्तनांत ' म्हणजे कुडाळांत, ' अनवरत, ' म्हणजे एकसारखें बऱ्याच पिढ्या, चालत आलेलें राज्य करणारा हा शिवोपासक देमराजा त्याच ब्राम्हण सामंत कुलांतील होय यांत संशय नाहीं.

दुसरें असें कीं, ताम्रपटांत देमानें पुत्रधर्मास अनुसरून दिलेलें एकट्या आपल्या महाराजाधिराजे[2] अशा बापाचें नांव **मल्लिनाथदेव** असें

---

१ चालुक्य, कदंबांच्या शिलालेखांत आणि ताम्रपटात त्यांच्या वंशांतील स्त्रीपुरुषांची लांबलचक यादी देण्याची रीत स्वलक्षण आहे.

२ प्राचीन काळच्या पद्धतीप्रमाणें ' महाराजा ' ही पदवी धारण करणाऱ्या राजाचें वार्षिक उत्पन्न Revenue ) सध्यांच्या रुपयाच्या किंमतीनें किमान रु. १६, ६६,६६६ आणि कमाल रु. ४१, ६६, ६६६ इतकें असावें लागे, असें शुक्रनीतीवरून दिसून येतें. हें उत्पन्न कोणताहि तऱ्हेनें जुलूम जबरदस्ती न करतां प्रजेकडून संतोषानें मिळणारें उत्पन्न होय, असें सदरील ग्रंथांत म्हटलें आहे. वरील उत्पन्नापेक्षां जास्ती उत्पन्नाच्या राजांना क्रमानें स्वराट्, सम्राट्, विराट आणि सार्वभौम अशीं नावें असत.

आहे. मलिनाथदेवाचीं खांडेराय इत्यादि पराक्रमदर्शक बिरुदें, आणि महाराजाधिराज हें स्वतंत्रतेचें बिरुद, तसेंच त्याचा काल–म्हणजे देमाच्या १२६३ या कालास लागून मागचा–इत्यादि सर्व सामंतकुलीन मंग महीपतीस अगदीं हुबेहूब लागू पडतात, हें नागदेवाच्या ताम्रपटांत दिलेल्या त्याच्या वर्णनाचा आम्ही मागें विचार केला आहे त्यावरून स्पष्ट आहे. अर्थात मलिनाथदेव हें मंगमहीपतीचेंच 'मायिंदेव' नांवाप्रमाणें दुसरें एक नांव होय. शिवाय देम हें नांव देव (शर्मा) या सामंत कुलाच्या मूळपुरुषाच्या नांवाचा अपभ्रंश दिसत असून तें सामंत कुलांत अगदीं कालपर्यंत चालू होतें[1]. ताम्रपटांत स्वाऱ्यांचीं, शत्रुपराजयाचीं इत्यादि वर्णनें नसल्यामुळें, 'विजयराज्योदैः सुखसंकथाविनोदेन राज्यं कुर्वाणः' हें देम राजाचें वर्णन औपचारिक नसून सार्थ दिसतें. आणि मायिंदेवानें चोहोंबाजूंच्या शत्रूंना खडे चारून स्वतंत्र राज्यसंस्थापना केली होती हें लक्षांत घेतां, त्याचा मुलगा देम याचें राज्य शांतता, समृद्धि, आणि वैभव यांनीं पूर्ण असावें यांत कांहींच आश्चर्य नाहीं. या शांततेमुळेंच देमास राज्याच्या अंतर्व्यवस्थेकडे आणि धार्मिक बाबींकडे विशेष लक्ष देतां आलें असावें. तो प्रजेचें वात्सल्यानें परिपालन करणारा असून, साधूंचा प्रतिपालक, तसेंच देव, ब्राह्मण, आणि गुरु यांचा भक्त होता. महादेवराय आणि रामदेवराय यादव

---

१ (१) शके १५०७ (इ. स. १५८५) च्या कागदांत 'देम सावत सुत रवळ सावत" अशी सही आहे. (याच कागदांत, भाम सावत, नागदे (व) प्रभु, जोग सावत अशा सह्या आहेत); (२) परिशिष्ट लेखांक २ पहा. यांत 'देम सावत देसाई' आणि 'रवळ सावत देम सावत' अशा सह्या आहेत. (३) शके १६१९ (सन १६९७) च्या गोळवण मठाच्या एका दानपत्रांत (दाभोलीमठ संस्थानचा इतिहास पहा.) देम सामंत देसाई आणि देम सामंत परुळेकर अशा सह्या आहेत.

हे देमाचे समकालीन होत. पंढरपूरच्या विठोबाच्या देवळास देमानें देणगी दिल्याचें चौऱ्यांशींच्या शिलालेखांत नमूद आहे ( ' देमो दत्ता ' ). स्वतःच्या राज्यांतहि देमानें देवळें[1] वगैरे बांधलीं असलीं पाहिजेत. राजधानींतील ( कुडळ शहरांतील ) कुडाळेश्वराचें देऊळ आणि नदीवरील संध्याघाट (छायाचित्र २२) हीं बहुधा देम राजाचींच असावींत. पण या दोहोंखेरीज, सामंतांच्या खुद्द या राजधानींत, त्यांच्या राजवटींतील दुसरे कोणतेहि अवशेष दिसूं नयेत हा कालमहिमा होय ! स्वतः कुडाळेश्वराला तरी आज कुठं ठिकाणं आहे ! असो.

असा हा या ब्राह्मण सामंत घराण्याचा इतिहास आहे. कुडाळ प्रांतावर ११ व्या[3] शतकापासून १५ व्या शतकाच्या मध्यापर्यंत आरंभीं

१ कुडाळप्रांतांतील कुणुकेश्वराचें देऊळ सामंत दक्षिणेंत गेल्याच्या पूर्वीचें आहे त्याची बांधणी दक्षिणेकडील प्रसिद्ध देवळांसारखी आहे. पण कुडाळप्रांतांतील इतर देवळांची बांधणी त्याहून अगदीं निराळी, साधी, पण एकच आहे. हीं बहुतेक देवळें सामंतांच्या राजवटींतील होत.

२ ' कुडाळ ' वरील टिप्पणी पहा.

३. कुडाळ प्रांतावर या स्थानिक ब्राह्मण घराण्याची राजवट १५ व्या शतकांत असल्याचें ग्याझेटिअरकारांस नागदेवाच्या ताम्रपटावरून समजलें; पण ती राजवट तत्पूर्वी कांहीं शतकांपासूनच,कांहीं काल साधारण दर्जाची कां होईना,होती हें थोडासा प्रयत्न केला असता तर त्याच ताम्रपटावरून कळून येण्यास फारसें कठीण गेलें नसतें ! पण याबद्दल मुळींच विचार न करतां आजूबाजूच्या ताम्रपटांवरून, ते तत्कालीन राजवटींची माहिती पुढीलप्रमाणें देतातः—

" In the tenth century ( 933 ) the rulers were Yadawas. In the thirteenth century ( 1261 ) the Chalukyas ruling from Kalyan, were again in power. At the close of the fourteenth century ( 1391 ) Vadi ( वास्तविक कुडाळ ) was under an officer of the Vijayanagar dynasty whose

मांडलिक पण पुढें स्वतंत्र असें राज्य या घराण्यानें केलें असतांना, पुढें तेंच राज्य त्यांच्याच वंशजांनीं ( प्रभूंनीं ) दुय्यम दर्जाच्या अधिकार-पदावर १७ व्या शतकाच्या अखेरपर्यंत ( १६९६ ) चालविलें असतांना, शिवाय राज्याधिकार नष्ट झाले तरी आजहि त्यांचे वंशज त्याच प्रांतांत अनेक गांवांतून परंपरेनें चालत आलेले ग्रामसंस्थेंतील प्राचीन हक्क उपभोगीत असतांना, इतिहासज्ञांनीं त्यांची आजपर्यंत दाद घेऊं नये—

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

headquarters were at Goa, and about the middle of the fifteenth century ( 1436 ) it formed part of the territory of a powerful local Brahman dynasty". (Bom, Govt. Gaz., Ratnagiri & Sawantvadi ).

वरील उताऱ्यांत ११ व्या आणि १२ व्या शतकांबद्दल माहितीच्या अभावामुळें मुग्धता स्वीकारिलेली दिसते. पण त्याकाळीं **देवशर्मा** आणि त्याचे **जोगदेव उग्रीदेवादि** पराक्रमी वंशज सत्ताधारी होते हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे. १३ व्या शतकांत १२६३ सालीं **महाराजा देम** अनवरत राज्य करीत होता; तेव्हां १२६१ सालीं त्या प्रांतावर कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता नव्हती हें निराळें सांगावयास नको. कदाचित् अधिराज सत्ता असेल या शंकेस पहिलें उत्तर देम राजाचें महाराजाधिराजत्व होय. दुसरें उत्तर—ग्याझेटिअरकारांच्या विधानास आधार चालुक्यवंशीय कामदेवाच्या केशव महाजनी नांवाच्या प्रधानानें राजापूर तालुक्यांतील तेरवाटक ह्मणजे तेरवण गांव ( एका लेखकानें ह्मटल्याप्रमाणें गोव्यांतील रिवण नव्हे ) केशव प्रभु ( कऱ्हाडा ब्राह्मण–मि. सालडाना ह्मणतात त्याप्रमाणें कुडाळदेशकर गौड नव्हे ) प्रभृति वीस ब्राह्मणांना व विमलेश्वर देवाला इनाम दिल्याचा ताम्रपट होय. त्यांत कामदेवाला महामंडलेश्वर अर्थात कोणाचा तरी मांडलिक ह्मटलें आहे. आतां १४ व्या शतकांत विजयनगरच्या सत्तेच्या अस्तित्वाचा विचार करूं. १३९१ सालीं विजयनगरच्या ताब्यांत गोवें **बंदर** गेलें हें खरें आहे, पण त्याबरोबर वाडी ( कुडाळ ) कडील भागहि त्याच्याच ताब्यांत गेला असें ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण नुसत्या गोवें बंदराचें देखील व्यापाराच्या दृष्टीनें विशेष महत्व होतें त्याच्यासाठीं हिंदू आणि मुसलमान या दोघांच्याहि खटपटी चालू असत. दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापति मलिक

एकानें त्यांचें अस्तित्व माहित असूनहि केवळ स्थानिक ( Local ) म्हणून पळवाट काढावी, दुसऱ्यानें ' ही एक इतिहासांतील नवीन बाब ( a curious bit of history ) असे आश्चर्योद्गार काढून स्वस्थ बसावें, आणि शेवटपर्यंत त्यांस कालाच्या पोटांत दडपून टाकण्याचा चोहोंबाजूंनीं प्रयत्न व्हावा, हा केवळ दैवदुर्विलास होय. आम्हीं वर

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

काफूर याच्या दक्षिणेंतील स्वाऱ्यांची शेवटची वावटळ गोवें बंदरावर सन १३१० च्या सुमारास आली त्या वेळीं गोव्यांचे अधिपति हिंदू होते. काफुरानें गोवें बेटांत लुटालूट केला; आणि दिल्लीस परत जातांना त्यानें आपला सरदार मलिक तुबलिग यास मागें ठेविलें; ह्याप्रमाणें गोवें बेटांत मुसुलमानांची वस्ती झाली असें फेरिस्ताच्या लेखावरून समजतें. पण खुद्द दिल्ली बादशहातींत प्रचंड कलह माजल्यामुळें गोव्यांकडील हे मुसलमान उघडे पडले व हिंदूंनीं तें पुन्हा घेतलें. असें म्हणावयास कारण कीं, सन १३४२ त होनावर येथील मुसलमान सत्ताधीश जमालुद्दीन यानें गोवें बेटावर स्वारी केली, त्या स्वारीबरोबर प्रसिद्ध लेखक इब्नबटूटा हा होता. त्यानें तें त्या वेळीं हिंदूच्या ताब्यांत असल्याबद्दल लिहून ठेविलें आहे ( Lee's Ibn Batuta ) तसेंच तेथें हिंदूंची जुनी राजधानी असल्याबद्दलहि त्यानें लिहिलें आहे. ही राजधानी त्या वेळीं नष्टप्राय झालेल्या कदंबांची होय. ( होनावरकरांच्या ) या स्वारीनंतर बटूटा ( महमद तघलखाचा दूत या नात्यानें ) चीन देशास जाऊन १३४५ त परत आला तों त्यास तें बंदर पुनः हिंदू घेत असल्याचें आढळलें, शिवाय गोवें बंदराचे उत्तरेस नजीकच मांडवी नदीच्या तीरावर आणखी एक हिंदू राजधानी वसलेली होती असेंहि तो या वेळच्या प्रवासवृत्तांत म्हणतो. या राजधानीसंबंधीं पोर्तुगीज इतिहासकारहि माहिती देतात. गोवेंबेटाबद्दलच्या झटापटी सतत चालू असल्यामुळें तें पुनरपि मुसलमानांच्या ताब्यांत गेलें. त्यांना पुढें १३९१ त विजयनगरच्या माधवमंत्र्यानें हांकून देऊन तें आपल्या स्वाधीन करून घेतलें असें त्याच्या ( ? ) कोचऱ्याच्या ताम्रपटांत म्हटलें आहे. १३९१ च्या पूर्वी विजयनगरकरांचा त्या प्रांताशीं मालक या नात्यानें कधींच संबंध आलेला दिसत नाहीं. या ताम्रपटांत गोवें ही " कौंकण " ( कोंकणच्या राजाची ) राजधानी अगोदरचीच असल्याबद्दल उल्लेख आहे. ही राजधानी

दिलेला इतिहास त्या घराण्यांतील नागदेव आणि देम यांच्या ताम्रपटांतील त्रोटक माहितावरून आणि परंपरागत माहितीवरून उभा केला आहे, तो आमच्या प्रस्तुत विषयाला पुरेसा आहे. विस्तृत इतिहास त्या प्रांतांत प्रयत्नसाध्य आहे याबद्दल आम्हांस मुळींच संशय नाहीं. असो.

---

(मागील पृष्ठावरील टीप समाप्त)

माधवानें घेण्यापूर्वी तो जयन्तिपुरींत राज्य चालवीत होता. माधवाच्या मागून गोवापुरींत नरहरि नांवाच्या मंत्र्यास हरिहररायानें नेमिलें. हा काल ह्मणजे १४ व्या शतकाचा अगदीं अखेरचा होय. पण यानंतर पोर्तुगीज इतिहासलेखक ह्मणतात कीं सन १४४० त मूळच्या हिंदू राजानें तें गोवें बेट परत घेतलें. हे 'मूळचे हिंदू राजे' व वरील संबंध हकीकतींत मुसलमानांशीं झटापट करणारे 'हिंदूराजे,' तसेंच गोवें ज्यांची एक राजधानी असे "कोंकण" ह्मणजे "कोंकणचे राजे" हे सर्व नागदेवाच्या ताम्रपटांतील सामंत घराणेंच होय हें स्पष्ट आहे. दुसरें असें कीं, या सुमारास विजयनगरकरांच्या बहामनीशहाशीं वारंवार होणाऱ्या झटापटींत विजयनगरकरांची मानखंडना होऊन फारच दुर्दशा होत असे. त्यामुळें गोवें बेटाच्या उत्तरेकडील कुडाळप्रांत जिंकून ताब्यांत ठेवणें त्यांस कठीण होतें. त्यांतहि उठल्याबसल्या कुरापती काढून मुसलमानांच्या सतत लढाया सुरू असतां, कुडाळ प्रांतांतील ब्राह्मण राजांशीं विजयनगरकरांनीं स्पर्धा मांडणें मुळींच संभवनीय दिसत नाहीं माधव मंत्र्याच्या मागून आलेल्या नरहरि मंत्र्यानें कुडाळ प्रांतांतील कोचरें गांवची वृत्ति तेथील ब्राह्मणांस अग्रहार करून दिली हा विजयनगरच्या स्वामित्वाचा निःसंशय पुरावा नव्हे. कारण स्नेहसंबंधानें दुसऱ्याच्या राज्यांतील एकादें गांव आपल्या इच्छेप्रमाणें देव–ब्राह्मणांदिकांस दान दिल्याचीं उदाहरणें प्राचीन काळच्या अशोक राजापासून तों कालच्या पेशव्यांपर्यंत दाखवितां येतील. कुडाळ प्रांतावरील सामंतांनीं आपल्याहून विजयनगरकर मुसलमानांस हांकून द्यावयास अधिक समर्थ आहेत असें मानून त्यांस स्वारी करावयास स्नेहाखातर बोलाविलें असेल व या स्नेहसंबंधामुळें, आपणास कोचऱ्याच्या कांहीं ब्राह्मणांनीं ग्रंथलेखनांत मदत केली (बर्लिन येथील प्रो. ए वेबर यांचा 'कृष्णजन्माष्टमी' विषयावरील निबंध—Ind. Ant., Vol. VI.) ह्मणून त्याच गांवची वृत्ति त्यांना ताम्रपटद्वारें द्यावी ही माधवमंत्र्याची इच्छा त्या सामंत राजानें पूर्ण केली असेल.

वर दिलेल्या माहितींत दिसत असलेली वंशावळ पुढें दिल्याप्रमाणें मांडतां येईल:—

| **ब्राह्मण सामंत घराणें.** | काल |
|---|---|
| देवशर्मा ... ... | ११ व्या शतकाचा पूर्वार्ध |
| जोगदेव ... ... | बारावें शतक |
| उगीदेव ... ... | बारावें शतक |
| मायीदेव ऊर्फ मंग ऊर्फ मल्लिनाथ ( ऊर्फ मांगल ) | तेराव्या शतकाचा पूर्वार्ध |
| । देम ... ... ... | तेराव्या शतकाचा उत्तरार्ध |
| भैरवदेव ... ... ... | चौदाव्या शतकाचा उत्तरार्ध |
| कांइदव | |
| । नागदेव ... ... ... | पंधराव्या शतकाचा पूर्वार्ध |

वरील वंशावळींतील नागदेव सामंत हाच शिक्क्यांतील श्रीनाग सामंत असून, त्याचा पूर्वज **मंगसामंत** हाच त्या शिक्क्याच्या शिरोभागीं विराजमान होणारा मांगलाख्यमहेश्वर—अर्थात् मठगांवांतील जुन्या, मोठ्या देवळांतील आज स्वयंभू या सामान्य नांवानें ओळखला जाणारा प्राचीन मांगलेश्वर ऊर्फ मांगलादेव—म्हणजे शेजारच्या धाकट्या देवळांतील नवीन मराठा मांगला ऊर्फ **मांग सावंत**—होय. मंग सामंताच्या **जातींत** आणि स्थानांत हा फरक कोणी, कां, व कसा केला याचा पुढील प्रकरणांत विचार करूं.

---

१. हें देऊळ मंग सामंताचा मुलगा धर्मशील देम सामंत यानें आपल्या पित्याच्या स्मरणार्थ बांधिलें असावें. याच अतुल पराक्रमी विख्यात मंगसामंताचें देऊळ त्याच्या राज्यांत दुसऱ्या एका ठिकाणीं म्हणजे गोव्यांतहि बांधल्याचें दिसतें–तें ' **मंगेश** ' देवस्थान होय; पण तें जुनें, सध्यांचें-पोर्तुगीजांच्या छळामुळें दुसरीकडे नेऊन स्थापन केल्यावर गेल्या दीडशें वर्षांत ऊर्जितावस्थेस आलेलें-नवीन नव्हे !

## प्रकरण बारावें.

### ब्राह्मण मंग सामंत, याचा मराठा मांग सावंत कसा झाला?

वरील प्रश्नांचें उत्तर, लेखी निःसंशय पुराव्याच्या अभावीं, निश्चितपणें देतां येणार नाहीं हें उघड आहे. ह्मणून आज प्रत्यक्ष दिसत असलेल्या, आणि इतिहासांत पुराव्यानें शाबीद झालेल्या गोष्टींवरून जीं काय अनुमानें निघतात तेवढींच आह्मीं पुढें मांडीत आहों.

प्रथम मठगांवांतील दोन देवळांतून प्राचीन कोणतें हें पाहूं. विस्तीर्ण सभामंडप, आणि इतर सरंजाम वगैरे बाबींवरून तत्प्रांतस्थ लोकांची समजूत मोठें देऊळ मुख्य, अतएव प्राचीन असावें, अशी दिसते. अधिक कमकुवत भिंती मोठ्याच्याच झाल्या आहेत. मोठ्याचें लिंग अगदीं मजबूत बांधून काढलें , स्वयंभू नांव शोभेल असें आहे (छायाचित्र २५); धाकट्याचें लिंग, दुसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, अगदीं वर सहज हालेल असें आहे. मोठ्याची दीपमाळ वहिवाटीप्रमाणें अगदीं समोर आहे; धाकट्याची दीपमाळ, समोर एक जुनाट थडगें आल्यामुळें, मोठ्या देवळाच्या दीपमाळेचा चबुतरा उत्तरेच्या बाजूस वाढवून ( हा वाढविलेला भाग सहज लक्षांत येण्यासारखा आहे ) त्याच्यावर बांधिली आहे. देऊळ अगोदरचें असल्यास अगदीं समोरच कोणी थडगें बांधणार नाहीं; अर्थात् धाकटें देऊळ थडग्याच्यानंतरचें उघड दिसतें. तें मोठ्याच्या अगोदरचें ह्मणावें, तर तें एकच एक देऊळ सभोंवारची प्रशस्त जागा सोडून थडग्याच्या अडचणींत बांधलें गेलें नसतें. वरील सर्व गोष्टी विचारांत घेतां मोठेंच देऊळ प्राचीन होय हें निःसंशय ठरतें.

हीं दोन्ही देवळें शिवलिंगाचींच, आणि हुबेहूब सारख्या बांधणींची आहेत. फरक फक्त लांबीरुंदींत. आतां आजूबाजूस पाहिजे तितकी

---

१ छायाचित्र २, यांत सभामंडपाच्या शेवटीं दिसणाऱ्या दीपमाळेच्या बाजूस ज्यांत झाड वाढलेलें दिसतें ती आकृति. त्याची पाठ देवळाकडे आहे!

२ मोठें देऊळः—मागील भाग सुमारें ४८ फूट लांब, २४॥ फूट रुंदः पुढची

प्रशस्त जागा असतां हीं एकसारखीं एक शंकराचीं देवळें एकमेकांस अगदीं लागून कां बांधलीं जावीं ? अर्थात यांत धाकटें देऊळ बांधणारांच्या– म्हणजे मांगला देवाचे म्हटलेले वंशज वाडकर सावंत यांच्या–मनांत ‘देवळाला देऊळ’ असा चढाओढीचा प्रकार असल्याचें दिसून येतें. म्हणजे बहुधा असें दिसतें कीं, वाडकर मराठे सावंतांनीं मांगला देव हा आपला पूर्वज होय अशी समजूत बळेंच करून घेतल्यानंतर ( पृ. ५१ पहा ), त्या वेळच्या त्यांच्या मानसिक स्थितीस अनुसरून मोठें देऊळ प्राचीन अतएवं परक्यांचें असल्यामुळें आपलें स्वतःचें “मांगला देवाचें” देऊळ बांधण्याचा विचार केला, आणि मांगला देव हें नांव पहिल्या देवळाचें काढून ह्या नवीन देवळास दिलेलें जनतेंत रूढ व्हावयास फारशी अडचण पडू नये म्हणून नवीन देऊळ, बांधणींत जुन्या देवळासारखें, त्याच दिशेस तोंड करून त्याच्याशीं समांतर आणि अगदीं लागून असें बांधलें ही गोष्ट फोंडसावंत ( सन १७०९–३८ ) याच्या कारकीर्दीत झाली असावी. कारण मांगला देवापासून मांगसावंत निपजल्याचा पहिला उल्लेख चिटणिसांच्या म्हणजे फोंड सावंताच्या कारकीर्दीतील–कागदांत सांपडतो; तसेंच मांगला देव सावंताचा पूर्वज ही समजूत करून घेण्याचा प्रयत्न नागसावंताच्या बनावट शिक्क्यांत म्हणजे फोंड सावंताच्या कारकीर्दीत झालेला आहे; शिवाय ‘देवळाला देऊळ’ अशी दांडगाई विशेषतः फोंड सावंताच्याच कारकीर्दीत संभवते.

कारण अशी दांडगाई फोंड सावंतानें दुसऱ्या एका प्राचीन प्रसिद्ध देवळासंबंधानें केल्याची प्रचलित समजूत आहे. तें देऊळ म्हणजे वालावली येथील श्रीनारायणाचें देऊळ होय. श्रीनारायण हा प्रभु सरदेसायांचें

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

मुखशाला १६½ फूट लांब आणि सभामंडप ६६ फूट लांब आहे. धाकटें देऊळ सुमारें ४० फूट लांब आणि १७ फूट रुंद आहे.

कुलदैवत असल्यामळें, त्याचें देवालय पुरातन काळापासून आजमिती-पर्यंत फार श्रेष्ठ दर्जाचें असें मानलें जातें. त्याचा सरंजाम, उत्सवादि कार्यें फार मोठ्या प्रमाणावर होत असून, खुद्द इमारतहि त्याला शोभेशी बरीच मोठी आहे. सभोंवतीं प्रदक्षिणेसाठीं फरसबंदीचें प्रशस्त पटांगण आहे. या पटांगणांत प्रदक्षिणेच्या अगदीं वाटवर मध्येंच एक खालच्या दर्जाच्या देवतेचें देऊळ आहे. नारायणाचे सेवेकरी प्रदक्षिणेंत त्याच्या पलीकडून न जातां अलीकडूनच जातात—म्हणजे तें मुद्दामच टाळतात. तें देऊळ प्रभूंच्या देवतेचें नव्हे; आणि श्रीनारायणाच्या शेजारीं तें शोभतहि नाहीं! पण याच कारणासाठीं तें मुद्दाम तशा ठिकाणीं मागाहून बांधिलेलें आहे—आणि तें फोंड सावंतानें, अशी समजूत आहे. दुसरेहि देवतांसंबंधी व इतर दुष्ट प्रकार फोंड सावंत नें प्रभ-घराण्याच्या आणि त्यांच्या ज्ञातीच्या विरुद्ध केलेले आहेत—ज्या सर्वांचा समावेश " फोंडसांवती " या एका शब्दांत कुडाळ प्रांतांतील जनता अद्यापि करीत असते.

ही कारवाई कशी काय घडून आली असावी हें सविस्तर कळण्या-साठीं तत्कालीन थोडासा इतिहास देणें अवश्य आहे.

मागें सांगितलेल्या ब्राह्मण सामंत घराण्याकडून कुडाळ प्रांताचें राज्य १६ व्या शतकाच्या मध्यास बहामनी शहांकडे गेल्यानंतर, बहा-मनींनी त्या प्रांतावर सामंतांचेच वंशज प्रभु यांनां आपल्यातर्फे अधि-कारी नेमिलें असें पृ. ६७ वर दिलेल्या रामजीप्रभूच्या शिवनया-

१ हा फोंड सावंत म्हणजे पुढें अधिकारी सावंतांविरुद्ध म्हणजे आपल्याच भाईबंदांविरुद्ध—बंड करणारा फोंड सावंत होय असें कोणी समजात; पण हा गैरसमज होय. या बंडखोर फोंड सावंताचा त्रास सर्वच जनतेस झाला; पण एका विशिष्ट जनसमूहास त्रास पोंचविणारा तो हा नव्हे!

वरून ठरतें. पुढें तो प्रांत विजापूरच्या अदिलशहांच्या तांब्यास गेल्यावरहि त्यांच्यातर्फे प्रभूच त्या प्रांतावर अधिकारी राहिले. एवढ्या दीर्घ कालांत त्यांच्यांत गृहकलहानें प्रवेश केला (पृ.२०) नसता तर नवल ! या गृहकलहाचा फायदा त्यांच्याच पदरच्या एका महत्वाकांक्षी नोकरानें घेतला, आणि त्यास दुसऱ्या कांहीं धूर्त नोकरांनीं पाठबळ दिलें. १७ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास लखम सावंत हा माणगांव तर्फेवरचा नाईक होता, त्यानें शिरजोर होऊन राज्यांत बंडाळी माजविली, आणि एकदां संधि साधून त्यानें खुद्द गादीवरील प्रभु–सरदेसायास कैद केलें आणि नंतर त्यास ठार मारिलें. विजापूरकरांना शिवाजीस कोंकणांत प्रतिरोध करणारा हा एक मराठा पुंड आयताच मिळण्यासारखा असल्यामुळें, त्यांनीं वरील गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. यामुळें प्रभूंची बरीचशी सत्ता

---

१ बहामनी शहांनीं दक्षिणेंत आपली स्वतंत्र राजवट स्थापन केल्यानंतर जिंकलेल्या प्रदेशावर एकजात मुसलमानी अधिकारी नेमून राज्यकारभाराचा गाडा हांकणें त्यांना मुष्किलीचें पडूं लागल्यामुळें, त्यांनीं हिंदू राजवटींतीलच देशमुख सरदेशमुख, नाइक, राव, राजा वगैरेंचे तेच वंशपरंपरेचे अधिकार आणि हुद्दे, आपणास वेळीं प्रसंगीं सैन्याची कुमक देण्याच्या अटीवर चालू ठेविले ( ग्रांटडफ ). त्यांतल्या त्यांत ब्राह्मणांनां मोठ्या हुद्याच्या जागा देण्याचा क्रम त्यांनीं ठेविला होता व तीच पद्धत अदिलशहांनींहि पुढें चालू ठेविली.

" During the next 200 years ( 1347 A. D. ) it became the universal custom throughout the Deccan for the different Mahomedan kings to appoint Brahmins to high posts of authority. "

( History of Deccan, by Gribble; P. 22 )

लखम सावंत बळकावून बसला.[1] त्यास प्रभूंच्या चिटणिसानें मनोभावें मदत केली. अशा स्थितींतहि प्रभूंनीं बरींच वर्षे टिकाव धरिला. शेवटीं सन १६९६ त कुडाळच्या किल्ल्याजवळ प्रभु आणि लखमचा पुतण्या खेम सावंत यांजमध्यें लढाई होऊन, जोगण प्रभु ठार मारला गेला; यामुळें हताश होऊन नारायण प्रभूनें कुडाळ सोडिलें, व तो साळशीमहालांत जाऊन राहिला, आणि आपली सत्ता परत मिळविण्याची खटपट करूं लागला. इकडे सावंत दिवसेंदिवस जबरदस्त होत चालले होते, तरी त्यांची सत्ता मूळांतच केवळ बळकाविलेली असल्यामुळें, ती पुढें स्वतःपाशीं राखण्यासाठीं त्या काळच्या महाराष्ट्रांतील धुमश्चक्रीमध्यें जो जो कुडाळ प्रांताचा मालक ( अधिराज ) बने त्याची कृपा संपादन करण्याची ते खटपट चालवीत असत. अदिलशाही साम्राज्याचा भाग म्हणून शिवाजीनें तो प्रांत हस्तगत केला—लागलीच त्याच्याशीं लखम सावतानें स्वतःस देसकत मिळविण्याचा तह केला; शिवाजी दुसरीकडे गुंतला, इतक्यांत विजापूरकर वरचढ झाले असें दिसतांच लखम सावंत शिवाजीशीं केलेला करार मोडून पुनः विजापूरकरांकडे गेला; संभाजीचें उच्चाटन करावयास औरंगजेब आला—खेम सावंतानें संभाजी विरुद्ध औरंगजेबाशीं संधान बांधलेंच; औरंग-

---

१ पृ. ३८ च्या टीपेंत दिलेला गव्हर्न्मेंट सिलेक्शनमधील मजकूर. त्याच्या पुढील भाग असा आहेः—

"It is a popular tradition that the Desaee, after a short imprisonment, fell a victim to the ambition of his conqueror, and died a violent death..." पृ. १५४.

" This chief ( लखम सावंत ) in a predatory incursion, made captive the Kudal Desai, put him to death and seized his lands. "

(Bom. Govt. Gazetteer, Ratnagiri & Savantwadi History, P. 440. )

जेबानंतर शाहू दक्षिणेंत येऊन मराठेशाहींत दोन पक्ष झाले—खेम सावंतानें त्यांतल्या त्यांत ( दुसऱ्या ) शिवाजीची कृपा संपादन करून कुडाळ परगणा पांच महालांसहित आपल्याकडे मोकासा चालविण्याची विनंति करावयास आपले चिटणीस—सबनिस तिकडे पाठवून दिले, आणि शिवाजीनें बावडेकर रामचंद्रपंत ( अमात्य ) यास सावंतांकडे पाठवून आपल्याशीं एकनिष्ठेनें वागून शाहूस मिळणार नाहीं या कबुलीवर तशी सनद दिली; पण शाहूची सरशी होतांच, सावंतांचे सबनिस—चिटणीस शाहूकडे रवाना होऊन, आपण शिवाजीस मिळणार नाहीं अशा कबूलीवर शाहूकडून वरच्यासारखीच सनद घेऊन आले. असल्या या उलट सुलट उड्यांमध्यें तरबेज झालेल्या आणि तत्कालीन महाराष्ट्रांतील बजबजपुरीमध्यें कोणत्या तरी भल्याबुऱ्या पक्षाचें बल वाढविण्यास सहाय्य होणाऱ्या सावंतांविरुद्ध, बिचाऱ्या नारायण प्रभूची राज्यहीन निर्बल बाजू न्यायाची असली तरी कोण विचारांत घेतो ? तरी देखील त्यानें जवळ जवळ ३५ वर्षेपर्यंत, आपली सत्ता परत मिळविण्याकरितां करवीरकर छत्रपति, कान्होजी आंग्रे, कान्होजी राजे प्रभानवल्लीकर, मोंगलांचा विजापूर येथील सुभेदार इत्यादिकांकडून मदत मिळविण्याची शिकस्त केली ! परंतु तत्कालीन गुंतागुंतीच्या राजकारणामुळें कोणाचाच उपयोग त्यास होऊं शकला नाहीं ! उलट शाहूनें सावंतांस नारायण प्रभू राहात असे त्या साळशी महालाचा अर्धा वसूल ( याचा वसूल अर्थातच नारायण प्रभू घेत असे ) इनाम दिल्यामुळें तर नारायण प्रभूची फारच बिकट स्थिति झाली; इतक्यांत १७०९ मध्यें खेमसावंत दिवंगत होऊन त्याचे जागीं त्याचा पुतण्या फोंड सावंत आला. फोंड सावंत सर्वतोपरि आपल्या चुलत्याच्याच तालमींत वाढलेला, त्याहूनहि महत्वाकांक्षी आणि पराक्रमी, पण बेधोरणी आणि क्रूर असा होता. लखम व खेम सावंतांनीं प्रभूंस नुसतें

राज्यभ्रष्ट केलें, पण फोंड सावंतानें तर त्यांचा समूळ नाश करण्यासाठींच चंग बांधला. ( सा. सं. इ. पृ. ५४।५५ ). शाहू छत्रपति सावंतांच्या बाजूस वळल्यामुळें, नारायण प्रभूनें आतां कोल्हापूरकरांची मदत मागितली. खुद्द कोल्हापूरच्या मुलुखासहि फोंड सावंताकडून वारंवार उपद्रव पोचूं लागला होता. कामत्याचे ( देवगड तालुक्यांतील एक गांव ) कोटास फोंड सावंतानें वेढा दिल्यावर त्याचे बंदोबस्तासाठीं करवीरकर छत्रपतींचें आज्ञापत्र चंदाजीराव राणे अरुळेकर यांस गेलें, त्यांत छत्रपति म्हणतात " फोंड सावंत कुडाळकर याणें वालावल ( नारायण प्रभूचा मूळगांव; येथें त्याचा कुलदेव नारायण याचें मोठें देवालय आहे. ले. ) खारेपाटण ( हें कान्होजी आंग्रे याजकडे होतें. ले. ) इकडे जमाव पाठवून कितेक लोकांचे कबिले ( असहाय बायका मुलें ) धरून नेले[१]. सावंतानें यलगार ( जुलूम ? ) मांडिला आहे. " फोंड सावतानें गगनगड तनख्याचे पुष्कळ गांवांची जाळपोळ करून नाश केला. शेवटीं करवीरकर छत्रपतींच्या आज्ञेवरून रामचंद्रपंत अमात्य यांनीं सावंतांचें मुख्य ठिकाण ' वाडी ' जिंकून घेतलें. हा प्रसंग सावंतांच्या इतिहासांत मोठा आणीबाणीचा होता ! पुढें सावंतांनीं प्रतिपक्षाकडील मुख्य सरदार नारोमहादेव[२] ( प्रस्तुतच्या इचलकरंजीकरांचा पूर्वज ) याच्या मध्यस्थी-

---

१ गोरेकृत ' पत अमात्यांचें वंशवृत्त '. कबिले घराण्याचें हें क्रौर्य फोंड सावंतानें ६८ व्या वर्षाच्या उतारवयांतहि सोडलें नाहीं ! त्या सालीं त्यानें ब्राह्मणांचे कबिले अटकेंत ठेविल्याचें कळतांच, खुद्द शाहूछत्रपतीनें आपल्या वरिष्ठ सत्तेच्या नात्यानें ( कुडाळ परगणा आणि महाल यांची देसकत शाहूनेंच खेम सावंतास दिली होती हें वर आलेंच आहे ) " **ब्राह्मणाचा कबिला अटकेंत ठेवावा हा महाराष्ट्रधर्म नव्हे** " अशी त्याची कानउघाडणी केली ! [ परिशिष्ट लेखांक १५ ] पण नुसतें सांगून फोंड सावंत मानतो थोडाच !

२ नारोपंतांचा जन्म कोंकणांत ज्या गांवीं झाला तो म्हापणगांव या वेळीं सावंतांच्या ताब्यांत होता. नारोपंताचे वडील महादाजीपंत जोशी हे त्या गांवांत कुळ-

नें अमात्यांची विनवणी केली, तेव्हां सावंतांकडून " छत्रपतीचे पायांशीं दुर्बुद्धि धरणार नाहीं असा करार करून घेऊन " अमात्यानें त्यांस मुलूख परत केला. वर सांगितल्याप्रमाणें, या स्वारीच्या वेळीं नारायणप्रभु हा करवीरकर छत्रपतीकडे गेला होता, व त्यानें रामचंद्र-पंत अमात्यांशींहि संधान बांधलें होतें. ( परिशिष्ट ले. ८।९ आणि सा. सं. इ. पृ ५४ ) पण शेवटीं नारायणप्रभूचा कांहींच फायदा झाला नाहीं ! उलट या स्वारीच्या मूळाशीं नारायणप्रभूचें अंग आहे हें समजतांच " कुडाळदेशस्थ प्रभूंचा समूळ नाश करण्यासाठीं " खारेपाटण येथें फोंड सावंतानें नारायणप्रभूवर स्वारी केली ! त्या ठिकाणीं उभयतांची मोठी लढाई होऊन त्यांत नारायणप्रभूचा वडील मुलगा बाबाजी

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

कर्णीपणाचें काम करीत असत. वास्तविक हा कुळकर्णेपणाचा हक्क तेथील ग्रामपुरुष [ गांवकर ] " देव ठाकूर, वीठ ठाकूर आणि काळठाकूर " यांच्या घराण्याचा ' कदिम मिरास ' पूर्वापार चालत आलेला होता. पण ते आपल्या वतीनें " यारदी [ गुमास्ता ] ठेवून त्याचे हातें कुळकर्णेगिरीचें काम चालवीत होते. " महादाजीपंत असेच एक गुमास्ते होते पुढें सन १६९७ सालीं या ठाकूर बंधूवर कांहीं संकट आल्यावरून त्यांनीं नारोपंत जोशांना आपला कुळकर्णेपणाचा हक्क १०० होनांस मिरास करून दिला. पण आतां वर दिलेल्या स्वारींत नारोपंतांनीं केलेल्या उपकाराबद्दल तो म्हापणगांवच फोंड सावंतानें त्यांस इनाम दिला. पुढें कांहीं काळानें त्या गांवचें उत्पन्न इचालकरंजीकरांनां मिळण्यांत अंतर होऊं लागलें. त्यावरून सन १७५० सालीं फोंड सावंताचा मुलगा जयराम सावंत आणि नातू रामचंद्र सावंत यांनीं नारायण व्यंकटेश इचलकरंजीकर यांस त्या गांवचें नवीन इनामपत्र करून दिलें. सदरील ठाकूर आणि नारोपंत जोशी यांचा लेख आणि सावंतांनीं दिलेलें इनामपत्र यांच्या अस्सलवरहुकूम नकला आमच्या संग्रहांत आहेत.

१. या वेळीं पाट ( वरील टीपेंतील म्हापण गांवास लागून असलेला गांव ) येथील कोनेरराव नांवाच्या ( कुडाळदेशकर ब्राम्हण ) गृहस्थाच्या मध्यस्थीनें पंत अमात्यांकडून नारायणप्रभूस मदत मिळण्याचें ठरलें होतें. परंतु तीहि ऐन वेळीं येऊं शकली नाहीं !

प्रभु हा मारला गेला. अपयश आलें तरी, सावंतांस 'देसकतीचा अधिकार नसतां ते आपली वृतभूम खातात' या गोष्टींची जाणिव नारायणप्रभूच्या मनांतून निघून जाणें शक्य नसल्यामुळें, त्यानें प्रयत्न सोडिला नाहीं. पुनः तो कोल्हापूरकरांकडे मदतीसाठीं गेला. परंतु दिवसेंदिवस बळावत चाललेल्या सावंतांच्या विरुद्ध, दिवसेंदिवस दुर्बळ होत चाललेल्या नारायणप्रभूचा हक्क कोण विचारांत घेतो? कोल्हापूरकरांकडून मदत मिळूं शकली नाहीं; फक्त कुडाळच्या कोटांत मारला गेलेल्या जोगणप्रभूच्या काशीबाई आणि येसूबाई या बायकांच्या योगक्षेमासाठीं आडेली हा १०० होनांचा गांव इनाम दिला. याप्रमाणें खेम सावंतानें सुरू केलेल्याचा शेवट फोंड सावंतानें केला.

लखम सावंत नाइकानें गादीवरील प्रभूचा खून केला, म्हणजे प्रभूंचा सर्वाधिकार त्यास मिळाला असें कोणी मानिलें नाहीं! तसेंच त्याचा शिरजोर पुतण्या खेम सावंत व नातू फोंड सावंत यांनीं नारायण प्रभूस राज्य सोडून पळावयास लाविल्यानेंहि त्यांस एकदम प्रभूंचा दर्जा प्राप्त झाला असें कोणी मानणें शक्य नव्हतें! याकरितांच त्यांनीं, हचिनसनच्या बखरींत उल्लेखिल्याप्रमाणें, प्रभूंचा कुडाळ प्रांताचा शिक्का मिळवून तो मारण्याची कल्पना काढली असावी, जेणेंकरून आपण कोणी नवीन नसून प्रभूंचीच सत्ता चालवीत आहों अशी जनतेची समजूत व्हावी. या कल्पनेनुसार सावंतांनीं नारायण प्रभूनें वालावलीच्या नारायणापाशीं ठेविलेले शिक्के आणविले! प्रभूंच्या शिक्क्याचा उपयोग करूं लाग-

---

१. याची बायको सती गेली, तिचें वृंदावन राजापूर तालुक्यांतील कुंभवडे गांवीं आहे. तेथें प्रतिवर्षी पुण्यतिथि होत असते.

२. सा. सं. इ. परिशिष्ट लेखांक १७.

३. काव्येतिहाससंग्रह पुस्तक ९ यांत ही सनद प्रसिद्ध झाली आहे. परिशिष्ट लेखांक १८ (२) कलम १२ वरील टीप पहा.

ल्यावर सावंतांच्या घराण्यास पीडा पोंचूं लागलेली दिसते. त्या काळच्या समजुतीप्रमाणें, ती पीडा खून केलेल्या देसायांच्या समंधापासून होत असावी अशी सावंतांनीं आपली समजूत करून घेतली; आणि लोकांत ही समजूत सन १८१८ सालीं देखील इतकी प्रचलित होती कीं ( युरोपियन म्हणून सहसा अशा गोष्टींवर विश्वास नसणाऱ्या ) हचिन्सन साहेबांना ती आपल्या बखरींत नमूद करण्याचा मोह आवरतां आला नाहीं ! साहेब मजकूर लिहितातः—

" In the Hindu code the murder of a Brahmin is branded as a crime heinous in the highest degree, and the family of the present rulers of Waree has ever since been considered obnoxious to the implacable vengeance of the vindictive spirit of the murdered Desaee, particularly excited by using *the seal of the Koodal Province*, and what is assigned as a reason of its being never affixed by them, but by the hand of another person, in general a Brahmin, who by his sanctity, is supposed less liable to the spirit's revengeful malice. "

ब्रम्हसमंधाच्या त्रासानें सावंतांनीं तो मूळ शिक्का पुनः वालावलीच्या देवळांत पोंचविला आणि फक्त त्याची नक्कल ते ब्राह्मणाच्या हातून मारूं लागले. ( पृ. ६२ टीप पहा ). शिक्का परत करूनच सावंत राहिले नाहींत तर परिशिष्ट लेखांक १८ ( २ ) यांतील १२ व्या कलमावरून असें दिसतें कीं, त्या समंधाचें दैवत स्थापन करून त्यांनीं तें

---

१ याला दुसरा आधार परिशिष्ट लेखांक १३ या नागसावंत–पंतअमात्य यांच्या एकमेकांशीं एकाच कागदावर झालेल्या पत्रव्यवहाराचा. अमात्य नागसावंतास लिहितातः—" तुमचे वडील परंपरागत कैलासवासी राजश्री खेम सावंत भौंसले सरदेसाई याणी देवा ब्राह्मणाचे ठाई नीष्ठा धरून देवब्राह्मणाची स्थापना करीत

पाट्यावर पूजेस लाविलें. यांपैकीं कांहीं गोष्टी खेमसावंताच्याच कारकीर्दींत ( १६७५–१७०९ ) झाल्या आहेत, पण त्या वेळीं फोंडसावंताचेंहि राजकारणांत बऱ्याच प्रामुख्यानें अंग असे. वरील उपायांनीं समंधाची पीडा बंद न होतां ती पुढें चालूच राहिल्याचें दिसतें. फोंडसावंताचा

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

आले आहेत...'' यांतील ' देवाब्राह्मणाची ' **स्थापना** ह्मणजे वर दिलेली समंधाच्या दैवताची पाट्यावरील स्थापना होय.

परिशिष्ट लेखांक १३ चें छायाचित्र अंक १३ ( अ. ब. ) होय. या पत्राची योजना अशी दिसते कीं, त्याचा अर्धा भाग म्हणजे लेखनावधीच्या मुद्रेपर्यंतचा मजकूर नाग सावंतानें अमात्यास लिहिलेला आहे; आणि त्या पुढील, ह्मणजे 'विशेष बहुतां दिवशीं स्मरण करून ' इथपासून पुढील सर्व, अमात्यानें लिहून तें पत्र परत नाग सावंताकडे पाठवून त्याच्या कबूलीबद्दल त्याचा शिक्का मारून परत आपणाकडे घेतलें आहे. ही गोष्ट पत्र वाचतांच सहज ध्यानीं येण्यासारखी नाहीं. रा. राजवाडे यांनीं ( खंड ८ वा लेख १४० ) जणूं तें नागसावंताचेंच अमात्यांस पत्र आहे असें छापिलें असल्यामुळें तें वाचल्यावर आंतील मजकुराचा मेळ घालतां येत नाहीं. छायाचित्रावरून तें दोघांच्या हस्ताक्षरांचें असल्याचें सहज दिसून येतें. लेखनावधीची मुद्रा पत्राच्या शेवटीं मारण्याचा प्रघात असतां, ती या पत्रांत नागसावंतानें लिहिलेल्या मजकुराच्या शेवटीं मारलेली आहे. ( राजवाडे खंडांत तर तिचा कुठेंच निर्देश केलेला नाहीं ! ) मुख्य मुद्रा कागदाच्या डाव्या बाजूस मारलेली असते, ( नाग सावंताच्या दुसऱ्या एका कागदाचें छायाचित्र, अंक १४ पहा ). त्याप्रमाणें या पत्रांत ती पंत अमात्यानें लिहिलेल्या मजकुराच्या डावे बाजूस आहे. ही मुद्रा मारण्यासाठीं अमात्यानें आपल्या पत्राच्या भागांत मुद्रेच्या वर्तुळा एवढीच जागा मोकळी ठेविलेली दिसते. शिवाय नाग सावंताच्या स्वतःच्या पत्रांवरील अशा मुद्रेवरून ओळी काढून त्यावरील मजकूर मुद्रेला लागून लिहिलेला असतो, ( छायाचित्रांक १४ पहा ) त्याप्रमाणें या पत्रावरील मुद्रेवर ओळी काढलेल्या नसून अमात्यानें मजकूर मात्र मुद्रेला धरून लिहिलेला आहे. इतक्या गोष्टी लक्षांत घेतल्यावर हें पत्र एकट्या नाग सावंताचें नसून सावंत आणि अमात्य या दोघांचें असल्याची खात्री होईल. अशा तऱ्हेचीं राजकारणी पत्रें क्वचितच प्रसिद्ध झालेलीं आढळतात !

वडील आणि आवडता मुलगा नार[1] सावंत एकाएकीं मृत्यू पावला आणि त्याची बायको राजसबाई त्याच्याबरोबर सती गेली. मागें रामचंद्र सावंत हा चार वर्षांचा एक मुलगा राहिला. वरील कारणामुळें फोंड सावंत

१ या नार सावंताची माहिती रा. पिंगुळकरांनीं आपल्या इतिहासांत(पृ.५५।५६) पुढील प्रमाणें दिली आहे:—" सन १७१५ च्या सुमारास फोंडसावंतांच्या वडील बायकोचा मुलगा नारसावंत यानें बापाच्या विरुद्ध बंड केलें. याचें कारण असें कीं फोंड सावंत यांस पुष्कळ मुलें असून कुटुंब फार मोठें होतें. त्यांचीं मुलें श्रीमंत स्थितींत वाढलेलीं असल्यामुळें चांगले कपडे लत्ते व दागदागिने आपल्यास असावे अशी त्यांची इच्छा असे. फोंड सावंत हे बेताबातानें वागणारे व व्यवहारांत फार दक्ष असत. त्यांनीं आपल्या मुलांस ' स्वतः मिळवावें व खावें ' असें सांगितलें. त्यावरून राग येऊन नारसावंत यानें बंड केलें असें म्हणतात...... ह्या बंडाचा मोड करण्यासाठीं फोंड सावंत यांनीं त्यास पकडण्याकरितां कांहीं लोक त्याजवर पाठविले. ह्या लोकांनीं नारसावंत यास अगदीं जेरीस आणिलें; तेव्हां तो वाडी येथें जुन्या कोटांत जाऊन राहिला. तेथेंहि फोंड सावंतांचे लोक त्यास धरण्यासाठीं गेले. दोघांची चकमक सुरू झाली; त्यावेळीं नारसावंत हा खिडकींतून बाहेर पडत असतां त्यास अकस्मात् गोळी लागून तो ठार झाला. (इ. स. १७१६)" वरील हकीकतीला रा. पिंगुळकरांपाशीं काय आधार असेल तो असो, पण ती सयुक्तिक किंवा सुसंबद्ध अशी मात्र मुळींच दिसत नाहीं ! छानछोकीनें राहतां न येणें हें नारसावंताच्या बंडास कारण म्हणून देणें निव्वळ हास्यास्पद होय. शिवाय सर्वच मुलांना तें कारण असतांना त्यांच्यापैकीं एकहि नारसावंतास मिळाला नाहीं हें कसें ? बरें या बंडानें नारसावंताच्या मृत्यूपलीकडे कांहींच घडवून आणिलेलें पिंगुळकर सांगत नाहींत ! हा बंडखोर म्हटलेला नार सावंत बापानें पाठलाग केल्यामुळे जेरीस येऊन उलट बापाच्या घराशेजारच्या कोटांत येऊन राहतो हेंहि आश्चर्य होय ! आणि त्या ठिकाणीं बापाचे लोक त्यास **धरण्यासाठीं गेल्यावर** तो खिडकींतून बाहेर पडतांना त्याला **अकस्मात् गोळी लागून** तो ठार होतो हें त्याहीपेक्षां आश्चर्यकारक होय ! आयताच घराजवळ कोंडला गेलेल्या नारसावंतावर पहारा ठेऊन सवडीनें त्याला सहज पकडितां आलें असतें, तें न करतां

व त्याची बायको यांस अतिशय दुःख झालें. " शेवटीं आपल्या बायकोचें व आपल्या मनाचेंहि शांतवन व्हावें म्हणून नार सावंताचा अज्ञान मुलगा रामचंद्र सावंत याच्या गळयांत राज्याचे शिक्के घालून

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

त्याला धरण्यासाठीं पाठविलेल्या लोकांनीं त्यावर **अकस्मात्** गोळी सोडण्याचें कांहींच कारण नव्हतें ? याच नारसावंतानें आपल्या मृत्यूच्या पूर्वी फार तर कांहीं महिने वाडी संस्थानच्या हद्दींतील बांदें येथील देवस्थानाला जमीन इनाम दिल्याची एक सनद ( परिशि. ले ४१ ) रा. पिंगुळकरांनीं छापिली असून तिचा भोगवटा आजमितीसही चालू आहे. [ ही एकच सनद नसून आणखीही कित्येक सनदा आढळतात. ] बंडखोरीच्या वेळीं आणि बापाच्या संमतीशिवाय दिलेल्या सनदा फोंड सावंतासारखा धूर्त मनुष्य ( स्वतःच्या मुलांना गरिबींत ठेवून ) चालू ठेवील ही गोष्ट शक्य नाहीं. या सर्व गोष्टींवरून नारसावंताचें बंड हो पिंगुळकरांची नुसती एक कल्पना दिसते ! त्याच्या मुळाशीं खरी गोष्ट एवढीच कीं नारसावंत हा वाडीच्या कोटांत सन १७१६ सालीं कांहीं आकस्मिक कारणानें वारला व तो फोंड सावंताचा सर्वांत वडील आणि प्रिय पुत्र असल्यामुळें त्यास अतिशय दुःख झालें.

वरील विसंगतपणा आम्हीं एवढ्याच करितां दाखविला आहे कीं, पिंगुळकरांच्या इतिहासांत फोंडसावंताची दिलेली हकीकत बऱ्याच ठिकाणीं अविश्वसनीय आहे, ती कशी याचा एक मासला वाचकांस दिसावा.

१ पुत्राच्या मृत्यूनें दुःखित झालेले फोंड सावंताचें अंतःकरण, राज्यकारभार न सोडतां फक्त 'राज्याचे शिक्के' नातवाच्या गळयांत टाकून शांत कां व्हावें अशी शंका रा. पिंगुळकरांस आली नसेलच असें म्हणतां येत नाहीं ! कारण पुत्रविरह विसरण्याचा हा सोपा उपाय अन्यत्र कुठेंच ऐकिवांत नाहीं ! यावरून हचिन्सन साहेबांच्या बखरींतील शिक्क्याची माहिती वरील विधान करितांना पिंगुळकरांसमोर होती हें स्पष्ट आहे; पण तसें स्पष्ट सांगावयाचें मात्र त्यांनीं टाळलें आहे ! ही बखर आपण आधारास घेतल्याचें ते प्रस्तावनेंत सांगतात; पण माणगांवतर्फेच्या लखम सावंत नाइकानें कुडाळदेसायाला ठार मारल्यापासून तों पुढें शिक्क्याच्या गडबडीप-

त्याच्या नांवें ( फोंड सावंत ) आपण राज्यकारभार पाहूं लागले. " ( सा. सं. इ. पृ. ५६ ). याशिवायहि सावंतांच्या घराण्यावर कित्येक आपत्ति कोंसळल्याचें परंपरागत माहितीवरून समजतें. या संकटपरंपरेच्या शांतीसाठीं प्रभूंचा कुलदेव श्रीनारायण याचें तीर्थ घ्यावें म्हणून

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू ).

यंतची राज्यक्रांतिविषयक अतएव इतर किरकोळ माहितीहून शतपट महत्वाची माहिती मात्र ( पृ. ३८ व चालू प्रकरणांत वर दिलेला उतारा ) ते नेमकी गाळतात ! हे " राज्याचे शिक्के " कोणत्या मजकुराचे होते हें सांगण्याची संधि असूनहि, त्यांनीं मुग्धता स्वीकारलेली आहे. फोंड सावंताच्या कारकार्दीतील बरेच कागद परिशिष्टांत त्यांनीं छापिले आहेत, त्यांवर " शिक्का आहे " असें नुसतें मोघम झालें आहे, मजकूर मात्र दिलेला नाहीं ! उदाहरण लेखांक ५०।५१. " शिक्का आहे " या शब्दांवरून वरील दोन्ही कागद ( ते शेजारच्या सबनिसांच्याच घरचे असल्यामुळें ) त्यांस अस्सल पहावयास मिळाले होते यांत संशय नाहीं. यांपैकीं दुसऱ्या कागदांत फोंड सावंत विश्राम अनंत सबनीस यास लिहितो " कागदावर थोरला शिक्का करावा ऐसें नव्हतें परत सांगोन पाठविल्यावरून ( ह्म० सबनिसानें. ले. ) केला आसे." धाकट्या शिक्क्यापेक्षां थोरल्या शिक्क्यांत असें विशेष काय आहे, याबद्दल वाचकांस साहजिक उत्पन्न होणारी जिज्ञासा तृप्त न करतां त्यांना पिंगुळकरांनीं नुसती अटकळ करीत ठेविलें आहे, तें त्रिसराळूपणामुळें खात्रीनें नव्हे ! कारण शाहूछत्रपति, आंग्रे, पेशवे इत्यादींच्या शिक्क्यांतील मजकूर द्यावयास ते विसरले नाहींत ! हे " राज्याचे शिक्के " नारायण प्रभूच्या शिक्क्यावरून नकलले तेच बहुधा असावेत, कारण सावंतांनीं आपला असा सत्तादर्शक शिक्का कधीं मारल्याचें दिसत नाहीं ( पृ. ५७।५८ ). हे शिक्के वेस्ट्रॉपम्युझिअममध्यें नाहींत; कदाचित् जामदारखान्यांत असतील, पण संस्थानचे शिक्के कसे काय आहेत हें पाहण्यासाठीं आमच्यातर्फेनें मागें अर्ज केला असतां ह्या शिक्क्यांचे ठसे आह्मांस मिळाले नाहींत. यावरून, एकतर तसे शिक्केच नसतील, किंवा असल्यास हल्लीं कोणास माहित नसतील, किंवा माहित असल्यास देणें इष्ट वाटलें नसेल ! एकूण ते नाहींत असेंच आमच्यापुरतें धरून चालणें आह्मांस भाग पडलें ! यानंतर कांहीं महिन्यांनीं

१४ किंवा १७ ब्राम्हणांची नेमणूक करण्यांत आली. हें त्रासक, खर्चाचें व परस्वाधीन असणारें काम वाडींतच उरकून घ्यावें म्हणून जसें वालावलींत तळयाच्या कांठावर नारायणाचें पुरातन देवालय आहे त्याचप्रमाणें पण लहानसें टूमदार देवालय बांधून त्यांत वालावलीप्रमाणें लक्ष्मी—नारायण आणि गरुड या मूर्तींची स्थापना करून तिथून तीर्थ घेण्याला सावंतांनीं सुरवात केली. या व्यवस्थेनेंहि घरांतील बाधाबाध कमी होईना.

अशातऱ्हेची फोंड सावंताची अंतस्थ परिस्थिति असली तरी त्याच्या मागचा नारायणप्रभूचा ससेमिरा कांहींसा कमी झाल्यामुळें, त्याची सत्ता अधिकाधिक प्रबल होत चालली होती. विजापूरची अदिलशाही औरंगजेबानें धुळीस मिळविली होती; त्या मोंगलशाहीची दक्षिणेंतून हकालपट्टी मराठेशाहीनें केलेली होती; आणि मराठेशाहींतील सातारकरांचा अंकितपणा सावंतांनीं खेमसावंतांच्या वेळींच ( मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खं. ८ वा, लेख ६२ आणि सा. सं. इ. प. ले. २६ )

---

गेल्या दिसेंबरांत वाडीसंस्थानाधिपति श्रीमंत राजेबहादर बापूसाहेब ऊर्फ खेम सावंत भोंसले हे अधिकारग्रहणानंतर मुंबईस आल्यावेळीं त्यांजपाशीं, हे शिक्के असल्यास ते आह्मांस पहाण्याची परवानगी मिळावी अशी आह्मीं विनंति केली होती. पण श्रीमंतांना परत जाण्याची घाई असल्यामुळें तो प्रश्न तेवढ्यावरच राहिला; शिवाय तेव्हां आमच्या पुस्तकाच्या छपाईचें कामहि सुरू झालेले असल्यामुळें, शिक्के पहावयास मिळतील या बहुतांशीं व्यर्थ ठरणाऱ्या आशेवर छपाईचें काम खोळंबून ठेवणें आह्मांस इष्ट वाटलें नाहीं.

१ देऊळ बांधल्यानंतर लौकरच फोंड सावंत वारला असें दिसतें. त्यानंतर देवळाकडे सावंतांची भजणूक होती कीं काय तें समजत नाहीं, पण शेवटीं काय झालें असेल तें असो या देवळाच्या हद्दींत सावंताच्या राजघराण्यांतील मृतांचे उत्तरविधि होण्यास सुरवात झाल्याचें समजतें ! पुढील काळांत या देवालयावरून सावंतांची स्वारी गेल्यास देवळाच्या बाजूस अबदागीर धरण्याचा प्रघात पडून देवळाचें दर्शन घेण्याचें सावंतांनीं वर्ज केलें असेहि समजतें.

स्वीकारलेला होता. राहतां राहिले कोल्हापूरकर छत्रपति. त्यांच्याशींहि एकनिष्ठपणें वागण्याची अट सावंतांनीं रामचंद्रपंत अमात्य बावडेकरांपाशीं कबूल केली होती; तीच पुढें कायम राखिली ह्मणजे झालें ! परंतु हें स्वतः फोंडसावंतासारख्या महत्वाकांक्षी आणि पराक्रमी पण बेधोरणी मनुष्याच्या हातून होणें शक्य नव्हतें; ह्मणून तें फोंडसावंताच्या दुसऱ्या बायकोचा मुलगा नागसावंत यानें आपल्या शिरावर घेतल्याचें त्याच्या पत्रव्यवहारावरून दिसतें. रा. पिंगुळकरांनीं नागसावंताची फारच थोडी माहिती दिली आहे. तिच्यावरून वाचकांची अशी समजूत होते कीं, तो बापाचा आणि वाडीचा संबंध अजीबाद सोडून हेरें—चंदिगडें महाल स्वपराक्रमानें जिंकून तिकडेच राहिला; पण वस्तुस्थिति तशी दिसत नाहीं. कारण चंदिगडें महाल नागसावंतास जिंकावयाचें कारणच नसून तो पूर्वींच शाहू महाराजांनीं सावंतांस इतर महालांबरोबर इनाम करून दिला होता ( सा. सं. इ. प. लेख २६ ). अर्थात् नागसावंत आपल्या बापाच्या तर्फेच त्या भागावर देखरेख करीत होता हें उघड झालें ! पण त्यानें वाडीचा संबंध तोडला होता असें नाहीं. कारण फोंडसावंताच्या मृत्यूनंतर अवघ्या तीनच महिन्यांत त्यानें भगवंतराव पंतअमात्य यांस प्रांत कुडाळ येथील देशकुळकर्णाची सनद दिली आहे. ( परिशिष्ट लेखांक १६ ). यावरून वाडी प्रांतावर त्याचा वारसा कायम होता हें उघड दिसतें. इतकेंच नव्हे तर बहुधा बापाच्या पश्चात् नागसावंताच्याच हातीं वाडीप्रांताचीं अधिकारसूत्रें आलीं, पण तो लवकरच वारला असावा. रा. पिंगुळकरांनीं अवघ्या पांचच ओळींत नागसावंताची आपल्या इतिहासांत जी संभावना केली ती एकतर कागदपत्रांच्या अभावीं असेल किंवा कांहीं हेतूनेंहि असेल, तें त्यांचें त्यांना ठाऊक ! असो. वरील सनद भगवंतराव अमात्य यांची भेट प्रथमतःच किल्लेगगनगडच्या मुक्कामीं जाहली तिच्या स्मरणार्थ, अर्थात् अमात्यांशीं जडलेला स्नेह कायम

टिकावा या हेतूनें, नाग सावंतानें त्यांस दिलेली कांहीं कमी प्रमाणावर अद्यापि चालत आहे. करवीरकरांच्या तर्फेचे पंत अमात्य यांची ही भेट होण्यासाठीं नागसावंतानें केलेला पत्रव्यवहार ( परिशिष्ट लेखांक १०,१२ १३,१४ ), तसेंच सौ. मनाबाई सरदेसाईण ( नागसावंताची सून ? ) इचें पत्र ( लेखांक ११ ), हीं सर्व सावंत आणि करवीरकर छत्रपति यांच्या लढाईस पुनः सुरुवात ( १७३० ) झाल्यानंतरचीं आहेत. यांवरून, वर ह्मटल्याप्रमाणें फोंडसावंताची महत्वाकांक्षा आणि अविचार यांमुळें वाडीप्रांतावर आलेलें विघ्न दूर करण्यासाठींच नागसावंताचे हे प्रयत्न होते असें निःसंशय ठरतें. या प्रयत्नांत त्यास बापाची आंतून संमति होती हें सांगावयास नकोच.

वरील पत्रव्यवहारावरच नागसावंतानें ( अर्थात फोंड सावंताच्या सांगण्यावरून ) मागें ८ व्या प्रकरणांत सांगितलेला शिक्का मारिलेला आहे. हा शिक्का म्हणजे प्रभु घराण्याकडील शिक्क्यांत सांपडलेला ब्राम्हण नागदेव सामंताच्या शिक्क्याची नक्कल होय हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे. नागसावंतानें ही नक्कल करावयाचें कारण पुढील प्रमाणें दिसतें. प्रभूंची सत्ता बळकावून सावंतांस फक्त २५।३० वर्षें झालीं होतीं; त्यांतहि नारायण प्रभूचा ससेमिरा सुटून फार तर ५।१० वर्षें झालीं असतील; शिवाय त्या प्रांताचा वंशपरंपरेचा मूळ मालक खुद्द नारायणप्रभू तर अद्यापि हयात होता. अशा स्थितींत इतर राजे रजवाड्यांच्या दृष्टीनें सावंतांस विशेषसा दर्जा प्राप्त होणें शक्य नव्हतें, खुद्द वाडींत सावंतांनीं हा प्रश्न प्रभूंचाच कुडाळप्रांताचा शिक्का उपयोगांत आणून सोडविला, पण नागसावंत वाडीच्या राजकारणांत आपल्या बापास हरतऱ्हेनें मदत करीत असला तरी चंदिगडें महालावरचा कांहींसा स्वतंत्र अधिकारी या समजुतीनें वागत असल्यामुळें त्याच्या नांवाच्या पत्रव्यवहारांत वाडकर सावंत वापरीत असलेल्या शिक्क्याचा उपयोग

होण्यासारखा नव्हता. त्यास स्वतःच्या नांवाचा, शेजारच्या राजेरजवा-ड्यांच्या बरोबरीच्या थाटाचा असा शिक्का वापरावयास असणें जरूर होतें. पण तसा स्वतंत्र शिक्का पाडावयाचें धैर्य त्याच्या वाडवडिलांस झालें नाहीं, तर त्याला स्वतःला कुठून होणार ? म्हणून त्यानें आपल्या वडिलांचाच किता गिरविला ! म्हणजे नारायणाच्या देवळांतून आणि-लेल्या प्रभुघराण्याच्या शिक्क्यांमधील ( ब्राम्हण ) नागसामंताच्या शिक्क्याचा उपयोग करण्याचें मनांत आणिलें. कारण शिक्क्यांत नांवाला नांव अगदीं हुबेहुब होतें, आडनांवहि तेंच पण जरा निराळ्या म्हणजे शुद्ध स्वरूपांत. पण त्याचें परक्यांनां कांहीं विशेष वाटण्यासारखें नव्हतें—शिवाय ती एका अर्थीं इष्टापत्तीच होती ! शिरोभागीं असलेला 'मांगलाख्यमहेश्वर' हा तर सावंतांस सहज लीलेनें प्राचीन काळांत नेणारा जणुं ईश्वरच भेटला ! ह्या प्राचीनपणास 'सामंत' हें शुद्धरूप विशेष जुळण्यासारखें असून शिवाय त्यामुळें 'सावंत' हे पुरातन काळीं कोणा चक्रवर्तीचे सामंत ह्मणजे मांडलिक होते अशी जनतेची समजूत व्हावयाची आयतीच सोय झाली ! असा सर्वतोपरि सोइस्कर हा शिक्का असला तरी तो मूळ घेऊन मारणें धोक्याचें आहे, अशी प्रभूंच्या दुसऱ्या, म्हणजे 'कुडाळ प्रांताच्या,' शिक्क्यासंबंधीच्या अनुभवावरून सावंतांची समजूत झाली होती; यामुळें या शिक्क्याचीहि त्यांनीं नक्कलच केली ( पृ. ६६ ). मूळ शिक्क्यांतील मांगलाख्यमहेश्वराच्या जोडीस मठ गांवांतील मांगलेश्वर होता—म्हणजे त्याच्याच नांवानें तें देऊळ बांधलेलें होतें हें आम्हीं मागें दाखविलेंच आहे. पण ब्राम्हण सामंतांचा शिक्का आतां मराठे सावंतांचा असा केल्यावर, मांगलाख्यमहेश्वरहि अर्थात मराठे सावंतांचा पूर्वज बनला ! पण ज्या कारणामुळें नागसावंतानें मूळ शिक्का न वापरतां नक्कल वाप-रिली, त्याच कारणामुळें त्यास मांगलेश्वराचें असलेलेंच देऊळ मराठ्यांचें

म्हणवेना; म्हणून त्यानें त्याची नक्कल त्याच्याच शेजारीं केली, आणि तिला मांगला ऊर्फ मांग सावंत असें म्हणण्याचा प्रघात पाडिला ! आणि जुन्या मांगलेश्वराचें तें नांव अजीबाद उडवून टाकण्यासाठीं, त्यास नवीन 'स्वयंभू' असें नांव दिलें. हेंच नांव कां पसंत करण्यांत आलें यासहि पुढील कारण असावें ! स्वयंभू हें दिगवळयाच्या प्राचीन शिवालयाचें नांव आहे. ( पृ. १०७ ) त्या देवास सन १६९६ त टोप घालणारा, आणि 'मांगलादेव तो मांगसावंत होय' अशी प्रथमच नोंद ज्या कागदांत आहे ( पृ. ५० ) त्या कागदाचा मालक ( कदाचित् उत्पादक ) चिटणीस ( सावंतांचा एक मुत्सद्दि ) हे दोघे मूलतः एकाच घराण्यांतील होत. ( पृ. १०८ ) म्हणून मठ गांवांतील हें देऊळ वरील दिगवळयाच्या देवळासारखें प्राचीन आहे अर्थात् त्याच्याशीं वाडकर सावंतांचा कांहीं संबंध नाहीं असें दाखवावयास सावंतांच्या या मुत्सद्यास 'स्वयंभू' हें नांव सुचणें साहजिक होय ! दुसरें एखाद्या प्राचीन मनुष्याचें नांव द्यावयाचें तर तें कोणाचें हाहि प्रश्न होताच ! शिवाय तसें एखादें नांव दिल्यास, मनुष्याच्या नांवाचीं अशीं एकाच ठिकाणीं दोन देवळें होऊन, तसें एकच एक देऊळ असल्यानें जितका ठळकपणा मांग सावंतांच्या कल्पनेस येईल, तितका तो येणार नाहीं !

वरील नकलेस आणखी खऱ्याचें रूप द्यावयास तेथीलच एक वस्तु त्यांस आयतीच उपयोगी पडली, ती शिलालेख होय. शिलालेख १४ व्या शतकांतील आहे, आणि मांगल्याचें देऊळ, रा. पिंगुळकरांनींच दिलेला मांग सावंताचा काल घेतला तरी, सोळाव्या शतकाच्या अखेरीस, किंवा आम्हीं वर दाखविल्याप्रमाणें १८ व्या शतकाच्या सुरवातीस, बांधिलेलें आहे. यावरून शिलालेख त्या देवळाच्या अगोदर तयार झाला असून, अर्थातच तो जुन्या मांगलेश्वराच्या ( सध्यांच्या स्वयंभू ) देवळांत असला पाहिजे. त्या लेखांत "भामसावतु" असें नांव दिसलें; तेवढ्या-

-वरून त्यास उचलून या नवीन देवळांत ठेविलें-हेतु असा कीं, शिलालेखांतील सावतामुळें देऊळ सावंतांच्या पूर्वजांचें दिसावें, शिलालेखाची प्राचीनता देवळास आणि त्यांतील देवास मिळावी आणि शिलालेखासारख्या चिरंजीव लिखाणानें देवळावरहि सावंतांचा छाप कायमचा बसावा !

ही सर्व कारवाई विलक्षण असली तरी, स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे प्रभूंच्या कुडाळ प्रांताच्या शिक्क्याची नक्कल करणाऱ्यांकडून, प्रभूंच्या शिक्क्यावरील अक्षरें काढून टाकविणाऱ्यांकडून, नारायणाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवरच देऊळ बांधविणाऱ्यांकडून, गादीवरील प्रभूंचा

---

१. शिलालेखाचा असा उपयोग करण्याचें, त्यांतील ' सावतु ' या शब्दामुळेंच सावंतांच्या मनांत आलें हें उघड आहे. पण त्यांतील ' माम ' या शब्दाचाहि उपयोग ' मांग ' हें नांव रूढ करण्याकडे झाल्याचें पुढें अगदीं अनपेक्षित रीतीनें आमच्या प्रत्यक्ष अनुभवास आलें ! आह्मीं त्या गांवीं माहिती मिळविण्यासाठीं गेलों असतां, तेथील जुन्या व बुद्रुक लोकांची समजूत काय ती प्रथम पाहिली. आपणास इतिहास वगैरे कांहीं माहित नाहीं, " मांगलादेव तो हा " असें ह्मणून त्यांनीं त्या शिवपिंडीकडे बोट दाखविलें. " वाडकर सावंताचा मूळ पुरुष तो हाच कीं काय ? ही तर शंकराची पिंडी आहे. " असें आह्मीं ह्मणतांच, " तें काय गौडबंगाल आहे तें आपणास माहीत नाहीं, पण मांग सावंत ह्मणून जो ह्मणतात तो हा नव्हे, तो पहा त्या पाषाणांत लिहिला आहे तो मांग सावंत खरा. " असें ह्मणून त्यांतून ज्याला वाचतां येत होतें त्यानें शिलालेखांतील " मामसावतु " हीं अक्षरें वाचून पाहण्याची आह्मांस शिफारस केली. तीं अक्षरें आह्मीं पूर्वीच वाचून पाहिलीं होतीं ह्मणून त्यासच तीं पुनः वाचावयास सांगितलीं. त्यानें मुखोद्गत केल्याप्रमाणें पुनः " मांग सावंतु " ह्मणून न अडखळतां चटदिशीं वाचून टाकलें. आमच्याकडे स्थूलदर्शक कांच होती. त्यांतून तीं अक्षरें पुनः वाचावयास त्यास सांगितलीं. तेव्हां " मामसावतु " अशीं अक्षरें दिसतांच तो आपल्या इतक्या दिवसांच्या समजुतीबद्दल खजिल झाला !

खून करणाऱ्यांकडून आणि प्रभु घराण्याचा समूळ नाश करावयास उद्युक्त होणारांकडून ती होणें अशक्य नाहीं ! शिवाय ती सावंतांच्या हातून झाली तरी ती सर्वस्वीं सावंतांच्याच बुद्धीनें झालेली नव्हे ! सावंतांच्या मुत्सद्यांचीं डोकीं तेव्हां शाबूद होतीं, आणि तीं प्रभूंशीं बेइमान आणि प्रभूंच्या ज्ञातीविषयीं तीव्र द्वेषभावानें भरलेलीं होतीं ! हें लक्षांत घेतल्यास वरील कारवाईचें विशेष आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं ! असो.

सावंतांनीं वरील कारवाई तत्कालीन् राजकारणामुळें केली खरी; पण ती लाट ओसरतांच, तिच्याबरोबर मांगसावंतहि वाहून गेला; आणि सावंतांच्या वंशजांच्या स्वप्नांतहि त्याचा मागमूस राहिला नाहीं. पण मांग सावंताची " नोंद " सावंतांच्या मुत्सद्यांनीं करून ठेविली होती; तिच्या आधारावर सावंतांच्या पुढील लेखनकारांनीं त्यास सावंतांच्या कपाळीं लिहिण्याचा प्रघात पाडला; तो कसा याचें सविस्तर विवेचन आम्हीं मागें केलेंच आहे.

येथवर केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, मांग सावंत नामक वाडकर सावंतांचा पूर्वज काल्पनिक—त्याच्या नांवानें बांधलेलें देऊळ मात्र खरें ! पण आश्चर्य हें कीं, तें देऊळ नसून छत्री किंवा मठ ( माठें किंवा थडगें ) आहे अशी खोटीच कल्पना रा. पिंगुळकर करितात; आणि तिला पुनः दुसऱ्यांच्या कल्पनेची जोड देतात कीं, " याच कारणानें ( म्ह. मठ बांधिल्यामुळें ) होडावड्याच्या या भागास ' मांगल्याचा मठ ' असें नांव पडून तो स्वतंत्र गांव झाला. " अर्थात् मांगसावंताची छत्री बांधण्यापूर्वी तो शेजारच्या होडावडें गांवाचाच एक भाग होय. आतां वरील उपपत्तींत सुचविल्याप्रमाणें कांहीं विशिष्ट वस्तूंचें नांव सभोंवारच्या देशभागास पडल्याचीं उदाहरणें बरींच

१ रा पिंगुळकरांचा पहिला आधार चिटणीसाचा कागद ( पृ. ५० ) तोही या देवळास देऊळच म्हणतो; पण तें पिंगुळकरांस सोईचें वाटलें नसावें !

आहेत यांत संशय नाहीं. उदाहरणार्थ, अमृताचें सर ( सरोवर ) त्यांत आहे म्हणून त्या शहराचें नांव अमृतसर, पांच नद्या आहेत म्हणून त्या प्रांताचें नांव पंजाब ( पांचनद्या ), मोंगलांची सराई ( धर्मशाळा ) आहे ह्मणून त्या भागास मोंगलसराई हें नांव, बागलांची राई ( समूह ) असल्यामुळें त्या भागाचें नांव ' बागलांची राई ' ( हें ठिकाण मठगांवापासून ४।५ मैल आहे. ) पण वरील उदाहरणावरून स्पष्ट होईल कीं, अशा तऱ्हेनें बनलेलीं हीं नांवें नेहमींच आहेत तशीं जोड वापरण्यांत येतात आणि आलीं पाहिजेत. अमृतसर न ह्मणतां नुसतें सर, मोंगलसराई न ह्मणतां नुसतें सराई किंवा बागलांची राई न ह्मणतां नुसती राई, असें फार तर सहज बोलण्यांत येईल, लिहिण्यांत—विशेषतः सनदा वगैरे सारख्या महत्वाच्या लिखाणांत कधींहि येणार नाहीं. या दृष्टीनें पाहिल्यास ' मौगल्याच्या मठाचें ' नांव ' मांगल्याचा मठ ' असें अखंड ह्मणजे दोन्ही शब्द असलेलेंच—नेहमीं पाहिजे. पण सन १६६४ सालीं लखमसावंताच्या तर्फे पीतांबर शेणवी ( चिटणीस ) यानें महंमद अदिलशहाच्या दरबाराकडे अर्जी करून लखमला १० गांवच्या इनामतीची सनद मिळविली. त्या सनदेंत (सा. सं. इ. परिशि. ले. ९ ) नमूद केलेल्या दहा गांवांत मौजे मठ व मौजे होडावडें असे दोन पृथक गांव लिहिलेले असून, ' मठ ' याच्यामागें ' मांगल्याचा ' हा शब्द नाहीं. हा मठ गांव रा. पिंगुळकरांनीं लिहिल्याप्रमाणें लखमच्या मूळपुरुषाच्या मठावरून नांव मिळालेला असता तर, त्याचें वर सांगितल्याप्रमाणें 'मांगल्याचा मठ' हें अखंड नांवच विजापूरकरांनीं सनदेंत लिहिलें असतें; तें तोडून नुसतें ' मठ ' असें लिहिण्याचें त्यांस कारण काय ? सनद लिहून घेणारा पीतांबर शेणवी सावंतांचें नांव मुद्दाम तोडील ही शंकाच नको ! कारण कोणते गांव इनाम मागून घ्यावे हें सोईप्रमाणें त्यानेंच सुचवून त्यांचीं नांवेंहि त्यानेंच लिहून दिल्याप्रमाणें सनदेंत यावयाचीं ! आतां

रा. पिंगुळकरांच्या मतें मांग सावंत सन १५८० त वारला; तेव्हां लवकरच त्याचा मठ ( समाधि, छत्री, किंवा माठें ) बांधला असला पाहिजे. सन १६६४ साल हें या मठाच्या कितीतरी नंतरचें! आणि ज्याअर्थी या सालीं नुसतें 'मठ' असें एकेरी नांव चिटणिसानें आणिलेल्या सनदेंत येतें त्याअर्थी, वर दिलेलीं उदाहरणें विचारांत घेतां तें 'मठ' नांव मांगल्याच्या 'मठा' वरून तयार झालेलें नव्हे! उलट 'मठ' हें त्या गांवाचें नांव अगोदरचेंच असतां, पुढें फोंड सावंताच्या कारकीर्दीत मांगला तयार केला, त्यानंतर त्या मांगल्यास रूढ करण्याकरितां मठगांवच्या मागें 'मांगल्याचा' हा शब्द घालण्याचा मुद्दाम प्रघात पाडल्याचें दिसतें; आणि म्हणूनच तें जबरीचें नांव अद्यापिहि प्रचलित झालेलें[१] नाहीं.

याप्रमाणें रा. पिंगुळकरांच्या मांग सावंताचा आणि तदनुषंगीक कल्पनांचा ( पृ. २ ) शेवट केल्यावर, आतां आपण आपल्या समोर मठगांवांत फक्त एकच देऊळ ठेऊन, त्यांत त्या शिलालेखाची पूर्ववत् स्थापना करून, राजवाडे–पिंगुळकरांच्या तत्संबंधीं विधानांचा विचार करूं.

---

१. चिटणिसांच्या कागदांत सुद्धां मठ आणि होडावडें हे दोन निराळें गांव म्हणूनच उल्लेखिलेलें असून 'मठ' याच्या मागें मांगल्याचा हा शब्द नाहीं.

२. तिसरे खेमसावंत यांनीं सन १७९७ सालीं पिंगुळकरांच्या जातीच्या गुरूस दिलेल्या सनदेंत तळवडें तर्फेतील १२ हि गांवांतून लावून दिलेल्या उत्पन्नाच्या यादींत, तसेंच क्यापटन् हचिन्सननें (सन १८१८) दिलेल्या वाडीप्रांतांतील गांवाच्या यादींतहि, नुसतें 'मठ' असेंच नांव आहे. यावरून खुद्द दरबारी लिखाणांतहि 'मांगल्याचा मठ' हें नांव प्रचलित नाहीं हें उघड दिसतें.

# प्रकरण १३ वें.

## शिलालेख ब्राम्हण सामंतांचाच !

शिलालेखासंबंधीं रा. राजवाडे यांनीं केलेल्या विधानांची[1] चिकित्सा करण्यापूर्वीं, त्यांचें आम्हांस वाटत असलेलें वाचन व अर्थ, हीं प्रथम देणें जरूर आहे. कारण तो निदान पांच सवापांचशें वर्षांचा जुना असल्यामुळें, कांहीं अक्षरें स्पष्ट लागत नाहींत, कांहींचीं वळणें कोरक्याच्या चुकीमुळें भलतींच झालीं आहेत, अतएव आमचें वाचन राजवाड्यांच्याहून कित्येक स्थळीं निराळें झालें आहे, व त्यामुळें अर्थांतहि थोडासा फरक पडलेला आहे. आम्हीं तो प्रत्यक्ष, व नंतर सफेद रंग भरून घेतलेल्या छायाचित्रावरून, वाचिला. याच छायाचित्रावरून पुण्याचे इतिहाससंशोधक रा. आबा चांदोरकर यांनींहि तो वाचिला, व टिपण गेल्या नवंबरच्या विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध केलें. त्यांतील कांहीं शब्द, आम्हीं लाविले होते त्यापेक्षां अधिक योग्य व संदर्भास अधिक जुळणारे वाटल्यावरून, आम्हीं स्वीकारिले आहेत; आणि आतां आमच्या मतें तो शिलालेख पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

---

१ रा. राजवाडे यांनीं या शिलालेखाचा भाषा दृष्टीनेंहि विचार केलेला आहे. ते म्हणतात. " ह्या लेखांतील अक्षरें जाधवांच्या तेराव्या शतकांतील अक्षरांसारखीं आहेत. त्या लेखांत सकु, संवतु, दीनु, हे शब्द जुने मराठी धर्तीचे आहेत. दळवै ( सेनापति ), आखर ( अक्षर ), टाक, द्राम, वरीसे, हेहि शब्द जुने मराठी आहेत. ह्या लेखांत फारशी शब्द किंवा प्रयोग एकहि नाहीं. ह्यावरून शके १३१९ त म्हणजे इ. स. १३९७ त दक्षिण कोंकणांत सावंतांच्या ( ? ) राज्यांत शुद्ध मराठी भाषा चालत होती असें दिसतें. '' वास्तविक ही गोष्ट या शिलालेखावरूनच अनुमित केली पाहिजे असें नाहीं. कारण त्या कालीं राजवट ब्राम्हण सामंतांची होती, आणि मुसलमानांचा प्रवेश त्या प्रांतांत झाला नव्हता, यावरूनच ती बाब निश्चित होते. पुढें १५ व्या शतकांत त्या प्रांतांत मुसलमानी अंमल झाल्यामुळें प्रत्यक्ष सत्ता ब्राम्हण प्रभू यांजकडे असूनहि मराठीची शुद्धता थोडीशी कमी झाल्याचें परिशिष्टांत दिलेल्या तत्कालीन कांहीं कागदांवरून दिसतें. या शिलालेखांतील अक्षरांत ' भ ' चें वळण, श्रीकारावरील तिरपी रेघ आणि ' र ' या अक्षराचें ( सध्यांच्या मोडी ' र ' सारखें )' वळण पुढें प्रभूंच्या राजवटींतहि १६ व्या शतकाच्या अखेरपर्यंत कायम राहिलीं, पण ' भ ' चें वळण बदललें, असें भानजी प्रभूचा शिक्का आणि छाया चित्रांक ४ वरून दिसून येतें.

## शिलालेख.

ओळ

( १ ) थथ्थी श्री शाळीवान सकु कु १३१७ वरीखे चीत्रभानु
( २ ) संवसर आदीक वेउळ् ३ गुरुवारी चांदगडाजुजीपती तत्यसी
( ३ ) देषायी दळ्वै याने याचा पीता भाम सावतु त्यदोद्दीसी उपभो
( ४ ) गासी दत वीडा धुपा तेला द्दया उपभोगासी दत
( ५ ) रौक्य टाके १४ आखेरतोपी टांके चौदा उपभोगासी
( ६ ) देउळाच्य कोमाचा वेचु द्राम १५०० दळवैपणोखे जाले दीनु आर्थे भडखंबा थापीला दीनु नीधी वेचु द्राम ६०० आल्यरतोवी सासु
( ७ ) उपभवासी भाम सावता देषायी दळ्वै यादोद्दीसी भुमी भन्यया २ ची मडाची मेर उघुवृची मेर नैची मेर सडेखडीयेची मेर आभन्ययची

यांत रा. राजवाडे यांच्या वाचनाहून आमचें वाचन बऱ्याच स्थळीं भिन्न असलेलें दिसून येईल. पण त्यांत महत्वाचीं अशीं दोन तीनच स्थळें आहेत. पहिलें. दुसऱ्या ओळीच्या शेवटचीं ३, आणि तिसऱ्या ओळीच्या आरंभींचीं ३ मिळून ६ अक्षरें. रा. राजवाडे तीं ' नऱ्यसी-देवाचा' अशीं वाचतात, आणि पुनः त्यांचा संदर्भहि भलताच लावितात! वास्तविक ' चा ' या प्रत्ययावरून अगदीं उघड आहे कीं, भाम सावत हा ( नऱ्यसीदेवाच्या ) दळव्याचा बाप; पण राजवाडे तो खुद्द नऱ्यसी-देवाचाच बाप म्हणतात ! शिवाय ही विचित्र चूक आम्हीं त्यांच्या नजरेस आणल्यावरहि ते उलट तिचेंच पुढील विलक्षण पद्धतीनें समर्थन करितात ! चांदगडाचा अधिपति नऱ्यसी, जो देवाचा दळवी

होता, ( " येथें देव हा शब्द ईश्वरवाचक आहे "! ) त्या नऱ्यसीचा भाम सावंत हा बाप होय ! यांतील 'देवाचा दळवी' म्हणजे काय, अथवा देव पृथ्वीवर आपले दळवी नेमीत असतात कीं काय, याचें स्पष्टीकरण रा. राजवाडे करते तर ठीक होतें ! हींच सहा अक्षरें मागें ( पृ. ५० ) दिलेला चिटणिसाचा कागद बनवितांना वाचविण्याचा प्रसंग आला, तेव्हां त्या लेखकानें पहिलीं ३ अक्षरें वाचलींच नाहींत, पुढच्या तिहींतील शेवटचें 'चा' ( राजवाड्यांप्रमाणेंच ) नजरे आड केलें; आणि 'देव दळवी' यास भाम सावंताचा मुलगा बनविलें! पुढें रा. पिंगुळकरांस भाम सावंताच्या मुलाचें नांव देण्याचा प्रसंग आला तेव्हां त्यांनीं इकडे तिकडे कांहीहि न पाहतां बेलाशक राजवाडे आणि चिटणिसांचा कागद या दोघांनीं वर दिलेलीं दोन निरानिराळीं नांवें जोडून 'नऱ्यसीदेव दळवी' असें एक तिसरेंच नांव तयार केलें ! वास्तविक आम्हीं वर दाखविल्याप्रमाणें हीं अक्षरें '**तत्यसी देषार्थी**' अशीं आहेत, 'नऱ्यसी देवाचा' अशीं नव्हेत; हें आम्हीं त्या शिलालेखांतील जरूर त्या अक्षरांचे नमुने ( ठसे=Blocks ) पुढें दिले आहेत, त्यांवरून स्पष्ट होईल. पहिलीं तीन अक्षरें (२) ऱ्या ठशांत ( शेवटचीं तीन ), आणि पुढचीं ३ (३) ऱ्या ठशांत आहेत. पहिल्या अक्षराचें वळण मागच्या ( 'पती' यांतील ) 'त' सारखें आहे, (१) ल्या ठशांतील ('भानु' यांतील) 'न' सारखें नाहीं; 'न'ची आडवी रेघ आरंभीं सरळ असून पुढें खालच्या बाजूस एकदम मुरडलेली आहे–उदाहरणार्थ, पहिल्या ओळींतील 'शाळीवा**न**' ६ व्या ओळींतील 'दी**नुनी**धी' इत्यादि; पण या अक्षराची रेघ आरंभापासूनच कलती असून पुढें मुरडलेली नाहीं. यावरून तें अक्षर 'न' नसून 'त' होय. दुसरें अक्षर जोड आहे. पण जोडलेला तो 'र'कार नव्हे; 'र'कार प्रत्येक स्थळीं चंद्रकोरेप्रमाणें वरच्या बाजूस वळलेला आहे हें (७) व्या ठशांतील दुसऱ्या अक्षरावरून तसेंच

मठगांवच्या शिलालेखांतील कांहीं अक्षरांचे नमुने.

(१)



(२)



(३)



(४)



(५)



(६)



(७)



पहिल्या ओळींतील 'वरीखे,' दुसऱ्या ओळींतील 'संवसर' पांचव्या ओळींतील 'रौक्य' इत्यादि अक्षरांवरून दिसतें; त्याचेंहि वळण 'त'चेंच आहे. जोड अक्षराचा दुसरा भाग 'य' च्या वळणाचा आहे. अर्थात् जोड अक्षर 'च्य' नसून 'त्य' होय. याप्रमाणें पहिलीं तीन अक्षरें ' **तत्यसी** ' अशीं होतात. ( चांदोरकर टिपण. ) ' **तत्यसी** ' हें ' **तद्वशी** ' याचें विकृत रूप होय. ' **वंश** ' हा शब्द बोलतांना स्पष्ट ' **वस** ' किंवा ' **वँस** ' असा म्हणण्याचा त्या प्रांतांत विशेषतः खालच्या लोकांत अद्यापिहि प्रघात आहे. 'द्' आणि 'त्' यांच्या उच्चारांतील सूक्ष्म भेदहि कोरक्याच्या लक्षांत न येणें साहजिक आहे. म्हणून ' तद्वंशी ' असा शब्द सांगणाऱ्यानें सांगितला, तो कोरक्यास ( तत्+वसी ) ' तत्वसी ' असा कोरावयाचा होता, पण कोरतांना 'त्व' हें 'त्य' असें कोरलें गेलें. पांचवें अक्षर (३) ऱ्या ठशांत किंचित् 'वा' सारखें दिसतें. पण तोच शब्द ( व त्याच्या पुढचा 'दळवै' हाहि ) पुढें ७ व्या ओळींत आला आहे, त्यांत तें (६) व्या ठशांत दाखविल्याप्रमाणें 'ळा' सारखें दिसतें. पण 'ळ' यास खालच्या बाजूस ( अर्ध्या 'त' कारासारखी ) वांकडी रेघ जोडलेली असते हें (४)थ्या ठशांतील ' दंळूवै ' वरून, तसेंच दुसऱ्या ओळींतील ' बेउळू, ' सहाव्या ओळींतील ' देउळूाच्य ' आणि 'दळूवै पणोखे ' यांवरून दिसतें. म्हणून बहुधा तें अक्षर 'षा' असावें. 'ष'चें पोट फोडणारी रेघ व पोटाची डावी बाजू हीं 'ळ' च्या डाव्या गांठीप्रमाणें एकदम वळविणें संभवनीय आहे. अर्थात तो शब्द ' **देषायी** ' असा होतो. ( चां. टि. ) ' देषायी ' किंवा ' देशायी ' असें ' देसाई' याचें जुनें रूप कित्येक लेखांत आढळतें. सहावें अक्षर आकारान्त नसून त्याची वेलांटी अगदीं स्पष्ट आहे. शिवाय तें 'च' नसून 'य' आहे. 'च'

१ 'द'वर वास्तविक मात्रा नसून, कोरतांना हात घसरलेला आहे.

२ अनागोंदी येथील जुन्या संस्थानिकाच्या घराण्यानें दिलेल्या एका सनदेंत ' देशायी कृष्णराय, ' आणि बळारीच्या किल्ल्यांतील हनुमानजीच्या देवळाजवळील

आणि 'य' हीं अक्षरें जवळ जवळ सारखीं दिसलीं तरी त्यांतील सूक्ष्म भेद ' याचा ' या (५) व्या ठशावरून स्पष्ट दिसतो. 'च' मध्यें डाव्या बाजूची वरची रेघ अगदीं वरपर्यंत वळून, शिवाय खालच्या रेघेबरोबर तिचा कोन अगदीं स्पष्ट होतो. उदाहरणार्थ, १ ल्या ओळींतील 'चीत्र-भानु,' दुसऱ्या ओळींतील ' चांदगडाजुजीपती, ' सहाव्या ओळींतील 'वेचु' इत्यादि. दुसरें स्थळ. ६ व्या ओळींत रा. राजवाडे यांनीं वाचिलेलें ' एखंधर याचीला ' हें ' भडखंबा थापीला ' असें स्पष्ट आहे. भडखंबा म्हणजे दीपमाळ. तिसरें. सातव्या ओळींतील राजवाड्यांचें ' ओंयूव्ययी ' हें ' उधुंब्रची ' म्हणजे औदुंबराची ( मेर ) असें आहे. या शिलालेखाची भाषा जुनी असून, पुनः त्यांत कोरक्यानेंहि बऱ्याच चुका केल्या आहेत. म्हणून अशा शब्दांचें त्यांच्या संदर्भासह स्पष्टीकरण करून, निरानिराळ्या वाक्यखंडांचा अर्थ पुढें आम्हीं देत आहों.

' **थष्थी......गुरुवारी.** ' **थष्थी**, स्वास्ति. **सकु**, शके. **कु**, मागच्या ' कु ' ची ही द्विरुक्ति चुकून झाली आहे. **वरीखे**, वर्षे. **आदीक**, भाद्रपद. **वेउळ**, ( बहुल ) कृष्णपक्ष.

**स्वस्ति श्री शालिवाहन शके १३१७ चित्रभानु संवत्सरे, भाद्रपद कृष्ण तृतीया गुरुवार रोजीं**[1].

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

शके १५७८ च्या शिलालेखांत ' देशायी वाबासाहेव ' असें 'सा'बद्दल 'शा' आणि 'ई' ऐवजीं 'यी' असलेलें रूप आढळतें. तोच प्रकार कुडाळप्रांतांतहि आढळतो. ( भानजी प्रभु सरदेसायी हा शिक्का पहा. पृ. २० ). पण तेथें 'स' बद्दल 'ष' लिहिण्याची विशेष वहिवाट दिसते. उदाहरणार्थ शिलालेखांतील पहिल्या शब्दांत [स्व] 'स्ति' 'बद्दल 'ष्थी;' देमभूपालाच्या ताम्रपटांत 'स्वयंभ' बद्दल 'ष्वयंभ' आणि 'स्वर्ग' याजबद्दल 'ष्वर्ग'.

१ ' आदीक ' म्हणजे ' अधिक ' ( महिना ) असें रा. राजवाडे व रा. चांदोकर दोघेहि समजतात; त्यामुळें शकाचा आंकडा, नांव, महिना इत्यादीं मध्यें त्यांना

' **चांदगडाजुजीपती...यानें.** ' **चांदगडाजुजीपती**, चांदगडचा अधिपति; **तत्यसी**, तद्वंशी=त्याच्या वंशाचा किंवा घराण्याचा. **देषार्यी दळवै**, देसाई असून सेनापतीच्या अधिकारावर असलेला. **दळवै यानें**= दळव्यानें.

**चांदगडाधीशाच्या घराण्याच्या पिढीजाद देसाई दळव्यानें.** ( चांदगडच्या घराण्याचा दळवीपणा ज्या देसायांच्या घराण्यांत वंशपरंपरा चालत आला होता त्यानें ).

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

परस्पर-विरोध दिसतो. म्हणून हा प्रश्न आम्हीं मुंबईचे ज्योतिर्गणिती डॉ. वसंतराव रेळे यांनां विनंति करून त्यांजकडून सोडवून घेतला. डॉक्टरसाहेब ' आदी ( क )' हें तामील भाषेंत एका महिन्याचें नांव आहे असें म्हणतात. या प्रश्नावर त्यांनीं एक विस्तृत टिपणच लिहिलें आहे, तें आम्हीं टिप्पणीच्या भागांत ( टिप्पणी ११ ) जोडलें आहे.

१ याला आज ' चंद्गड ' किंवा ' चंदिगडें ' असें म्हणतात. हें ठिकाण बेळगांवच्या पश्चिमेस सुमारें २२ मैलांवर असून त्याच नांवाच्या महालाचें मुख्य ठाणें आहे. या ठिकाणीं, कुडाळ प्रांतांत बहुतेक सर्वत्र आढळणाऱ्या ' रवळनाथ ' देवतेचें एक प्राचीन देवालय असून त्यांत फारशी लिपीचा एक शिलालेख असल्याचें समजतें. ही देवता विषूचिका ( महामारी ) रोग-प्रतिबंधक असल्याची तेथील लोकांची समजूत आहे. या गांवांत एक जुना पडका किल्ला आहे. त्यावरून या गांवांस......गड हें नांव प्राप्त झालें असावें. चंद्गड हें नांव १४ व्या शतकांत रूढ असल्याचें या शिलालेखावरून सिद्ध होतेंच. परंतु तत्पूर्वी त्याचें नांव ' **चंद्रपूर** ' असावें असें हेमचंद्र आणि अभ्ययतिलक ( जैन ) यांच्या द्याश्रयकोश नामक ग्रंथावरून दिसतें. या ग्रंथांत अशी माहिती आहे कीं अनहिलवाड्याचा चौलुक्य राजा कर्ण ( पहिला ) यानें दक्षिण देशांत चंद्रपूर येथें राज्य करणाऱ्या कदंबवंशी जयकेशी राजाची मुलगी मयानल्लदेवी इच्याबरोबर लग्न केलें ( Ind. Ant. Vol IV. P. 233 ) जयकेशीच्या राज्यांत ' चंद्रपूर ' या नांवाचें ठिकाण आढळत नाहीं; पण त्यांत सध्यांच्या चांदगडाचा समावेश होत असे. यावरून चंद्रपूर हें चंदगडाचेंच मूळ संस्कृत नांव असावें !

—'याचा पीता भाम सावतु त्यदोद्दीसी.' याचा, असलेल्या चांदगडाधीशाचा. त्यदोद्दिसी, त्यास सद्गति मिळावी म्हणून.

**चांदगडाच्या अधिपतीचा बाप भाम सावतु यास सद्गति मिळावी म्हणून.**

'उपभोगासी......चौदा.' उपभोगासी, म्हणजे मांगलेश्वर ( सध्यांच्या स्वयंभू ) महादेवाच्या. **दत**, दिले. **वीडा**, तांबूल. **धुपा**, धूप. **तेला द्देया**, तेल आदिकरून यांकरितां. उपभोगासी दत, हे दोन्ही शब्द पहिल्या ओळींतील 'कु' प्रमाणें व्यर्थ दिरुक्त झाले आहेत. **रौक्य**, रौप्य=रुप्याचे. **टाके**, एकनाणें. **आखेरतोपी**, अक्षरीं.

**देवाच्या उपभोगास तांबूल, धूप, तेल इत्यादींकरितां १४ अक्षरीं चौदा रुप्याचे टांके दिले.**

'उपभोगासी......जाले.' **कोमाचा**=झाडसारवण, दुरुस्ती वगैरे कामाचा. **वेचु**, वेंच=खर्च. **द्राम**, हें एक नाणें आहे. **दळवैपणोखे जाले**, दळवीपणाचे झाले=सेनापतीच्या कामाबद्दल मिळालेले.

**देवळाच्या कामासाठीं दळवीपणाची तैनात ह्मणून मिळत असलेले १५०० द्राम खर्च.** सबंध दळवीपणाचें उत्पन्नच आपल्या धन्यासाठीं आपण खर्च करित आहों, असें सांगण्यांत स्वामिनिष्ठा आणि धन्याबद्दल उत्कट भक्ति दाखविण्याचा या देसायाचा हेतु उघड आहे.

'दीनु आर्थे......सासु.' दीनु याचा अर्थ बरोबर लागत नाहीं. **आर्थे**, करितां, साठीं. **भडखंबा**, दीपमाळ. **थापीला**, स्थापिला. **दीनु**, दिवशीं. **नीधी**, निधि=रक्कम. **सासु**, सहाशें.

**......साठीं दीपमाळ बांधिली त्या दिवशीं ६०० अक्षरीं सहाशें द्राम रकमेचा खर्च ( केला ).**

'उपभवासी......यादोद्दीसी.'

**देवाच्या उपभोगास भामसावताचा देसाई-दळवी** ( यानें ) **त्यास** ( भामसावतास ) **सद्गति मिळावी ह्मणून.**

'**भुमी......आभऱ्ययची.**' भऱ्यया २ ची, दोन भरे भात उत्पन्नाची. **मडाची,** मठाची=मठ गांवची. ( मड किंवा मढ हे शब्द मठ या शब्दाबद्दल १३, १४ व्या शतकांतील मराठी लेखांत आढळतात. ) **मेर,** सीमा. **उंबुवुर्ची,** औदुंबराची ( हा बांधलेला औदुंबर असावा ). **नैर्ची,** नदीची; 'नै' किंवा 'न्हय' हा शब्द विशेषत: त्या प्रांतांतील खालच्या लोकांत प्रचलित आहे. **सडेखडीयेर्ची;** हें नांव '**सडेखांदी**' या रूपांत आज एका जमिनीस प्रत्यक्ष चालू आहे. **आभऱ्ययची,** आंबराईची.

**२ भरे उत्पन्नाची मठगांवांतील, जमीन** (दिली; तिच्या सीमा ) **औदुंबराची सीमा, नदीची सीमा, सडेखांदीची सीमा, आंबराईची सीमा.**

या चतुःसीमांतून नदी आणि सडेखांदी या दोन, आज प्रत्यक्ष तेथें आहेत. औदुंबर, सीमा दाखविण्यास उपयोगी पडेल इतका प्रसिद्ध व पुराणा, तेथें जवळपास दिसत नाहीं; पण अशा तऱ्हेचा बराच विस्तीर्ण असा एक ६०।७० वर्षांपूर्वीं होता असें तेथील गांवकऱ्यांकडून समजलें. आंबराई म्हणण्यासारखी आज तेथें नाहीं, आणि सवापांचशें वर्षांपूर्वींची आज राहणेंहि शक्य नाहीं. असो.

हा शिलालेख 'भाम सावतु' नामक चांदगडाच्या पिढीजाद अधिकाऱ्याचें स्मारक म्हणून त्याच्या दळव्यानें कोरविलेला आहे. पण हा 'सावतु' कोण ? रा. राजवाडे त्यास वाडकर ( मराठे ) सावंतांचा पूर्वज म्हणतात हें आम्हीं पहिल्याच प्रकरणांत ( पृ.२ ) सांगितलें आहे; परंतु त्यांनीं आपल्या म्हणण्यास स्पष्ट आधार दिलेला नाहीं; बहुधा त्यांनीं असा अंदाज बांधिलेला दिसतो कीं, 'सावंत' वाडी संस्थानांत

असल्यामुळें, शिलालेखांतील ‘ सावंत ’ हें नांव तेथील संस्थानाधिपतीचें होय. पण ते वाडकर सावंत इतके प्राचीन म्हणावयास दुसरा एक तरी आधार आहे कीं काय, सावंतवाडी हें नांव कधीं तयार झालें, दुसरे कोणी सावंत होते कीं नाहीं, इत्यादि मुद्यांवर रा. राजवाडे यांच्या समोर माहिती आलेली नव्हती. पहिल्या दोन मुद्यांवर आम्ही पुस्तकाच्या पूर्व भागांत तसेंच ठिकठिकाणीं टीपेंत माहिती दिलेली आहे. तिच्यावरून स्पष्ट होईल कीं, इ. स. च्या १७ व्या शतकापूर्वी सावंतांचें इतिहासांत नांवहि नाहीं; आणि प्रथमच दिसतें तें माणगांव तर्फेचा नाईक म्हणून, आणि तत्पूर्वी, रा. पिंगुळकरांनीं दिलेल्या गुराखीपणाच्या तत्वार्थावरून पहातां खेड्यांतील अत्यंत गरीब मराठ्याचा मुलगा म्हणून[1]!

---

१ अशा तऱ्हेनें अत्यंत गरिबींतून पुढें, सावंतांपेक्षां शतपट राज्य वैभव प्राप्त करून घेतल्याचीं उदाहरणें सबक्तगीन ( तुर्कीगुलाम ), शम्स-उद्दीन अल्तमश, ( तुर्कीगुलाम ), मलिक खुस्रू ऊर्फ नासिरुद्दीन ( बाट्या हिंदु ), युसुफ अदीलशहा, हैदरनाईक यांचीं डोळ्यांसमोर असतांना, सावंतांच्या या गरिबीच्या आरंभाबद्दल त्यांच्या मुत्सद्यांस आणि इतिहास लेखकांस विषाद वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें! कारण कोणतेंहि राजघराणें आकाशांतून एकदम वैभव मिळवून खालीं उतरत नसतें! मुलगा, नाहीं तर बाप आजा, कोणास तरी गरिबींत सुरवात करणें भाग पडतेंच! किती आणि कसें वैभव मिळविलें हाच काय तो इतिहासदृष्टीनें महत्वाचा प्रश्न होय. त्याच्या विचारांत आरंभींच्या गरिबीकडे कोणाचें लक्ष जात नाहीं, आणि गेल्यास ती गरिबी दूषण नसून भूषण मानिली जाते! पण ही सरळ गोष्ट लक्षांत न घेतां, सावंतांचे एक मुत्सद्दी सावंतांच्या मूळ पुरुषाच्या दैन्यावस्थेंत त्याचे अन्नदाते होते हें दाखविण्याकरितां ती दैन्यावस्था तर दाखवावयाचीच, पण तिच्या मागें त्यांस खेंचून शिसोदिया कुळामार्फत सूर्य वंशांत सोडावयाचें, असा प्रयत्न त्यांच्या इतिहासलेखकांनीं करावा हें आश्चर्य होय! आणि तो कशाच्या जोरावर, तर मठगांवांतील एक देऊळ आणि तेथील शिलालेख हीं वाडकर सावंताचीं होत असें मुद्दाम किंवा नकळत मानून! पैकीं पहिला मांग सावंताचा प्रयत्न किती हास्यास्पद झाला आहे हें आम्हीं मागेंच सविस्तर दाखविलें; त्यानंतर आतां हा दुसरा-भाम सावंताचा; याचा निकाल वरील प्रकरणांत केला आहे.

' सावंत ' वाडी हें नांव सावंत उदयास आल्यानंतर, पुढें १७ व्या शतकाच्या अखेरीस निघालें, तत्पूर्वी त्या प्रदेशाचें नांव कुडाळ प्रांत असें होतें. तिसऱ्या मुद्याबद्दल आम्हीं येथवर पुरावे देऊन असें सिद्ध केलें आहे कीं, ' सावंत असें क्वचित् नांव लिहिणारे ( पण सामान्यतः शुद्ध ' सामंत ' असें रूप लिहिणारे ) ब्राम्हण ज्ञातीचे ' सामंत ' ' सावंतांच्याच ' वाडी प्रांतांत आजहि आहेत, आणि ते ११ व्या शतकापासून स्थायिक झालेले आहेत, तसेंच ह्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत त्यांचें विस्तीर्ण राज्य होतें—ज्याचा एक लहानसा भाग म्हणजे सध्यांचें ' वाडी संस्थान ' होय, ज्या ( आणखी शेजारच्या कांहीं ) भागावर १५ व्या शतकानंतर पुढें १७ व्या शतकाच्या तृतीय पादापर्यंत त्यांचेच आप्तसंबंधी ' प्रभु ' यांनीं सरदेसाईपणा केला, तोच पुढें या वाडकर सावंतांनीं बळकाविला.

भामसावताचा काल ( सन १३९५ ) वरील ब्राह्मण सामंतांच्या राजवटींत येतो. तसेंच भामसावत ज्या चांद्गडावर पिढिजाद् अधिकारी होता तो चांद्गड आणि शेजारचा भाग ब्राह्मण सामंतांच्या राज्यांत येत असे हें १० व्या प्रकरणांत आलेंच आहे. याचा प्रत्यक्ष

---

१ " या कुडाळदेशी ब्राह्मणांचीं मूळ उपनांवें काय असतील तीं असोत; पण चारशें वर्षांच्याही पलीकडच्या कागदांत त्यांस प्रभु, देसाई, सामंत असें म्हटलेलें आढळतें. पंधराव्या शतकाच्या समाप्तीच्या सुमारास कुडाळप्रांत विजापूर अमलाखालीं गेला, त्या वेळचे कुडाळचे देसाई यांजकडे त्यांची देसकत त्यांकडे काईम केल्याबद्दल फरमानें आहेत. त्यांत त्यांस प्रभूदेसाई असेंच म्हटलें आहे. गांवची राजसत्ता ज्या मराठ्यांकडे आहे त्यांत साटम, राणे, दळवी, टिवळे व सावंत ( सामंत या शब्दाचा अपभ्रंश ) इत्यादि आहेत. सामंत शब्द ज्यांच्याकडे राजसत्ता आली अशा मराठ्यांनाही पुढें लावूं लागले. सांप्रतचे वाडी प्रांताचे अधिकारी यांचें उपनांव भोंसले; पण तेही वोटवणे वगैरे गांवचे पाटील व राजसत्तेचे मालक असल्यामुळें त्यांसहि सावंत (सामंत) हें पद आलें." ( वि. ज्ञा. वि. पु. १८ पृ. ७८ सन १८८६ )

उल्लेख सामंतांच्या जागीं आलेल्या प्रभु सरदेसायांच्या राजवटींतील एका कागदांत मिळतो तो असा: " तपे चांदगड तपे याचे गाऊ ८४ असामी गाव आणि ११ वाडीया." इतक्या गांवांवर ' दोनै देसाई ' असत आणि या देसयांच्यावर त्या सबंध भागाचा बंदोबस्त ठेविणारा अधिकारी चांद्गडावर असे. यावरून ' भामसावतु ' हा वरील ब्राह्मण सामंत कुलाची चांद्गडच्या भागावर राज्य करणारी शाखा, तिच्यांतील पुरुष ठरतो; आणि त्याचें स्मारक करणारा त्याचा दळवी हा वरील दोन देसायांपैकीं एक, किंवा दुसऱ्या एखाद्या देसाई कुळांतील दिसतो.

याच्या उलट, कोणताहि पुरावा न देतां, केवळ नांवावरून १७ व्या शतकाच्या मागें ३ शतकांच्या दीर्घ कालोदरांत एकहि सावंत नांवालाहि दिसत नसतां, त्याच्या पलीकडे असलेल्या भाम सावतास अलीकडील सावंतांचा पूर्वज म्हणणें ही दुसरी ' मांगसावंती ' च होय ! आणि खरें पाहतां ती तिच्याच बरोबर निर्माण झालेली आहे; कारण ' मांग सावंता ' ची नोंद करणाऱ्या चिटणिसाच्या कागदांतच ती आहे. तेथें ती कालविपर्यासामुळें ( पृ. ५० ) निरुपयोगी ठरली, पण राजवाड्यांसारख्या इतिहासज्ञांनीं हातीं धरतांच तिला विलक्षण बळ चढलें ! कारण पिंगुळकरांचा मांग सावंत, स्वकुलास फक्त १५ व्या शतकाच्या शेवटापर्यंत ओढीत नेतो; तर राजवाड्यांचा भाम सावंत आणखी मागें, १४ व्या शतकाच्या मध्यापर्यंत आणि १४ वें शतक गांठतांच, ' सावंत ' या नांवापूर्वींच त्यांचें भोंसले हें नांव होतें या आधारावर ( ? ) त्याच्याहि मागें १३ व्या शतकांत—खेंचीत नेतो ! या दुसऱ्या टप्प्यावर जातांना रा. राजवाडे म्हणतात:—" सावंतांचें मूळ आडनांव भोंसले. भाम सावंताचें आडनांव सावंत होण्यास

१ यांतील एकाचें ठाणें ' आंबरोली ' नांवाच्या गांवीं असे. सध्यां सावंतवाडी संस्थानांत मोडणाऱ्या घांटमाथ्यावरील ' आंबोली ' गांवचें हें जुनें नांव असावें.

त्याच्यापूर्वी दोन चार पिढ्या त्याचे पूर्वज कोणातरी चक्रवर्ती राजाचे मांडलिक असले पाहिजेत. त्याशिवाय भोंसले हें आडनांव जाऊन सावंत हें आडनांव पडावयाचें नाहीं. अर्थात, १३६० च्या पूर्वी शंभर वर्षें सावंतांचें कूळ कोंकणांत सावंत ह्या नांवानें महशूर होतें असें दिसतें. म्हणजे इ. स. १२६० च्या सुमारास हे भोंसले आडनांवाचे सावंत हयात होते हें उघड आहे." (मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खं. ८ वा. पृ. ९७). पण ह्या उडीची सगळी मदार 'भाम सावतु' हा मराठा सावंत ठरण्यावर आहे; आणि त्याला तसा ह्मणावयास रा. राजवाडे कोणताच पुरावा देत नाहींत; उलट आम्ही मात्र पुरावा देऊन तो ब्राह्मण सामंत होय असें वर दाखविलें आहे. अर्थात् मूळचाच आधार अशा रीतीनें डळमळल्यावर वरच्या आधाराची बळकटी तपासण्याची मातबरीच काय ? असो.

या चांद्गडाधीश भामसामंताचें शिलालेखद्वारा कायमचें स्मारक परक्यानें (त्याच्या सेनापतीनें) करावयास, अशी कोणती संस्मरणीय कामगिरी त्याच्या हातून घडली हा प्रश्न साहजीक मनांत उद्भवतो. त्या कामगिरीची साधारण रूपरेषा स्मारकांत दिसली पाहिजे हें उघड आहे.

पण लेखांत तिजबद्दल कांहींच उल्लेख नाहीं, तेव्हां चित्रांत त्याचें थोडेंतरी दिग्दर्शन असलें पाहिजे यांत संशय नाहीं. हीं चित्रें पुढील प्रमाणें आहेत. कलश, गणपति, सूर्य[1], चंद्र, पूजारी, शिवलिंग, नंदी, आणि शिवभक्त राजघराण्यांतील स्त्रीपुरुष; विजयोत्सवाचा आनंद प्रदर्शित करण्याकरितां स्त्रीजनांच्या खांद्यावर हात ठेवून नृत्य करीत असलेला राजपुरुष (यांत एक राजा आणि राणी असावीं), लाढाईत


---

१. सूर्य–चंद्र यांच्या आकृति १२ व्या शतकापूर्वींच्याहि कोरींव पाषाणांवर बहुतेक सर्व प्रांतांत आढळतात. सूर्य–चंद्र हे केल्या कृत्याचे अक्षय साक्षीदार असून त्यांच्या अस्तित्वापर्यंत तें चालावें अशी कर्त्याची इच्छा दर्शविण्यासाठीं त्या आकृति कोरण्याचा प्रघात पडला असावा.

कापलेलें योध्याचें शीर तबकडींत ठेवून तें देवीला ( रणदेवतेला ) अर्पण करणारा सैनिक, शत्रूच्या प्रेतावर पाय देऊन उभा असलेला व हातांत ढाल तरवार घेतलेला ससैन्य उभा असा सेनापति व धनुष्यबाणयुक्त एक सैनिक, तसेच हातांतून भाले फेंकणारे घोडेस्वार इत्यादि. लेख-शिलेच्या दोहोंबाजूंस असलेल्या शिला त्याच जातीच्या दगडाच्या असून त्यांवरील चित्रेंहि बतुतेक तशींच आहेत. अर्थात त्या सर्व शिला मिळून एकाच प्रसंगाच्या निमित्तानें तयार झालेल्या असून तो प्रसंग ह्मणजे धर्मसंबंधी युद्ध होय. यास दुसरें प्रमाण असें. स्वयंभूच्या ( ? ) देवळाच्या बाजूस चबुतरे बांधलेलीं अशीं ७।८ लहान मोठीं थडगीं आहेत. देऊळ अगोदरचें असल्यास तेथें थडगीं कोणी बांधीत नाहींत, किंवा थडगीं अगोदरचीं असतां जवळ एक मोठें शिवालय कोणी बांधणार नाहीं. यावरून देऊळ आणि थडगीं यांचा परस्परांशीं कांहीं विशेष संबंध आहे यांत संशय नाहीं. आणि तो असा कीं, त्या शिवा-लयाचें कोणा शैवेतराच्या हल्ल्यापासून रक्षण करण्याकरितां ज्या वीरांचे प्राण खर्ची पडले त्यांचीं तीं थडगीं होत. या प्रमाणांवरून भाम सामंताचें स्मारक करण्याचा हेतू आपणांस कळून येतो-तो हा कीं, वरील वीरांबरोबरच धर्मकार्यार्थ भाम सामंतानें धारातीर्थीं देह ठेविला. तेथें सर्वांत मोठें असें एक थडगें दिसतें, ज्याच्यावर शिवलिंग आहे, तेंच बहुधा भाम सामंताचें असावें. त्याच्या उत्तरेच्या बाजूस कांहीं अंतरावर 'सतीचें टेंब'[1] नामक एक क्षेत्र आहे. येथें भाम सामंताची बायको सती गेली असावी, असें त्याच्या स्मारकशीलेंत सीमा दिल्या आहेत त्या या भूमीस बहुतांशीं लागू पडतात, त्यावरून दिसतें.

1. टेंब म्हणजे उंच जागा. या टेंबाच्या जागेवर मोडकळीस आलेलें एक सतीचें थडगें असून त्यांत सूर्य-चंद्र यांच्या आकृती असलेली एक कोरींव शिला आहे. तिचा निंमे भाग जमिनींत पुरल्यासारखा झाल्यामुळें इतर आकृति दिसत नाहींत: मध्यभागीं सतीची आकृति कांहीं वर्षांपूर्वी दिसत होती असें समजतें.


चित्र अंक ३३



कुडाळ प्रांतांतील ब्राह्मण सामंतांच्या राजवटींतील कोरींव पाषाण.

( मधल्या पाषाणाच्या शिरोभागीं कलशाकृति आहे. )

चित्र अंक ३४



कुणकेश्वर देवळानजीक असलेल्या गुहेंतील शिवोपासक राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचे मुखवटे.

J. A. P. W

वर उल्लेखिलेलें शैवमतसंरक्षण एकाच प्रसंगीं, सामंत घराण्यांतील एकट्या भामानेंच, आणि तें फक्त एका मठ गांवांतच केलें असें नव्हे; तर सबंध कुडाळ प्रांतांत त्या सबंध ब्राह्मण सामंत वंशानें आपल्या चार शतकांच्या राजवटींत, शैवमताचा फैलाव जारीनें चालवून त्या मताची स्थापना आज दिसते तशी कायमची करून टाकिली. यास पुरावा. भाम सामंताच्या स्मारक शिलेच्या जातीचे आणि तशींच शिव-भक्तिदर्शक चित्रें कोरलेले असे शेंकडों पाषाण आज कुडाळ प्रांतांत सर्वत्र आढळतात. त्यांतील अनेकांवर कलश कोरलेला असतो. उदा-हरणार्थ, छायाचित्रांक ३३ मधील मधल्या शिलेवरील आकृति पहा. या तिन्ही पाषाणांच्या खालच्या दालनांत शिवभक्तिपरायण राजाराणींचीं चित्रें दाखविलीं आहेत. या पाषाणांची पूर्वी एका ब्राह्मण घराण्याकडून पूजा होत असे, व ते **ब्राह्मण** नांवाच्या देवतेच्या देवळांत देवाजवळ आहेत. ह्या राजा राणीच्या प्रतिमा आणि लेखशिलेच्या दुसऱ्या दालनां-तील शिवलिंगाच्या शेजारीं बसलेल्या, स्त्रीपुरुषांच्या प्रतिमा या त्यांच्या आभरणांवरून आणि घडणीवरून एकाच घराण्याच्या दिसतात. ( दिगवळ्याच्या देवळानजीक अशा शिला असल्याचें पृ. १०७ वरील टीपेंत नमूद केलें आहे ).

हे पाषाण सामंतांच्या राजवटींतील असून, दुसऱ्या कोणाच्या राज-वटींतले नव्हेत असें निश्चितपणें सांगणारें एक चिन्ह त्यांतील बहुते-कांवर आहे; तें शिलेच्या शिरोभागीं असलेला कलश होय. हा कलश कुडाळ प्रांतांतील कित्येक देवळांत 'कुळ' या नांवानें पूजिला जातो. 'कुळ' म्हणजे सामंत राजकुल देवता; या सामंतांनीं मूळच्या देव-स्थान व्यवस्थेंत फेरफार करून आपल्या राजवटींत शिवोपासनेचा फैलाव केल्यामुळें त्यांच्या राजदैवतासहि तेथील देवस्थान व्यवस्थेंत स्थान प्राप्त झालें. तेथील अनेक कोरींव शिलांत एक पाषाण असतो, त्यावर इतरांत

दिसणाऱ्या बहुतेक सर्व आकृति असून एका दालनांत भोयांच्या खांद्या-वर असलेल्या पालखींत एक राजघराण्यांतील पुरुष बसलेला असतो; त्याच्या हातांत नग्न तरवार असून पालखीच्या मागेंपुढें सशस्त्र सैनिक असतात. या पाषाणाला 'राजसत्तेचा देव' अथवा 'राजसत्तेचा पाषाण' असें ह्मणतात. या जातीचे पाषाण अनेक गांवांतून आढळतात, तसे ४।५ वेस्ट्रॉप म्युझिअम्‌मध्येंहि आहेत. मठगांवच्या धाकट्या देवळांतील डावीकडून ५ वा पाषाण याच जातीचा होय. त्याच्या शेवटच्या दालनाचा भाग फुटून गेला आहे. या प्रांतांतील बहुतेक सर्व देवळांत 'तरंग' या नांवाच्या देवता असतात. 'तरंग' हा माणसाच्या उंचीचा असा लांकडाचा एक गुळगुळीत केलेला गोल सोट असतो, त्याला निरनिराळ्या रंगांचे पट्टे असतात. या तरंगांवर पितळेचे अगर रुप्याचे मुखवटे (स्त्रीपुरुषांचे), नुसता हाताचा तळवा, किंवा कलश असे बसवून आणि रेशमी किनारीचीं धोत्रें किंवा लुगडीं नेसवून ते विशेष प्रसंगीं पूजिले जातात. हे तरंग गांवदेवसकीच्या वेळीं गांवचे विरतिक खांद्या-वर घेऊन आपापल्या शक्तीप्रमाणें आंगांत अवसर आणितात. वर सांगितलेले स्त्रीपुरुषांचे मुखवटे वगैरे ह्या देवता होत अशी तिकडील भाविकांची समजूत दिसते. पण ती आह्मांस अगदीं चुकीची वाटते. वास्तविक हे मुखवटे, ज्यांनीं तेथील देवस्थानव्यवस्था लाविली त्या राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचीं स्मारकें असलीं पाहिजेत. कारण या तरंगांच्या सान्निध्यानें पिशाच्च संचाराप्रमाणें विरतिक अवसर आणतात त्यावरून त्या देवता नसून, त्यांचा संबंध (spirit प्रमाणें) मनुष्याशींच येतो हें उघड दिसतें. या मुखवट्याचा संबंध छायाचित्रांक ३४ यांत दाखविलेल्या शिवोपासक राजघराण्यांतील मुखवट्यांशीं असावा असा तर्क होतो. कुणकेश्वराच्या टिप्पणींत दिलेल्या माहिती-वरून हे सर्व शिवोपासक राजघराण्यांतील दिसतात. आमच्या मतें ज्या सामंतांनीं तेथील देवस्थानपद्धति लावून दिली त्यांचेच

हे ( कुणकेश्वर येथील ) मुखवटे असून त्या प्रांतांतील तरंगांवर दिसणारे मुखवटेहि त्याच राजघराण्यांतील होत; आणि तरंगांवरील कलश सामंतांची कुलदेवता होय, जिला पुढें 'कुळ' हें संक्षिप्त नांव प्राप्त झालें. प्रत्येक राजघराण्याचें एक विशिष्ट चिन्ह असे; उदाहरणार्थ; चालुक्यांचें वराह, यादवांचें गरुड, कलचुरींची तरवार, होयसळांचा हत्ति; ( कलचुरी आणि होयसाळ हे दोन्ही वंश मूलतः जैनधर्मी असल्यामुळें त्यांच्या कोरींव शिलांवर, इतर ठिकाणच्या शिवलिंगाच्या जागीं जैनतीर्थकरांच्या प्रतिमा असत; पुढें होयसळ सनातनधर्मी बनल्यावर तयार झालेल्या शिलांत शिवलिंग किंवा विष्णुमूर्ति कोरण्याचा प्रघात पडला. ) कदंबाचा सिंह, इत्यादि. याप्रमाणें कलश हें सामंतांचें विशिष्ट चिन्ह होय—नागदेवाच्या ताम्रपटांत सांगितल्याप्रमाणें, जान्हवीतीरावरून हे सामंत आले म्हणूनच गंगोदकपूर्ण कलश हें त्यांनीं चिन्ह स्वीकारलेलें दिसतें.

सामंतानीं कुडाळ प्रांतांत वाढविलेला शैवपंथ अद्यापि तेथें तसाच चालू आहे. हें लक्षांत घेतां, कोणासहि वाटेल कीं सामंतांच्या राजवटींतील शैवमतप्रतिपादक अशा शेंकडों शिला कुडाळ प्रांतांत सांपडतात त्या यथोचित आदरानें ठिकठिकाणीं ठेविलेल्या असतील ! पण नाहीं; त्या आज देवळांबाहेर कुठें तरी राईंत, झाडींत, उघड्यावर इतस्ततः पडलेल्या आहेत ! हीच स्थिति कित्येक पूजनीय देवतांची झालेली आहे ! सावंतवाडीच्या वेस्ट्रॉपम्युझिअममध्यें असल्या २००।२५० मूर्ति आणि कित्येक शिला १८८०।८२ सालीं गांवोगांवाहून आणून ठेविल्या आहेत; त्यांतून एकट्या चराठें गांवातूनच २४ शिला आणि २२ देवता नेल्या. चराठें हें खेम सावंतांचें ठिकाण होतें. तें दाट जंगलाचें ठिकाण

१ शिवाजीनें कुडाळप्रांतावर स्वारी केली त्या वेळीं दबा धरून राहण्यास सुरक्षित जागा ह्मणून लखम सावंतानें चराठें पसंत केलें. नंतर शिवाजीनें " प्रभावलीकर

म्हणूनच त्याच्या वडिलांनीं पसंत केलें होतें; व्यवस्थित गांव असा तो मुळींच नव्हता. अशा जंगलाच्या ठिकाणीं एकदम इतक्या शिला आणि मूर्ति दुसऱ्या अनेक गांवांतून काढून आणिल्याशिवाय जमणें शक्य नाहीं. या शिला आणि मूर्ति अशा स्थितींत कां याजबद्दल जाणत्या नेणत्यानीं आजवर निरनिराळीं विधानें केलेलीं आहेत. कोणी म्हणतातः त्या जीर्ण झाल्यानें बाहेर काढून टाकिल्या. पण हें म्हणणें सर्वांनांच लागू पडण्यासारखें नाहीं—कांहीं शिला आणि मूर्ति तर अगदीं काल कोरल्याप्रमाणें दिसतात; शिवाय एका विशिष्ट ठिकाणीं अशी एक शिला फुटलेली असूनहि पूजेस लाविलेली आहे ! दुसरे कोणी, महाराष्ट्रांत इतर ठिकाणीं लागू पडणारें विधान याहि ठिकाणीं जाणून बुजून किंवा नकळत करितात; तें असें कीं " त्या जैनांच्या म्हणून ब्राम्हणी धर्माच्या स्थापनेच्या वेळीं बाहेर फेंकून दिल्या[1] " ( वि. ज्ञा. वि. पु. १८ पृ. ८१ ) हें म्हणणें बरोबर आहे कीं काय तें ठरावावयास प्रथम जैनमूर्ति कशा असतात हें पाहणें जरूर आहे.


---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त )

हरजी राजे व सर्याजी यांसी मारून चालविले श्रींगारपुराहून ते लखम सावंतांचे आसरेसी आले सनईहिदे मधें चराठीयेस जागा करून दिल्हा " या एका जुन्या कागदांतील मजकुरावरून स्पष्ट आहे कीं, चराठें हें पूर्वी निव्वळ जंगल होतें, आणि वरील दोन इसम लखम सावंतास येऊन मिळाल्यानंतर पुढें हळु हळु तेथें वस्ती झाली. या चराठ्याचाच भाग ह्मणजे प्रस्तुतचें वाडी शहर होय.

1. "There is a tradition in some parts of the country that some of the existing temples contained Jaina idols at one time and that afterwards they were thrown out and Brahmanic ones placed instead." (Early History of the Dekkan, by Dr. Bhandarkar p. 73).

चित्र अंक ३५



सजोद (अंकलेश्वर) येथील मंदिरांतील

**दिगंबर जैनमूर्ति.**

चित्र अंक ३६



अबूपर्वतावरील देलवाडा मंदिरांतील

श्वेतांबर जैनमूर्ति.

J. A. P. W

o

जैनांच्या देवता म्हणजे त्यांचे तीर्थंकर होत; त्यांच्या मूर्तींची ते पूजा करितात. जैनांत दिगंबर आणि श्वेतांबर असे पंथ असून, प्रत्येकाच्या मूर्तींचीं विशिष्ट लक्षणें आहेत. दिगंबरांच्या मूर्ति वस्त्रालंकारविरहित नग्न असतात, आणि त्यांनां चक्षु लावीत नाहींत; उलट श्वेतांबर आपल्या मूर्तींनां सोन्याचांदीचे वर्ख (यांना 'आंगी' असें म्हणतात) लावून विभूषित करितात आणि चक्षु अवश्य लावितात; पण दोघांच्याही मूर्ति पद्मासनस्थ असून, हातांचे तळवे एकावर दुसरा असे निरनिराळे पण वरच्या बाजूस वळवून धरिलेले असतात. (चित्रांक ३५ आणि ३६ पहा) ह्या लक्षणांच्या वरील मूर्ति नव्हेत हें वेस्ट्रॉपम्युझिअमच्या यादीवरून सहज दिसण्यासारखें आहे. त्यांतील कांहीं नांवें पुढें देतों:—सरस्वति, ब्रम्हदेव, विष्णु, महादेव, महाकली, महिषासुरमर्दिनी वेताळ, गणपति, नारायण, सांतेरी, रवळनाथ, वीरभद्र, पूर्वाचारी, केळबाई, गजेंद्रलक्ष्मी, भगवति, मारुती, माउली, भूतनाथ, ब्राम्हण, ब्राम्हाणि, निरांकारी, ब्राम्हणमाया, पावणाई, पूर्वस (पूर्व वंश), नितकारी, सति, तळखंबा, देवळाकडील चाळा, चावडीचा पूर्वस, कुळाचीं माया, मायेचा पूर्वस, चवाठा, गांवदेवस, वंस, परमार, धाडवस इत्यादि. यांपैकीं एकहि मूर्ति जैन धर्मांची नव्हे! त्याच प्रमाणें शिलाहि जैनांच्या नव्हेत हें त्यांच्या वर दिलेल्या वर्णनावरून स्पष्टच होतें. याप्रमाणें या बाहेर पडलेल्या शिला आणि मूर्ति ब्राम्हणी धर्माच्या असतांनां त्या जैनांच्या आहेत असें प्रथम उगाच मानावें, आणि दुसऱ्यांनीं तोच पाया घेऊन "कुडाळ प्रांतांत जैनधर्म चांगला

१. चित्रांक ३५ ही दिगंबर जैन मूर्ति असून तिच्या मुखवट्याच्या सभोंवती जें तेजोवलय दिसतें तें मुखवट्याला चिकटविलेलें नसून मागील भिंतीला चकटविलेलें आहे. त्याला 'भव्य मंडळ' असें दिगंबर ह्मणात. या मूर्तीचें नांव 'श्रीशितलनाथ' असें आहे.

प्रस्थापित झालेला होता " अशी उभारणी करावी याला काय म्हणावें समजत नाहीं ! कारण जैन धर्मासंबंधींच्या या विधानाबद्दल दुसरा पुरावाच नाहीं.

जैनधर्म कुडाळप्रांतांत प्रस्थापित झालेला असता तर त्याचीं थोडीं तरी दैवतें आणि चित्रांक ३५।३६ यांत दाखविलेल्या स्वलक्षण मूर्तीसारख्या कांहीं तरी आजमितीसहि अवश्य शिल्लक राहिलीं असतीं. उदाहरणार्थ मिरज-कोल्हापूर या प्रांतांत जैनधर्माचें उच्चाटण यादवांनीं केलें, तरी कांहीं जैन देवळें ( बस्ति वगैरे ) आणि जैनांच्या वसाहती आज मितीपर्यंत शिल्लक आहेत; गोव्यांत शेंकडों हिंदू देवळें प्रथम मुसलमान आणि नंतर पोर्तुगीज यांनीं उध्वस्त केलीं, पण त्यांतून कांहीं शिल्लक राहिलींच ! तसें कुडाळप्रांतांत आज एकहि जैन मंदिर नाहीं ! आतां कुडाळप्रांतांतील " जैन " नांवाचा देव जैन धर्माचा पुरावा म्हणून कोणी पुढें आणल्यास, तो जैन धर्माच्याच विरुद्ध कसा जातो हें पुढील उताऱ्यावरून दिसेल.

" जैनदेव[1]-हा पाषाणावर कोरलेलें एक शिवलिंग असून त्याचें हें नांव चुकीचें होय. लिंगाच्या दोन्ही बाजूंस, मुंडन केलेले जैन म्हणून मानिलेले पूजारी असतात, त्याच पाषाणावर हात असलेले खांब, चंद्र,

1. "*Jain God*—wrongly so called and is represented by a Linga carved in stone. On either side of the Linga are supposed Jain worshippers with their heads shaved throughout. On the same stone there are carved pillars from which issue some human hands, the sun, the moon and the stars. These Gods are now discarded and have fallen into disuse. They have been removed from the temples and placed outside the temple. Nevertheless there is found inside the temple a stone representing the Jain God. Lingayat Gurav worships this God but where there

सूर्य, आणि तारे यांच्या प्रतिमा असतात. या देवता अपूज्य समजून त्यांचा देवता म्हणून कोणीहि आतां उपयोग करीत नाहींत. पूर्वी देवळांत असलेल्या या देवता आतां तेथून काढून बाहेर ठेविल्या आहेत. तथापि कित्येक देवळांच्या आंतील बाजूस ' जैनदेव ' म्हणून एक दगड आढळतो. ( कित्येक देवळांत हा जैन म्हटलेला देव लांबट आकाराचा गुळगुळीत दगड असतो, तर कित्येक ठिकाणीं एक लहानशी शिवपिंडी असते, तिची शाळुंका नुसती गोल असते. ह्या दोन्ही जातीचे हे जैन बहुतांशीं गांवच्या शंकराच्या देवळांत असतात. जैनाच्या बाजूला दुसरा एक दगड असतो त्याला ब्राह्मण म्हणतात. ले. ) त्याची पूजा लिंगायत जातीचे गुरव करितात, आणि जेथें हे गुरव नसतात तेथें मराठे जातीचे गुरव पूजा करितात. बरसातीच्या सुरवातीस अजूनहि गांवकरी लोक या देवास ( ' बा देवा जैना, बामणा, ' असें ) गाऱ्हाणें देतात. "

वर सांगितलेल्या लिंगायत–गुरव पुजाऱ्यांना तिकडे जैन–गुरव समजतात व तेहि स्वतः तसें मानतात असें आमच्या अनुभवास आलें. त्यावरून दोन तीन गुरवांस ' तुह्मी कोण? ' ह्मणून विचारल्यावर त्यांनीं " आह्मीं जैन गुरव " ह्मणून आह्मांस सांगितलें. त्यावर जैन धर्माचीं कांहीं लक्षणें सांगून " तुह्मीं जैन धर्मी असून शंकराची पूजा ( जैनांस निषिद्ध असतांनां ) कशी करितां ? " असें विचारल्यावर ते ह्मणाले कीं " लोकें

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

are no Lingayat Guravas it is worshipped by a Maratha Gurav. The villagers still offer prayers first to this God at the beginning of the monsoon."
(Jour. Authro. Soc., Bom., Vol. IX, No. 5, p. 350.)

१ बाराव्या शतकाच्या तृतीयपादांत ( सन ११६६।६७ ) कर्नाटक देशांत वसव्याचा लिंगायत पंथ, जैन धर्माचा पाडाव करण्यासाठीं पुढें आला त्या वेळीं जे जैन होते त्यांतील अनेकांनीं लिंगायत पंथाची दीक्षा घेऊन जैनांस विरोध केला,

आह्मास जैन ह्मणतात ह्मणून आह्मींहि जैन ह्मणवितों, वास्तविक आह्मीं लिंगायत आहों. ! " असो.

आतां आपण आपल्या मुख्य प्रश्नाकडे वळूं. ब्राह्मणांच्या देवता आणि शिला, बाहेर कोणी टाकिल्या? इतिहास सांगतो कीं असले प्रकार राजसत्तेच्या जोरावर किंवा खुद्द राजसत्तेकडूनच होत असतात, केवळ सामान्य माणसांकडून ही दांडगाई एवढ्या प्रमाणावर होणें शक्य नाहीं! सामंतांच्या मागून त्या प्रांतावर प्रभु आले, पण ते सामंतांच्याच ज्ञातीचे, आणि सामंतांचे आप्तसंबंधी होते. त्यांच्या मनांत, सामंतांच्या देवता आणि शिला भ्रष्ट करण्याचा दुष्ट विचार कधींच येणें शक्य नाहीं! पण प्रभूंचें राज्य बळकावून, प्रभूंस देशोधडीस लावून, पुनः प्रभूंचा समूळ नाश करावयास उद्युक्त झालेले मराठे सावंत, यांचें मन प्रभूंनीं पूज्य मानिलेल्या सामंतांच्या देवता आणि वैभवदर्शक शिला यांजबद्दल शुद्ध असणें शक्य नाहीं! तेव्हां हें काम त्यांजकडूनच झालें असण्याचा बळकट संभव आहे; आणि तें दोनदां. फोंड सावंताच्या कारकीर्दींत (१७०९–३८)–ह्मणजे, सावंतांस नुकतीच मिळालेली सत्ता नारायण प्रभूचा प्रत्यहीं चाललेला तीव्र विरोध दूर करून मजबूद करण्याच्या काळीं (प्रकरण १२ पहा); आणि नंतर तिसऱ्या खेम सावंतांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस (सन १७५६)–ह्मणजे, नारायण प्रभूचा मुलगा दादाजी प्रभु यानें पेशव्यांच्या मदतीनें सावंतांकडून आपलें राज्य परत मिळविण्याची, शेवटीं निष्फल ठरलेली, खटपट केली त्याबद्दल प्रभूंचा आणि प्रभूंच्या ज्ञातीचा सूड घेण्यासाठीं; याबद्दल

---

(मागील पृष्ठावरील टीप समाप्त.)

कर्नाटकाचा कुडाळ प्रांताशीं व्यापारानिमित्त संबंध होता ह्मणून, या लिंगायत बनलेल्या उद्यमी जैनांचा संबंध या प्रांताशीं येणें अपरिहार्य झालें. अशा रीतीनें पुढील काळांत हे लिंगायत स्थायिक झाल्यामुळें (मूलतः ते जैन या समजुतीवरून) कुडाळप्रांतांत त्यांना जैन ह्मणण्याचा जो प्रघात पडला तो आज मितीसहि चालू आहे.

प्रत्यक्ष कागदोपत्रीं उल्लेख आहेत ते परशिष्ट १८ (२) कलम ७, आणि त्यावरील टीपा यांत दिले आहेत. या वेळीं गादीवरील खेमसावंत (राजश्री) फक्त ७ वर्षांचे असल्यामुळें सर्व जबाबदारी त्यांच्या मुत्सद्यांवर येऊन पडली, ती त्यांनीं मनसोक्त पार पाडिली! असो. या शतकृत्याचें श्रेय सावंतांकडे जावयाचें दुसरें एक असें कारण कीं, सामंतांच्या अशा प्रकारच्या शिला, ज्या ठिकाणीं ह्मणजे मठ गांवांतील धाकट्या देवळांत स्वतःच्या (सावंतांच्या) पूर्वजांच्या होत असें भासवावयाचें होतें, तेथें मात्र त्या बाहेर न टाकतां अगदीं देवाच्या मागें (छायाचित्रांक ३ पहा) ठेविल्या आहेत! नाहींतर त्याहि मठ गांवांतल्या दुसऱ्या ४ शिलांबरोबर, देवळाबाहेरची हवा खाऊन नंतर वेस्ट्रॉप म्युझिअम्मध्यें जाऊन पडल्या असत्या! असो.

याप्रमाणें शिला आणि शिलालेख हे ब्राम्हण सामंतांचेच असें दाखविल्यावर, पहिल्या प्रकरणांत पुढें आणिलेल्या सर्व प्रश्नांचा विचार पूर्ण होतो. त्या सर्वांचा मथितार्थ असा कीं, मठ गांवांतील शिलालेख आणि त्यांतील 'भामसावतु', तसेंच ज्याच्या देवळांत तो शिलालेख आज आहे तो मांगसावंत, हे वाडकर मराठे सावंतांचे पूर्वज नसून, ते ११ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंत कुडाळप्रांतावर राज्य करणाऱ्या ब्राह्मण सामंतांच्या कुलांतील होत: मांग सावंत म्हणजे या सामंत कुलाची कीर्ति दिगंतीं नेणारा, आणि स्वतंत्र सत्तेचा आद्य संस्थापक असा, मंग महीपति होय. या घराण्याची माहिती सामान्य लोकांस आजपर्यंत नसली, तरी इतिहासज्ञांस त्याचा सुगावा लागलेला होता; पण त्याचा पुरा छडा लावण्याची बुद्धि त्यांस अनेक कारणांनीं झाली नाहीं. आम्हांस मठगांवचा शिलालेख वाचतांनां तो प्रश्न हातीं घ्यावा लागला; त्यावर उपलब्ध पुराव्यावरून जो कांहीं शोध लागला तो आम्हीं वाचकांसमोर मांडिलेला आहे.

---

१ वेस्ट्रॉप म्युझिअम्च्या यादींत मठ गांवांतून ४ शिला नेल्याचें नमूद केलें आहे.

# परिशिष्ट

## लेखांक १ ते १८.

# परिशिष्ट.

लेखांक १ ( इ. स. १४३६-३७ )

( श्रीकाराजवळचा भाग फाटून गेला आहे. )

विनायेकं गुरुं भानु ब्रम्हा विस्णु महेश्वर स्वस्ति
श्री नृप शाळी वाहाने सेके १३५८ तेरासे आठावन
वर्शे पिंगळ नाम सवछरे भाद्रपदे..........
सप्तमी रविवारे येसाजे रा बाळ......            गा

---

१ अस्सल कागदावरून काढलेली ही नकल सुमारें ३०० वर्षांची असून तीहि अतिशय जीर्ण झालेली आहे व क्वचित् फाटलेलीहि आहे. अस्सल कागदाचे बारीक तुकडे अलीकडेपर्यंत होते. पुस्तकांत सांगितलेल्या नागसामंताच्या राजवटींत झालेला हा कागद असून त्याला आजमितीस ४८८ वर्षे झालीं. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कुडाळ प्रांतांतील कागदांत इतका जुना कागद आढळत नाहीं. तो मठगांवच्या शिलालेखानंतर ४०१४१ वर्षांत तयार झालेला आहे. या दोन्ही लेखांच्या काळीं—सन १४६९ पर्यंत—कोंकणांत दाभोळच्या खालीं गोव्यापर्यंतच्या प्रदेशावर बहामनी शहांचा अम्मल मुळींच झाला नव्हता, हें त्या वेळीं इकडे आलेल्या **निटिकिन** नामक **रशियन** प्रवाशानें लिहून ठेविलें आहे ( *India in the 15 th Century,* Haklut society, London, 1837 पृ. १५ ) आणि त्यामुळेंच मठगांवच्या शिलालेखाचें बिनफारशी असें निर्भेळ मराठी शुद्ध रूप शक्य झालें. पण त्या प्रांताच्या आजूबाजूस महाराष्ट्रांत मुसलमानी अंमल रूढ होऊन ११८ वर्षें झालीं होतीं आणि दिवसेंदिवस प्रबल होत चाललेली शेजारच्या बहामनीची सत्ता प्रस्थापित होऊन ९० वर्षें झालीं होतीं. त्या भागाशीं साहजिकच राजकारण आणि व्यापारविषयक दळण-

उकार मौजे केळुस व नारे[1] प्रभु गाउकार मौजे केळु
( स )....तुमच्या गावास............
हाली न्हवता या करिता तुम्हास विर्ती....
हाली आम्हास देउळेस मिरास नाही देखोन आ
म्ही आपले आत्मसतोसे तुमचे गावीचे गुरव

---

( मागील पृष्ठावरील टीप समाप्त. )

वळण आल्यामुळें, महत्प्रयासानें आपलें स्वातंत्र्य रक्षण करून राहिलेल्या या ब्राम्हणी राज्याच्या मराठी भाषेत शेजारच्या मुसलमानी राज-भाषेतील शब्द डोकावूं लागणें अगदीं अपरिहार्य होतें. हाच प्रकार सन १४३६ च्या या कागदांतील मौजे, मिरास, मजकूर, पैकीं, कित्ता, नांवनिशी या अरबी व फारशी शब्दांत दिसून येतो. सन १८१८ त दक्षिणेंत इंग्रजांचें राज्य सुरू झाल्यावर पुढील १०।२० वर्षांच्या आंतच मराठी संस्थानांतून इ. स. चा प्राधान्येंकरून उपक्रम झाला तो याच न्यायानें. ह्मणजे भोंवतालच्या बहुतेक सर्व प्रांतांतून मराठी भाषा बोलणारे लोक ज्या सनाचा उपयोग करूं लागले तोच सन मराठी संस्थानांतूनहि सुरू करणें अपरिहार्य झालें. **अलिबागेजवळ** असलेल्या **नागांव** नांवाच्या गांवांत **हंबीरराव** नांवाच्या **यादववंशीय** राजाचा शके १२८९ ( इ. स. १३६७ ) चा एक शिलालेख आहे. त्यावर शालीवाहनशक देण्यापूर्वी " स्वस्ति हिजरत ६९" ( म्हणजे ७६९ ) असा हिजरी सन कोरलेला आहे. देवगिरीकर शेवटच्या रामदेव यादवाच्या भीमदेव नांवाच्या मुलाचें उत्तर कोंकणांत राज्य होतें. हंबीरराव हा या भीमदेवाच्या वंशांतील शेवटचा स्वतंत्र राजा होय. कुडाळ प्रांताप्रमाणें याच्याहि राज्याच्या आजूबाजूस बहामनींचें राज्य असूनहि हंबीररावानें महत्प्रयासानें आपलें स्वातंत्र्य राखिलें होतें. असें असतां त्यानें आपल्या या नागांवाच्या लेखांत हिजरी सनाला अग्रस्थान दिलें; याचें कारण शेजारचें बहामनी राज्य हें असून, त्या काळीं बरेच मुसलमान येऊन त्याच्या राज्यांत लष्करी नोकरींत राहिले होते हेंहि होय.

१. प्रस्तुत लेखकाचा पूर्वज.

पण कबूल केले देऊळची दिवटी धरावी
यैसे कबूल केले त्यास तुम्ही मिरास करू ( न )
दिली टिकणे नव नावानिसी घरभाट सेत भा
टी...व्हाली...जारली ( ? ) खुडसधार जात्रेचे
दुवे पैकी निरम पछिमेकडे फाली कालवी खाल
समुद्राचेकडे डोगराचे मेरेस खडीपाचे आतेस..
किता दिरभाट दिवटे ( चे ) 'वाकरीस येणे प्रमाणे
दिलेत आम्ही केले आमच्या जाले जातेने भोगावी
तुमचे जाले....वी आम्ही गावामधे .......
पडिल ती करु. राम.....( दिवट्याची सही )

साक्ष

गोविंद पाटेल बाल पाटेले पाटकार १[1] विठो घाडी[3] मौजे मजकूर १
जने प्रभु पाटकार मतकरी[2] १ खेम भियाळे[4]...... १
मादे प्रभु खानोलकर १

---

१. प्रभु घराण्याच्या अमदानींत हें पाटील घराणें एका महालावरील देसाई या अधिकाराचें होतें.

२. मतकरी व सदरील पाटील यांचीं दोन्ही घराणीं अजूनहि "पाट" गांवींच आहेत.

३. घाडी हा देवळाकडील वतनदार नोकर ( विर्तिक ) असे. आजमितीसहि सावंतांच्या वाडी प्रांतांत असे विर्तिक आहेत.

४. हा साक्षीदार महार जातीचा होता.

## लेखांक २.

श्री. ( इ. स. १५९७ )

विनायेकं गुरुं भानुब्रम्हांविष्णुमहेस्वरं सरस्वती प्रणंम्यादौ
सर्व कार्यार्थ सीधये स्वस्थी श्रीनृंपशालीवाहान शके १५१९ वरु
षे वर्तमाने वेव्हारीक हेमलंबी नाम सवच्छरे श्रावण सुध्यं
७ सत्पमि गुरुवारी परउळे ग्रामी श्रीवेताळ देऊ देवाचे देवळीं
केले कृत यैसाजे **श्रीमंत दादसावत** सुत **गणसावत** व **सुर
सावत** व **रुद्र सावत** तथा **कान्हसावत** सुत **गोविंद सावत**
व **देमसावत** सुत **येससावत** व **गणंसावत** सुत **नारसावत
देसाई** याणी तथा ग्राम, हरसेणवीया सुत लिंगसेणवी व
गोरख सेणवीया सुत रुद्र सेणवी व नारसेणवीया सुत बा-
बसेणवी कुलकर्णी मौजे मजकूर यास लिहुन दिले येसाजे.
आमच्या ग्रामा मधील कुलकर्णी गाविक तक्षीम चौथी बाबद
पलट हरी मागरस ( ? ) पेसजी गावाने वीक्रीत घेऊन क्रीये
खत लिहून घेतले होते उदड वरुषे गाव खाली होते....
गाववरी मोकासाई याचे गावतिजणुकेची बाकी सनसीत
खमस याचे सालासी आखरसालास वाडले ते बाकीचे
पैकेसीं तगादा गावासी लागले वरी गावाने सदरहू कुलक-
र्णाचे पलट आम्हासी विकत देऊन आम्हापासी किरेचे
पैके बेरिज होनु ४० च्यालिस घेऊन मोकासाई याचे
रसदीस देविले ते कुलकर्णाचे पलटाची यार्दी आम्ही
तुम्हासी तीन वर्गासी आपले आत्मसंतोषे दिल्ही आसे

गण सावत देसाई

गोविंद सावत देसाई

सुभाजी सावत देसाई

हेम सावत देसाई

मुशाहिरा व कागद बाब हकलाजमादेखील वाडी चिपी.
यैन होनु ४७। मुशाहिराब.

३९

| तपसील | नेहमी (?) हक | कागद्बाब | श्रीइनामदारास |
|---|---|---|---|
| गाव ३५ वाडीचिपी ४ | १ | ६। | वराई १ |

गाव साबत वसाई

तपसील

गाव ६ वाडीचिपी -।-

याप्रे॥ बादल यार्दी कुबसी मुशाहिरा होनु २० वीस
मोकारा ( र ) केले आसे बाकी होनु २७। सवाई सतावीस
आम्हासी पलटाचे पलटासी देऊन यार्दी तुम्ही सुखी चालवीजे
जलमातर भासे यार्दी दीली आसे सदरहू मुशाहिरा यार्दीचे
होनु वीस होनु सुखी भोगवटा कीजे विलाईत सर्ती
हरयेक तड तक्षीम कुलकर्णी वरी पडेल तयाचे तक्षीम
जे येईल ते आम्ही देऊ तुम्हासी निसबत नाही येणे
प्रमाणे तुम्ही यार्दी कुलकर्णगीरी सुखे भोगवटा कीजे
कोणी शक्र वक्र करतील तर आम्ही बुजाऊन देऊ म्हणोन
पटा सई—

| पईलापलट लिंगसेणवी | दुसरापलट रुद्रसेणवी | तिसरापलट बाबसेणवी |
|---|---|---|
| १ | १ | १ |

येणेप्रमाणें पलटाचे पलट येईल ते चालवावे मुशाहिरा यादीं सदर हु सालाचे सालासी मुशाहिरां वाटून घेणे बपटा सई स ५ माहे जिलकाद सु ॥ सबा खमसेन आलफ.

गोवाई

| | |
|---|---|
| बाबासावत गोविंद सावत गावकर | रवळसावत मलसावत गावकर |
| १ | १ |
| कामप्रभु गावकर | रामसावत कालसावत माजरेकर |
| १ | १ |
| विठसावत सिवसावत वरवडेकर | मादसावत भानसावत गावकर |
| १ | १ |
| बालसावत जोगसावत | रवळसावत देमसावत |
| १ | १ |
| मलसावत म्हाकल सावत | भानसावत फटसावत...कर |
| १ | १ |
| लखप्रभु नागदेप्रभु गवाणकर | |
| १ | |

पटा दोन सिकेचा त्याची तालिक.

---

**टीपः**—जुन्या काळीं ‘ सामंत ’ या शब्दाबद्दल ‘ सावत ’ हा शब्द किती रूढ होता हें या कागदावरून दिसून येईल. लेखांतील ‘ सावत ’ आणि “ प्रभु ” उपनांवांचे सर्व ब्राह्मण होत. प्रभु उपनांवाचे ब्राह्मण भारद्वाज गोत्री, सामंत उपनांवाचे सांख्यायन गोत्री आणि सामंत देसाई या जोडनांवाचे धनंजय गोत्री होत. या सर्वांचीं घराणीं आजमितीस परुळें गांवीं आहेत.

## लेखांक ३

(इ. स. १६३०)

श्री

फौजदार

( फारशीलिपीचा शिक्का आहे ) राजश्री सारदेसाई

देशपटा प्रां कुडाल नि (फारशी लिपीचा शिक्का आहे
वाडपत्र स्वस्ति श्री नृप अक्षरें लागत नाहींत.)
शाहालिवाहान शके १५५२व
र्शे वर्तमान वीवारिक शुक्ल
नाम सवछेर निवाडपत्र
भट सादले उपाध्ये मौजे ने
रूर सु....लहुर निवाड प
त्र करून दिले ऐसाजे उपाध्ये
मौजे मजकूर यांस वृति क
रितां गावी वेव्हार होऊन दि
वाणांत कुडाळी ठाणें मज
कुरी येऊन फिर्याद जा
हाले जे पारपत्य मनास आ
णुन स्थापना करावी
म्हणउन अर्ज केला त्या
वरून मौजे मजकूरचे ग्रा
मस्त हुजूर आणून हकी
कत मनास आणली त्यावरून
त्याणी सागितले जे हे गो
त्रज वारीस एक याची घरा
णी तीन याचा तपसील
कैसा काय तो दखल करणे

मानजी प्रभु देसाई (मराठी लिपीचा शिक्का आहे देसाई इतकींच अक्षरें लागतात.)

गोमजी प्रभु देसाई (मराठी लिपीचा शिक्का आहे देसाई इतकींच अक्षरें लागतात.)

गण सावत सारनाइकवडी (फारशी लिपीचा शिक्का आहे अक्षरें लागत नाहींत.)

म्हणऊन पुसलेवरून आ
दपछाद सांगितला बी
तपसिल घराणे कृस्ण भ
ट याचा वारीसदार कान भ
ट तक्षीम तिसरी घराणें
दामोधर भट यांचे वारीस घरे
हाली रामचंद्र भट व नाराये
ण भट व शंभुभट तक्षीम
तिसरी घराणे नारायेण भ
ट याचे वारीस घरे हाली अंतभ
ट कासी भट व अनंतभट
तक्षीम तिसरी येणें प्रमाणें
तीन तक्षिमा साहाजण ये
काचे घरीं कार्ये जाहाले तर
कलह करितात याची सम
जाविसी करून कार्ये चाले
हे सुरळीत वर्तणुक करी
तील यैसे करावे म्हणून आर्ज
केला त्यावरून गावचे अनु
मते घरांचा आजमास पाहू (न)
वाडे सार सुमार घरें नेमू
न दिलें असे बी । तपसील

आवाठ घरें वाडे

| | |
|---|---|
| कानभट तक<br>सीम तिसरी यास | घराणें दामोधर भट<br>याचे वारीस घरें<br>तीन तक्षिम ति |



भान नाईक देसाई

बाबुजी राघो नाइकवडी
(फारशी लिपीचा अष्टकोनी शिक्का आहे.)
अक्षरें लागत नाहीत.

भान सावंत देसाई
(मराठी लिपीचा शिक्का आहे,
'भान' इतकींच अक्षरें लागतात)

१ वाडा सिरसोस
१ सोलिये
१ माड्याची वाडी
—
३
—

१
घराणे नारा
येण भट या
चे वारीस घरें दो
न तक्षिम ति
सरी यास

२ आतभट का
सीभट
१ कोबा वागोसे
१ काडर व कु
डगाळवी
—
२

३ आनत भट
१ येवडीये
१ गोवेरी
१ गोवलवाडा
—
३
—

सरी यास
२ रामचंद्र भट
१ देऊळ वाडा
उसवसे

१ चांदोस
—
२
१ नारायेण भट
वाडा सोनुली
१ शेभु भट

यास वाडी वरावडें
—
४
—
१

बाळं प्रभु देसाई
(मराठी लिपींचें मोर्तब)

मोर्तब सुद

विठल प्रभु नाइकवडी
(मराठी लिपीचा शिका आहे.
अक्षरें लागत नाहींत.)

भास्कर सेणवी नाइकवडी
(फारशी लिपीचा शिक्का आहे,
अक्षरें लागत नाहींत.)

दादु सावत नाईकवडी
(फारशी लिपीचा शिक्का
अक्षरें लागत नाहींत.)

येणें प्रमाणें निवाडा करून दिला आसे उ
पाध्येपणाचे काम चालो देणे यामधे
कोणी अंतर करून वेव्हार करील तो गुन्हेगार असे
मागांफुढा वेव्हार होईल याबद्दल देशपटा
माहाजर करून दिले असे सदरहुप्र॥ वर्तणुक
करणे निवाडपत्र सई छ ११ माहे सवाल

( इथें फारसी लिपीचें लहानसें मोर्तब आहे )

---

**टीपः**—या निवाडपत्राच्या सुरवातीस उजव्या बाजूस असलेली **राजश्री सार-देसाई** ही सही आणि तिच्या खालचा फारशी लिपीचा शिक्का हीं प्रभु सरदेसा-याची निदर्शक होत. दोन्हीं बाजूंच्या इतर सह्यांत तीन **प्रभु देसाई** एक **सामंत देसाई** आणि एक **नाईक देसाई** अशा पांच देसाई या अधिकाऱ्यांच्या सह्या आणि शिक्के आहेत. हे देसाई प्राचीन हिंदु राजवटींतले देसाई असून, यावेळीं ते महा-लांवरचे अधिकारी होते असें समजतें. सामंत सरनाईक हा १२ नाईकांवरचा अधिकारी होता. त्याचप्रमाणें प्रभु नाईक आणि सामंत नाईक हे तर्फांवरील नाईक होते. सरदेसायां-सहित वरील सर्व अधिकारी एकाच जातीचे ह्मणजे (कुडाळदेशकर) आद्यगौड ब्राह्मण होत. बावूजी राघो नाईक (बाबाजी राघो असेंहि नांव असूं शकेल) हा मराठा जातीचा होता असें समजतें. नाडकर्णी हा प्रांताच्या हिशोबी खात्यावरचा अधिकारी असून तो जातीचा शेणवी ब्राह्मण होता. हें घराणें इतर कांहीं शेणवी घराण्यांप्रमाणें सावं-तांच्या वंडाळींत त्यांच्या बाजूस न जातां शेवटपर्यंत प्रभु सरदेसायाशीं स्वामि-निष्ठ राहिलें असा दाखला मिळतो.

श्रीकाराच्या खालचा फारशी लिपीचा शिक्का एका मौलवीकडून लावून घेण्याचा प्रयत्न केला, त्यांत " आदिल शहा " इतकीं अक्षरें लागतात; पण शिक्काच बरो-बर उमटलेला नसल्यामुळें त्यांबद्दल आम्हांस खात्री देतां येत नाहीं.

## लेखांक ४

—श्री— ( अजमासें इ. स. १६४१ )

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री ( अक्षरें गेलीं आहेत ) स्वामीचे सेवेसी विनंती. सेवक भानजी प्रभु सरदेसाई प्रा कुडाळ कृतानेक सा नमस्कार विज्ञापना तागायेत श्रावण ( अक्षरें गेलीं आहेत ) पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असों विशेष. **आमचा उदय होऊन आला** तेव्हां श्रीसन्निध स्वामींचे चरण दृष्टीस पडले परंतु वांच्छा चरणांपाशीं राहिली. परंतु सुदीन होईल तेव्हां स्वामी मनोरथ पूर्ण करितील. **परंतु काळ कठीण असे.** बरें असो **होणारास बलिवान यास उपाय काय.** विशेष.

**टीपः**—अस्सल पत्र मिळालें नाहीं. ठळक अक्षरांतील मजकूर ऐतिहासिक महत्वाचा असून, लखम सावंतानें सरदेसायाचा वध केल्यानंतरच्या काळाचा तो निदर्शक असावा.

---

## लेखांक ५

—श्री— ( अजमासें इ. स. १६५५ )

स्वस्ति श्रीमद् वेदशास्त्र
संपन्य राजमान्य राजश्री आहिताग्नि
प्रमुख समस्त ब्राम्हण
वृंद श्रीवालावल स्वामीचे
सेवेसि———

विज्ञापना सेवक भानजी प्रा सरदेसाई प्रा
कुडाळ साष्टांग नमस्कार विज्ञापना ता श्राव
ण वद्य ११ पावतो वर्तमान स ( से ) वकाचे येतास्ते

त असे विशेष ल्याहावया कारण वो शाा
बाबाभट उपाधे यांचे वडील नारायणभट उपा
धे याकडेस वडिलांनीं **राजश्री दादाजी प्रभु**
**सरदेसाई** वईकुंठवासी याणी याकडेस पं
चईतान ठेविले तेसमई याणी पुसिले की
यास साईत्य काय तेव्हा नमस ठिकाण
स्थान केले व उपभोग नंदादीप व नैवेद्य
पुजा पुरस्कर चालवाव ( वे ) आम्ही चालवि
तो म्हणोन मान्य करून घेतले. त्यास आज[1]
तावद् चालिले व त्याचेही वृधी चा
लवितो यैसी यास हाली त्यास काही
अडखल दिसोन आला तर तुम्ही समस्त
ब्राम्हण तुम्हास कळच असेल कीं कळवे
तर पूर्व मऱ्यादा प्रमाणे चालवावे व
ठिकाणे श्रावणी श्रीचे देवळीं प्रतिवर्ष
यांचे हस्ते चालवावी. येसी यास अडखळ न
आला तर याचे वंशपरंपर चालवावे आपणास
कळावे म्हणोन लिहिले आहे बहुत काय लिहिणे.

---

१ **टीप**—सावंतवाडीच्या इतिहासांत रा. पिंगुळकरांनीं ( पृ. ३३ ) ज्यांचा "दादबा" या नांवानें उल्लेख केला आहे ते हेच होत. ते ह्या पत्रलेखक भानजी प्रभु सरदेसायाचे चुलत चुलते होत पत्रांत उल्लेखिलेलें पंचायतन आज वालावली गांवीं असून दान दिलेली जमीन सदरील उपाध्यायांच्या घराण्याकडे चालू आहे. या पत्रावर शक नाहीं, तरी तें इ. स १६५५ च्या सुमारचें असावें असें वाटतें. भानजी प्रभूच्या कारकीर्दीतील शेवटचें दान पत्र इ. स. १६६६ सालचें असल्याचें रा. पिंगुळकरांनीं लिहिलें आहे. त्यांच्या कारकीर्दींत लखम सावंताबरोबर त्यांच्या बऱ्याच चकमकी झाल्या तरी शिरजोर झालेल्या सावंतांनां प्रभूंचा पूर्ण पराजय करितां आला नाहीं.

## लेखांक ६

श्री ( अजमासें इ. स. १६५५ )

राजश्रीया विराजीत राजमान्य
राजश्री भाने प्रभु व रा। विठे
प्रा। व समस्त ग्रामस्त वालाव(ल)कर
स्वामी गोसावी यांसी
स(से)वक भानजी प्रा। सरदेसाई प्रां। कुडाळ नमस्कार
विनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीय कु
शल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष वे ॥ शा.
बाबा भट उपाधे याचे वडील नारायेण भट उपाधे
वालावलकर यांकडेस शालिग्राम देऊन व श्रावणी
श्रीचे देवालई करवावी याच्या हस्तें करवावी
म्हणोन आज्ञा केली. आण शाळिग्रामास ठिकाण
नमस व श्रावणीस ठिकाण एकूण दोन[1] ठिकाणे
दिली त्यास आजपावेतो उपभोग जाहाला
तर हाली त्यामधें गोत्रसमधामधे प्र
तीवाद पडिला तर दोनी ठिकाणे त्याचे
वंशवृधीने चालवावीं आण तुम्ही
पाळावी आम्हीही पाळतो तुम्हांस
कळावे म्हणोन लिहिले आहे बहुत काय लि
हिणे हे विनंति.

---

१. हीं दोन्ही ठिकाणें उपाध्यायांच्या घराण्याकडे चालत आहेत. त्यांतील एका ठिकाणाचें नांव " श्रावणी " असेंच असल्याचें जाबत्यांत आढळतें.

## लेखांक ७

श्री (इ. स. १६९९–१७००)

राजेश्री नारायेण प्रभु सरदेसाई गोसावी यांसी

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो कानोजी आंगरे सरखील राम-राम विा सुा मयावअलफ तुह्मी वीनंतीपत्र पाठविलें ते प्रवीष्ट होऊन वर्तमान विदीत जाहालें भेटीस यावयाचा अर्थ लीहीला ऐशास राजेश्री विसाजी राम मोत पाटणी येतील त्याजपासीं वर्तमान जें आसेल तें सांगणें आण मशारनील जंजीरा आल्यावरी तुमचे मसलद जे आसतील त्याची वील्हे कर्तव्य ते केली जाईल तुम्ही आपले समाधान आसों देणें जाणीजे ता. १५ छ माहे रजब बहुत काय लीहीणे तूर्त तुम्हां दोनसें खंडी गला गडी पैकीं देवीला आसे घेणे. ( मोर्तब आसे )

---

## लेखांक ८

श्री (इ. स. १७०७–९)

राजश्री नारायेण प्रभु देसाई प्रांत
कुडाळ गोसावी यांसी

छ अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ बराणजी मोहिते नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग रामराम येथील कुशल जाणुन लिहिले पाहिजे या नंतर खेमसावताने दुरबुधी आरंभिली आहे आपले दावेदार आहेत त्याचा घात कराव हे गोष्टीस माणसे नेमिली आहे ती तुम्हांसही तैसच करावें येसे आपले ठाई करून चालणा केली आहे म्हणोन वर्तमान हुजुर कळलें त्यावरून आम्हांस आज्ञा पत्र सादर जाहले आहे कीं ज्यास त्याणें अपाई करावयाचें योजिले आहे त्यास सावध कर्णे म्हणोन लीहीलें त्यावरून तुम्हांस लिहिलें आहे आपले जागां बहुत बहुत सावध राहात जाणे ज्याणे दुर्बुधी धरिली आहे तो नतीजा लवकरच पावेल चींता न कर्णे परंतु बहूत सावध राहात जाणें. बहुत काय लिहीणें लोभ असों देणे हे विनंती. ( मोर्तब आसे )

---

१ नारायण प्रभूच्या लहानशा सैन्याच्या बेगमीसाठीं हा गल्ला दिल्याची माहिती मिळते.

## लेखांक ९

श्रीराम. ( इ. स. १७०९–१० )

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री
नारायेण प्रभु सारद् ( दे ) साई प्रा कुडाळ गोसा
वी यासी

...शिवाजी कशव ( केशव ) कृतानेक नमस्कार विनंति येथील कुशल जाणुन स्वानद् लखन केले पाहिजे विशेष आप...
............ सदाशिव परशराम .........
सन अशर मया व ालफेस आम्ही विजयदुर्गा
स आलो हे वर्तमान तुह्मास कळलेच आसेल य
क पत्रही तुह्मास पाठविले आहे व हाली रा कोनेर......
यां बराबरि कितेक गोष्टी सागोन पाठविल्या
आहेत तरी तुह्मी कोण्हे वीसीचा.........
णे **जमाव घेऊन येतो.** ...............

( पत्राची मागची बाजू )




कुलता करून दिली ... ...
प्रभु सागता कळो येईल जाणीजे बहुत काय
लिहिणे छ २४जमादिलावल




---

**टीपः**–पत्राचा बराचसा भाग, तसेंच शिकाहि, फाटून गेला आहे. फक्त शेवटच्या दोन ओळींतलीं शेवटचीं ' परशराम ' हीं अक्षरें दिसतात.

## लेखांक १०

**श्री.**

राजश्री—पंत आमात्यगो
सावी यासी.

छ सकल गुणांलंकर्ण अखंडीत लक्ष्मीआ
लंकृत राजमान्यें श्रा नागसावं
त भोसले सारदेसाई पां कुडाल व माहालान
हाये रामराम येथील कुशल जाणुन स्वकि
ये कुशल लेखन केले पाहीजे विशेष आपण
पत्र पाठवीले पावोन बहुत संतोश जा
हाला व रा घोंडोपंत व रा नरसीगरा
ऊ जाधउ हे उभयेता आले त्याणी हीं कि
तेक ममतायुक्त आपली वचने सागीतलि
त्यावरून चीताचे ठाई हर्शोत्कर्श जाहाला
ते पत्री लिहींता पुर्वत नाही आपला आम
चा स्नेह अकृत्रीम चालत आला त्याची
वृधी होऊन दिवसे दिवस स्नेह अधीक
चाले तो आर्थ केला पाहिजे यानंतर मनस
बेचा आर्थ चीतात आणुन आपल्या पत्रा
वरून आवाडिहून कूच करून हेरेस आलों
तों आपली पत्रें आली त्यामध्यें दिरंग दीसो
न आला त्याउपर मनसब योजावा तर प्र
ज्यन समीप येऊन दीवस थोडके राही
ले तेव्हां साहजेंच प्रस्तुत कालें मनस

बेचा आर्थ राहीला त्यातूने उभये प
क्षीच्या भेटी ही राहील्या बरें जेव्हां उ

( पत्राची दुसरी बाजू )

भये पक्षि चीताचे ठाई दुसरा आर्थ
कदाप नाही तेव्हां समयोचीत भेटी
ही होतील मुख्य गोस्ट चातुरमास प्र

श्री
सामतकुलेशो
भान्नून्मागलाख्य
महस्वरश्रीनागसा
मतमुद्येयजनभु
त्यवीराजते

जनकाल तो जातच आहे त्याउपर दुसरे
कारणें उभये पक्षी भेटी होऊन जो मन
सब करणें तो पोक्ताच करावा येदर्थी
चा कितेक मजकूर रो पंत मारनीले यांस
स्वमुखे सांगीतला असे ते अनुक्रमे आ
पणास नीवेदन करीतील त्यावरून कळों ये
ईल राजश्री संभार्जी आगरे सारखेल यांजकडे
आम्हांकडून भला माणुस व पत्रें पाठवावी
म्हणुन आपण सांगोन पाठवीलें त्यावरून
हाली पत्रें पाठवीली आहेत पुढां आपले वीचारें
रवाना करून दीलि पाहीजे मुख्य गोस्ट आप
ण आम्हास कोणहि प्रसंग अनकूल करून
द्यावें ( द्यावें ? ) आसे चीती जाहाले तेव्हां सर्व भरीभार
आमचा आपणाचवर आहे त्यास पत्रें लिहिली
आहेत त्याचे समर्पक उतर आले नंतर येथु
न भला माणुसही पाठऊन देउ घडी
घडी पत्र पाठवीत असावें वरकड कि
तेक मजकूर पंत मारनिले जवळ सांगीतला आसे
बहुत काये लिहीणे हे वीनती

विलस
तिलेख
नावधि

## लेखांक ११

श्री

तीर्थस्वरूप राजश्री काका

वडीला प्रति

प्रीतीपुर्वक सकल सौभाग्यादी संपन मनाबाई सरदसाईण पां कुडाल व माहालानिहाये दडवत वीनति येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लखन केलें पाहिजे विशेष बहूतां दीवसीं आसीरवादपत्र पाठविलें प्रवीस्ट होऊन बहूत समाधान जाहालें याच प्रकारें सर्वदा पत्र पाठऊन श्नेहाची आभिवृधी केली पाहीजे यानंतर पत्री कीतेक श्नेहभाव आणुन वडीलपणे बुधिवाद लिहीला तो यथार्थच आहे आम्हींही आपणा ठांई कीमपि दुसरा अर्थ धरीत नांहि आपले श्नेहाची जोडी केली ते दीवसेंदीवस वृधींतें पावोन वींशेशात्कार व्हावी हेंच आम्हास अवस्यक यांत दुसरा पदार्थ नाहीं मातुश्री आम्हां ठाई श्नेह धरीत होती तैसा तुम्ही धरावा म्हणुन विशेषार्थे लिहीले तरी वडीलां ठाई आपणास आम्ही मानीतों

(पत्राची दुसरी बाजू)

हरयकविसीं आपणेंच प्रीती संपादोन श्नेह वर्धमान करावा हे ऊचीत वरकड भेटीचा मजकूर लिहीला या पैक्षीं आधिकोतर आणिक काये आहे आसते पदार्थें तूमचे श्नेहाची जोडी केली आहे येवीसीं मुख्यासं हिं परंम अवस्यक आहे तो विस्तार लिहीतां पुरवत नाहीं हांलि तुह्मीं भाद्रपद मासि भेटीचा निश्चये लिहिला तो यथोनही करार करोन आपणास पत्रें पाठवीली आहेत भेटीच्या प्रसगासं यक महीना आवध राहिली आहे या उपरि अविलबेच भेटी होऊन ऊभये पक्षी जो कर्तव्यार्थ करणे तो आपले चीतानरूप

होईल आम्हीं आपल्यासमान नीरंतर पत्री परामर्ष करून स्नेह वर्धमान करवीत आसावें बहूत काय लिहिणें हे वी नतीं[1] ०० ०.

---

### लेखांक १२ *

श्रीविठल

० श्री ०

सामंतकुलेशोभानु-
मांगलास्यमहेश्वरः
श्रीनागसामंतसुश्रेयं
जनभूत्यै विराजते ॥

राजश्री पंत अमात्य हुकमतपन्हा—गोसावी यासीः—

छ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो॥ नाग सावंत भोसले सरदेसाई प्रा॥ कुडाळ व महालानिहाय रामराम विनंति येथील कुशल जाणून स्वकीयानंद लिहित असलें पाहिजे. विशेष. बहुत दिवस क्रमोन पत्र पाठविलें. आदरें परसोन श्रवणें चित्त संतोषातें पावून समाधान वाटलें. याचप्रमाणें प्रतिक्षणीं साकल्य-वृत्त लिहून संतोषाभिवृद्धि केली पाहिजे. यानंतर महाराज राजश्री स्वामींनीं उभयतांकडील सौरस्याचा मजकूर लिहिला. अक्षरशा श्रुत जाहाला. त्या कर्तव्यें एकसा विचारें जे आपणाकडील विवेक होऊन आला नाहीं हेंच आम्हांस अयुक्त वाटलें. बरें ! आपण राज्यभारी, कर्ते असा. तोही प्रसंग आपले चित्तानुरूप होऊन येईल ते गोष्टीचे

---

१ "वीनती ०० ०" हीं शेवटचीं अक्षरें दुसऱ्या लेखकाचीं दिसतात. फार करून तीं सौ.मनाबाईच्या हातचीं असावीं. नागसावंताचा मुलगा आप सावंत याच्या दोन बायकांपैकीं एकीचें नांव " मईनाबाई " असें मागें दिलेल्या सावंतांच्या वंशवृक्षांत आढळतें. ( डाव्या बाजूच्या डहाळीचें शेवटचें पान पहा ) बहुधा हीं दोन्हीं नांवें एकच असावीं.

* ह्या पत्राची अस्सल प्रत आह्मांस मिळाली नाहीं, म्हणून रा. रा. राजवाडे यांनीं छापलें तसेंच येथें दिलें आहे.

अगाध काय असे ? रा. संभाजी आंगरे यांची व आपली भेटी जाहाली. बोलीचाली व्हावी ते पूर्वी सुचविलेप्रमाणें जाहाली असली तर बहुत उत्तम गोष्ट घडली. जो विचार आमचे चित्तीं आवश्यक होता तो संपादिला ते युक्तच गोष्ट केली. बोलीचा मजकूर तरी-आपण सुज्ञ लोक आहा, तेथें सांगणें अगर लिहिणेंसे काय आहे ? मुख्य गोष्ट जे, उभय पक्षीं विवेक जाहाला. तेव्हां सर्वही मामला उत्तमच होऊन येईल. इलाची बग यांकडील काय वर्तमान लिहावें म्हणून लिहिलें. तर निजामन् मुलकाकडून बेळगांऊचे किलेबारीस फौजदार होऊन जागा येऊन दाखल जाहाले. आम्हासही स्नेहभावयुक्त येतांच पत्रें आलीं होतीं. चातुर्मास क्रमलेनंतर त्यांची कितेक मनसबे करायाची उमेद आहे. अगोदर फौजेचीही तरतूद करीत आहेत. **मालवणकर** याकडील विचार लिा त्यास त्या ह्यामध्यें **कटकट** मांडिली आहे. किल्लेस रा **शिवाजीपंतकारकून**[1] मख्तसर आहेत. त्यांचीं आम्हांस पत्रें आलीं कीं, तुम्हीं आम्हीं मिळून मनसबा करावा, प्रस्तुत **जमाऊ** पाठवणें. ह्मणून लिा त्यावरून तेथें जमाऊ पाठविला आहे. हमेशा स्वारी शिकारी करून पायबंद लागला आहे. **महादाजी अनंता**चा मजकूर लिा. बरें ! **त्याचें अगत्य कोणतें** आहे ? उभयपक्षीं भेटी होतील तेव्हां त्याचेंही पारपत्य केलें जाईल. भेटीचे प्रसंगाबद्दल अगोदर भाद्रपदमासीं रा मादपाध्ये यास पाठवितों असें लिा. बहुत बरें ! सर्वही एकीकडेस ठेऊन आधीं भेटी व्हावी हाच इत्यर्थ आहे. एतद्विषयीं दुसरा विचार किमपि नाहीं. भाद्रपदमासी त्यास आधीं पाठवावें. तैसेंच आपले भेटीचा लाभ होऊन पुढील कर्तव्यता जे करणें ते आपले विचारें केली जाईल. प्रस्तुत धुळाजी यास पाठविले. सांगतां कळों येईल. मागून भला मनुष्य पाठवितों. आपले विचारास येईल तरी समागमें मजुरा देऊन पुढें आंगरेकडे रवाना करावे. मुख्य गोष्ट आपली भेट व्हावी हा हेत आमच्या चित्तीं. भेटी होऊन येई तेव्हां मनाची निशा होऊन स्वस्थता दिसेल. बहुत काय लिहावें. विनंति. विलसती लेखनावधि.

---

१ लेखांक ९ हें ज्या शिवाजी केशवचें पत्र आहे तो बहुतांशीं हाच असावा.

लेखांक १३

श्री.

राजश्री पंत अमा
त्य गोसावी यांसी

छ सकलगुणालकरणे अखडीत लक्षु
मी आलंकृत राजमान्यें श्रों
नांग सावत भोसले सरदसाई पां
कुडाल व भाइालानिहाय राम राम
विनंति यथील कुशल जाणुन स्वकी
ये कुशल लिहीत असावें विसष बहु
त दिवस जाहाले परंतु स्मरणपुर्वक
पत्र पाठऊन परामृश केला नाहीं
येणे कडुन श्नेहास युक्त नव्हे
समयोचीत कर्तव्यानरूप अट
वण जाहाली नसेल याजउपरि सर्व
काल स्वानंदवृत लिहून संतो
शाभिवृधि केली पाहिजे यानंतर
आम्हाकडील वृत पत्री लिहीतां पुर
वत नांही सविश्तर वृत राजेश्री

( पत्राची दुसरी बाजू )

घोडापंत मुक्ता सांगतां विदीत हो
ईल बहुत काय लिहिणें




विशेष बहुता दीवसी स्मरण करून तुम्ही रा घोडो त्रीमल या

ज वा।। पत्र पाो तें उतम समई प्रवीष्ट जाले बहुत सतोश जा
ला पत्र पाठवीत नाही म्हणुन बोल ठेऊन लेख केला तर आम्ही ये
क दोन पत्रे तुम्हास पाा परंतु मनावर धरून श्नेहा
ची जोडी केली नाही श्वार्थवर द्रष्टी तेसमई ध

श्री
सामतकुलेशो
भानून्मागलाख्य
महस्वरश्रीनागसा
मतसुतेयजनभु
त्यवीराजते

रीली होती हाली आम्हा लोकांचे अगत्य धरीले तर या
पेक्षां उतम ते काये आहे तुम्हाखेरीज आम्हास दुसरी जोडी का
ये आहे हे घर श्री देव ब्राह्मणाचे आहे तुमचे वडील परं
परागत कैलासवासी राजश्री खेम सावत भोसले सरदसाई या
णी देवाब्राह्मणाचे ठाई नीष्टा धरून देवब्राह्मणाची स्थ
पना करीत आले आहेत तुम्ही देवा ब्राह्मणाची भक्ती करी
ता यैसे यैकिले त्याजवरून बहुत समाधान वाटले आम्हा
लोकाचा अगत्यवाद मनःपूर्वक कायावाचामनसा नि
श्र्चयेरूप आसेल तर हे पत्र पावले ते क्षणी दर्शनाचा योग
घडे तो आर्थ केला पाहिजे इमान खरे वचन सत्य असावे हे जा
गे व आम्ही आपले पदरीचे आहो दुसरा आर्थ नाही सवीस्तर
वेदमुती व रा।। धोंडो त्रीमल सागता कलेल प्र
जन काल समीप आला त्वरा करावी दर्शनाती सविस्तर आर्थ उभये
पक्षी कलेल चिरंजीव राजश्री आपाजीराऊ तेथे तुम्हाजवली हार
गडी आहेत त्यास व जागा जतन होये ते करावे

---

१ भगवंतराव पंतअमात्य यांचे धाकटे बंधु

## लेखांक १४

श्री (इ. स १७३२)

राजश्री पंतअमात्य गो
सावी यांसी

छ श्री सकल गुणालंकरण अखंडि-
तलक्ष्मी अलंकृत राजमान्यें श्रेहां
कीत नागसावंत भोंसले सारदेसाई पा। कु
डाल व माहालानिहाय रामरांम येथील कुष
ल जांणुन स्वकीय कुषल लखन केलें पाहीजे
विसेष बहुतां दिवसां आपण पत्रें पाठवी
लीं पात्रलीं व वेदमुहुर्ती राजश्री मादे
पाध्ये व राजश्री धोंडोपंत यांकडे कीतेक
मुग्तां सांगोन पाठवीलें तें सवीस्तर श्र
वण होऊन बहुत संतोषातिशय जाहाला
तेथ सारांश भावार्थ जें आपले आमचे भे
टीचा योग होऊन उभय पक्षीं जो मनस
बा करणें तो येक मतें करावा असें मानस आहे
म्हणुन कीतेक वीस्तारें लिहीलें व उभयतां
हीं सांगीतलें तरी बहु उतम यापरतें
विसेष काय आहे मुख्य गोष्टी जें आपली व आ

(पत्राची दुसरी बाजू)

मची भेटी व्हावी त्यामुलें लक्षशा मन
सबे घडतील आम्हास कायावाचामनेकरून
आपली भेटी व्हावी हेंच बहु अवश्यक आहे या

श्री
सामतकुलेशो
भानुन्मागलाख्य
महेश्वरश्रीनागसा
मतसुद्रेयजनभु
त्यवीराजते

उपरी आम्ही आवाडेचे मुकामीहून बुधवारी कुच करून मजल दरमजल येउसी येतों ये वीशींचें सवीस्तर वर्तमान वेदमुहूर्ती राजेश्री ऊपाध्यांहीं लिहीलें आहे व राजश्री धेतो पंत आले आहेत ते मुगतां सांगतां कळों येईल बहूत काय लिहावें लोभ असों दील्हा पाहीजे आम्हांला आपनापेक्षा दुसरी जोड नाहीं आह्मांठाई येवडी आवड आहे तेंवा जीवानषिं स्येरिक[१] आहों बहुत काय लिहिणें

विलस
तिलेख
नावधि

---

## लेखांक १५

**हा महाराष्ट्रधर्म नव्हे.** (इ. स. १७३५)

१६५७ मार्गशीर्ष व. ९

राजश्री फोंड सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाळ यासी पत्र कीं राजश्री गोपाळ रामराव याचा कबिला तुह्मीं अटकावून ठेविला आहे.

---

१ अरबी शब्द. सरीक किंवा शरीक=मदतनीस.

त्यासी निरोप देऊन पाठवणें ह्मणून पूर्वी तुह्मांस लिहिलें होतें परंतु ते गोष्टी न केली. **ब्राह्मणाचा कबिला अटकेंत ठेवावा हा महाराष्ट्र-धर्म नव्हे.** प्रस्तुत हे स्वामीसान्निध[1] आहेत. तरी त्याचा कबिला त्यास मुक्त करून पाठवून देणें ह्मणून पत्र १ सीत सलासीन मया व अलफ, रजब २२.

( वाडकृत शाहुमहाराज रोजनिशी पृष्ट. २१७ ).

---

लेखांक १६

श्री श्री विठोबा

रघुवीर ( ५ एप्रील १७३८ ).

राजश्री भगवंतराऊ रामचंद्र, भारद्वाज गोत्र, आश्वलायन शाखा, गोसावी यांसीः—

छ सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री नागसावंत भोंसले सरदेसाई प्रां कुडाळ व माहालानिहाय दंडवत विनंति उपरि, शालिवाहन शके १६६० कालयुक्त नाम संवत्सरे चैत्र बहुल—त्रयोदशी सौम्यवासर सु॥ समान सलासीन मया अलफ दिल्हें वतनपत्र ऐसाजे. आपली व आमची किल्ले गगनगडच्या मुकामीं भेट समारंभें करून जाहाली. ऐशास कैलासवासी राजश्री रामचंद्र नीलकंठ यांचा व तीर्थस्वरूपांचा राजश्री खेमसावंत भोंसले सरदेसाई यांचा ऋणानबंध विशेषाकारें चालत आला त्याप्रमाणें उभयपक्षीं चालत आहे. अभिवृद्धीनें ऋणानुबंध चालावा, आमचें साहित्य आपण करावें, आपलें साहित्य सर्व प्रकारें आम्हीं करावें, वंशपरंपरेने अकृत्रिमतेंत कांहीं न्यूनता पडों न द्यावी, येविशी श्रीसंनिध शपथपूर्वक बोली चाली जाहली आहे. त्यास आम्हांकडून किमापिहि तफावत पडणार नाहीं.

---

१ शाहूमहाराजांजवळ.

आपल्याकडून तफावत न पडावी. घरोब्यानें ऐक्यतेनें उभयपक्षीं सुधामत चालावा. यास अंतर पडणार नाहीं. आपली आमची भेट प्रथमत: जाहली. आमचे चित्तास बहुतच संतोषावह जाहाला. यावरून तुम्हांस आम्ही आपले आत्मसंतोषें होऊन **प्रांत कुडाळ येथील** देश कुळकर्ण्याची वतन देहाय कर्याती देखील जकायती दिल्हें असे. यास वतनी बाहवी ता।.

| इनाम गांव दरोबस्त. | हक्कदर सद्दे होन निमे. | बीमयेत इनाम ठिकाण. |
|---|---|---|
| १ ———— | ———— | ———— |
| ———— | | ———— |
| ———— | | ———— |
| ———— | | |
| ———— | | जकात दर बैली |

लाजमा पान मान पद्धत प्रा कलम १

येणें प्रमाणें दिल्हें असे. तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादिवंशपरंपरेनें देश कुळकर्ण्याचें वतन अनुभवून भोगवटा करून सुखरूप राहणें. सदर सरदेशकुळकर्ण्याचीं वतनें आहे तीं कूलीं तुम्हांस देऊं.

**स्वदत्तां परदत्तां वा योहरेत्त वसुंधराम् ।**
**षष्ठीवर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥**
**स्वदत्तानुपालकाः परदत्तापहारकाः ।**
**ते नरा नरकं यान्ति यावच्चंद्रदिवाकरौ ॥**

शिक्का

राजश्री नार दळवी          राजश्री निळापा देसाई ता।
खानापूर.

---

**टीपः**—ही सनद रा. राजवाडे यांच्या ८ व्या इतिहासखंडांवरून घेतली आहे.

## लेखांक १७

श्री (इ. स. १८०३ ते १८१८)

राज्यकर्ते सांवत भोंलें प्रां कु
डाल व माहालानिहाये ई॥ सन आंर्बा
सलासैन आलंफं १०३४ शालीवान सेके १५५५
श्रीमुखी नाम सवछरे
१२ खेम सां पाये सां वोटवणेकर ई॥
सन आर्बा सलासेन आलफ १०३४ सेके १५५५ श्री
मुखी नाम सवछरे ता। सन खमस आर्बेन
आलफ सेके १५६६ तारंण नाम सवछरे
१ सोमसावत खेमसावत सनसीत आर्बेन आ
लफ १०४६ सेके १५६७ पार्थीव नामसवछरे
७ फोड सां साम ( सोम ? ) सां ई॥ सन सबा आर्बेन आल
फ १०४७ सेके १५६८ व्यये नाम सवछरे
ता। सन सलास खमसेन व आलफ १०५३ सेके
१५७४ नदन नाम सवछरे
२४ लखंम सां सोम सां ई॥ सन आर्बा खम
सेन आलफ १०५४ सेके १५७५ वीजये
नाम सवछरे ता। सन सबा सबैन आलफ १०७७
सेके १५९८ नलनाम संवछरे
३२ खेम सां फोड सां ई॥ सन समान स
बैन व आलफ १०७८ सेके १५९९ पीग
लनाम सवछरें ता। सन तीसा मया
व आलफ ११०९ सेके १६३० सर्व
धारी नाम सवछरे
२९ फोड सां नार सां ई॥ सन आशरम

या आलफे १११० सेके १६३१ विरोधी
नामं सवछरे ताा सन समान सलासैन
मया आलफ ११३८ सेके १६५९
पीगलं नाम सवछरे

१८ जैराम सां फाड ( फोंड ) साा व रामचद्र सां
नार सां उभयेता ई॥ सन तीसा
सलासैन मया व आलफ ११३९ सेके १६६०
कालयुक्तां नाम सवछरे ताा सन सीत
खमसेन मया आलफ ई॥ ११५६ सेके
१६७७ युव नांम सवंछरे

४८ खेमं सां रामंचद्र सां ई॥ स
न सबा खमसैन मया व आलफ ११५७
सेके १६७८ धाता नाम सवछरे
ताा सन आर्बा मया तैन व आलफ ई॥
सेके १७२५ रुद्रीरोदगारी नाम
सवछरे

---

## लेखांक १८ ( १ )

इ. स. १८४४-४५ सालीं इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनी सरकारकडे गणेश दादाजी प्रभु देसाई, यांनीं केलेल्या अर्जाची संक्षिप्त नोंद आणि अर्जासोबत जोडलेली १६ कलमांची यादी:—

सावंत हा बारा नायकवड्यांपैकीं एक होता. लखमसावंत जोरावर झाला आमचे पूर्वजांनीं कांहीं वेळ त्याचा पराभव केला, परंतु नंतर

त्यानें त्यांस मारून गादी बळकाविली. नंतर कोलापूर सरकारचे मदतीने मालवणास किल्याचे आश्रयानें राहिलों. आंगरे सरखेल यानीं मदतीचे वचन दिले, त्याच प्रमाणें कोलापूरकरानीहि दिले होते. पेशव्यांचा सरदार नारो त्र्यंबक सोमण सरसुभेदार याणे मदत केली परंतु इलाज चालला नाहीं. कंपनी सरकारनें मदतीचे वचन दिलें परंतु उपयोग झाला नाहीं.

---

## लेखांक १८ (२) (इ. स. १८४४-४५)

श्री.

याद्री प्रांत कुडाळ येथील दरोबस्त अधिकार आमचा येविसीची हकीकत व पुराव्याबाबद सुरु सन खमस आर्बान मयातेन व अलफ.

( कलमें )

( १ ) १. आमचे वडील अधिकार चालवीत असतां वाडीकर सावंत यांणीं दगा करून मुलुख जबरीनें घेतल्यावर कुडाळ प्रांत सोडून आंगरे सरखेल यांचे राज्यांत गेलों, त्यावेळीं आंगरे याणी खर्च वेच चालवून पुढील स्थापनेचा उद्योग करावा असेही तजवीज केली होती या बाबद पुरावा आंगरे याचें पत्र सन मया व अलफ सालचे सिका मोर्तबी आहे[२].

( २ ) १. नंतर आमचे वडील माहाराज छत्रपती करवीरकर यांचे राज्यांत आल्यावर वाडीकर हे दुरबुधी धरून आमचा घात[३]

---

१ क्यापटन हचिनसननें लिहिलेल्या सावंतवाडी मेमॉयरमधील माहितीस यानें बळकटी येते.

२ लेखांक ७ पहा; सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ५४–५५ पहा.

३ सावंतवाडी संस्थानचा इतिहास पृ. ५५–५६ पहा.

कर्ण्याची इच्छा करीत असत त्याजविसी माहाराज्याणीं मालवण किल्याचे मामलेदार यासी पत्र पाठऊन आमचे संरक्षण केले. व पुढें वाडीकर याचें पारपत्य लवकरच होईल असाही भरंवसा दिल्हा याबाबद पुरावा माहाराजा यांचें पत्र बराणजी मोइते नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग याचे नावें शिके मोर्तबी आहे[1].

( ३ ) १. संस्थानचा दरोबस्त अधिकार आमचा सबब सुखासनादिक चिन्हे होती येविसीचा पुरावा पादषाई अमलांत वडिलांचे भाऊबंदी विभागपत्र जाहालें आहे. तें येकुणिसी सिक्याचें आहे तें सन खमसेन अलफचे[2].

---

१ छत्रपतींनीं बराणजी मोहित्यास लिहिलेलें पत्र मिळालें नाहीं, मात्र मोहित्यानें नारायण प्रभूंस लिहिलेल्या पत्राची नक्कल मिळाली ( लेखांक ८ पहा ). या मोहित्याचा शिक्का दुसऱ्या एका कागदावर मिळतो तो असा आहे:—

श्री ०

राजाराम नरपतेस्तस्य

सेवक बराणजी मोहिते.

२ अति जीर्ण झालेल्या अशा एका विभागपत्राची नकल आम्हांस मिळाली, तिच्यावर १९ शिक्के व २२ सह्या आहेत, पण तिसऱ्या कलमांत नमूद केलेला सन ( खमसेन अलफ=इ. स. १६४९) नसून फक्त " तेरीख १ माहे शाबान " इतकाच उल्लेख आहे. लेखाच्या सुरवातीस " पगपत्र " असें या कागदाचें नांव असून तो ५।६ बंदांचा आहे. हा कागद मूळ कागदाची नकल असल्यामुळें शिक्क्यांच्या नुसत्या आकृति काढून बाजूला सह्या दिलेल्या आहेत, त्यांचा क्रम समजत नाहीं. त्या सह्या अशाः–( १ ) हणमाजी पंडित ( २ ) भानजी पंडित निा ( ३ ) गोपाळ पंडित ( ४ ) × × माजी पंडित हेजीव ( हेजिब हा अरबी शब्द दूत किंवा कारकून या अर्थी ) ( ५ ) हरबाजी हेजीव ( ६ ) हासीम आली दबीर ( दबीर

( ४ ) १. प्रांताचे अधिकाराचा प्रत्यक्ष सिका मोर्तब आज बाजिनस पाछयाई हरपाचा आम्हाकडे आहे तो वहां-

---

फारशी शब्द चिटणीस या अर्थी )( ७ )...प्रभु देसाई ( ८ ) कान्ह सावत देसाई ( ९ ) जेन...सरगुरो ( १० ) सेख हुसेन सरगुरो ( ११ ) गोवींद सावत देसाई ( १२ ) विठोबा देसाई ( १३ ) मुस्तफा सरगुरो ( १४ ) सिदोजी नायकवडी ( १५ ) दमाजी नाडकर्णी ( १६ ) वापूजी सेणवी नाडकर्णी ( १७ ) खळोजी नायकवडी ( १८ ) कान सावत नायकवडी ( १९ ) गोरखोजी नायकवडी ( २० ) विठ्ठल प्रभु नायकवडी; आणि कागदाच्या बाजूला ( २१ ) काने प्रभु देसाई आणि ( २२ ) भानजी प्रभु व बाबाजी प्रभु देसाई ह्यांच्या सह्या आहेत. वरील सह्यांपैकीं अनुक्रम ५,६ आणि १५ ह्यांच्या जवळ शिक्का मारलेला नाहीं.

१७ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास या प्रभु घराण्यांत गादीविषयीं तंटा उत्पन्न झाल्यावरून त्याचा निकाल लावण्यासाठीं काने प्रभु व भानजी प्रभु हे विजापुरास जाऊन तंट्याचा निकाल लावून आल्याची माहिती रा. पिंगुळकरांनीं सावंतवाडी संस्थानच्या इतिहासांत ( पृ. ४३ ) दिली आहे; ती कोणच्या आधारावर तें समजत नाहीं !

बहुतकरून ती याच विभागपत्राच्या माहितीवरून असावी. तसें असल्यास रा. पिंगुळकरांनीं काढिलेला निष्कर्ष चुकीचा ठरतो. काने प्रभु आणि भानजी प्रभु हे दोन्ही सावत्रबंधु होत. लखम सावंतानें प्रभु घराण्याच्या सत्तेचा व खासगी उत्पन्नाचा बराचसा भाग या वेळीं बळकावून तो दिवसेंदिवस शिरजोर होत चालला होता, अशा वेळीं प्रभु घराण्याच्या पुरातन वतनाचा व खासगत मिळकतीचा विभाग करून घेतलेला हा कागद आहे. यांत " इनामती तकसीम व बागायती, नमसी व कटुबाणी वा पछोडी, बापाची जोड" यांच्या विभागाचा उल्लेख आहे. सरदेसगतीच्या गादीविषयीं त्यांच्यांत तंटाच नव्हता. या विभागपत्रांत " काने प्रभु वडील फर्जंद ( फारशी शब्द प्रियपुत्र या अर्थी ) आणि बडे आवरतेचे " आणि "दुसरे आवरतेचे फर्जंद भानजी प्रभु व बाबाजी प्रभु लाहान " या मानानें वांटप करून दिल्याचा उल्लेख आहे. इतकेंच नव्हे तर, त्यांची आजी व " मणा प्रबीण व कमला प्रबीण " नांवाच्या बाबाजी प्रभु सरदेसाई यांच्या दोन रखेल्यांची सुद्धां त्यांत व्यवस्था केलेली आहे.

वाटीस चालला आहे व त्याबाबद मेहरबान कोर्टनी साहेब बाहादूर याणीही सन १८३९ साली चौकसी करून चाऊविला आहे[1]

( ५ ) १. शके १६१० सालीं वाडीकर याणी आमचा मुलुख लुटून[2] खराब केला तेव्हां त्याचे निवारण करण्याबद्दल कानोजीराजे प्रभावलीकर यासी आमचे वडिलांनी मदतीस घेऊन त्याजला अधिकारापैकी तिसरी तक्षीम देऊन तिसरे भाव केले होते. परंतु त्याजला दुसेरकडे जाण्याचे जरूर लागोन ते गेल्यामुळें त्याजकडून मदत जाहाली नाहीं तेव्हां ती पत्रें आमचे वडिलांनीं कानोजीराजे याजकडून परत घेतली ती जुनी पत्रें आम्हांकडे हजर आहेत.

( ६ ) १ या अधिकाराचे पातशहा अमलांतील तांब्रपत्रही सन-खमस मया सालचे आम्हांकडे हजर आहे व सिवाय जुने कागद पत्रही आहेत[3].

---

१ हा शिक्का कोणता तें बरोबर समजत नाहीं. १९ व्या शतकाच्या सुरवातीस या प्रभु घराण्याकडचे अनेक जुने कागद निरनिराळ्या कारणानें कित्येकांनीं नेले. त्यांच्या कांहीं याद्या ( फेरिस्त ) मिळतात, त्यांत रत्नागिरीस जे कागद पाठविले त्यांच्या यादीच्या शेवटीं " ता. १२ जुलई सन १८३९ " च्या पावतीचा " मेहरबान कोर्टनी साहेब मार्जी फष्ट असीष्टंट यांणीं आमचे सिक्याची चौकसी करून सिकामोर्तब दिल्हे त्याची पावती " असा उल्लेख आढळतो. आम्हीं ४ थ्या आणि ९ व्या प्रकरणांत प्रभु घराण्याचे दोन शिक्के दिले आहेत. त्यांतील ९ व्या प्रकरणांतला ( रामजी प्रभूचा ) शिक्का तोच बहुधा वरील शिक्का असावा.

२ छत्रपति संभाजीराजे यांचा औरंगजेबानें वध केल्यामुळें महाराष्ट्रांत जिकडे तिकडे जो हाहाःकार झाला त्या संधीस.

३ अधिकारभ्रष्ट झालेल्या नारायण प्रभूच्या लहानशा सैन्याच्या खर्चासाठीं विजापूर येथील त्या वेळच्या मोंगल बादशहाच्या सुभेदाराकडून वार्षिक १००१

(७) १. पुढें श्रीमंत पेशवे अमलांत आमचे वडीलांनीं नारो त्रिंबक सुभेदार यांसी तीस हजार पोवजे निसी मदतीस आणीले होतें इतक्यांत वाडीकर यांचे सगे सिंदे यांणी पेशवे यासी

---

होनांच्या नेमणुकीची ही ताम्रपत्रावरील सनद इ. स. १७०४ सालीं करून दिली होती, ती मालवण येथील आमचे मित्र रा. रा. **आबासाहेब देसाई** यांच्याकडून आम्हांस मिळाली. (या एका सनदेशिवाय त्यांच्याकडे आजमितीस एकहि जुना कागद शिल्लक राहिलेला नाहीं. !)

१ ही मदत इ. स. १७५५-५६ सालीं बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांच्याकडून मिळाली होती. नारोत्र्यंबक सरसुभेदार हा दंडाराजपुरीहून सैन्यासह **कुडाळ**च्या सीमेला लागून असलेल्या **नेरुर** गांवापर्यंतचीं सावंतांचीं ठाणीं सर करीत आला होता. ही त्याची स्वारी परत फिरविण्यांत शिंद्यांचें अंग नसावें, कारण त्या वेळीं शिंद्यांची सावंतांशीं सोयरीक झाली नव्हती. (ती पुढें सन. १७६२।६३ सालीं जिवबादादा बक्षी केरकर यांनीं जुळवून आणिली. केळकर कृत 'मराठे आणि इंग्रज' पृ. १३५). वरील स्वारीच्या वेळीं **राजश्री खेम-सावंत** यांचें वय अवघें **सहा वर्षांचें** होतें. स्वारी परतविण्याचें हें श्रेय सर्वस्वीं सावंतांचे प्रधान सबनिस यांनांच देणें इतिहासास धरून होईल. सावंतांवर आलेलें हें गंडांतर आपल्यावरच आलें असें सबनिसांस वाटलें असें रा. पिंगुळकरांनीं आपल्या इतिहासांत नमूद केलें आहे. जिवाजी विश्राम सबनिस हा त्या वेळीं सावंतांचा प्रमुख कारभारी होता आणि त्याचा भाऊ विठ्ठल विश्राम हा पुण्यास पेशव्यांकडे होता. शिवाय या वेळीं पुण्यांत पेशव्यांकडे इतिहासप्रसिद्ध रामचंद्र बुवा शेणवई हेहि एक मुत्सद्दी होतेच. सदरील जिवाजीनें विठ्ठल विश्रामकडून पेशव्यांचें मन वळवून कुडाळनजीक चाल करून आलेल्या नारो त्र्यंबकास माघारें फिरण्याविषयीं त्यांच्या-कडून हुकूम आणून लाविला (सा. सं. इ. पृ. ७५). पण काय कारण असेल तें असो, या बिचाऱ्या स्वामिनिष्ठ खटपटी सबनिसावर दुर्दैवानें लवकरच त्याच्या धन्याची–खेमसावंतांची–इतराजी होऊन त्यांनीं त्यास कामावरून दूर केलें (सा. सं. इ.) त्यानंतर लौकरच जिवाजीचा बंधु " विठ्ठल विश्राम व जिवाजीचा लेक लष्करांत (पुणें) होता त्यां (दोघां) स माधवराव पेशवे यांनीं गाड्यांची चौकी

इतक करून त्याजकडून नारो त्रिंबक यासी माघारे फिरविलें तेव्हां आमचे ज्ञाती ग्रहस्तांचे गावगना गांवकीचे वगैरे अधिकार व देव[१] होते ते काढून मराठी यासी दिल्हे

---

देऊन अटक केली आणि त्यांस लुटून फस्त केला. " करवीरकर छत्रपति यांनीं माधवराव पंडित प्रधान यांस आज्ञापत्रें रवाना केलीं त्यांत " जिवाजी विश्रामच्या बेइमानीचा मजकूर " लिहिला आहे. " जिवाजी विश्रामास ताकीद निषेधपत्र ढालाईत राजश्री शेणोनारायण याजबरोबर जिवाजीस दस्त करून ( जीवंत धरणें किंवा कैद करणें ) आणावयास पाठविलें. आणि विठ्ठल विश्रामास कोपळच्या किल्यावर कैदेंत ठेवावयास पाठवावयाचें केलें. " आणि त्यानंतर " कोणी जिवाजीस आश्रा देईल त्याचें पारिपत्य होईल " या प्रमाणें पेशव्यांनीं ताकीद केली. [ सबनीस बंधूंसंबंधी ही माहिती-" श्रीमन्महाराज मातुश्री आईसाहेब ( राणी जिजाबाईसाहेब ) करवीरकर यांनीं सन १७६७ सालीं राजश्री भिकाजी नरहर यांस " लिहिलेल्या एका आज्ञापत्रावरून घेतली आहे. ]

१ प्रस्तुत लेखकाच्या घराण्यांतील **कृष्णप्रभु** नांवाच्या एका पूर्वजानें केलेल्या एका अर्जांत त्याच्या पूर्वजांनीं **शिवाजी महाराज** आणि **वाडीचे सावंत** यांस वेळोवेळीं केलेल्या मदतीचा तपशील दिला आहे, त्यांतहि आपले देव वगैरे काढिल्याचें नमूद आहे. त्यांतील थोडीशी माहिति दिल्यास गणेश दादाजी प्रभूच्या कैफियतींतील कित्येक गोष्टींचा उलगडा होऊन तत्कालीन अप्रसिद्ध इतिहासावरहि किंचित् प्रकाश पडेल. अर्जांत कृष्णप्रभु लिहितोः—

" आपल्या वडिलां पासोन चार पिडिया खर्च व सेवाचाकरी करीत आल्याची हकीकत श्रीमंत थोरले खासे यांस माहीत होती. कडवाडाहून गोमंतकी पोर्तुपेमधे बारदेसी राहिले ते समई प्रांतमजकूर काबीज करावयाचा उद्देश तेव्हां रा. गोम सावंत यास आज्ञा केलीजे प्रांत मजकुरीं मातबर कोणी आसला तर तो आपले ममतेंत घेऊन पुढा कार्यसिधी करावी. तेव्हां **कृष्णप्रभु** सेवकाचे आजे रा. **सिवाजीमहाराज** यांकडे सातसे लोकांनसी होते तेव्हां **जोगणप्रभु**मधे व खासेमधे वैमनस होतें ते समई माणसें कविले सुद्धा तराडेवर भरून बारदेस पोर्तुपेमधें गेले. **भोळेप्रभु** चुलत आजे जमाव घेऊन प्रांतमजकुरी होते. प्रांत मजकुरी **शाहालम** आला तेव्हां

होते. पुढें त्यापासून वाडीकर यासी बाधाबाद होऊ लागली ते वेळीं पुन्हां आमचे ब्राह्मणाचे अधिकार पुर्ववत प्रमाणें चालूं लागले.

---

**आकेरीच्या मेटावर** कृष्णप्रभूस आज्ञा करून जमावसुधा ठेविले, तेव्हां त्याणीं तेथे **गडगा घातला** तें अद्याप **केळुसकर याचा गडगा म्हणून आभिधान आहे.** उपरांतिक घोडे आणण्याची मशारनिलेस आज्ञा केली त्यावरून भानसारंग याजकडून तराडा विकत घेऊन प्रांतामधें ...तांदुळ घेऊन तारवाची भरताड करून **मसकतास** रवाना केले आण घोडे आणले ते आरवलीचे ( वेंगुर्ले-बंदरावरून ८ मैलांवर समुद्रकांठीं असलेला एक गांव ) वेळेस ( समुद्रकांठास ) खासे जाऊन घोडे उतरले तेथ ईदरकेस ( ? ) आस्रा नाहीं तेव्हां रेडी बांधायास प्रारंभ केला, मागती तारू मसकतास रवाना करून घोडे आणले, मशारनुलेस घोडी एक बक्षीस दिली. मशारनुलेस **आरमार करूं सांगितलें** त्यावरून आरमार गलबतें सजुन तारां तरांडे (मोठीं तारवें) मारां लागले. माहाराज फार खुशाल जाहाले. उपरांतिक मशार निलेने **बंदुखा सोनेचा कंठी....नजर केल्या** त्या अद्यापी सरकारामधें होत्या **ही सेवा कृष्णप्रभु आजे याणी केली** त्याउपर सेवकाचे तीर्थरूप **रामप्रभु** हे दाहावीसवर्षे बाहीर होते, ते उभयताचे कारकीर्दीस ( जयराम आणि रामचंद्र सावंत—अनुक्रमें चुलता आणि पुतण्या यांची संयुक्त कारकीर्द-सन १७३८—५५ ) प्रांतमजकुरी आले, तेव्हां राजश्रीनीं आरमाराकडे नेमणुक करून लोकांच्या सारंजामास मौजे **खानोली** ( सध्यां ब्रिटिशहद्दींत ) हा गांव जमी व यैन जीनस दरोबस्त दिला होता व यैन जीनस भात पनास भेर भात **वामर्डे** व **बिबवणे** ( हे दोन्ही गांव वाडीसंस्थानांत आहेत ) येथें येकूण पावणसे भेरे दीले होते व जातीच्या सनदा मौजे **केळूस** व **तेंडालो** ( हे कृष्ण प्रभूच्या पूर्वजांचे मूळचे गांव होत ) येथें होत्या, आण दीडसे लोकानसी गुरावा ( एका जातीचें तारूं ) एक व गलबतें दोन...सेवा केली, आण **फरासेस तारू व आणखी तारवे मारली, या प्रमाण रामप्रभु याणी सेवा केली.** पुढा उभयता राजश्रीच्या ( जयराम आणि रामचंद्र सावंत ) कजीयामधे आम्ही राजश्री जयराम महाराज याजपासी बिलगुन होतो, तेव्हा आमच्या

( ८ ) १. मालवण गांवात कांहीं पुरातनची इनामत अद्याप चालली आहे व ती इनामत चालविण्याविसी माहाराज

---

व वेंके प्रभूच्या वृत्ती करितां वेव्हार हुजूर आला, तेव्हा तो पुरुशांतरास आमच्या लागला नाही व भोगवटेस लागला नाही ऐसे आसोन प्रमाणाने ( देवासमोर प्रमाण केल्यावरून ) त्यास वृत्त आमची दिली व आम्हाकडे वजूर ( ? ) ( हजार असेंहि वाचतां येईल ) रुपये घेतले हे समजोन आम्ही राजश्री रामचंद्र माहाराज या कडेस आलो ते समई प्रमाणास आमची वृत्त आम्हास भोगावी ऐसा कागद दिला, त्यास त्या उप्रातिक त्यास आम्ही वृत्त भोगु दिली नाही. त्या उपर उभयता राजश्री कैलासवासी जाहाले." याच्या पुढें नारोत्र्यंबकची स्वारी झाल्यावेळीं व नंतर उक्त जिवाजी विश्रामनें काय केलें तें या अर्जांत पुढें दिल्याप्रमाणें नमूद केलें आहेः——

" नारो त्रिंबक प्रांत मजकुरी येऊन ' **निवती** ' घेतली ( हा किल्ला मालवण आणि वेंगुर्लें यांच्या दरम्यानच्या समुद्रकिनाऱ्यालगत डोंगरावर आहे. इ. स. २४० च्या सुमारास प्लीनी नामक ग्रीक प्रवाशानें लिहिलेल्या कोंकण किनाऱ्याच्या हकीकतींत, निट्रिअस् ( Nitrias ) हें चांचे लोकांचें एक प्रमुख ठिकाण असल्याचा उल्लेख केला आहे. हें ' निट्रिअस ' म्हणजे सदरील ' निवती ' होय असें रेनेल ( १७८० ) साहेबांचें मत आहे ). आण आम्ही ते समई सेवा साहेबांची येक निष्ठ केली. धनीकामावर बंधु खर्चजाहले हे सर्व लोकास राज्यातील यास दाखल आहे. सर्वा ..राजश्री जिवबादादा सबनीस ( मागील टीप पहा ) याणी सेवा चाकरी घेतली परंतु उर्जीत कांही केले नाही. चिरंजीव ऐसे नाव ठेविले त्या नंतर **आमचे देव धर्म काडीले** तेव्हा आम्ही निरोप मागोन बाहीर गेलो. "

या सबनिस बंधूंनीं नारो त्र्यंबकच्या स्वारीच्या वेळीं केलेलें कृत्य आणि त्यानंतरच्या हकीकती, तसेंच कृष्ण प्रभूच्या घरांतील जुने कागद सबनिसांकडे कसे गेले वगैरे बऱ्याच गोष्टींचा उलगडा करणार कांहीं कागद आमच्यापाशीं आहेत. त्यांवरून निघणारा इतिहास या स्थळीं देण्याची जरूर नाहीं; पण त्यांपैकीं एक कागद आम्हीं या पुस्तकांत अन्यत्र ( छायाचित्रांक ५ ) छापिला आहे. त्याबद्दल सांगावयाचा विशेष हा कीं सावंतवाडीच्या इतिहासांत ( पृ. ३४।३५ ) " इ. स. १६०४ तील

यार्णीं राज्याभिसेक एकसेंदहाच्या संदा दिल्या आहेत त्यांतही आमचे वडीलांस देसाई प्रांत कुडाळ असें लिहिलें आहे.

( ९ ) १. जमेदारीचे वतनाबाबद वतनबाबी म्हणजे हक दर सेंकडा जमाबंदी वर अजमासें पांच रुपये परयंत आहेत. आतां बजीनस वाडीकर घेत आहेत. या बाबद पुरावा गांवगनाचे हिशेबी वतनबाबी म्हणोन जमा येत आहेत. हिशेब व गाववाले याकडे चौकशी केल्यावर मिळेल.

( १० ) १ मौजे **वालावली** हा गांव आमचा मुख्य वतनाचा व तेथील **श्रीदेव नाराय**ग हें आमचें कुलदेवत्य सबब त्या गांवीं वाडीकर यार्णी रात्रवस्तीसें[२] राहूं नये असा पूर्वी

---

मोडी लिपी " चा नमुना म्हणून ज्या एका कागदाचें छायाचित्र रा. पिंगुळकरांनीं दिलें आहे तो कागद आम्हीं दिलेल्या कागदाचा समकालीन आणि सहोदर म्हणजे त्याच वर्षांतील आणि त्याच कृष्णप्रभूच्या—अथवा प्रस्तुत लेखकाच्या-घराण्यांतील आहे. त्यावर कृष्ण प्रभूच्या पूर्वजांच्याहि सह्या आहेत.

१ जमाबंदींतून शेंकडा पांच रुपये. जमीदारीचें वतन किंवा हक्क म्हणून प्रभु घराण्यास पूर्वापार मिळत असल्याचें कै. वा. अनंतराव देसाई यांनींहि आपल्या लेखांत नमूद केलें आहे.

२ या गोष्टीचें प्रत्यंतर पाहण्यासाठीं श्रीमंत " बापू साहेब सावंत यांणीं आपला हत्ती या गांवीं ठेवून आपण वस्तीस नेरूर गांवीं गेले. सकाळीं येऊन पाहतात तो हत्ती मेलेला " दिसला. " तेव्हांपासून येथें वस्ती करूं नये हा ग्रह दृढ झाला. " असें एका कागदांत नमूद केलें आहे. परंतु कै. वा. रघुनाथ सावंत ऊर्फ बाबासाहेब हे एक दोन वेळां सपत्निक राहिल्याचें समजतें.

कै. वा. अनंतराव देसाई बी. ए. एल्. एल्. बी, यांनीं सुमारें ३०।३५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या आपल्या ( प्रभु ) घराण्याच्या हकीकतींत पुढील गोष्ट

पासून आज पर्यंत सांप्रदाय चालत आहे. व **कसबा कुडाळ** येथें **आमचा संस्थान**चा अधिकार हालीं जसा वाडीस आहे तसा चालत होता. तेथें अद्यापही वाडे पागा वगैरे खुणा आहेत.

---

नमूद केली आहे. " मालवणच्या **देसायांस** वालावलीस **आपल्या देवाला जाणें फार भयंकर झालें होतें** ही भाति अव्वल इंग्रजीशाहींतहि होती. १८३५ च्या सुमारास भाऊसाहेब देसाई हे वालावलीस गेले होते. पण दोन प्रहरीं रुद्र वगैरे करून संध्याकाळीं वस्तीला धामापुरांत ( ब्रिटिश हद्दींत ) आले. संध्याकाळच्या सुमारास वाडीहून त्यांनां पकडण्यास लोक आले, तों हे तिथें नाहींत. नंतर त्यांनीं या देसायांस गांवांत येऊं दिल्याबद्दल म्हणून तेथील कुडाळ-देशकरांकडून १०० रु. दंड घेतला व वाडीस निघून गेले." या हकीकतीच्या वेळीं चवथे खेम सावंत ऊर्फ बापूसाहेब ( सन १८२३–३८ ) वाडी संस्थानचे अधि-पति होते. त्यांच्या वेळीं संस्थानच्या कारभारांत बेबंदशाही माजून तिजोरीचीहि हलाखी झाली होती. याकरितां उत्पन्नाची एक बाब म्हणून, वर सांगितलेल्या दंडास जें कारण झालें त्याच मासल्याचीं निरनिराळीं कारणें पुढें करून प्रभु घराण्याचे ज्ञातिबंधु एवढ्याच घोर अपराधासाठीं कुडाळदेशकर ब्राह्मण ज्ञातिकडून " **दंड** " वसूल करण्यांत येत असे तो " **बामणदंड** " या नांवानें त्या प्रांतीं सर्वतोमुखीं आहे. **बामणदंडाचे** कांहीं **रोखे** आमच्या संग्रहीं आहेत. या बामणदंडाचा वरवंटा कुडाळदेशकर जातीवर फिरल्यामुळें त्या जातीचीं शेंकडों कुटुंबें देशोधडीस लागलीं. कुडाळदेशकरांचा असा छळ करण्याची पोक्त सल्ला सावंतांस त्यांच्या शेणवी ज्ञातीच्या मुत्सद्दी डोक्यानें दिली असें कै. प्रो. राजाराम रामकृष्ण भागवत यांचें म्हणणें आहे. ( विविधज्ञानविस्तार पुस्तक २२ पृ. २४७–२४८ ) रा. भागवत लिहितात" ही **कर्नाटकी** अंश वरचढ झालेली **मंडळी** ( शेणवीलोक) सावंत नांवाच्या मराठ्यास मिळाली व वाडी प्रांतांतील कुडाळे देसाई होता त्याचा खून झाला. तेव्हां मराठ्या सावंताच्या हातीं वाडी प्रांताचें राज्य आलें व शेणवी त्यांचे दिवाण झाले. मूळचे कुडाळे होते, ते शिरदेसाई होते. **शिरदेसाई हे मूळचे मांडलिक-राजे समजावे**. शेणव्यांच्या हातीं सत्ता आल्यापासून त्यांनीं कुडाळ्यांचा छळ

(११) १. सावंतवाडीकर हे संस्थानचा अधिकार चालवितात परंतु त्याजला सिका मोतंब आपले हातून कर्ण्यास प्रतिबंद आहे. ब्राम्हणाचे हातून सिका मोर्तब करून **देव ब्राम्हणाचें राज्य** असें म्हणतात.

(१२) १. आमचा पुरुष **जोगण प्रभु** हा लडाईंत पडला तो प्रबर होऊन वाडीकर यासी उपद्रव करूं लागला तेव्हां पासून त्याची पूज्या चालऊन तें देवत्य पाट्यावर पुज्येस लाविलें आहे'

---

करण्यास सुर्वात केली. **दिवाणगिरीच्या संबंधानें राजसत्ता हातीं आल्यामुळें शेणव्यांनीं नवीन पत्याही कुडाळयांवर बसवून त्यांचा पुष्कळ छल केला.** जसा कुडाळ्यांचा शेणव्यांनीं पूर्वी छल केला **व आजही (१८९१) थोडा बहुत करीत आहेत** तसा, शानभोगांनीं पूर्वी हैगांचा केला व आजही बराच करीत आहेत. अशा प्रकारें छल करण्याचा व त्रास देण्याचा गुण जो त्यांच्या आंगीं बऱ्याच अंशीं मुरलेला दिसतो तो कर्नाटकी होय, महाराष्ट्र नव्हे." यासंबंधांत वरील कैफियतींचें १४ वें कलम पहा. प्रभु घराण्यावर वाडकर सावंतांकडून झालेल्या जुल्माची कबुली खुद्द सावंतवाडीचे माजी न्यायाधीश गोविंदराव बळवंत यांनीं सन १८५२ सालीं **जोगण सूर्यभान प्रभु** देसाई सुभेदार (वादी) यांनीं केलेल्या दिवाणी दाव्याच्या निकालांत ठळकपणें दिली आहे.

१ आमच्या संग्रहांतील एका जुन्या कागदांत या जोगण प्रभूच्या मृत्यूची नोंद मिळते ती अशी. "**जोगणप्रभु** कुडाळीच्या कोटामधे सन सबा तिसैन आलफ (इ. स. १६९६) मधे श्रावण मासी शुध चतुर्दशी शनीवारी मारिला" त्याच्या वधानंतर २२ वर्षांनीं करवीरकर छत्रपति संभाजी महाराज यांनीं त्याच्या (जोगण प्रभूच्या) **काशीबाई** आणि **येसूबाई** या दोन बायकांनां सध्यां वाडी संस्थानांत मोडणारा '**आडेली**' हा गांव इनाम करून दिल्याची सनद मिळते. (हा गांव प्रभु घराण्याकडे "इनाम चालत नाहीं, खालसाकडे आहे" असें रा. पिंगुळकर लिहितात. सा. सं. इ. परिशि. ले. २७ टीप पहा.)

(१३) १. आमचें गांवगना वतन आहे त्या पैकी तुर्त प्रा। मसुरें व मौजे कादलगांव व मौजे हर्डी व मौजे आंबेरी व मौजे कुमामें व मौजे मालवण व मौजे मालगाव व मौजे वडाचेंपाट येथील कांहीं ठिकाणें व हक चालत आहे व माहाराज यांचा अंमल असतां मौजे वालावली वगैरे गांवचे ही हक मिळत होते.

(१४) १. इतका आमचा दगा होऊन आमचें राज्य जाण्यास कारण एक सेणवीलोक यांपासून आमचे विश्वासघात होऊन नाश जाहाला. असा कीं सेणवीलोक हे गोमांतक प्रांतीं सासष्टी देशांतील केळुसी व कुशस्थळी या दोन गांवातील कुलकर्णी म्हणजे चाकरीचे अधिकारी

---

वाडीशहरांत सरकार वाड्यालगत असलेल्या देवस्थानाला " **पाटेकर** " असें म्हणतात. जोगण प्रभूच्या वधानंतर दुसऱ्या खेमसावंतानें प्रभु सरदेसायांच्या कुडाळ येथील वाड्यांतून ( हा वाडा महालक्ष्मीच्या देवळानजीक होता असें समजतें. आजमितीस त्याच्या पायाचाहि मागमूस तिथें लागत नाहीं ! ) प्रभु घराण्याच्या परंपरागत पूजेचा राज्याचा पाटा वाडीस आणून आपण पूजेस लाविला. " **पाटा** " म्हणजे " **गादी**. " हा मूळचा **चंद्रभान** आणि **सूर्यभान** यांचा होय अशी त्या प्रांतीं समजूत आहे. तो मूळांत लांकडाचा बनविलेला होता. त्यावर पूजेसाठीं ठेविलेली **झारी** ( कलश ) ही गादीची व राज्याची संरक्षक देवता आणि मालक अशी प्रभु घराण्याची परंपरेची समजूत आहे. सावंतांनीं हीच देवता आपल्या राज्याची देवता मानून तिची स्थापना केल्यावर तिची पूजा कोळंबेकर नांवाच्या कऱ्हाडे ब्राह्मण घराण्याकडे लावून दिली. **वाडींतील** हा **पाटेकर**, सुमारें ४ फूट लांब ३॥ फूट रुंद व १ फूट उंच अशा चुनेगची पेढीवर स्थापन केला असून त्यावर कित्येक लहानमोठ्या झाऱ्या ठेविलेल्या आहेत. या सर्वांत जी मोठी झारी ती प्रभु घराण्यांतील वध केलेल्या पुरुषाच्या नांवाची होय अशी माहिती सन १८८८ सालीं तेथील पूजारी आणि राजोपाध्ये कोळंबेकर यांच्याकडून समजली.

यांजला आमचे वडीलांनीं लिहीण्याचे चाकरीस या देशांत आणुन मुख्य संस्थानी चिटणीस[1] सबनीस[2] केले. व गांव गना कुलकर्णी केलें. या प्रमाणें आमचे जुने कागदास

---

१ **चिटणीसः**–सध्यां वाडीशहरांत राहत असलेल्या चिटणीस घराण्याचे पूर्वज सावंतांचे चिटणीस होण्यापूर्वी प्रभु सरदेसायांकडे चिटणीशी चालवीत असत, अशा तऱ्हेचें निश्चित विधान रा. पिंगुळकरांनां करण्याची इच्छा होती तर, त्यांनां चिटणीसांच्याच घरीं दस्तैवजी पुरावा मिळूं शकता असा आम्हांस भरंवसा आहे. आमच्या संग्रहांतील कागदांतल्या एका यादींत या चिटणिसांची माहिती मिळते ती अशीः–" अंतोकृष्ण आरस गुळगुळे"–( आरस आणि गुळगुळे हीं त्यांचीं उपनांवें असावीं ) हा प्रभु सरदेसायांकडे चिटणीस होता ( अजमासें सन १५६५ ) त्याच्या पुढील चिटणिसांचीं नावेंः–" नारायण शेणवी, त्याचा मूल अंत शेणवी, त्याला, सात मुलगे, त्यांत वडील पीतांबर शेणवी. " शेवटच्या दोघांनी प्रभूंच्या विरुद्ध कारस्थान केलें अशी समजूत आहे.

२ **सबनीसः**—हे वाडीनजीक सावंतांचा मूळ गांव जो " **ओटवणें** " तेथील **कुळकर्णी**. त्यांचें उपनांव **वर्दे**. पहिले **खेम सावंत** हे त्याच गांवचे रहिवासी असून तेथील " **गांवकर** " होते असा उल्लेख एका कागदांत आढळतो. ते या वर्दे कुळकर्ण्यांच्या घरीं लहानपणीं गुराख्याचें काम करित होत वगैरे एक आख्यायिका सावंतांच्या अवनत काळांत ( अजमासें सन १८०३ च्या नंतर ) जनतेंत रूढ केलेली दिसते. असल्या या आख्यायिका विश्वासार्ह मानून त्या उदयास आलेल्या पुरुषांस चिकटविणें हा अज्ञ जनतेचा आवडता विषय होय. पण अशा एका आख्यायिकेस इतिहासविषय मानून पुनः तिला काडीच्या आधारावर बळकटी आणण्याचा प्रयत्न रा. पिंगुळकरांसारख्या संस्थानच्या जबाबदार लेखकानें सावंतांच्या मूळ पुरुषास कमीपणा येईल अशा बावतींत करणें हें त्यांस फारसें भषणावह आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

३ **कुळकर्णीः**–या लोकांना गांवगन्ना कुळकर्णीपणाचे कामावर नेमून वेतनादाखल जमिनी दिल्याच्या सोळाव्या शतकांतील कित्येक सनदा ( ग्रामस्थांनीं दिलेल्या ) आमच्या पाहण्यांत आल्या असून कांहीं आमच्या संग्रहांतहि आहेत.

> दाखला आहे. त्याच सेणवी लोकांनीं आम्हांस मोडण्याची तजवीज करून सावंतवाडीकर यांस सामील जाहाले आणि बंड माजऊन आमचे संस्थान बुडऊन सावंत याज बरोबर कारभार करूं लागले. त्यापासून त्याचे व आमचे जातीचा द्वेश अद्यापी चालला आहे.

---

लेखांक २ हा कागद त्याच स्वरूपाचा होय. एका जुन्या कागदांत या कुळकर्ण्यांबद्दल पुढील उल्लेख आला आहे. " सांगितले जे कुलकर्णी मिरासदार आसिलेवरी कुलीं भोगवटे दखल होताती यावरी मग सिरणी ( ? ) वांधोन कुलकर्णे मीरास करून दिल्ही साल अर्वा व अलफ. " ( सन १६०३–४ ). सुरवातीला असे कुळकर्णी २८ गांवांत ठेविले होते.

अशा दोन्ही रीतीनें नेमलेलीं या जातीचीं कित्येक घराणीं आज मितीसीह परंपरेनें सावंतांच्या राजवटींत कुळकर्णपणाचीं कामें करीत आहेत. कुडाळ प्रांतांत ग्रामाधिकाऱ्याला गांवकर अशी संज्ञा आहे. तो ग्रामसंस्थेंतील अष्टाधिकारांचा मालक असे. या अधिकारांतील ' कुललेखन ' या अधिकारानुसार ग्रामलेखक म्हणून हे कुलकर्णी मूलतः ग्रामाधिकारी यांनीं नेमून त्यांनां आपल्या मालकींतून जमिनी दिल्यामुळें ते ( कुलकर्णी ) ग्रामाधिकाऱ्याचे नोकर या नात्यानें वागत असत. विजापूरच्या बादशाहाच्या वतीनें या प्रांतावर " मलिक अजम ( म ॥ ) सरीफन्मुल्क हवालदार " नांवाचा अधिकारी ( सध्यांच्या पोलिटिकल एजंट सारख्या दर्जाचा ) बांदें येथें राहत असे. प्रभुसरदेसायांच्या अंमलाखालील प्रदेशाच्या जमाबंदींतून जी ठराविक रकम बादशहास द्यावी लागे ती सदरील हवालदाराकडे जमा करण्याचा प्रघात असे. अशा रकमांतून एकदां १५००० होन व आणखी एकदां ५००० होन मिळून वीस हजार होनांची रकम या हवालदाराकडून विजापुरास गेली नाहीं. ह्या रकमा खजीन्यांत जमा न करितां त्या ' अमानत ' म्हणून आपल्याकडे ठेविल्या असें सरदेसायांकडून विजापुरास कळविण्यांत आल्यावरून त्याला बादशहानें कामावरून दूर केलें. ( " मलिक सारिफन मुलुकाचे हवालदारी दूर करून हवालदारी परगने मजकूर हवाले इथानीह केले " ) या कामांत या जातीच्या कुळकर्णी वर्गाचें अंग होतें

°(१५) १. आम्हीं या प्रांताचे अधिकारी सबब मेहरबान डंडलोर्ब[1] साहेब कलेकटर जिल्हा रत्नागिरी याही आम्हांस सन १८२५ सालीं हुकूम पाठऊन आम्हांकडून जुने कागद पत्र हुजर न्हेले आहेत तो हुकूम सिक्या बाबद

---

आणि तेव्हांपासून १४ व्या कलमांत लिहिल्याप्रमाणें या दोन जातींमधील द्वेषास सुरवात झाली; व पुढें या जातीनें उघड उघड विजापूरच्या सुभेदाराशीं संगनमत करून सावंतांच्या दंगलीत भाग घेतला असा, कित्येक जुन्या कागदांच्या मतितार्थावरून, निष्कर्ष काढतां येतो. **केळुसी** व **कुशस्थळीः**—कुशस्थळी या गांवाचें मूळचें नांव **कुडथाळ** किंवा **कुट्ठाळ**; केळुसीला केळोशी किंवा **केळूस** असेंही म्हणतात. पण या लोकांच्या आगमनानंतर आणि सह्याद्रीखंडाच्या सुधारलेल्या आवृत्तीच्या वेळीं या दोन्ही नांवांवर **गोमंतकी छाप** वसून अनुक्रमें **कदली** आणि **कुशस्थली** ह्या नामाभिधानांची जोड त्यांस प्राप्त झाली, आणि मंगेशमहात्म्य रचनाकालीं कुशस्थली गांवाला " नगरी " चें सौभाग्य प्राप्त झालें ! [ अशा प्रकारचें आणखी बऱ्याच गांवांचें भाग्य उदयास आल्याचें दिसतें. उदाहरणार्थ ' माशेल ' याचें ( १ ) ' महाशाला ' ( २ ) ' महाशैल ' ( आपापल्या मगदुराप्रमाणें याच्यांत निवड करावी ), ' वेरणें ' याचें ' वरेण्य ', ' सिरदन ' याचें ' श्रीवर्धन ', ' चोडण ' याचें ' चडामणि ', ' दिवाडी ' याचें ' द्वीपावती ', ' सांखवळ ' याचें ' शंखावली ' म्ह. शंखांची रांग ]. आमच्या तपासाप्रमाणें हे दोन्ही गांव या लोकांचे मूळगांव म्हणतां येत नाहींत. हे लोक गोव्यांच्या दक्षिणेकडील मलबारांतून ( अर्थात कानडी भागांतून ) गोव्यांत येऊन राहिले त्या वेळीं वरील दोन गांवांत त्यांनीं वसाहत केलेली दिसते. या लोकांचा धंदा लेखनक्रियेचा होता.

१ यांचें नांव आय. एस्. डनलॉप. हे सुरवातीस मालवण येथें ' रेसिडेंट ' होते. त्यांनीं दादाजी प्रभु देसाई यांच्या इनाम आणि कटुबाण ठिकाणांवर कुंबळें मना केल्याची सन १८१४ आणि १८१६ सालचीं जीं पत्रें मिळतात त्यांवर रेसिडेंट असा त्यांचा हुद्दा लिहिलेला आहे. सन १८२२-२३ सालीं सांवतवाडींतील लढे मिटविण्याच्या कामावर यांची नेमणूक झाली होती.

सन १८३९ सालीं **कोर्टीन** साहेबांकडे चौकसींत दिल्हा आहेत.

(१६) १. सदरहु बाबद दाद लागण्याविसीं कंपनी सरकारांत मुंबईस आम्हीं सन १८२७।२८ सालीं अर्ज्या पाठविल्यावरून कलेकटर साहेबांकडे अर्ज करावा असे हुकूम आले त्या अर्ज्या सुद्धां सदरहु सिक्याचे खटल्यांत दिल्हे आहेत.

# टिप्पणी.

# टिप्पणी.

## [ १ ]

### चित्रांक ४

ह्याचा कागद आकारानें लांब असल्यामुळें त्याचें संपूर्ण छायाचित्र घेतलें नाहीं. ( लांबी २१॥ इंच आणि रुंदी ९॥ इंच). कागद शिवपूर्वकालीन असून, आजमितीस त्याला ३२४ वर्षें झालीं. त्याचे १२ तुकडे झालेले आमच्या हातीं मिळाले, ते व्यवस्थेनें चिकटवून कागद उभा केला आहे. त्याच्या उजव्या बाजूस ६ शिक्के व सात सह्या आहेत. मराठी लिपीच्या सह्या आणि शिक्के शक्य तितके बरोबर लाग्लिले आहेत. सहावी सही कानडी लिपीची असून, तींतलीं जितकीं अक्षरें लागूं शकलीं तितकींच दिलीं आहेत. लेखाच्या वरच्या बाजूस कानडी लिपीच्या मजकुराची एक लहानशी ओळ आहे.

१ सहीः—बाल गोविद सावत दौलत मोकासाई मौजे मजकूर. शिका अष्टकोनी असून आंतील अक्षरें बालबोध लिपीचीं आहेत, पण तीं लागत नाहींत.

२ सहीः—बोहुजूर भानजी देसाई. शिक्यांतील मजकूरः—श्रीनारायण प्रसन भानजी प्रभु देसाई.

३ सहीः—रामजी प्रभु देसाई. शिका फारशी लिपीचा. अक्षरें समजत नाहींत.

४ सहीः—बाये प्रभु देसाई. ,, ,,

५ सहीः—गणे सावत देसाई ,, ,,

६ सहीः—कानडी लिपीची. " हुजूर रामजी ... देसाई वालावली ... ... दस्तुर खुद्द "

७ सहीः—बोहूजूर जोगण प्रभु देसाई. शिका मराठी लिपीचा, त्यांतील " प्रभु देसाई " हीं शेवटचीं अक्षरें दिसतात.

८ कानडी मजकुराच्या ओळींत " श्रीमातोश्री तारादेवी " अशी अक्षरें आहेत.

---

# [ २ ]

## चित्रांक ५

१६ इंच लांब आणि ७ इंच रुंदीच्या कागदाचे ८ तुकडे जुळवून हा कागद उभा करून त्याचें पूर्ण छायाचित्र घेतलें आहे. कागद शिवपूर्वकालीन असून त्याला आज मितीस ३२० वर्षें झालीं. पांचव्या ओळीच्या मध्यावर शा. शक १५२६ चा आंकडा आहे, त्यांतील २ चा अंक तुटून गेला, आणि तुकडे चिकटवितांना शेवटचा ६ चा अंक मागील ५ च्या पुढें चिकटला गेला. या कागदाच्या उजव्या बाजूस तीन शिक्के आणि ५ सह्या आहेत. शेवटच्या सहीच्या खालीं आणि कागदाच्या डाव्या बाजूस लेखाच्या सुरवातीच्या भागावर कानडी लिपीच्या ओळी आहेत.

१. सही:–' निघावन ' अशा हुद्देदाराची ही सही आहे. नांवाचा कांहीं भाग फाटून गेल्यामुळें नांव सांगतां येत नाहीं. इ. स. १५९६ सालच्या याच केळूस गांवच्या एका कागदांत ( हा कागद आमच्या संग्रहीं आहे ) या निघावनच्या नांवापुढें "पंडित हु ॥ महालांनिहाय दौलत मोकासाई मौजे मजकूर " असा मजकूर आहे.

२. सही:-गोवाई भानजी देसाई. शिक्का मराठी लिपीचा. त्यांत " श्रीनारायण प्रसन भानजी प्रभु देसाई " अशीं अक्षरें आहेत.

३. सही:–गोवाई लख प्रभुदेसाई. शिक्का मराठी लिपीचा, त्यांत वर चंद्र आणि सूर्य यांच्या आकृति असून खालीं " श्री लक्ष्मीनारायण प्रसन गणप्रभु सुत ळख प्रभु देसाई " अशीं अक्षरें आहेत.

४. सही:–गोवाई कान सावत देसाई; शिक्का फारशी लिपीचा, लागत नाहीं.

५. सही:–गोवाई आंत सेणवी नाडकर्णी. या मोडी लिपीच्या सहीखालीं कानडी लिपीचीं कांहीं अक्षरें आहेत, तीं " स्वस्तिसींमे " अशीं लागतात; कदाचित् लेखनसीमेप्रमाणें साक्षीच्या सह्यांच्या मर्यादेचीं तीं द्योतक असावीं.

६. लेखाच्या सुरवातीच्या भागावर डावे बाजूस कानडी लिपीच्या ओळींत " **श्रीमातोश्री तारादेवी** " अशीं अक्षरें आहेत.

---

## [ ३ ]

### चित्रांक ९

संपूर्ण कागदाचें छायाचित्र घेतलें नाहीं. कागद १९॥ इंच लांब आणि ७ इंच रूंद आहे. तो शिवपूर्वकाळचा असून आज मितीस त्याला ३४२ वर्षें झालीं. त्याचे १४ तुकडे जुळवून तो उभा केला आहे.

श्रीगणेशायनमःच्या डाव्या बाजूस लिहिलेला मजकूरः—

" स्वस्तिदेवी **श्रीतारादेवी** वा **ब्राम्हण.** " परिशिष्ट लेखांक १ ला यांत उल्लेखिलेल्या केळुस गांवीं तारादेवीचें देऊळ आहे. ब्राम्हण हें प्रस्तुत लेखकाच्या घराण्यांतल्या एका प्राचीन पूर्वजाचें स्थान होय. हें स्थान केळुसनजीकच्या तेंडोली गांवांतील " **आरव** " नांवाच्या क्षेत्रांत आहे. या घराण्याच्या कोंकण ( गोव्यांसहित ) आणि दक्षिण कानडा या भागांत राहत असलेल्या ६ शाखांचा तपास लागतो. दरवर्षी विजयादशमीच्या दिवशीं या प्रत्येक शाखेंतील कोणीतरी इसमाला येऊन सदरील आपल्या पूर्वजाच्या स्थानाची पूजा करून नैवेद्य करावा लागतो.

कागदाच्या शेवटीं ' मोर्तबसूद ' च्या समोर कानडी लिपीची एक सही आहे, तींत " दस्तुर बाबशेणवी शिरवळी मु॥ बडनाळ " ( ? ) अशीं अक्षरें असल्याचें समजतें.

---

## [ ४ ]

### तिलिंग-गौड

प्राचीन काळीं ओरीसा ( ओढ्या–औड्र ) प्रांतावर राज्य करणाऱ्या केसरी राजांचा अंमल तेलंगणावरहि असे. या केसरी घराण्याचा शेवट सन ११३२ मध्यें झाल्यानंतर या दोन्ही देशांवर गंग राजघराण्याची सत्ता स्थापन झाली. यांना गजपति राजे असेंहि म्हणत. ओढ्या प्रांताचा एका काळीं गौड साम्राज्यांत अंतर्भाव होत असल्यामुळें आणि गौड देशांतल्या गंगाकिनाऱ्यापर्यंत एक दोन वेळां स्वाऱ्या केल्यावरून गजपतिराजे स्वतःस गौड देशचे राजे असें म्हणवूं लागले. उदाहरणार्थ, पुरुषोत्तमदेव नांवाच्या एका गजपति राजानें पोटेश्वरभट्ट नांवाच्या ब्राह्मणास दिलेल्या एका दानपत्रांत स्वतःस ' गौडेश्वर ' म्हटलें आहे.

" The illustrious Gajapati, lord of Gaur, lord of the tribes of the nine forts, Karnatac and Utkala, Shri Purushotum Dev Maharaj, to Poteshwar Bhat a deed of a gift of a sâsan ".

या ताम्रपत्राला अनुलक्षून जॉन बीम्स लिहितातः—

" Gaureshwar or lord of Gaur *i.e.* Bengal is a constant empty boast of the kings of Orissa, who claimed to rule from the great to the little Ganga *i. e.* from Ganga to Godavari. Their kingdom did frequently stretch as far as the latter river and even beyond it ; but only twice in all their annals did they reach the Ganges and then only for a brief period each time". (Ind. Ant. Vol. I (1872) P. 355).

याप्रमाणें केवळ वृथाभिमानानेंच गजपति राजे आपणास गौडेश्वर म्हणवीत हें उघड आहे. वर सांगितल्याप्रमाणें त्यांचा तेलंगणावरहि अंमल असल्यामुळें नागदेवाच्या ताम्रपटांत त्यांना तिलिंग-गौड असें म्हटलें आहे.

---

## [ ५ ]

## ' वीर ' माइन्देवानें पराजित केलेले हम्मीर.

सुप्रसिद्ध इतिहासलेखक डॉ. फ्लीट यांनीं हम्मीरांस मुसलमान म्हटलें आहे. पण सिंघणाच्या बालसेनापतीनें पराजित केलेले हम्मीर मुसलमान नसून क्षत्रिय रजपूत होते हें पुढें दिलेल्या रामदेवराव यादवाच्या सन ११९४ च्या एका ताम्रपटांतील श्लोकावरून दिसतें.[2]

---

1. Bombay Gazetteer Vol. 1, Part II, P. 525.
2. Journal, Royal Asiatic Society of Great Britain and Ireland Vol. I, New Series. 1865.

" लक्ष्मीकांतलवः प्रतारितभवः **श्रीजैत्रपालोद्भवः**
संग्रामांगणसंचितातिविभवः शास्ता भुवः**सिंघणः**
पृथ्वीशो मथुराधिपो रणमुखे काशीपतिः पातितो
येनासावपि **यस्य भृत्यबटुना हम्मीरवीरो जितः** "

या श्लोकांत सिंघणानें मथुरा आणि काशी येथील राजांना लढाईत चित केल्याचें वर्णन आहे, त्यावरून त्याच्या बालसेनापतीनें पराजित केलेला हम्मीर हा सुद्धां त्याच बाजूचा कोणी तरी राजा असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वस्तुतः खरोखरचे ' हम्मीर ' हे मुसलमान नसून रजपूत होते असें डॉ. भांडारकरांनीं दाखविलें आहे.

"I have shown that there were two Rajput Hammirs one of whom was a Chohan and held the fortress of Ranthaubhor and the other a Gehlote who ruled over Mewar."

जैन महाकवि जयसिंह सूरि याचा शिष्य आणि नातु जयचंद्र सूरि यानें वरील रतनभोरच्या ( रणस्तंभपूर ) चौहान हम्मीरावर " हम्मीर महाकाव्य " केलें आहे. याच हम्मीरावर शार्ङ्गधर कवीनेंहि ' हम्मीरकाव्य ' आणि ' हम्मीररासा ' असे दोन ग्रंथ रचिले आहेत. कर्नल टॉड म्हणतात ( राजस्थान ) त्याप्रमाणें स्वतः शार्ङ्गधर हम्मीराचा समकालीन नसून त्याचा आजा रघुनाथ हा हम्मीराचा गुरु म्हणून समकालीन होता असें शार्ङ्गधराच्याच सांगण्यावरून दिसतें. असो. फ्लीट साहेबांस १२, १३ व्या शतकांतील कित्येक सुलतानांच्या नाण्यांवर आढळलेले ( श्री ) **हम्मीर** हे वास्तविक अरबी ' अमीर ' या शब्दाचा अपभ्रंश होत. श्रीकार हें केवळ हिंदू पद्धतीचें अनुकरण आहे. त्या काळचे बरेच सुलतान नाण्यांवर आपल्या नांवामागें श्री जोडीत असत. उदाहरणार्थः—( १ ) श्री हम्मीर सुरित्रण ( अरबी सुलतान ); ( २ ) श्री सुलतां मुइजुद्दीं ( कैकुबाद ); ( ३ ) श्री सुलतां अलावदीं; ( ४ ) श्री सुलतां गयासुदीं, इत्यादि.

---

1. Report on the search for Sanskrit Manuscripts in Bombay Presidency, for the years 1887-1891.

# [ ६ ]

## प्राचीन गौडदेश आणि तेथील ब्राम्हण.

गौड हें बंगाल देशाचें नांव म्हणून अर्वाचीन काळीं इतकें रूढ आहे कीं, तें प्राचीन काळीं दुसऱ्या एका देशाचें होतें हें फारच थोड्यांस ठाऊक असेल. बंगाल्यास तें नंतर एका विशिष्ट कारणामुळें मिळालें. तत्पूर्वी त्याचें नांव " वंग " असें होतें, हें १० व्या प्रकरणाच्या एका टीपेंत सांगितलें आहेच. महाभारतांत बंगाल्याचा गौड या नांवाचा उल्लेख मिळत नाहीं. इ. स. च्या ५ व्या शतकांतील वराहमिहिरानेंहि त्या नांवाचा उल्लेख केलेला नाहीं. त्यानें ठाणेश्वर ( स्थानेश्वर ) च्या आसमंतातच्या प्रदेशाला गुड अथवा गौड देश हें नांव दिलेलें आढळतें. प्रथमतः गौड हें नांव दिल्लीच्या आसमंतांतल्या बऱ्याच विस्तीर्ण प्रदेशास लाविलें जात असे. त्या प्रदेशांतील ब्राम्हण स्वतःस आदिगौड ( आदगौड=पहिले गौड ) म्हणवितात. इ. स. च्या पांचव्या शतकाच्या अखेरीस आणि सहाव्याच्या सुरवातीस हूण ( म्लेंछ ) लोकांच्या स्वाऱ्यांस कंटाळून तेथील कित्येक ब्राम्हणांनीं पूर्वेकडील वंग देशांत जाऊन वसाहत केल्यानंतर, या नवीन वसाहतीच्या प्रदेशास ( बंगाल्यास ) कालेंकरून गौड हें नांव प्राप्त झालें, असा रा. ब. चिंतामणराव वैद्यांचा शोध आहे[१]. वैद्यांच्या या शोधाला दुसरीकडेहि अनेक प्रमाणें आढळतात.

वर सांगितलेल्या हूणांनीं गुप्तराजांचा बराचसा मुलुख काबीज करून त्या ठिकाणीं आपली सत्ता स्थापन केली. चिनी प्रवासी हुएन्त्संग यानें आपल्या प्रवासवर्णनांत[२], श्रावस्तीचा राजा ' मिहिरकुल ' हा बौद्धांचा मोठा शत्रू होता असें लिहिलें आहे. ' मिहिरकुल ' याचें ' मिहिरगुल ' असें संस्कृत रूप राजतरंगिणींत मिळतें. हा राजा हूण जातीचा म्लेंछ होता. याबद्दल त्या ग्रंथांत पुरावा आहे (अथ म्लेंछ गणाकीर्णे मण्डले चण्डचेष्टितः तस्यात्मजोभून्मिहिरकुलःकालोपमो नृपः ). जसे ११ व्या शतकांत तुर्कांच्या स्वाऱ्यांमुळें गौड देशी ब्राम्हण दक्षिणेंत आले तसेच हूणांच्या स्वाऱ्यांना त्रासून ५ व्या किंवा ६ व्या शतकांत ते वंग देशांत जाऊन राहिले.

---

१ मध्ययुगीन भारत, भा. १ ला. प्र १४ वें.

२. Water's Huentsung's Travels. pp. 288-299.

परंतु पुढील काळांत या आदिगौडब्राह्मण ज्ञातीच्या ( उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील ) इतिहासांत कित्येकांनीं वरीच गडबड करून सोडल्यामुळें मूळ गौडदेशी ब्राह्मण कोण, त्यांचें मूलस्थान कोणतें, यावद्दल साधार आणि एकत्र लिहिलेली अशी माहिती मिळत नाहीं. तरी इतस्ततः पसरलेली जी थोडीबहुत मिळते ती पुढें देत आहों.

सन १८८१ च्या खानेसुमारीच्या अहवालांत सर डेंझिल इबेटसन साहेबांनीं "Outlines of Punjab Ethnography" या निबंधांत पुढील माहिती दिली आहे.

"*Gaur Brahmins* :—There has been much dispute about the position of the Gaur from which this section is named. Their traditional place of origin is Hariana and their present home is the portion of the N. W. Provinces lying west of Aligarh and Mathra and the part of the Punjab defined above and they are separated from Bengal by other sections of the caste. General Cunningham suggests that Gaur is the old name of Gonda, which Sir George Cambell would make it another from of the word Ghaggar. The Gaur Brahmins are far more strict in all caste observances than Sarsut Brahmins from whose hands they will not eat bread and upon whom they look down."

बंगाल्यांतील वरेंद्र आणि ऱ्हारी ( बारेंद्र सेनी आणि राडिया सेनी=श्रेणी ) ह्या नांवाचे ब्राम्हण, गौड ब्राह्मण ते आपणच असून दुसरे कोणी नव्हत असें म्हणवीत आले. पण त्यांचा ह्या भ्रम आतां कित्येक संशोधकांनीं दूर करून ते ( **सेनी** ) वास्तविक **कान्यकुब्ज ब्राम्हण** असून सेन राजांनीं ११ व्या शतकांत कान्यकुब्ज देशांतून आणिलेल्या कान्यकुब्ज ब्राह्मणांचे ते वंशज होत असें सप्रमाण सिद्ध केलें आहे. बंगाल्यांत वर सांगितलेल्या आदिगौड ब्राह्मणांच्या मागाहून कित्येक शतकांनीं वसाहत केलेल्या या लोकांनीं राजाश्रयाच्या जोरावर दांडगाईचें वर्तन

करून पूर्वोक्त गौड ब्राम्हणांविषयीं भलभलत्या कथा रचून स्वतःच्या जातीच्या प्रौढीचीं कथानकें फैलावून सोडिलीं. ( याच बंगाली सेनींचे वंशज आपण आहों असें मानणाऱ्या कोंकणांतील एका ज्ञातीनें तिकडेहि तोच प्रकार चालविला ! ) याबद्दल बरीचशी माहिती " **भ्रांति-विजय** " नामक एका बंगाली पुस्तकांत दिलेली आहे. या पुस्तकावरील अभिप्रायांत कलकत्ता येथील संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपॉल महामहोपाध्याय डॉ. सतीशचंद्र विद्याभूषण, एम्. ए., पीएच्. डी , हे म्हणतातः—

" It has been stated in the Book ('Bhranti Bijaya') that before the migration of the Kanoujea Brahmins to our country there lived Gauradya ( आद्यगौड ) Brahmins. There is no shadow of doubt that the Mahishyas and their priests ( आद्यगौड ब्राह्मण ) have been living in Gaur since a very ancient time."

या वरेंद्र आणि राडियासेनी ब्राम्हणांच्या भानगडीचा चांगला तपास करून डॉ. वाइज ( Wise ) आणि रिस्ले ( Risley ) साहेब यांनीं सन १८९१ च्या खानेसुमारीच्या अहवालांत जी माहिती नमूद केली आहे ती जिज्ञासूंनीं मूळांतूनच ( Ethnographical Enquiries in Eastern Bengal, by Dr. wise ) वाचावी.

गौड-बंगाल आणि आदिगौडदेश यांचा तपास अलीकडे कित्येक संशोधकांनीं प्राचीन पुराण्यांवरून आणि तत्प्रांतस्थ ब्राम्हणांच्या परंपरागत इतिहासावरून लावून आदिगौड ब्राम्हणांचें मूलस्थान प्राचीन श्रावस्ती नगरीजवळ गुडदेशांत होतें, आणि तेथून हे ब्राम्हण दिल्लीच्या आसमंतांत, ब्रम्हावर्तांच्या-गंगायमुना यांच्या किन्याऱ्यांमधील-प्रदेशांत ( अंतर्वेदी ) येऊन राहिल्याचें पूर्णपणें सिद्ध केलें आहे. त्यांतील कांहीं प्रमाणें पुढें दिलीं आहेतः—

( १ ) इक्ष्वाकु कुलांतील राजा युवनाश्व याचा मुलगा श्रावस्त यानं सुप्रसिद्ध श्रावस्ति नगरी गौडदेशांत निर्माण केल्याचा उल्लेख मत्स्यपुराणांत ( अध्याय १२ श्लो. ३० ) आहे.

श्रावस्तश्च महातेजा वत्सकस्तत्सुतोऽभवत् ।
निर्मिता येन श्रावस्ती गौडदेशे द्विजोत्तमाः ॥

अर्थात हा गौडदेश म्हणजे गौड–बंगाल–नव्हे हें उघड आहे. उक्त श्लोकांतील श्रावस्तीपुरी, आजहि शरयूनदीच्या उत्तरेस गोंडा नगरीच्या समीप आहे. त्या भागांतून पुढील काळांत या ब्राम्हणांच्या वसाहती दिल्ली प्रांत-सोनपत, पानिपत, करनाल, कुरुक्षेत्र, फल्गु, कैथल, यमुनानदीजवळचा प्रांत, हस्तिनापूर, मारवाड. झंझनु, फत्तेपूर, शेखावाटी, पुष्कर, आदि प्रांत, मत्स्य, विराट, भिवानी इत्यादि स्थानांत झाल्या.

( २ ) राष्ट्रकूट वंशांतील सुवर्णवर्ष कर्कराज ( कृष्ण ) किंवा अकालवर्ष कृष्ण याच्या सन ८११–१२ च्या ( बडोदें ) ताम्रपटांत[1], त्यानें गौड देशाच्या राजाचा गर्वहरण केल्याची माहिती असून त्यांतच ' वंग ' या निराळ्या देशाचाहि उल्लेख आहे. त्यावरून नवव्या शतकाच्या प्रथमार्धापर्यंत तरी वंग देशाला गौडदेश हें नांव प्राप्त झालें नसल्याचें दिसून येतें.

( ३ ) सुप्रसिद्ध अरबी लेखक अल्बेरुनी यानें गौड म्हणजे गुडदेश असें सांगून तो भाग स्थानेश्वराजवळ असल्याचें लिहिलें[2] आहे.

(४) A Gaur Brahmin is one of the five Gaurs now located in Hindustan, in the upper Provinces throughout the Subha of Delhi to hills." (Cyclopædia of India, by Surgeon General Edward Balfour Vol. 1, 1885).

(५) "The original home of the Gaur Brahmins is the कुरुक्षेत्र Country. The Gaurs say, that the other four main divisions of North India Brahmins were originally Gaurs and have acquired their present

---

१. Ind. Ant. Vols. XI and XII.

२. Sachan's Alberuni's India. I. p. 300; Alberuni's Notes on " Volkartafel of वराहमिहिर.

designation of सारस्वत, कान्यकुब्ज, मैथिल and उत्कल by immigrating to the Provinces where they are now domiciled. The name Adi Gaur(आदिगौड) adopted by Kurukshetra Brahmins is in consonance with this view." ( Hindu castes and sects, by J. N. Bhattacharya P. 35).

वरील अवतरणांत निर्दिष्ट केलेल्या इतर चार ब्राह्मणांबद्दलची समजूत बरोबर आहे किंवा नाहीं तें ठरविण्याचें हें स्थळ नव्हे. आद्यगौड ब्राह्मणांच्या मूल स्थानाबद्दल विद्वानांचा तपास व ग्रथांतरींचे इतर आधार काय आहेत इतकेंच दाखविण्याचा हेतू आहे.

(६) " It is necessary to remark that although Gaur be the name of Bengal, yet the Brahmins who bear that appellation are not inhabitants of Bengal but Hindustan proper. They reside chiefly in Subha of Delhi, while the Brahmins of Bengal are avowed colonists from Canouj कनौज ......The Gaur Brahmins allege a tradition that their ancestors migrated in the days of the Pandwas at the commencement of the present Kaliyuga." ( Misc. Eassays by H. T. Colebrooke, Volume 11, on the "Sanskrit and Prakrit languages").

एकंदरींत पाहतां वरील माहितीवरून इतकें सिद्ध करतां येतें कीं गौड किंवा आदिगौड ब्राह्मणांचें मूलस्थान म्हणजे उत्तर हिंदुस्थान होय-बंगालदेश नव्हे. सामंत ब्राह्मण राजवंशाचे पूर्वज ज्या गंगथडीच्या प्रदेशांतून कोंकणांत आले तो भाग आद्यगौडब्राह्मणांनीं वसविलेला होता व आहे, हें तत्प्रांतांतील आमच्या प्रवासावरूनहि आम्हांस माहित आहे.

---

[ ७ ]

## हिंदळें.

हा गांव कै. वा. गोविंदराव चांदोरकर यांनीं ह्मटल्याप्रमाणें गोव्यांजवळ नसून त्याच्या उत्तरेस सुमारें ७० मैलांवर देवगड तालुक्यांत ( पण प्राचीन कुडाळ प्रांतांत ) समुद्र किनाऱ्यालगत वसलेला आहे. गांव लहानच असून तो सपाट मैदानावर वसलेला आहे. एका बाजूस नदी, दुसऱ्या बाजूस नारिंग्रे गांवचे डोंगर, तिसऱ्या बाजूस मुणगें व चौथ्या बाजूस समुद्र अशा चतुःसीमांनीं हा गांव परिवेष्टित असून त्याला ऐतिहासिक महत्वहि आहे. या गांवांत प्राचीन काळच्या राज्याचे व क्रांत्यांचे अवशेष अद्यापिहि दिसून येतात. दक्षिणेच्या बाजूस, पण जरा अग्नेयी दिशेकडे–कलती अशी, एक सुमारें अर्धा मैल लांबीची चिरेबंदी घांटी डोंगरावरून मैदानावर उतरलेली आहे. तिच्या बांधणीची सुबकता खरोखरच कौतुकास्पद आहे. ही घांटी फार प्राचीन काळची आहे असें तिकडील लोक सांगतात, परंतु " **भैरवाची घांटी** " या तिच्या नांवावरून तिचा काल काढतां येण्यासारखा आहे. माइन्देवसामंताच्या पश्चात् भैरव ह्या राजाचें नांव मिळतें, त्यावरून प्रायः त्याच्याच नांवानें ( हिंदळ्यांचें देऊळ व ) ही घांटी बांधली असावी. यावरून ठोकळ मानानें तिच्या बांधणीचा काल चौदाव्या शतकाच्या मध्यास येतो. तिच्या पायथ्याशीं प्रवाशांना पाणी पिण्यासाठीं बांधलेली लहानशी एक पुष्करणी ( तळी ) आहे. गांवाच्या तीन बाजूंस बांधलेले लहान मोठे असे पांच तलाव आहेत. पैकीं तीन साधारण स्थितींत असून बाकीचे नादुरुस्त झाले आहेत. तथापि प्राचीन काळीं ते विशेष हेतूनें बांधलेले होते असें दिसतें. गांवच्या पश्चिम बाजूस जो एक तलाव आहे तो **देम** नांवाच्या एका पुरुषाच्या नांवानें प्रसिद्ध असल्याचें समजतें. कोणी त्याला " **ब्राह्मण देवाचें तळें** " असेंहि ह्मणतात. पहिल्या नांवांतील ' म ' चें ' व ' होणें साहजिकच आहे. गांवच्या मुख्य देवाचें नांव ' **भैरव देव** ' असून, तें एक शंकराचें स्थान आहे. वर सांगिल्याप्रमाणें सदरील घांटी आणि हें देऊळ हीं दोन्हीं स्थळें ताम्रपटांत उल्लेखिलेल्या भैरव भूपतीच्या नांवाचीं स्मारकें होत असें अनुमान करावयास हरकत नाहीं. या भैरवाच्या नांवानें ओळखिलीं जाणारीं आणखी कांहीं स्थळें हिंदळ्यापासून पूर्वेला सह्याद्रीच्या लगत आढळतात.

दिगवळें गांवानजीक सह्यशिखरावर **भैरवगड** नांवाचा एक पुराणा डोंगरी किल्ला आहे. हा भूभाग ज्या महालाच्या नांवानें ओळखिला जातो त्या साळशी गांवांत भैरव देवाच्या नांवानें प्रसिद्ध असलेलें शंकराचें स्थान असून तें या हिंदळ्यांतील देवस्थानापूर्वीचें म्हणून भैरवाचें मूलस्थान मानतात. या महालांतील गांवांतील देवस्कींत कांहीं विघडाविघड झाल्यास बहुतेक सर्व गांवचे देव या भैरव देवाकडे येऊन त्याचा कौल घेऊन जातात.

हिंदळ्यांतील भैरव देवाच्या देवळाच्या आजूबाजूस बऱ्याच समाधि किंवा वृंदावनें आहेत, त्यांची माहिती अशी मिळते. बहामनी शहानें दक्षिण कोंकण काबीज करून घेतल्यावर (सन १५७० नंतर) हिंदळें गांवांत मुसलमान लोकांनीं ठाणें बसविलें. ("तांब्रांची स्वारी झाली तेवां हा मुलुक ओशोड पडला" अशी "बेदरकरांच्या" स्वारीनंतरची माहिती एका जुन्या कागदांत मिळते). पुढील कांहीं वर्षांनीं "राणे" ऊर्फ "रावळ" नांवाच्या एका मराठे कुळानें हिंदळ्यांत आपला जम बसविला. तुर्कांच्या सतत स्वाऱ्यांनीं धुमाकूळ मांडल्यामुळें उत्तरेंतून जसे ब्राह्मण कोंकणांत येऊन राज्याधिकारी बनले तशींच कित्येक क्षत्रिय कुळेंहि कोंकणांत आलीं, त्यांपैकीं आपलें घराणें असल्याची या घराण्याची परंपरागत समजूत असल्याचें समजतें. ते आपल्यास 'रावळ' नामक क्षत्रिय घराण्याचे वंशज समजतात. या राण्यांत आपल्या कोंकणांतील पूर्वजांविषयीं जी एक आख्याइका प्रसिद्ध आहे ती अशीः—

वर सांगितल्याप्रमाणें हिंदळ्यांत ठाणें दिलेल्या मुसलमान सरदारानें या राण्यांनां आसपासच्या गांवांतून जाण्याची मनाई केली. त्यावरून उभयतांची हिंदळ्यांच्या मैदानावर लढाई झाली. तींत कित्येक राण्यांप्रमाणेंच उत्तम कुळींचे मराठे मारले गेले. त्यावेळीं जी पळापळ झाली त्यांत, भैरवाच्या एका गौडब्राह्मण पुजाऱ्याच्या स्त्रीनें, राण्यांचा कुलतंतु वांचविल्याची हकीगत तिकडील लोकांत प्रचलित आहे. सदरील पुजाऱ्याचा रहिवास देवळाच्या मागील भागीं असे. राणेघराण्यांतील एक गर्भवति स्त्री आपला जीव वांचविण्यासाठीं पुजाऱ्याच्या बायकोकडे आली. तेव्हां तिला भैरव देवाच्या घुमटीच्या आड लपून राहण्यास सांगून ब्राह्मणस्त्री घुमटीच्या दुसऱ्या बाजूस लपून राहिली. मुसलमान सैनिक देवळाकडे येताहेत

असें ऐकतांच ब्राह्मण स्त्रीनें त्या गरोदर स्त्रीला सांगितलें कीं तुला कोणी कांहीं विचारल्यास आपण देवाची पूजारीण आहें असें सांगून इतर आपणास कांहीं माहित नाहीं असें सांग. मुसलमान सैनिकांनीं त्या दोघींस हुडकून बाहेर काढिलें व त्यांच्या मानेवर तरवारी ठेवून तुह्मी कोणाच्या घराण्यांतील स्त्रिया व ही गरोदर स्त्री कोणाची तें खरें सांगा नाहींतर दोघींसही ठार मारूं अशी धमकी दिली. या वेळीं राण्यांच्या वंशांतील एकूणएक स्त्री पुरुषांस ठार मारण्याची मुसलमानांनीं प्रतिज्ञा केली होती. ( महंमदशहा–१३५८–१३७५; बहामनीनें, विजयनगरकरांच्या राज्यांतील एक लाख हिंदूंना ठार मारण्याची अशीच एकदां प्रतिज्ञा केली होती. ) राण्यांच्या घराण्यांतील आणि पुनः गरोदर स्त्री तर त्यांनीं कधींच जीवंत सोडिली नसती. पण या ब्राह्मण स्त्रीनें, गरोदर मराठा स्त्रीला खास त्यांचा ठार मारण्याचा बेत जाणून, प्रसंगावधान दाखवून, आपला एकटीचा जीव गेला तरी बेहत्तर, पण गरोदर स्त्रीला वांचवून दोन जीव वांचतील तर पाहावें व एका घराण्याचा कुलतंतु वांचवावा अशा भावनेनें त्यांस उत्तर दिलें कीं " ही गरोदर स्त्री म्हणूनच इला ठार मारण्याचा तुमचा निर्धार झालेला दिसतो, पण ही बिचारी या देवाची पुजारीण आहे आणि मीं तिची एक गरीब नोकर आहें. कालच्या लढाईत आमचे नवरे कुठें ठार होऊन नापत्ता झाले, आमचा व येथील राण्यांचा कांहींच संबंध नाहीं. " या गोष्टीवर मुसलमान सरदाराचा विश्वास बसून त्या दोघींना दया करून त्यानें सोडून दिलें. पूर्वदिवशींच्या कत्तलींत त्या दोन्ही स्त्रियांचे पति ठार झाले होते. पुढें या गरोदर स्त्रीपासून राण्यांचा वंशविस्तार झाला. पण त्या ब्राह्मणस्त्रीचा नवरा दिवंगत झाल्यापासून हिंदळें गांवांत तिचा वंश पुढें राहिला नाहीं. राणेस्त्रीला जो मुलगा झाला त्यानें आपल्या हयातींत राणे घराण्याचें वजन वाढविलें व ज्या भैरवाच्या कृपेनें व एका ब्राह्मण स्त्रीच्या चातुर्यानें आपलें गर्भावस्थेंतील मरण टळलें त्या स्त्रीचें जें उपास्य दैवत भैरवदेव त्याच्या देवळाची डागडुजी केली व त्याच्या पुढील वंशजांनीं देवालय आणखी वाढवून त्याला सध्यांचें रूप प्राप्त करून दिलें. सदरील प्रसंगानंतर हा भैरवदेव सर्वांची ग्रामदेवता झाला. देवळाच्या व रस्त्याच्या बाजूस समाधीसारखीं जीं पुष्कळ स्मारकें दिसतात तीं वर सांगितलेल्या कत्तलींत ठार झालेल्या पुरुषांच्या ज्या स्त्रिया सती गेल्या त्यांचीं स्मृतिचिन्हें होत. पुढें लौकरच

मुसलमानांची व शिल्लक राहिलेल्या राण्याच्या पक्षाच्या लोकांची आपसांत राजी होऊन मुसलमान सरदारानें एका अटीवर सर्व तंट्याचा निकाल लाविला. ती अट अशी:-गांवच्या उत्सवाच्या वेळीं या प्रसंगाची स्मृति म्हणून एक लुटुपुटूची लढाई ( Mock fight ) हिंदूंनीं प्रतिवर्षी खेळावी. सदरहू प्रसंगाची आठवण म्हणून तेथील राणे वार्षिकोत्सवांत खोटी लढाई खेळत आले, तो प्रघात आजपर्यंत चालू आहे. या लढाईंत एका राण्यास ठार मारलासा करतात. त्याला भैरव देवासमोर आणून त्याच्यावर एक माच रचतात, त्या माचीवर थोडें गवत जाळलेसें करतात व त्यानंतर राण्यास खालून काढून घेऊन त्याला भैरवदेवाचा अंगारा व प्रसाद देऊन नंतर तो जीवंत झाला असें समजून सोडून देतात. हा प्रकार आज दिवसपर्यंत प्रतिवर्षी पहावयास मिळतो. वरील माहितीवरून हिंदळें हा गांव प्राचीन ऐतिहासिक महत्वाचा असल्याचें दिसून येतें.

---

## [ ८ ]

## कुणकेश्वर.

प्राचीन कुडाळ प्रांतात मोडणारें हें महादेवाचें सुप्रसिद्ध आणि पुरातन स्थान सध्यां रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुक्यांत मोडतें. हें स्थान कुणकेश्वर नांवाच्या गांवांत समुद्रकांठीं डोंगराच्या पायथ्याशीं उंचवट्यावर वसलेलें आहे. दक्षिण कोंकणांतील इतर प्रसिद्ध अशा शंकराच्या स्थानांत याची गणना होत असून त्याचा उल्लेख संगमेश्वर महात्म्यांतहि आला आहे. या स्थानाविषयीं प्राचीन असा लेख आढळत नाहीं. ‘ कुणुक ’ नांवाच्या वृक्षांची राई तिथें होती त्यावरून हें नांव त्या शंकराच्या स्थानास पडलें असें म्हणतात. आतां ही राई पार मोडून गेली असली तरी त्या जातींचे वृक्ष आजू बाजूस बरेच आढळतात.

देवालय अगदीं समुद्रकांठीं डोंगराच्या पायथ्याशीं सुमारें १५।२० फूट उंच चौथरा बांधून काढून त्यावर बांधिलें आहे. पश्चिमेस समुद्रालगत भक्कम दगडांचा दुहेरी तट आहे, त्यावर समुद्राच्या लाटा आपटून तटाचा भाग कोसळून खालीं पडत चालला आहे. पण आंतील तट अजून शाबूद आहे.

कुणकेश्वराचें स्थान इ. स. च्या ११ व्या शतकापूर्वींच प्रसिद्धीस आलें होतें यांत संशय नाहीं. त्याला दोन हजार वर्षें झालीं असेंहि कोणी म्हणतात. या देवस्थानाबद्दल सरकारी ग्याझेटिअरमध्यें पुढील माहिती दिलेली आहे:—

"The temple with granite foundation and catarite superstructure and dome is said to have been built by a Musalman trader. An inscription on a stone let in over the entrance states that it was repaired and enlarged by the Kolhapur Chief in 1680. A yearly fair held on the last day of Magha (February-March) attracts about 10,000 people, shops are opend and during the twenty days cloth and other miscellaneous goods to the value of from £ 1,500 (Rs. 15,000) to £ 2,500 (Rs. 25,000) are sold".

(Bombay Government Gazetteer, Ratnagiri and Savantwadi, Vol. X, Chapter XIV, P.342. 1880).

वरील उताऱ्यांत उल्लेखिलेली देऊळ व देऊळ बांधणाराविषयीं जुन्या काळापासून चालत आलेली दंतकथा अशी आहे:–

प्राचीन काळीं समुद्रांतून इराण व हिंदुस्थानचा व्यापार चालत होता. आफ्रिका, अरबस्थान, इत्यादि पश्चिमेकडील प्रदेशांचें जलमार्गानें हिंदुस्थानाशीं दळणवळण चालू होतें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. एकदां इराणचा एक मुसलमान व्यापारी जहाजांत माल भरून हिंदुस्थानच्या कोंकण किनाऱ्याकडे येत असतां वाटेंत किनाऱ्याच्या जवळपास त्याचें जहाज वादळांत मिळालें. आतां तरणोपाय नाहीं यासाठीं या ठिकाणीं जवळपास जो कोणी देव असेल त्यानें आपणास सुरक्षितपणें किनाऱ्यास लावावें व आपले प्राण वांचवावे, आपण तारवांतील संपत्ति खर्चून त्या देवाचा नवस फेडीन असा त्यानें श्रद्धायुक्त अंतःकरणानें संकल्प केला. सुदैवानें त्याचें तारूं माल–मनुष्यांसह सुरक्षित येऊन किनाऱ्यास लागलें. तो व्यापारी किनाऱ्यावर उतरल्यानंतर अगदीं

जवळ असलेल्या शिवलिंगाकडे त्याचें लक्ष गेलें. आणि याच देवाच्या कृपेनें आपले प्राण वांचले ह्मणून या हिंदूंच्या देवावर त्या मुसलमान व्यापाऱ्याची श्रद्धा बसली. त्यानंतर या व्यापाऱ्यानें जवळच्या संपत्तीचा व्यय करून श्री कुणकेश्वरावर एक भव्य देऊळ बांधिलें. हें काम पुरें होण्यास सुमारें तीन वर्षें लोटलीं. इतक्यांत, हा व्यापारी मूर्तिपूजक हिंदूंच्या देवाचें देवालय बांधीत असल्याची दुसऱ्या कोणी व्यापाऱ्यानें इराणच्या शहापर्यंत बातमी पोंचविली. आपल्या राज्यांतील प्रजाजन मूर्तिपूजकांचें देऊळ बांधतो ही गोष्ट शहास असह्य होऊन त्यानें या व्यापाऱ्याला पकडून परत इराणांत आणण्यासाठीं कांहीं अधिकारी पाठविले. ही मंडळी इराणांतून इकडे येऊन पोंचण्यापूर्वींच देऊळ तयार झालें होतें. शहानें पाठविलेले अधिकारी किनाऱ्यावर येऊन पोंचल्यावर या व्यापाऱ्याची खात्री झाली कीं आपण त्यांच्याबरोबर इराणांत परत गेल्यास शहा आपणास ठार मारणार; त्यापेक्षां ज्या देवानें आपले प्राण वांचविले त्याचा सहवास सोडून जावूं नये. असा त्यानें निश्चय केला, आणि त्या भावनेंत देवळाच्या उंच मनोऱ्यावर चढून तिथून उडी टाकून त्यानें प्राण दिला. त्याची कबर देवळाच्या उत्तरेच्या अंगास आहे. या कबरीचा वरील भाग घुमटाकृति असून आंतील थडगें शाबूद आहे.

देवालयाविषयीं इतर बारीक सारीक गोष्टी सांगण्यांत येतात, पण त्यांत ऐतिहासिक महत्वाचें असें कांहीं नसतें. कोणा ब्राह्मणाच्या गाईनें अदृष्टपूर्व अशा एकाद्या शिवलिंगावर आपल्या आंचळांतून दुधाचा अभिषेक करणें व मागाहून तें लिंग लोकांच्या लक्षांत येणें असल्या दंतकथा शंकराच्या कित्येक जुन्या देवस्थानांबद्दल सांगण्यांत येतात, तशीच एक गोष्ट कुणकेश्वराबद्दलहि सांगण्यांत येते. कुडाळ नजीकच्या **नेरूर** गांवांतिल ' **कालेश्वर** ' शिवलिंगाबद्दल आणि गोव्यांतील '**मंगेश**' नांवाच्या शिवलिंगाबद्दल (सध्या प्रसिद्ध असलेल्या नव्हे-जुन्या) हि अशाच गोष्टी सांगण्यांत येतात ! अशी गोष्ट आधारास धरून या मंगेश देवतेवर ' मंगेश महात्म्य ' नांवाच्या ग्रंथाची उभारणीहि करण्यांत आली आहे ! असो—

वर सांगितलेल्या मुसलमान व्यापाऱ्याच्या गोष्टीचा काल समजणें कठिण आहे. इतिहासदृष्ट्या ह्या गोष्टीचा तपास केल्यास त्यांतून बरेच वादग्रस्त मुद्दे निघूं शकतात, करितां त्या भानगडींत न पडतां इतकेंच ह्मणावें लागतें कीं कुणकेश्वराच्या देवाळावर कांहींसा मुसलमानी व बराच हिंदी संस्कार झाला आहे. त्या व्यापा-

त्याची कबर ज्या अर्थीं अगदीं देवळाच्या निकट आहे त्या अर्थीं त्याचा व कुणकेश्वराचा कांहींतरी संबंध होता असें ह्मणणें भाग आहे. देऊळ त्यानें बांधलें याबद्दल हिंदु–मुसलमानांत एकवाक्यता आहे. तेथील कित्येक मुसलमानांचें असें ह्मणणें आहे कीं, त्यानें हें हिंदूंचें देऊळ बांधल्याबद्दल त्यास मागाहून पश्चात्ताप झाल्यामुळें देवळाच्या मनोऱ्यावरून उडी टाकून त्यानें आत्महत्या केली; आणि हिंदूंचें ह्मणणें असें कीं तो कुणकेश्वराचा महाभक्त होता, त्यानें योगबलानें समाधि साधून आपला देह ठेविला. पहिलें कारण सयुक्तिक दिसत नाहीं. कारण, तसें असतें तर मुसलमानांनीं, पश्चात्ताप पावलेल्या या कट्टया मुसलमानाची कबर हिंदूंच्या देवळाच्या आवारांत बांधूं न देतां ती आपल्या कबरस्तानांत बांधली असती. ( पण या गोष्टीच्या वेळीं मुसलमानांचा प्रवेश कोंकणच्या या भागांत किंवा सिंध–मुलतान शिवाय उत्तरहिंदुस्थानच्या भागांत झाला होता किंवा नाहीं हाच मुळीं वादग्रस्त प्रश्न आहे. ) दुसरें कारण कांहींसें सयुक्तिक दिसतें. व्यापाऱ्याची श्रद्धा कुणकोबावर जडल्यामुळें त्यानें स्वतःची कबर देवळाजवळच बांधण्याची आपल्या हयातींत व्यवस्था करून ठेवल्यास त्यांत वावगें असें कांहीं नाहीं इराणच्या शहाची गोष्ट चिकित्सेला पटण्यासारखी नाहीं.

कुडाळ प्रांतांत कुणकेश्वराच्या देवळाइतकें विशाळ आणि भव्य दुसरें देवालय नाहीं. त्याची बांधणी तत्प्रांतस्थ इतर देवळांप्रमाणें नसून ती द्रविडियन ( दाक्षिणात्य ) पद्धतीची आहे ( छायाचित्र २६ पहा. ) मुसलमानांच्या मशिदींतील पायऱ्या बहुतेक गोल ( अर्धचंद्राकार ) असतात. क्वचित् चौफळहि असतात. निमाज पढण्याच्या जागेवरील ' मेहराब ' मात्र गोल असते. त्याप्रमाणें कुणकेश्वराच्या आंतल्या दरवाजासमोरील कित्येक पायऱ्या अर्धचंद्राकार राखिल्या आहेत. तसेंच बांधकामांत वापरिलेल्या शिला अजस्र असून त्या देवळाचा प्राचीनपणा दाखवितात. देवालयांत कोरींव काम बहुतेक नाहींच ह्मटलें तरी चालेल. क्वचित् ठिकाणीं मागाहून केलेल्या दुरुस्तीच्या वेळेच्या लांकडी तुळयांवर साध्या ओबडधोबड आकाराच्या पानांफुलांच्या आकृति दिसतात. बांधकामांत मोहकतेपेक्षां मजबुतीकडे विशेष लक्ष दिल्यामुळेंच अगदीं समुद्रकिनाऱ्यावरील हें विशाल देऊळ अजून टिकाव धरून राहिलें आहे. जुन्या देवळावर १७ व्या शतकाच्या अखेरीस शहालम मोंगलाची वक्रदृष्टी झाल्यामुळें त्याचा सभामंडपासारखा कांहीं

भाग त्यानें मोडला म्हणून करवीरकर संभाजी राजे व बावडेकर पंतअमात्य यांनीं तो दुरुस्त केल्याचें समजतें.

कुणकेश्वर हा गांव प्राचीन काळीं कुणकेश्वर देवास इनाम दिलेला होता. ( कोणी तें समजत नाहीं. ) ती इनामत इंग्रजी अंमलांत रद्द होऊन आतां फक्त वार्षिक ९९ रु. नेमणूक चालू ठेविली असल्याचें समजतें.

देवस्थानाकडे कागदपत्र विशेषसे नाहींत, कांहीं महत्वाचे होते ते सर्व गांवच्या कुळकर्ण्यानें गमाविल्याचें समजतें. बोंडाळे उपनांवाचे ( कऱ्हाडे ब्राह्मण ) त्या गांवचे खोत गांवचें उपाध्येपण करितात. त्यांच्या संग्रहांत कांहीं थोडे कागद आहेत, ते सर्व छत्रपति ( पहिले ) संभाजी महाराजांच्यानंतरचे. त्यांतील कांहीं माहितीः—राज्याभिषेक शक ४८ च्या करवीरकर संभाजी महाराजांच्या आज्ञापत्रांत " परिपत्यगार कारकून तर्फ साळशी... शाहाअलम मोंगल कोंकणांत उतरला होता, त्यानें कुणकेश्वरचें देऊळ जाळपोळ करून टाकलें. त्यानंतर रामचंद्र पंडित यांनीं चिरे व शिवार ( ? ) आणून ठेविले पण काम अनकूल परिस्थिति नसल्यामुळें चालू झालें नाहीं. "

राज्याभिषेक शक ५५ मध्यें शंभु छत्रपतीनें ( करवीरकर ) कान्होजी आंग्रे यांस " कुणकेश्वराच्या देवस्थानाच्या बाबतींत कांहीं भानगडी असल्यास त्या दूर करून त्यावर लक्ष ठेवावा " म्हणून हुकूम केला होता.

राज्याभिषेक शक ५५ मध्यें देवळांतील नागाची ( Snake image चांदीचा कीं सोन्याचा ? ) अफरातफर केल्याबद्दल तो भरून देण्यासाठीं बाळोपाध्यास सरकारचा हुकूम झाला होता.

खंडोजी माणकर सुभेदार प्रांत राजापूर याचें हुकूमपत्र गांवच्या फौजदाराकडे आहे, त्यावर मराठी दरबारचे शिक्के आहेत. त्या हुकुमाप्रमाणें तीनशें रुपये गांवचा दस्त देवस्थानास भोगावा असा परवाना आहे.

वर दिलेल्या ग्याझेटिअरमधील उताऱ्यांत सन १६८० त कोल्हापूरच्या राजानें देऊळ दुरुस्त केल्याचा उल्लेख आहे तो इतिहासास धरून नाहीं.

देवस्थानचा औरस चौरस घेर सुमारें पाऊण एकर असावा. गाभाऱ्याचें शिखर फार उंच असून तें बदामी आकाराचें बांधिलें आहे. देवालयाचे चार निर-

निराळ्या नांवाचे भाग आहेत. ( १ ) गाभारा, ( २ ) मुंगसाळ, ( ३ ) विश्रांति-स्थळ, आणि ( ४ ) सभामंडप. दक्षिणेच्या बाजूचा थोडा भाग नादुरुस्त झाला आहे. मुंगसाळीचें बांधकामहि अगदीं जीर्ण झालें आहे. कोंकणांत मिळणाऱ्या जांभे दगडांचा उपयोग देवळाच्या कामीं केला आहे, आणि बळकटीच्या ठिकाणीं काळी-थर दगड घातले आहेत.

या गांवचें प्राचीनत्व दाखविण्यास कुणकेश्वराशिवाय आणखी तीन वरींच मोठीं जुन्या बांधणीचीं देवळें आहेत. तटाबाहेर छोटा पण टुमदार असा जुन्या बांधणीचा एक तलाव आहे. पूर्वेकडील ओढयावर पूल आहे.

कुणकेश्वर हा देव ब्राम्हणांप्रमाणें कित्येक मराठे कुळांचाहि कुलदेव आहे. तेथील कांहीं मतमानकऱ्यांच्या यादींत देवशर्म्यांच्या ज्ञातीच्या ब्राम्हणाचें आज नांव नाहीं. पण शेजारीं असलेल्या **मुणगें** गांवांतील त्या ज्ञातीच्या '**महाजन**' घराण्याची उत्सवांत बसण्याची मानाची जागा ( लहानसा चौक ) व कुणकेश्वरास शिवरात्रीच्या दिवशीं मध्यरात्रीं करावयाचा अभिषेक इतका मान अद्यापि कायम आहे. हे महाजन मूळचे '**सामंत**' असून त्या गांवांतील त्यांची वसाहत कित्येक शतकांची आहे.

ग्याझेटिअरमध्यें सांगितलेली प्रचंड यात्रा महाशिवरात्रीनिमित्त भरत असते. या यात्रेच्या वेळीं कुडाळ, पाटण, साळस, सौंदळ येथील देव ( तरंग व पालख्या ) आपापल्या इतमामांसह कुणकेश्वरीं येत असतात. कुडाळचे देव अजूनहि जातात किंवा नाहीं, तें समजत नाहीं; पूर्वी मात्र प्रतिवर्षी यात्रेस आणि महापर्वकाळीं समुद्रस्नानास त्यांना जावें लागत असे.

## कुणकेश्वर येथील गुहा.

देवळापासून जवळच पूर्व दिशेस गेल्या तीन चार वर्षांच्या सुमारें डोंगराच्या उतरणीवर कांहीं लोक जमीन खणत असतां, पूर्वकाळपासून कित्येक शतकें बुजालेलें एका गुहेचें दार मोकळें होऊन आंत कोरींव पाषाणी मूर्ति आढळून आल्या. ही गुहा म्हणजे इतर कोरींव लेण्यांप्रमाणें एक लेणी आहे. पण यांतील मूर्ति मात्र गुहेच्या दगडांवर कोरलेल्या नसून त्या अलग आहेत. गुहेची खोली तिक-डच्या तांबड्या कापाच्या दगडाची असून मूर्तींचा दगड काळा-कालित्री-आहे. हा

काळा दगड त्या गांवांत समुद्राच्या कडेस आणि डोंगराच्या कड्यांत क्वचित् स्थळीं सांपडतो.

गुहेची खोली सुमोरें १० फूट लांब ८ फूट रुंद आणि सहा फूट उंच असून, पांच फूट उंच व तीन फूट रुंद असा दरवाजा आहे. आंत १८ कोरींव मुखवटे, शिवलिंग आणि नंदी मिळून वीस नग आहेत. मुखवट्यांची मांडणी जोडी जोडीनें केलेली आहे. ( छायाचित्र ३४ पहा ). पुरुष व स्त्री अशा आठ जोड्या, प्रत्येक जोडी एका निराळ्या बसकणींत बसविलेली आणि एक तरुण पुरुषाचा मुखवटा एका स्वतंत्र बसकणीवर वसविलेला आहे, व एका मुखवट्याचा पुढचा भाग फुटून नासधूस झाल्यामुळें तो पुरुषाचा किंवा स्त्रीचा हें नीट ओळखतां येत नाहीं. तथापि तो एका बाजूस ठेविला आहे. शिवलिंग आणि नंदी हे देखील काळ्या ( कालिंत्री ) दगडाचे असून गुहेंत प्रवेश केल्यावर तिच्या मध्यभागीं—पण जरा डाव्या बाजूस—ठेविले आहेत. स्त्री पुरुषांच्या आठ जोड्यांपैकीं, रांगेच्या मध्यभागीं बसविलेल्या दोन जोड्या इतर मुखवट्यांहून बऱ्याच मोठ्या आकाराच्या आहेत. प्रवेशद्वारावर बाहेरच्या दोन्ही बाजूंस दोन लहान कोनाड्यांत कालिंत्री दगडाच्या गणपतीच्या मूर्ति बसविल्या आहेत. गुहा दक्षिणाभिमुख आहे. मूर्तींचें स्वरूप, कोरींव काम, त्यांचा पेहराव, अलंकार, घाटाचें वळण आणि इतर कोरींव कामावरून स्वाभाविकपणें निघणारीं अनुमानें पुढें दिलीं आहेत.

ह्या मूर्ति म्हणजे देवतांच्या मूर्ति नसून राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचे ते मुखवटे आहेत. त्यांचें कोरींव काम उच्च दर्जाचें दिसून येतें. कौशल्यामध्यें ओबडधोबडपणा कमी असून रेखींव व सुबकपणाकडे कोरक्यानें चांगलेंच लक्ष दिलें आहे. पुरुषांच्या आकृति जरा मोठ्या असून त्या मानानें स्त्रियांच्या लहान आहेत. प्रत्येक जोडप्यास निराळी बसकण आहे. प्रत्येक मुखवट्याला राजास आणि राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांस शोभेल असाच पेहराव केलेला आहे प्रत्येक मुखवट्यास शिरपेंच, डोकीच्या एका बाजूस तुरा, भाल-प्रदेशापासून तहत डोक्याच्या मागील भागापर्यंत पोंचणारे मोत्यांचे पेड कोरींव कामांत दाखविले आहेत. शिरोभूषणें महाराष्ट्रीय वळणाचीं ( महाराष्ट्रीय राजांच्या पगड्यांसारखीं किंवा मंदिलासारखीं—होळकरी किंवा शिंदेशाही वळणाचीं ) नसून

डोक्यावर नीट बसणाऱ्या गोल आकाराच्या शिरस्त्राणांप्रमाणें आहेत. डोकीच्या मध्यावरून वर्तुळाच्या त्रिज्येप्रमाणें ( मुकुटांच्या शिरांप्रमाणे ) शिरोभूषणांच्या परिघास मिळणाऱ्या रेषा असून त्या देखील मोत्यांचे पेडच असावेत. तथापि तीं भूषणें मात्र मुकुटासारखीं खास नसावींत. इतिहासाच्या पुस्तकांतून कित्येक ठिकाणीं आढळून येणाऱ्या महाराणा प्रतापसिंहाच्या चित्रांत दाखविलेल्या त्याच्या शिरोभूषणा ( शिरस्त्राण ) मधील अगदीं वरचा अणकुचिदार भाग व कानांच्या खालील भाग काढिल्यास त्याचा जो आकार दिसेल तशा आकाराचीं हीं शिरस्त्राणें आहेत असें म्हणतां येईल. कित्येकांच्या मस्तकांच्या मागें बुचडा बांधल्याप्रमाणें केंसांचा उलट भाग फिरवून आणिला आहे. कानांच्या खालच्या पाळीस पैलू पाडलेल्या रत्नांचे अलंकार घातले आहेत. कानांच्या वरच्या भागीं साधारणतः मकराकार कुंडलें दाखविलीं आहेत. मुखवट्यांचे मागील भागसुद्धां व्यवस्थितपणें कोरलेले व साफसूफ केलेले आहेत. नाकें सरळ व उंच, मिशा आंकडेदार व पीळदार दाखविल्या आहेत. हनुवटीपासून कानाच्यापुढें येणाऱ्या व मस्तकावरून उतरून दाढीच्या केंसांत मिळणाऱ्या केंसांच आकार दाढीसह उठावदार, सुबक, प्रमाणशीर व शोभिवंत दिसतील असेच कोरिले आहेत. ( हे मठगांवच्या शिलालेखावर असलेल्या व इतर कोरींव पाषाणांवरील राजपुरुषांशीं अगदीं सारखे आहेत ). स्त्रियांच्या मुखवट्यांवरहि पुष्कळ अलंकार दाखविले आहेत. केंस व्यवस्थितपणें विंचरलेले, केंसांचा भांग आणि पिंपळपान साफ रेखीव असून " वेणीबंधाची " पद्धत सध्यांच्या महाराष्ट्रीय पद्धतीहून जरा निराळी आहे. बुचड्यासारखे केंस डोकीच्या मागच्या बाजूस जरा कसरून बाजूस बांधलेले, तर कांहींच्या डोक्यांच्या मागच्या बाजूस मस्तकास समांतर अशा चक्राकार वेण्या कोरल्या आहेत. कानांच्या खालच्या पाळ्यांत वर्तुळाकार मुद्रांसारखे अलंकार असून, नाक, तोंड, डोळे, भालप्रदेश हीं व्यवस्थित व प्रमाणशीर करण्यांत कारागिराचें कौशल्य दिसून येतें. स्त्रियांच्या डोक्यावरून महाराष्ट्रीय राजघराण्यांतील स्त्रियांप्रमाणें अर्धे अवगुंठण किंवा पडदा ( पदर ) दाखविलेला नाहीं. त्यांच्या मस्तकास दागिन्यांखेरीज निराळें शिरोभूषण असावें, पण त्याचें अनुमान होत नाहीं. अलंकार व आभरणें सामान्यतः ब्राह्मणी वळणाचीं आहेत.

बौद्धांच्या गुहेंतील आणि या गुहेंतील कारागिरीचें स्वरूप या दोहोंत पुष्कळच फरक आहे. बौद्ध गुहांतील मूर्ति गुहांतील भिंतीलाच आंगच्या दगडावर कोरलेल्या असतात व स्तूपासारख्या किंवा बुद्धदेवाच्या ध्यानस्थ प्रतिमा अथवा बौद्धभिक्षु–भिक्षुणींच्या प्रतिमा कोरलेल्या असतात. तद्वत् किंवा अन्य कोणतेंहि बौद्ध कारागिरीचें चिन्ह या गुहेंत नाहीं. येथील सर्व प्रतिमा बाहेरच्या दगडाच्या तयार करून भिंतीहून अलग अशा जागीं ओळीनें ठेवलेल्या आहेत. बौद्धांच्या किंवा जैनांच्या ( लिंगायतांचीं लेणीं असल्यास तीं आमच्या पाहण्यांत नाहींत ) कोरींव लेण्यांतील प्रतिमांस योध्यांचे पेहेराव आणि शिरोभूषणें कोरलेलीं नसतात. तीं या गुहेंतील सर्व पुरुषांस घातलेलीं स्पष्ट दिसतात.

मध्यभागीं शिवलिंग आणि नंदी यांच्या मूर्ति असून सभोंवार त्या देवताचे उपासक राजपुरुष व स्त्रियांचे पुतळे आहेत. त्यावरून ते कोणच्या तरी शिवोपासक आणि शिवोपासनाप्रवर्तक राजघराण्यांतील स्त्रीपुरुषांचे पुतळे असले पाहिजेत हें उघड आहे. १२ व्या शतकाच्या अखेरीस फोंफावलेल्या बसव्याच्या लिंगायत ( वीरशैव ) पंथांतील एकाद्या राजघराण्याचे ते द्योतक असतील अशी शंका घेतल्यास गुहेच्या द्वारावरील गणपतीच्या दोन मूर्तींवरून तिचें परस्पर निराकरण होण्यासारखें आहे; कारण लिंगायत पंथाच्या उपासनेंत गणपतीला स्थळच नाहीं. यावरून या प्रतिमांशीं लिंगायतांचा काडीचाहि संबंध नाहीं हें उघड आहे. जवळच कुणकेश्वराचें शिवलिंग आहे, त्याच्या कोणी राजपदाधिष्ठित उपासक घराण्यानें आपल्या राज्यांत शिवोपासनेचा फैलाव व्हावा ह्मणून सबंध राजकुटुंबाचें प्रत्यक्ष उदाहरण जनतेसमोर ठेवावें व हा मार्ग आपल्या पश्चातहि इतरांनीं चोखाळावा या हेतूनें स्वतःच्या घराण्यांतील मंडळीचें प्रत्यक्ष उदाहरण ह्मणून ह्या प्रतिमा कोरून गुहा बांधून तींत ठेविलेल्या दिसतात. अर्थात तत्पूर्वी त्या बाजूस शिवोपासनेला कोणत्यातरी अवैदिक पंथाच्या लागलेल्या धक्क्याचा राजसत्तेच्या जोरावर प्रतिकार करून ब्राह्मणी धर्मांच्या शिवोपासनेचा फैलाव करणाऱ्या सत्ताधारी राजघराण्यानें स्वतःच्या ( किंवा आपल्या पूर्वजांच्या ) स्मारकाच्या ह्या प्रतिमा करून ठेवल्या होत्या असा तर्क करण्यास हरकत नाहीं. आपल्या मानवी देहाच्या प्रतिमा आपल्या उपास्य देवतेच्या ( कुणकेश्वराच्या ) देवालयांत ठेवणें अप्रशस्त वाटल्यावरून उपासनेला एकांत अशी जागा डोंगरांत शोधून काढून तिथें गुहा

खोदून तींत मुद्दाम निराळें शिवलिंग व नंदि यांची स्थापना करून सभोंवार आपल्या घराण्यांतील मंडळींच्या प्रतिमा ठेविलेल्या दिसतात.

एकंदरींत पाहतां ह्या प्रतिमा सनातन वैदिक अथवा ब्राह्मण धर्मानुयायी राज-घराण्यांतील स्त्रीपुरुषांच्या आहेत असें ह्मणण्यास हरकत नाहीं. अलीकडे ही गुहा उघडल्यानंतर तिकडील लोक त्या पुतळ्यांना देवता समजून त्यांची नित्य पूजा करितात. पांडवांच्या वेळच्या त्या असाव्या अशीहि कित्येकांनीं कल्पना केलेली दिसते. तिच्यांत कांहींच अर्थ नाहीं. आमच्या तपासांत तत्प्रांतांतील आणखी एक गुहा व शिवोपासकांचीं एक दोन स्थळें आलीं आहेत, त्यांची शहानिशा केल्यानंतर त्यांवर एकादा लेख प्रसिद्ध करतां येईल.

---

## [ ९ ]

## पंच महाशब्द.

हें पद अनेक राजांच्या बिरुदावळींत असतें, परंतु त्याच्या अर्थाबद्दल मात्र विद्वानात निरनिराळीं मतें आढळतात. देमराजाचा समकालीन आणि कुडाळ प्रांताच्या उत्तरेस राज्य करणारा कांवदेव ( कामदेम ) चालुक्य याच्या केशव महाजनी नावाच्या महामात्यानें तेरवण ( तेरवाटक–राजापूर ) येथील विमलेश्वर देवाला दिलेल्या दानपत्रांत ( ताम्रपट ) कामदेवाला महामंडलेश्वर आणि पंचमहाशब्दांचा अधिकारी म्हटलें आहे. त्याचा अर्थ त्याच्या बिरुदावळींतील शब्दाला अनुलक्षून ( १ ) रायधरणी, ( २ ) वराहराय, ( ३ ) बटकार रिपुराय, ( ४ ) साहसमल्ल, आणि ( ५ ) श्रीकामदेवराय, असा सिलेक्शन्स रेकॉर्ड्स बॉ. ग. नं. १० मध्यें दिला आहे. हा अर्थ बहुधा कै. वा. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांनीं लाविलेला दिसतो, पण तो बरोबर दिसत नाहीं. कारण पंचमहाशब्दांच्या अधिकारी सर्वच राजांना वरील विशेषणें लाविलेलीं आढळत नाहींत, तीं फक्त या चालुक्यवंशी कामदेवाला आणि त्याच वंशांतील महामंडलेश्वर श्री बप्पदेवराय याला ( श. ११८१ च्या ताम्रपटांत ) लाविलेलीं आढळतात. या दुसऱ्या ताम्रपटांतील पंचमहाशब्द म्हणजे **शृंग, शंख, भेरी, विजयघंटा** व **तम्मट** हे होत असें कै. वा. गोविंदराव काशिनाथ चांदोरकर यांचें मत आहे; तें पटण्यासारखें आहे.

१ भारत-इतिहास-संशोधक मंडळ, तृतीय-संमेलन-वृत्त, शके १८३७

चंदभाटकृत पृथ्वीराजरासांत पृथ्वीराजाच्या ह्यातींत राजवाड्यासमोर रोज पांच वेळ निरनिराळ्या वाद्यांची नौबत होत असे असा उल्लेख आहे. त्याला मि. एफ. एस. ग्रोव्ह्ज् हे " The noise of the five kinds of music and auspicious songs " म्हणतात[1].

हिंदूराजांची ही नौबतीची पद्धत कलबुर्ग्याच्या ( पहिल्या ) महमदशहानें ही आपल्या वाड्यासमोर चालू ठेविली होती असें फेरिस्ताचें मत आहे.

डॉ. फ्लीट आणि रा. ब. शंकर पांडुरंग पंडित यांच्या मतें ( निश्चित नव्हे ), महाराजा, महामंडलेश्वर इत्यादि ' महा ' शब्दानुगामी विशेषणें म्हणजे महाशब्द होत. हेंहि मत ग्राह्य धरतां येत नाहीं.

दाशरथी रामचंद्राच्या विवाहसमयीं ' पंचध्वनीं ' चा निनाद आणि मंगल गायन झाल्याचें वर्णन गुसांई तुलसीदास यांनीं केलें आहे. हे पंचध्वनि म्हणजे बंदी, शंख, निषाण, जयघोष आणि वेद असा श्रीयुत यादव शंकर जहागीदार यांनीं ( तुलसीकृतरामायण पृ. २५८ ) आणि हरिप्रसाद भगीरथजींच्या प्रतींत ( पंच शब्द धुनि=ध्वनि ) वेदधुनि, बंदिजनधुनि, जयधुनि, शंखधुनि आणि बाजाओंकीधुनि असा अर्थ दिला आहे

या सर्व अर्थांतून निवड करणें विद्वानांचें काम आहे. आम्हांस कै. वा. चांदोरकरांचा अर्थ ग्राह्य वाटतो.

---

## [ १० ]

## कुडाळ.

कुडाळ शहर दोन नद्यांच्या संगमावर वसलेलें आहे. कानडी भाषेत अशा संगमाला ' कुडाल ' असें ह्मणतात. प्राचीनकाळीं कानडी प्रांतस्थ ( बदामीचे ) पूर्वकालीन चालुक्यांच्या साम्राज्यांत हा प्रांत मोडत असल्यामुळें त्यांच्याकाळीं या शहरास वरील संगमावरून ( Confluence of rivers ) ' कुडाळ ' असें नांव प्राप्त झालें असावें.

परान्त आणि अपरान्त या कोंकणच्या प्राचीन भागांपैकीं अपरान्ताच्या एका भागाला ' कुट्टापरान्त ' किंवा ' कुट्टापरान्तक ' ह्मणत. ' कुट्ट ' हा शब्द कुडाळ

---

१ Ind Ant. Vol. V.

या शब्दांतील 'कुड' या शब्दाशीं अत्यंत सदृश दिसत असल्यामुळें कुट्टापरान्त हें दक्षिण कोंकणांतल्या कुडाळचेंच प्राचीन नांव ठरतें.

इ. स. च्या १२ व्या शतकांत या कुडाळचें 'कुडुवलपत्तन' असें नांव असल्याचें देमराजाच्या ताम्रटपावरून दिसतें.

बहामनी शहांनीं तो भाग जिंकून घेतल्यावर कुडुवलपत्तनाचें 'कुडाळ प्रांत' असें नांव प्रचारांत आल्याचें दिसतें.

प्रसिद्ध मुसलमानइतिहासलेखक फेरिस्ता ( याचें पूर्ण नांव महंमद कासीम फेरिस्ता, हा विजापूरकर दुसरा इब्राहीम अदीलशहा–१५८०–१६२६–च्या वेळीं विजापुरास होता; त्यानें आपला इतिहास विजापुरांत लिहिला ) यानें कुडाळचा उल्लेख 'कुंडवाल' असा केला आहे.

भूषणकवि विरचित 'शिवराजभूषण' काव्यांत, शिवाजीनें खवासखानाबरोबर दिलेल्या कुडाळ येथील लढाईच्या वर्णनांत 'कुडाळ' चा उल्लेख आहे.

संगमेश्वर महात्म्यांत कुडाळ शहरांतील मुख्य देवस्थानचा उल्लेख 'कुद्दालेश' या नांवानें केला आहे. देवाला हें नांव कुडाळ शहरावरून प्राप्त झालेलें दिसतें. रूढ नांव 'कुडाळेश्वर' असें आहे. अर्थात हें देवस्थान उक्त महात्म्यांत उल्लेखिलेल्या, हरेश्वर, त्र्यंबकेश्वर, धोपेश्वर, कुणकेश्वर या ईशांत स्थानांप्रमाणें शिवलिंगाचें स्थान असावयास पाहिजे. पण आज कुडाळेश्वराच्या गाभाऱ्यांत शिवलिंगाची प्रतिमा दिसत नसून तिच्या जागीं एक चतुर्भुज–सायुध ( त्रिशूल, डमरु, भिक्षापात्र आणि भाला=झेंडा ) अशी मूर्ति स्थापन केलेली आढळते ! तिलाच कुडाळेश्वर ह्मणण्याचा सध्या प्रघात आहे. प्राचीन कुडाळ प्रांताच्या परिकरांत शिवाचीं प्राचीन मानलेलीं अशीं बरींच स्थानें आहेत, त्यापैकीं ( १ ) कुडाळ नजीकच्या नेरूर गांवीं 'कालेश्वर' ( कलेश्वर ), दोन अडीच मैलांवरच्या बांबुळीं गांवीं रामेश्वर, ( ३ ) आकेरी गांवात रामेश्वर, ( ४ ) गोळवणांत गौतमेश्वर, ( ५ ) आचऱ्यांत रामेश्वर ( ६ ) मठगांवीं मांगलेश्वर ( स्वयंभु ), इत्यादि स्थानें शिवलिंगाचींच असतां या प्राचीन राजधानीच्या शहरांतील मुख्य देवस्थान चतुर्भुज कां असावें हा प्रश्न इतिहासदृष्ट्या महत्वाचा आहे. सध्यांच्या कुडाळेश्वराचें ध्यान त्या प्रांतीं आढळणाऱ्या 'भैरव' किंवा 'रवळनाथ' नामक देवतांशीं बरीच साम्यता दर्शविणारें आहे असें समजतें. ही मूर्ति कुडाळापासून ८।१० मैलांवर सह्याद्रीच्या नजीक असलेल्या नारूर गांवांतून दोन सवादोनशें वर्षांच्या सुमारास आणून कुडाळेश्वराच्या देवळांत पूजेस लाविली आहे असें ऐकितों.

[ ११ ]

# A DATE FOR VERIFICATION.

SAMVAT "CHITRABHANU" SAKE 1317 ADIK BAHULA 3 THURSDAY.

(Verified by Dr. V. G. Rele, L. M. & S., F. C. P. S.)

*References are from "Indian Ephemeris" Vol. I, Part I, by Pillai.*

At the very outset this date creates a difficulty in verification in not mentioning a Lunar or Solar month in a language with which we are acquainted. In Marathi language the word आदिक to all outward appearance is suggestive of अधिकमास but then there ought to be a name of some Lunar month to go with it. The date is carved on a stone slab and as such it must have been given to the carver by some Shastri and he would not make a mistake of replacing "अ" of अधिक by आ and धि by दि and it is not likely he should have forgotten to write the Lunar month either before or after आदिक. If we refer to Tab. II we find that in Säke 1317 there is no अधिकमास. The word then in the date is not put there for the Intercalary month as some* have tried to interpret.

Another interpretation that one could possibly put on आदिक is, the first month of a year—(आदि) means first; 'क' perhaps has no meaning. In some places year begins with the Lunar month Chaitra (चैत्र); while in other places it begins with

* रा. रा. वि. का. राजवाडे: (पहा मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ८ वा. पृ. ३३. ग्रंथकर्ता.)

the Lunar month Kartika (कार्तिक). If we take the first month to be Chaitra (चैत्र), then in the Shaka mentioned, Bahula or Krishna 3 does fall on week day Thursday but the Samvatsara is वृष according to Southern cycle and Yuva (युवा) according to Northern cycle and not Chitrabhanu. If the first month be Kartika (कार्तिक) then on the Tithi mentioned week day is Sunday (*Indian Ephemeris, Vol. 4*).

I think the word Adik (आदिक) is itself a name of Solar or Lunar month in some other language than we know of. In Tamil language there is a Sölar month Adi (आदि) which corresponds to our Solar month Kirka (कर्क). If we take Adik (आदिक) to be Adi (आदि) where was the necessity of adding 'क' to Adi (आदि)? Is it there a redundant addiment or is used there to acquire the sense of that leads, proceeds, heads, introduces, or originates? If we take 'क' to be an addition without any meaning, then the Lunar month going with the Solar Kirk (कर्क) or Adi will be either Ashadha (आषाढ) or Shravan (श्रावण) but the Bahula 3 will be mostly that of Ashadha and not of Shravan as the Lunar months begin and end somewhere in the middle of Solar months. If 'क' be taken as having a meaning mentioned above, then the date for verification will read as follows: Thursday Bahula 3 of that Lunar month which originates in Solar Adi or Kirk and that month will necessarily be Shravan. Had the Solar date corresponding with the Lunar Tithi been given, we could have known which of the two Lunar months mentioned above we have to take in the verification of the date; but that too is not given. From mention of the word

Adi or Adik in the date one could infer that the date given is taken out of a Tamil Panchanga (पंचांग) which is based on Arya-Siddhanta ( आर्यसिद्धान्त ). The countries where this Siddhanta is used are Malbar, Kochin, Travancore, the Tamil Districts, and part of South Kanara. The foregoing calculations are therefore done according to Arya-Siddhanta (eye-table).

The Astronomical commencement of a Solar month is the moment of Sankranti and though the moment of Sankranti is the same all over India for the same Siddhanta the commencement of the corresponding months for civil purposes is not necessarily the same all over India, and for this reckoning certain definite rules for certain countries are given by **" Sewell** and **Dixit "** in their **" Indian Calander "**. I will here make use of the Tamil rule, for fixing the moment of Sankranti. The rule is, when the fraction of a day at which Sankranti occurs, does not exceed 30 Ghatikas the Solar month begins on the same day and when it exceeds 30 Ghatikas the Solar month begins on the next day, *i.e.*, when the fraction of a day is less than, .500, deduct the fraction from the actual moment of Sankranti; but when the fraction of a day is over .500 add the compliment of the fraction to the actual moment of the Sankranti and carry it on to the next day.

Shake 1317 corresponds to A. D. 1395. The commencement of the Solar year is on March 26·87, the first new Moon in the Solar year is 24.34 days after the commencement of Solar year and the Anamoly of 1st New Moon is 5.81 days. In the verification of the

dates, Sun's equation or Moon's Anamoly need not be taken into account as their omission will only cause a difference of 1 Ghati in the ending moment of a Tithi.

Adi or Kirk Solar month lasts from 93.93 to 125.40 days of Solar year. The Lunar month which must begin in this period when there is no Intercalary month (अधिकमास) is Ashadha (eye-Tab. Sec. B.) and Ashadha in this particular year would begin 59.06+24.34=83.40 days later than the Solar year. The interval from Ashadha New Moon to the end of Bahula 3 Tithi is the duration of 18 Tithis or 17.72 days. (eye-Tab. Sec. D). The total number of Solar days would then be 83.40+17.72=101.12; to this we add one more day as the fraction of a day of Kirk Sankrant is over. 50 (93.93+.87 fraction of a day at the beginning of Solar year=94.80). This gives us 102 days. Add to it the days of the beginning of Solar year March 26+102=128 days from the beginning of 1st March. Now by eye-Tab. Sec. q. March 1st to July 1st=123 days. Therefore 128th day from March 1st to July 1st+5=6th July; for the week day we have for 6th July 1395 by eye Tab. Sec. J. 0+6+5+6=17÷7 leaves remainder 3, *i.e.*, Tuesday. Thus by taking Ashadha Bahula 3 for verification the week day is Tuesday for the Tithi mentioned, which does not tally with the week day given in the date.

We will now try to see whether the week-day Thursday given in the date corresponds to the Bahula 3 of Shravana. Sharavana in this particular year will

begin 88.59+24.34=112.93 days later than the Solar year (eye Tab. Sec. B). To this add 17.72 days for the 18 Tithis, the total number of days would then be 112.93+17.72=130.65. To this add 1 day for Tamil usage as the fraction of a day of Kirk Sankrant is over 50 and by adding the days of the beginning of Solar year we get March 26.87+130.65+1=158.52 days from 1st March. And in the year 1395 A.D. 158th day from 1st March falls on Thursday (eye Tab. Sec. Q and J). So far Thursday Bahula 3 of that Lunar month which originates in Solar Adi of Tamil countries is correct in its citation.

We have now to see whether the Samvatsar ( संवत्सर ) Chitrabhanu is correct for that Saka. Here again a difficulty presents itself. There are different practices of reckoning Samvatsaras, Southern and Northern. In Southern India and more particularly in Deccan the cycle of 60 years, is really a cycle of Solar years and each year in the cycle receives a name corresponding to the names of years of Jovian cycle beginning with ( प्रभव ) Prabhav. While in the Northern India the Samvatsara cycle is of real Jovian years, and the names of the years in the cycle start with Vijaya ( विजय ). In this again there are two modes of citation. In the first mode Jovian years actually completed at the beginning of the Solar year are cited and in the second mode the Jovian years completed at the actual moment are quoted. We have to ascertain which of the three modes is used in arriving at the Samvat Chitrabhanu in the date given for verification. Samvat of the Southern

cycle current at the particular year or Saka can be found by addition of 54 to A. D. year or by addition of 12 to Saka Era and dividing the results by 60; the remainder will show the Samvat current on that Saka. The Samvat current on Saka 1317 according to the rule mentioned is Yuva ( युव ) Tab. I page 195. This does not agree with the Samvat mentioned in the date. It may be that the Samvat mentioned is the actual Jovian year of the Northern cycle current at the beginning of a Solar year (मेषार्क ). In this mode of citation there is a chance of a whole Samvatsara being suppressed. The formula to find the real Jovian year current at the beginning of a Solar year, according to Ketkar is as follows :—

Samvat=( 18.0050+1.0117 ( A. D. years–831 ) ÷ 60

Putting A. D. years in its place in the above formula and solving it we get :—

Samvat=( 11.0050+1.0117 × 564 ) ÷ 60.

=588.600 ÷ 60 = Remainder 48.60 Vrisha ( वृष ).

Here the Samvat obtained is for the beginning of the Solar year. This again does not agree with the citation given ; it falls short by one Samvat. We will now see whether the Samvat given is for actual moment. To do this calculate the interval from the beginning of Solar year to the actual moment, either in Tithis or in days and divide the interval in Tithis by 367 or that in days by 361 and then add the quotient to the Samvat at the beginning of a Solar year. The total number of days from the beginning of a Solar

year to the actual moment, *i.e.*, Bahula 3 of Shravan is as shown before 131.65 days. This divided by 361 gives a quotient .364. This added to 48.600+.364=48.964 gives Vrisha ( वृष ) as Samvat even at the actual moment. Thus though the week day tallies with the citation yet the Samvatsara does not. There are about 12 days short to reach Samvatsara Chitrabhanu.

Neither Ashadha nor Shravan Bahula 3 tallies with all the citations given in the date.

We have now to see whether Adik is really a name of a particular Lunar month that we know of. If a search be made in the *Indian Ephemeris Vol. IV* we find that it is only in the Lunar month of Bhadrapada ( भाद्रपद ) after the Lunar month of Shravan that the Bahula 3 falls on Thursday. We need not take into consideration months before Shravan as the Samvat for actual moment in these months before Shravan will be Vrisha as calculated above. The Solar month going with Bhadrapada is Sinha or Avani of Tamil countries and it lasts from 125·40 to 156·43 days of solar year. Bhadrapada Bahul 3 will be 118.12+24.34+17.72=159.18 days from the beginning of Solar year. As the fraction of a day of Kanya Sankrant is less than ·50 we need not add a day for Tamil usage. Add to these the days of the beginning of Solar year March 26·87+159·18=186·05. From March 1st to September 1st=185 days then 186th day will fall on 2 September 1395 A. D *i. e.* on Thursday ( eye Tab. sec. J). The total number of

days from the beginning of Solar year to the actual moment are 159.18; these divided by 361 give a quotient .440 which added to Samvatsara of Meshadi (मेषा ) gives 48.600+.440=49.040, *i.e.*, Chitrabhanu as Samvatsara current at the actual moment. We thus find that by taking Adik to be a name of Lunar Bhadrapada the date given above is correct in all its citations.

By summerising the different interpretations that are put on Adik we get the following results.

Adi (k) आदि (क)=1st month of a year either Chaitra or Kartika.

Chaitradi=Thursday Bahula 3 Samvat Vrisha.

Kartikadi=Sunday Bahula 3 Samvat Chitrabhanu.

Adik=Having the sense of that leads, originates, etc. Shravan Thursday Bahula 3 Samvat Vrisha.

Adi=Tamil Solar month

Ashadha Tuesday Bahula 3 Samvat Vrisha.

Adik=Name of the Lunar month Bhadrapada.
Bhadrapada Thursday Bahula 3 Samvat Chitrabhanu.

Lunar months receive their names from the Nakshatras and two Bhadrapada Nakshatras from which Bhadrapada, (Lunar month) receives its name are thus pronounced in Tamil language Purattadi and Uttirattadi, *i.e.*, these end in Adi (आदि) and thus perhaps Adik a short name corresponds to our Lunar Bhadrapada in Tamil language.

I am, therefore, inclined to put the last interpretation on the word आदिक and with this interpretation alone, the date given for verification is correct in all its citations.

REFBK-0002812